



प्रसिद्धी व माहिती अधिकारी, वन विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## वन्य प्राण्यांकडून होणारे नुकसान व त्यासाठी शासनाकडून मिळणारी आर्थिक भरपाई ..

" साहेब ! साहेब ! ओ रेंजर साहेब !!!

गाय मारली माझी गाय ! " एक आदिवासी ओरडत येतो.

" अरे ! कोणी मारली ? " रेंजर साहेब.

" बिबट्यानी मारली बघा साहेब ! हे माझ्या डोळ्यां देखत, काल रातच्याची गोष्ट बघा ! " आदिवासी.

" अस्सं ! चल, चल मला जागा दाखव बघू ! " रेंजर साहेब.

" माझं लई नुकसान झालं साहेब ; दुभती गाय होती बघा ! " आदिवासी.

" अरे ! हो हो ! एवढी काळजी करू नको. बिबट्यानच गाय मारली असेल तर माझ्या खात्याकडून तुला नुकसान भरपाई मिळेल. पण मला आधी खात्री केली पाहिजे. बस बघू तू गाडीत. आपण आधी जागेवर जावून पंचनामा करू " रेंजर साहेब. सर्वजण गाडीत बसतात.

" हं सांग बघू मला आता सर्व काही " रेंजर साहेब. आदिवासी सर्व प्रसंग सांगतो.

" ठीक आहे ठीक आहे ! अशा प्रकारे वन्यप्राण्याने पाळीव जनावर मारलं तर नुकसान भरपाई माझं खातं देईल. सांगितलना एकदा मी तुला." रेंजर साहेब.

" खरं आहे साहेब, पण मला किती पैसे मिळतील साहेब ? माझी गाय दुभती होती बघा." आदिवासी.

" अरे! कळलं मला, तुझी गाय दुभती होती ते. म्हणून काय तुला ५००० रू. मिळणार नाहीत." रेंजर साहेब.

" पण साहेब जास्तीत जास्त किती पैसे मिळतील ? तेव्हढं तरी सांगाकी. " आदिवासी.

" हे बघ नियमानुसार कोणत्याही वन्यप्राण्यानं पाळीव जनावर मारलं. तर जास्तीत जास्त ही रक्कम मिळू शकते."

### अ] वन्यप्राण्याने पाळीव जनावर मारल्यास मिळणारे अर्थसहाय्य.

| | | |
|---|---|---|
| १) | गाय, बैल, म्हैस या पाळीव जनावरांसाठी | बाजार भाव किंमतीच्या ७५% अथवा रू. ३,०००/- या पैकी कमी असणारी रक्कम. |
| २) | मेंढी, बकरी व इतर पशुधन यासाठी | बाजार भाव किंमतीच्या ७५% अथवा रू. १,०००/- या पैकी कमी असणारी रक्कम. |

" साहेब ! वाघाला मी हाकलून लावलं बघा. पण वाघानं माझ्यावर हल्ला केला असता, मला मारलं असतं तर काय झालं असत हो ? तुमच्या खात्यानं. दिला असता का पैका ? " आदिवासी.

" हो तर ! माणसाला वाघ, बिबट्या, अस्वल, गवा, रानडुक्कर, तरस, कोल्हा व रानकुत्रे या वन्यप्राण्यांनी जखमी केलं, मारलं तरी माझं खातं नुकसान भरपाई देतं. हे बघ एवढे पैसे देण्याची तरतूद केली आहे सरकारनं." रेंजर साहेब.

### ब] जीवीत हानी झाल्यास मिळणारे अर्थसहाय्य.

| | | |
|---|---|---|
| १) | मृत किंवा कायमचे अपंगत्व आलेल्या प्रौढ व्यक्ती. | रू. ४०,०००/- |
| २) | मृत किंवा कायमचे अपंगत्व आलेले १८ वर्षा खालील मूल. | रू. २०,०००/- |
| ३) | गंभीररित्या जखमी झालेली व्यक्ती. | रू. १३,५००/- |
| ४) | किरकोळ जखमी झालेल्या व्यक्तीस औषधोपचारासाठी. | रू. २,०००/- |

" साहेब ! कधी मिळणार ओ मला पैका ? " आदिवासी.

" व्वा ! वाघानं जनावर मारून एक दिवस पण झाला नाही आणि लगेच तुला नुकसान भरपाई पाहिजेल व्हयं. अरे इतक्या लगेच नाही मिळत नुकसान भरपाई. त्याचेही काही नियम आहेत. चौकशीची पद्धत आहे. सर्व झाल्यावर मिळेल की तुला नुकसान भरपाई. " रेंजर साहेब.

" साहेब काय नियम आहेत ते तरी सांगा की." आदिवासी.

" हे बघ, नियम व अटी अशा आहेत." रेंजर साहेब.

१) वन्यप्राण्यांकडून झालेला हल्ला हा सदर व्यक्तीने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या तरतूदींचा भंग करताना झालेला नसावा.

२) जर जनावर अनधिकृतरित्या त्या वनक्षेत्रात चरत असताना वन्यप्राण्याने मारले तर त्या जनावराच्या मालकास भरपाई देण्यात येणार नाही.

३) वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे मृत झालेल्या व्यक्तीला द्यावयाचे आर्थिक सहाय्य त्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसालाच देण्यात येईल.

४) जखमी झालेल्या व्यक्तीने शक्यतो औषधोपचार शासकीय / जिल्हा परिषद रूग्णालयात घ्यावा मात्र खाजगी रूग्णालयात औषधोपचार करणे अगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रू. २,०००/- प्रति व्यक्ती अशी राहील.

५) मारलेल्या जनावरावर विष टाकू नये. जनावराचा ज्या ठिकाणी मृत्यू झाला त्या ठिकाणापासून १० कि.मी. भागात कोणत्याही वन्यप्राण्याचा सहा दिवसांच्या आत विष टाकून मृत्यू झाल्यास नुकसान भरपाई मिळणार नाही. बऱ्याचवेळा वाघाने मारलेले जनावर जागेवरून हलविले जाते. त्याची कातडी काढली जाते किंवा वाघ जनावर खात असेल तर त्याला हुसकावून लावले जाते. त्यामुळे वाघ तेथून निघून गेला तरी इतर ठिकाणी जावून लगेच तो दुसरे जनावर मारतो, पर्यायाने लोकांचे जास्त नुकसान होते. हे लक्षात घेऊन शक्यतो वाघाने मारलेले जनावर त्याला पूर्ण खावू द्यावे. तो पर्यंत माणसांनी त्या ठिकाणी जाऊ नये.

६) वन्यप्राण्याने जनावरास मारलेल्या तारखेपासून ३ महिन्यांचे आत नुकसान भरपाई मंजूर करण्यात येईल.

" हे झाले नियम व अटी याशिवाय लोकांची काही कर्तव्ये सुद्धा आहेत." रेंजर साहेब.

" आमची काय कर्तव्ये आहेत साहेब ? " आदिवासी.

### लोकांची कर्तव्ये

१) हल्ला झालेल्या व्यक्तीने त्यांच्या नातेवाईक मित्रांनी हल्ला झाल्यापासून ३६ तासांच्या आत नजीकच्या वन अधिकाऱ्याला, कर्मचाऱ्याला कळवावे.

२) जनावरावर हल्ला झाला असल्यास जनावर मेल्यापासून ४८ तासांच्या आत जवळच्या वन अधिकाऱ्याला, कर्मचाऱ्याला कळवावे.

३) वन्यप्राण्याने ज्या ठिकाणी जनावर मारले त्या ठिकाणावरून जनावराचे शव हलवू नये.



" साहेब ! तुम्ही लोकांसाठीची कर्तव्ये, नियम व अटी सांगितल्या. तसेच आमच्यासाठी काय आदेश आहेत ते पण एकदा समजावून सांगा की. ".... वनरक्षक.

### वन कर्मचारी / अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही

१) वन्यप्राण्यापासून जीवीत हानी झाल्यास, हल्ला झाल्यापासून तीन दिवसांच्या आत स्थानिक वनक्षेत्रपाल यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन झालेल्या हल्ल्याचा पंचनामा करावा. पोलिस उप-निरीक्षक यांनाही पंचनामा करण्याचा अधिकार आहे.

२) वन्यप्राण्याने जनावर मारले असल्यास, वनपालांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तातडीने पंचनामा करावा तथापी जनावराचा मृत्यु कोणत्या वन्यप्राण्यामुळे झाला याची तपासणी वनक्षेत्रपाल यांनी करावी.

३) जनावराचा ज्या ठिकाणी मृत्यु झाला त्या ठिकाणा पासून १० कि.मी. च्या परिसरात कोणत्याही वन्यप्राण्याचा ६ दिवसांपर्यंत विष देवून मृत्यु झालेला नाही असा संबंधीत क्षेत्राचे वनरक्षक यांनी दाखला द्यावा.

४) वन्यप्राण्यामुळे व्यक्ती मृत अथवा जखमी झाली असल्यास त्याची तपासणी सक्षम राजपत्रित वैद्यकीय अधिकारी [ज्याचा दर्जा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या (मेडिकल ऑफिसर) खालचा नाही] यांचे कडून करून, लेखी प्रमाणपत्र प्राप्त करावे.

५) वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे जखमी झालेल्या व्यक्तीला देण्यात येणारी आर्थिक सहाय्याची रक्कम खुद्द जखमी व्यक्तीलाच द्यावी.

६) मारलेल्या जनावराची दक्षतापूर्वक पहाणी करून वनक्षेत्रपाल यांनी बाजारभावाप्रमाणे जनावराची किंमत निश्चित करावी व शक्यतो पंचनाम्यामध्ये किंमतीचा उल्लेख करावा.

७) वन्यप्राण्याने माणसावर हल्ला केल्यास किंवा पाळीव जनावर मारल्यास त्याचे वृत्त वनक्षेत्रपाल यांनी वनसंरक्षक, उप-वनसंरक्षक यांना तात्काळ कळवावे.

८) मारलेल्या जनावराचे व्यवस्थित निरीक्षण करून जनावराचा रंग, जात, वय, आरोग्य, मादी असल्यास दुभती किंवा गर्भार आहे किंवा कसे ? शिंगे आहेत किंवा नाहीत ? या सबंधी तपशीलवार वर्णन पंचनाम्यामध्ये नमूद करावे. याबाबी जनावराची किंमत ठरविण्यासाठी उपयुक्त ठरतात.

९) जनावराच्या अंगावरील जखमांचे निरीक्षण करावे. वन्यप्राण्याने पाळीव प्राण्यास मारल्यानंतर त्याने सुरवातीस कोणता भाग खाल्ला आहे ? पुढचा की मागचा ? कशा रितीने खाल्ला आहे ? आतडी बाजूला काढून ठेवली आहेत काय ? पोटाकडचा भाग प्रथम खाल्ला आहे काय ? यासंबंधी पंचनाम्यात नोंद करावी. या वर्णनावरून जनावर कोणत्या वन्यप्राण्याने मारले (वाघ की बिबट्या) हे ठरविण्यास मदत होते.

१०) जनावर मारलेल्या परिसराचे निरीक्षण करून वन्यप्राण्याचे ठसे, केस, विष्ठा इत्यादी पुरावा मिळतो काय याची खात्री करावी व त्याचा पंचनाम्यामध्ये उल्लेख करावा.

११) ठसे मिळाल्यास व्याघ्र गणनेतील पद्धती नुसार ठशांचे ट्रेसिंग व प्लॅस्टरकास्ट घ्यावे. यावरून जनावर कोणत्या प्राण्याने मारले याची खात्री करता येते. प्लॅस्टरकास्टवर आवश्यक नोंदी कराव्यात. दोन पायातील अंतर (स्टेप) मागच्या व पुढच्या पायातील अंतर (स्ट्राईड) मोजावे. यावरून वन्यप्राण्याच्या आकाराची कल्पना येते.

१२) मारलेले जनावर खाण्यास वन्यप्राणी परत येतात अशा वेळी त्यांचे निरीक्षण करणे महत्वाचे आहे. त्यासाठी निरीक्षणाच्या दृष्टीने सोईच्या ठिकाणी झाडावर मजबूत मचान बांधावे. झाड उपलब्ध नसल्यास वन्यप्राण्याला चाहूल लागणार नाही इतक्या अंतरावर सुरक्षित ठिकाणी जमिनीवर तात्पूरता आडोसा करावा व किमान ४८ तास निरीक्षण करावे. निरीक्षणाच्या नोंदी टिपून ठेवाव्यात.

१३) वाघ असलेल्या परिसरातील गावांना भेटी देवून नुकसान भरपाई संबंधी व वरील प्रमाणे घ्यावयाच्या दक्षते बाबत लोकांना कल्पना द्यावी व सहकार्याचे आवाहन करावे.

१४) कोणत्याही परिस्थीतील नुकसान भरपाई मिळण्यास विलंब होणार नाही याची दक्षत घ्यावी.

१५) संबंधीत विषयाबाबत पंचनामा करण्याचा अधिकार वन रक्षकाला नसला तरी घटने विषयी त्वरीत माहिती वन क्षेत्रपाल यांना देणे, जखमी व्यक्तीस दवाखान्यात नेवून योग्य ते औषधोपचार करण्याबाबत व्यवस्था करणे व वनक्षेत्रपाल यांना तपास कामात वेळोवेळी योग्य ती मदत करणे इत्यादी कामे वनरक्षकाकडून अपेक्षित आहेत. नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्याचे अधिकार फक्त वनसंरक्षक, उप-वनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना आहेत, तथापि जखमी व्यक्तींना तातडीच्या औषधोपचारा साठी रू. ५००/- पर्यंतचे आर्थिक सहाय्य करण्याचे अधिकार वनक्षेत्रपाल यांना देण्यात आले आहेत.

१६) जनावरे मारलेल्या नोंदी नकाशावर दर्शविल्यास मांसभक्षक प्राण्याच्या हालचाली संबंधी माहिती मिळू शकते.

वरील प्रमाणे दक्षता घेतल्यास, वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसानीचे प्रमाण कमी करता येईल. नुकसान झाले तरी नुकसान भरपाई मिळते याची जाणीव झाल्याने स्थानिक लोकातील असंतोष कमी होईल. पर्यायाने वन्यजीवांच्या संवर्धन करण्याच्या वन खात्याच्या प्रयत्नांना यश तर मिळेलच पण त्याच बरोबर लोकांमध्ये वन खात्याची उत्कृष्ट प्रतिमा निर्माण करता येईल यात शंकाच नाही.

" थांबा ! थांबा ! साहेब इथेच थांबा ! इथून गाडी आता पुढे जाणार नाही. आता फर्लांग दोन फर्लांग चालत जायला लागेल आपल्याला जंगलात. मी दावतो तुम्हाला वाघानं गाय कुठे मारली ते ! " आदिवासी.

" चल तर ! " सर्वजण जागेवर जातात, पाहणी करतात. साहेब तुम्ही सांगितल्या वर्णनाप्रमाणे ही गाय तर, बिबट्याने मारलेली दिसते. " वनपाल.

" साहेब ! साहेब ! इकडे या, हा बघा बिबट्याच्या पायाचा ठसा." वनरक्षक.

रेंजर साहेब पायाचा ठसा पहातात. " खरच ! हा तर बिबळयाचा ठसा आहे ! " रेंजर साहेब.

आदिवासी आनंदीत होतो. " साहेब ! आता झाली ना तुमची खात्री ? मग मिळेल ना मला नुकसान भरपाई ? " आदिवासी.

" हो रे बाबा ! मिळेल तुला नुकसान भरपाई पण मी काय सांगितल तुला, लक्षात आहे ना तुझ्या ? " रेंजर साहेब.

" तर ओ साहेब ! मी नाही हालवणार गाईला येथून. गाईवर विष पण नाही टाकणार कातडीपण नाही काढणार खावू दे वाघाला गाय. माझ्या गायीमुळे दुसऱ्यांची जनावर तरी वाचतील ! " आदिवासी.

" शाब्बास ! लई हुशार आहेस की तू, तुला लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न करतो मी. पण आता मला पंचनामा करू दे बघू ! " रेंजर साहेब.

" करा करा साहेब ! अजून मदत लागली तर सांगा. " आदिवासी.

" एक मदत पाहिजे तुझी ." रेंजर साहेब.

" सांगा की साहेब ! आता करतो बघा !! " आदिवासी.

" हे बघ, आता असाच गावात जा. गावातल्या लोकांना गोळा कर आणि मी तुला जी आता माहिती सांगितली ती लोकांना सांग. एवढा पंचनामा करून आम्ही आलोच." रेंजर साहेब.

" लगेच व्यवस्था करतो बघा साहेब ! " आदिवासी.





प्रकाशक : प्रसिद्धी व माहिती अधिकारी,
वन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मुद्रण स्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.

वर्ष : डिसेंबर १९९७.

उजनी जलाशय

# अभयारण्य

## आधार आणि आवाहन



सलिम शेख

# प्रस्तावना . . . .

उजनी जलाशय 'अभयारण्य, आधार आणि अवाहन' या पुस्तिकेत श्री सलीम शेख यांनी या परिसरातील सामान्य माणसांच्या आजच्या व्यथा आणि भविष्यकालीन समस्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उजनी प्रकल्पामुळे जे क्षेत्र आज पाण्याखाली गेले आहे त्या शिवाय उरलें त्या जमिनीचा परिसरातील माणसांना उदरनिर्वाह साठी उपयोग होतो आहे विस्थापितांचे प्रश्न शासन खूपच दिरंगाईने पूर्ण करते. हे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना नंतर आंदोलने करावी लागतात असा अनुभव सामान्यांचा आहे हे लक्षात घेवून येथील अभयारण्या बाबत पर्यावरण, रोजगार संधी व राजकीय भुमिका यांचा उहापोह केलेला आहे.

येथे परिसरात जी गावे पक्षी अभयारण्यासाठी संपादित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे विस्थापित झालेल्या की ज्यांचे अद्यापीही पुर्ण पुनर्वसन झाले नाही अशा अल्पभूधारक, मजूर यांचा जो समुह संख्याबळाने मोठा आहे. त्यांनाच स्थलांतराची झळ लागणार आहे. उरलेली श्रीमंत व नेंत्यांच्या पाठींब्याची मुठभर मंडळी यांचा पंचतारांकित हॉटेल्स सारख्या उद्योगातून लाखो रुपयांचा फायदा होणार. महिना दिड महिना येऊन राहणाऱ्या पक्षांसाठी व मुठभर लोकांच्या फाय द्यासाठी व परकिय पैसा मिळतो आहे म्हणून पक्षी अभयारण्य उभारुन ८० गावा तील लोकांना जे विस्थापीत आहेत त्यांना पुन्हा विस्थापीत करणें कितपत योग्य आहें? माणसांना वाऱ्यावर सोडून वाऱ्यावर उडणाऱ्या पाखरांना स्थापित करुन त्यांना अभय मिळावे म्हणून माणसांना हूसकावन लावण्याचा हा प्रकार म्हणावा लागेल. सर्व उजनी धरणग्रस्तांनी या अभयारण्याबाबत साकल्याने माहिती करुन घेतल्याशिवाय वस्तुस्थितीची जाणिव होणार नाही. आणि म्हणून ही पुस्तिका वाचनीय ठरावी हे मात्र नक्की. जयहिंद!

यशपाल भोसले
चंद्रमणीनगर, आमराई, बारामती.

# थोडसं उरलं सुरलं !!!!

सप्रेम नमस्कार,

ही छोटी पुस्तिका आपल्या हाती देताना वाचक आणि संबंधितांकडून काही वेगळ्या अपेक्षा आहेंत. मला खात्री आहे, होता होईल तेवढे खोलात जाऊन या परिसराचा अभ्यास माझ्या परिनें मी करुन थोडक्यात हे टिपन तयार केले आहें अभयारण्याचा प्रश्न जरी १३ गावांच्या भवितव्याचा आणि उजनी जलाशयातील बुडालेल्या जमिनी, उघड्या टेकड्यांच्या पुरताच मर्यादित नसून जो परिसर आहे त्या परिसरालाही यापासून संभाव्य मोठा धोका आहे.

अभयारण्य म्हटलं की, नानाविध पक्षीप्राणी येणार, मुक्त संचार करणार मर्यादित क्षेत्रात हें? राहतीलच कशावरुन शेजारच्या जमिनीतील पिके वसाहती यांनाही याचा उपद्रव हा ठरलेलाच आहें. अनेक बंधने व मर्यादा मनुष्य मात्रास घालूनही तो ते पाळू शकत नाहीत. मग हे तर नियोजित व कृत्रिम अभयारण्यातील पशुपक्षी आहेत याचा आपण सर्वांनी डोळसपणें विचार केला पाहिजे असे नम्रपणे इथे नमूद करावेसे वाटते.

आपलं सरकार परकियांचा पैसा आपल्या देशात गुंतवण्यासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड स्विकारायला तयार आहे इंग्रज आपल्या देशात येण्यापुर्वी आपले पुर्वज ज्या गर्तावस्थेत होते त्याच गर्तावस्थेत आपले शासनकर्ते आहेत की काय? अशी शंका येते राजकिय दृष्टचा जरी आपण स्वतंत्र असलो तरी आर्थिक दृष्टचा आपण बड्या राष्ट्रांच्या गुलामीत गुंतत चाललो आहोत. हा प्रश्न आपली माती जगवण्याचा आहें. प्रत्येकाच्या मनाने हे घेतले पाहिजे की, काही झालं तरी अभयारण्य हटविण्यासाठी आम्ही आमचे सर्वस्व पणाला लावू.

काही त्रुटी, उणिवा या पुस्तिकेत असण्याची शक्यता मी नाकारत नाही आपण मला दाखवून द्याव्यात रास्त असतील तर नम्रपणें स्विकारेन. या कामी मला आणखी ज्ञात अज्ञातांनी सहकार्य केले आहे. सर्वांच्याच नावाचा व्यक्तीशः उल्लेख करणें शक्य नाही. सूरु झालेल्या अभयारण्य हटाव मोहिमेत माझा यथा–शक्ती सहभाग असेल त्याचाच एक भाग म्हणून ही पुस्तिका.

–सलिम शेख

# पक्षी अभयारण्य हटाव कमेटीचे निवेदन

## मा. मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई–३२.

विषय–उजनी प्रकरणातील (पुणें जिल्हा) नियोजित पक्षी अभयारण्याची योजना रद्द होण्याबाबत.

महोदय,

उजनी धरणासाठी इंदापूर, दौंड, कर्जत, श्रीगोंदा व माढा यासह तालुक्यातील ८१ गावातील सुमारे २८७५४ हे. जमिन संपादित झाली असून त्यावर धरण बांधून पूर्ण झाले आहे. काही गावे संपुर्ण पाण्याखाली गेली आहेंत. जमिनीसारखे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन गेल्यामुळे हजारो धरणग्रस्तांना उपासमारी व अत्यंत हलाखीच्या परिस्थीतीला तोंड द्यावे लागत आहे.

संपादन केलेल्या ज्या जमिनी पाण्याखाली गेल्या नाहीत त्याच जमिनीवर बऱ्याच धरणग्रस्तांचा उदरनिर्वाह अवलंबून आहें. या जमिनी आता धरणासाठी लागणार नसल्यामुळें मालकी हक्कानें आम्हास परत मिळाव्यात अशी मागणी शासनाकडे प्रलंबीत आहे. आमच्या मागणीचा विचार करणें तर राहोच पण या क्षेंत्रात व खाजगी मालकीच्या असणाऱ्या जमिनीच्या ३६६ चौरस कि. मि. क्षेत्रात पक्षी अरण्य काढण्याचे व या क्षेत्रातील ३६६५१ हे. जमिन संरक्षित म्हणून दि २८।१०।९१ च्या राजपत्रात जाहीर झाले आहे.

उजनी धरणासाठी आम्हीं ८०,००० एकर जमिन देऊन राष्ट्रीय कर्तव्याचे भावनेतून फार मोठा त्याग केला आहें. धरणग्रस्त म्हणून आजपर्यंत अनेक हाल–अपेष्ठाना तोंड दिले आहे आता पुन्हा या पक्षी अभयारण्यामुळे आमच्या अडचणीत नुसती भरच नव्हे तर हजारो कुटुंबियांचें सर्व जीवनच उध्वस्त होणार आहे.

अभयारण्य झाल्यास संरक्षित क्षेत्रातील जमिनी कसण्यावर अनेक बंधने जमिनीच्या हस्तांतरात बंदी, मच्छीमार व्यवसायावर नियंत्रण, पिकांवर रासायनिक औषधे मारण्यावर बंदी अशीं अनेक बंधनें कायद्याने घातली जाणार असल्याने राहिलेल्या जमिनीत आम्हाला शेतीं करणें अशक्य होणार आहें. त्याही पेक्षा अरण्यातील निरनिराळ्या योजनांसाठी संरक्षित क्षेत्रातील आमच्या जमिनी संपादन केल्या जाणार हेही निश्चित.

उजनी धरणामुळे एकदा आमच्या जमिनी व घरादारांपासून मुकलो आहोत आता पक्षी अभयारण्य आमच्या राहिलेल्या जमिनीत करुन आमच्यावर आणखी संकट लादू नये

वरील सर्व परिस्थितीचा सहानुभुती पुर्वक विचार करुन दि. २८।१०।९१ चे पक्षी अभयारण्याचे राजपत्र रद्द करावे. ही विनंती.

आपलें विश्वासू,

उजनी धरणग्रस्त अभयारण्य हटाव कमेटी,

द्वारा–ग्रामपंचायत पळसदेव, ता. इंदापूर, जि. पुणें.

(प्रती सर्व संबंधितांना रवाना.)



# संभाव्य अभयारण्य ग्रस्त हो !

अत्यंत खेदाने लिहीण्याची ही वेळ आली म्हणून आपल्याला या पुस्तिकेच्या माध्यमातून नम्र आवाहन करतो.

वाचक हो,

उजनी धरणाच्या प्रकल्प उभारणीस (बांधणी–मांडणी) २५ वर्षे होत आली पण अजूनही ८० टक्के प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेलें नाही हे आपण सर्व जण जाणताच कारणमिमांसा करायचीच झाली तर अनेक रथी, महारथी आदरणीय श्रेष्ठ मंडळींच्या माथ्यावर याचं खापर फोडावे लागणार आहे.

आपण सर्वांनी राष्ट्रीय हिताचा एक भाग म्हणून उजनी जलाशयासाठीं जवळपास ८० हजार एकर जमिन विनासायास सरकारला दिली. देशातील उजनी प्रकल्प वगळता कोणताही छोटा–मोठा प्रकल्प जर पाहिला, अभ्यासला तर कमालीची तीव्र आंदोलने, रक्तपात, निदर्शने, उपोषणे, मोर्चे इ. मानवी हक्कासाठी संघर्षाच्या मार्गाचा अवलंब झाला, होत आहें. पण यापैकी किरकोळ अपवाद नको म्हणून या प्रकारे संघर्ष केला विशेष उल्लेखनीय बाजू म्हणजे डाळज ग्रामस्थांचा त्यात सिंहाचा वाटा आहे.

संत महात्म्यांच्या इतिहासाची साथ देणारी भिमा नदी आपल्या या त्यागाने आपण पावन केली असे म्हणायला हरकत नाही, का त्याचे प्रायश्चित्त म्हणून आपले पुन्हा पुनर्वसन करण्याचा घाट पक्षी अभयारण्याच्या नावाखाली घातला गेला त्याचा शोध आपण घेतला पाहिजे.

जगात सर्वत्र पर्यावरणाच्या नावाने डांगोरा पिटला जात आहे. निकोप व सुंदर स्वच्छ पृथ्वी कुणाला नको आहे? त्यादृष्टीने रीओ नावाच्या एका छोटयाशा देशात नुकतीच जागतिक 'वसुंधरा परिषद' संपन्न झाली, आपणा सर्वांना अभिमान वाटेल अशी भूमिका भारताचे वतीने आपल्या मंत्री महोदयांनी मांडली अमेरिकेची थोडीशी कुरकुर वगळता जवळपास १५० विकसीत, अविकसीत देशांनी 'पृथ्वी वाचवा–प्रदुषन थांबवा ' या घोषवाक्याला अर्थ प्राप्त करुन देण्याच्या आणाभाका आपापल्या परिने घेतल्या. २७ कलमी कार्यक्रमाची आखणी झाली. सर्वानूमते अविकसीत राष्ट्रांना प्रदुषण रोखण्याकामी मदत करायची याशिवाय दुसऱ्याच्या देशात जाऊन औद्योगिक उत्पादनामुळे त्या कारखान्याकरवीं होणारे प्रदुषण रोखण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई द्यावी हा महत्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय रीओच्या तटावर जगाच्या मानवी कल्याणाच्या दृष्टीने झाला. हा निर्णय आणि ही परिषद

तसे पाहता उशीरा का होईना पण झाली. जग जाहीर आहे पृथ्वीच्या एकूण वातावरणातील ५५ टक्के प्रदुषण जर्मनी, पोलंड, कॅनडा, ग्रेटब्रिटन आणि अमेरिका या राष्ट्रांकडून होत असते पैकी अमेरिका २२ टक्के प्रदुषणाला जबाबदार हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरणविषयक तज्ञांतच मत आहे. या आणि अशा सर्व आंतरराष्ट्रीय संबंधाशी आपल्या उजनी जलाशयातील होऊ घातलेल्या अभयारण्याचा खूप जवळचा संबंध आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही.

आपला परिसर तसा भौगोलिक दृष्टचा बऱ्यापैकी सधन आहे. पुणें, सातारा सोलापूर अहमदनगर उस्मानाबाद या पाच जिल्ह्याना हे मध्यवर्ती ठिकाण १०० टक्के शहरी नाही की १०० टक्के ग्रामिणहीं नाही, अशा अवस्थेतील आपण माणसे संमिश्र संस्कृतीचा आपल्यावर नाही म्हटल तरी पगडा आहे. स्वतंत्र अशी आपली कडेपठारी संस्कृती नसली तरी रुईचा बाबीर, नरसिंगपूरचा नृसिंह, राशीनची जगदबामाता ही विभिन्न वर्गाची महाराष्ट्रातील प्रमुख आराध्य दैवते या नियोजित अभयारण्याभोवती आहेत. आंतरराष्ट्रीय पक्षी गेली कित्येक वर्षांपासून इथे येत होते येत आहेत आणि येत राहतील. यात नविन असे काहीच नाही. कोणत्याही गोष्टीचं कुतुहल तो पर्यंतच असते जो पर्यंत त्याची शास्त्रशुद्ध कारण मिमांसा होत नाही ती झाली की त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. तसेच या ठिकाणीं हिवाळयाच्या उत्तरार्धात दोन महिन्यांसाठी येणाऱ्या पक्षांच्या बाबत आहे तेवढचा साठीच अभयारण्य असेल तर मग निश्चित या देशाने माणसांपेक्षा परकिय पक्षांचें पालकत्व करण्यात धन्यता माननारी सरकारी यंत्रणा कीव करण्या पलीकडची आहे

अभयारण्य हें निमित्त आहे असे प्रामाणिक मत इथल्या प्रत्येक माणसाने स्वतःमध्ये डोकावून पाहिले तर लक्षात येईल औद्यागिक वसाहतीच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ व ९ (मुंबई–मद्रास) प्रचड उजनी जलाशयाचा साठा, भिगवण–जेऊर संपुर्ण धरणाला छेदून जाणारी ब्रॉडगेज रेल्वे, लवकरच धरणावर उत्पादित केली जाणारी बिज आणि वर्षानुवर्षे सत्ताधारी पक्षाचे राजकिय वर्चस्व असतानाही या तालुक्यातील ७५ टक्के बेरोजगार जनता कोणत्याही प्रकारे आपले अधिकार व मागण्या घेऊन उभी राहीली नाही. उजनी जलाशय झाल्यावर किमान परिसराचा दुष्काळ हटला, रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्या तरीही बेरोजगार नसल्याचा खोटा आभास उचल पाण्यामुळे आपण निर्माण करु लागलो नसलेल्या प्रकल्पग्रस्तांनीं ही याचा फायदा घेतला आणि कधी नव्हती अशी अतर्गत राजकिय खेळी जाती–जमातीच्या वादावर येऊन ठेपली. गटांगटातच राजकारण आपल्या प्रत्येक माणसाच्या प्रगतीचा अडसर होऊन राहिली आहे. तरी आपण 'ठवीलें अनंते तैसेंच रहावे' या उक्तीप्रमाणे दिवस कठीत आहेत. उद्याच्या आशावादाला तिलांजली देऊन. ना नव्या नेतृत्वाची आशा, ना जुन्याकडून शाश्वती. खाजगीत माणूस चर्चा

करतात. नोकरदारांच्या बदल्यांशिवाय आपली नेते मंडळी काहीच करु शकत नाही केल नाही. हे प्रामाणिक मत सामान्य माणसापासून करत्या करवित्या नेत्यांनाही पटतय पण त्या शिवाय दुसरे करावे असे काहीच नाही ना? असो

प्रश्न अभयारण्याचा आहे. नेमकी त्याची गरज का वाटली? हे जरा आपण नीट समजाऊन घेतले पाहिजे आपला देश आज प्रगतशील राष्ट्रांच्या पंगतीत बसण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहें. अनिवासी भारतीय आणि बहु राष्ट्रीय कंपन्यांना आपण निमंत्रीत करीत आहोत. त्यांना कमालीच्या सवलतीही दिल्या म गांधींच्या म्हणण्यानुसार खेड्याकडे चला (बहुराष्ट्रीय कंपन्या घेऊन) हा मंत्र राजकिय सत्ताधिश अमलात आणीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून की काय आपले हे होऊ घातलेले अभयारण्य ?

भिगवण, ता. इंदापुरच्या भोवतालचा परिसर जरा डोळ्यापुढे आणा दौंड तालुक्यातील कुरकुंभ एम. आय. डी. सी. पूरंदर ता. जेजूरी एम आय डी. सी. बारामती एम. आय. डी. सी. माढा-मोहोळ करमाळा तालुक्यातील छोट्यामोठ्या औद्योगिक वसाहती आणि अकलूज परिसरातील औद्योगिकीकरण वाढते करण्याचा वाढता प्रयत्न लक्षात घेता त्या कार्यान्वीत होण्यापुर्वी म्हणजे प्रदुषणाची निर्मीती होण्याआधीच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उजनी जलाशयाच्या आधाराने ३६६ चौ कि. मी. अभयारण्य अस्तित्वात आणण्याचीं ही योजना जवळपास ८८-८९ मध्येच कार्यान्वीत करण्याचा शासनाचा विचार होता पण ठरल्याप्रमाणें खजिन्याचा रितें पणा झाकण्यासाठीं "नियोजित" या गोंडस शब्दाखाली गती घेऊ शकला नाही. कुस्ती ठरलेल्या पैलवानाप्रमाणें झाकरीत मेहनत आणि आहार वाढवत वाढत राहीला आणि सपूंर्ण तयारी झाल्यावर दि. २८।१०।१९९१ ला ते शासनानें अधि कृतपणें राजपत्रीत करुन जाहीर केले. यात शासनाला दोष देण्यात काही अर्थ नाही हे सर्व होत असताना आपल्या परिसरातील लोक प्रतिनिधी काय करीत होते ? हा प्रश्न आहे. प्रदुषणामुळे निर्माण होणारे ग्रिन हाऊस गॅस, क्लोरोफ्लोरो कार्बन, मिथेन, कार्बन डायऑक्साईड इ. सारखे विषारी प्रदुषीत वायुच्या निर्मितीला आपल्या अभयारण्यामुळे एक प्रकारे काटशह मिळणार हे नाकारुन चालणार नाही. शिवाय हा काटशह देण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा भार आपलं सरकार या बहु-राष्ट्रीय कंपन्यावर टाकणार हे निश्चितच आहे कारण आपण नव्या औद्योगिक धोरणातच ते ठरवून घेतले आहे. शिवाय जागतिक वसुंधरा परिषदेचा तसा ठराव ही आहे. त्यामुळे आपल्या ह्या अभयारण्याचा संबंध नकळत आंतरराष्ट्रीय पातळी वर आहे. शिवाय या देशातल्या राजकर्त्यांना हें ही माहित आह "यथा राज तथा प्रथा" या नियमाप्रमाणें स्थानिक नेतृत्व याला यथा शक्ती विरोध करुच शकत नाही. त्यामुळे जनतेंच्या उठावाचा प्रश्नच येंत नाही. शिवाय अखिल भारतीय

पक्षांत आपल्या भागातील नेत्यांचा कितपत वरचष्मा आहे हे सर्वांना ज्ञात आहेच.

काँग्रेस (आय) पक्षाचं धोरण मुळातच स्थानिक माणसांचा विचार न करता बाहेरील माणसाला सवंग प्राधान्य देण्याची निती असल्याने आणि आंतरराष्ट्रीय संबंधाची आर्थिक व औद्योगिक नितिचा विचार करता स्थानिक काँग्रेस नेतागण एकूण पक्षाच्या प्रतिमेचा आणि जेष्ट नेत्याच्या विरोधात जाऊन होऊ घातलेले अभयारण्य होऊ नये यासाठी कितपत क्रियाशील राहून प्रयत्न करेल याबाबत शंकाच आहे ? तर दुसऱ्या बाजूला राज्य व राष्ट्रीय पातळीवर विरोधकांची असलेली अल्पशी ताकद या प्रश्नाकडे कितपत गांभिर्याने बघेल हाही प्रश्नच आहे ? लोणी ते चांडगांव रस्त्यापासून भिगवण–खेड टार रोड (दौंड तालुक्यातील) दोन गावे म्हणजे साधारण ५ किमी. X २० किमी च अंतर सरकार निर्मनुष्य करावयाच्या विचारात आहे म्हणजे नुकतीच उजणी जलाशयामुळे एका ठिकाणाहून उठून दुसऱ्या ठिकाणी वसलेली इंदापूर–दौंड तालुक्यातील एकण १३ गावांचे पुन्हा पुनर्वसन करण्याचो महत्वकांक्षी योजना हाणून पाडायची असेल तर राजकारणातील अगदी श्रद्धास्थान असणाऱ्यांना सुद्धा ठणकावून सांगाव लागेल आमच्या या प्रश्नावर तुमचे राजकीय जोडे बाजूला ठेवून या. एकपिढी सुद्धा आमची सुखी होऊ द्यायची नाही अस काय आम्ही तुमचं मोठं पाप केलयं ? हा प्रश्न निर्भिडपणे सरकारला विचारण्याची क्षमता प्रत्येकाच्या मनात यथाशक्ती निर्माण झाली पाहिजे, यात मतभेद गट, तट, भाऊबंदकी न आनता या क्षणीच प्रश्नाच गांभिर्य ओळखून ऐक्याची प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. काही झालं तरी आम्ही आमच्या जमीनी–घरदार अभयारण्यासाठी देणार नाही ह्रा निर्धार केला पाहिजे.

आपलं पहिलं निवेदन सरकारला आपण खूप मोठचा साध्या आणि सौजन्य पूर्ण भाषेत दिलेयं त्याची प्रतिक्रिया काय होतेय याची वाट पहाण्यात वेळ वाया घालवून चालणार नाही. वाद विवादातून आपणाला जनतेशी संवाद साधावा लागेल. बुर्झवी नेंतृत्वावर विसंबून चालणार नाही युवा शक्ती कार्यान्वित केली पाहिजे. साहसाशी खेळण्यात वेगळीच मजा असते ती या वेळी आपणास अनुभवावी लागेंल. शेवटच्या क्षणापर्यंत ही जबाबदारी आपल्या प्रत्येकाची आहें. आत्तापर्यंत नाकरत्या नेतृत्वावर विसंबून राहिलो आपण त्याची कुणाला काय फळं मिळाली ? किती विकास झाला परिसराचा ? अनंत प्रश्न या निमित्ताने आपल्या समोर येणार आहेत. प्रत्येकजण यात आपले हितबंध जपणार आहेत, मुळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न केला जाईल, व्यक्तीगत आशा आकांक्षा फुलविल्या जातील आंदोलनात्मक ताकद उभी राहण्याआधीच सहानभूतीं दाखवली जाईल, ठरल्याप्रमाणें आश्वासनाची खैरात होईल आणि आपली बंडाची शक्ती हिरावून घेतली जाईल, या आणि अशा सर्व गोष्टीपासून आपण सावध राहिले पाहिजे.

जागतिक पातळीवर आपला देश पर्यावरणाच्या बाबतीत खूप काही करीत आहे याचा रास्त अभिमान उराशी बाळगून आपल्या इथं एकपिढी स्थिरावण्याआधिच विस्तापित करण्याचा सरकारचा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे रीओच्या आंतर-राष्ट्रीय परिषदेत आपण विधवेचे डोळे पुसायला गेलो खरे. पण आपण आपलं कुंकू अनावधानानें पुसून तर आलो नाही ना ? असा प्रश्न किमान आपल्याला या संदर्भात निर्माण झाल्यावाचून रहात नाही.

सरकारने पूर्ण तयारी केली आहे. उरलाय फक्त अनौपचारिक उद्घाटनच्या कार्यक्रमाचा मुहूर्त ठरायचाच बाकी आहे. मग मोठ्या शहरातली, परदेशातली गोरीगोमटी चामडी असणारी मुले-मुली गळ्यात गळे घालून तुमच्या जमिनीत ओसाड अंगणात फिरतील पक्षी बघत, आणि आपण असू कुठे तरी ओसाड उजाड माळावर, थोरामोठ्यांच्या कवतीका पाई आपली जन्मभूमी कर्मभूमी आपल्याला सोडून द्यावी लागणार आहे.

## सावधान मंडळी सावधान !! सावधान !!!
## आपल्या उजनी जलाशयाच पक्षी अभयारण्य होत आहे ?



थोडक्यात शासकीय उपलब्ध झालेली माहिती पुढीलप्रमाणें अनुवादीत संदर्भासाठीं–

असा. क्र. १४४ • रजि. नं. एच / आम / साऊथ /२

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण अधिकृत प्रकाशन

सोमवार, आक्टोबर दि. २८।१९९१। कार्तीक ६ शके १९१३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाटी या भागाला वेगळे पृष्ठ क्र. दिले आहेत

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये व तयार केलेंली भाग, १, १ अ आणि १ क यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश या व्यतिरिक्त नियम व आदेश महसूल आणि वनविभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. २८ अखेर १९९१ वन्य जीवन (संरक्षण) नियम १९७२

नं. डब्ल्यू. एल. पी. १०८९ पि. आर. नं. २६। एक–५ च्या अर्थी महाराष्ट्र सरकारच्या असे निदर्शनात येते की मागे जोडलेल्या पुरवणीं परिशिष्टात वर्णन केलेले असे (इथून पुढे हे ''म्हटलेले उल्लेखलेले क्षेत्र'' असे संबोधले जाईल.) या क्षेत्रातील वनस्पती प्राणीसंबंधी, प्राणीशास्त्र संबंधी, कुळासबंधी, भूगर्भीय वनस्पती प्राणी संबंधी, नैसर्गिक व प्राणीशास्त्रीय अभिप्राय आवश्यकतेपूर्ण त्यांच्या संरक्षणासाठी फैलावासाठी किंवा त्यातील भोवतालच्या प्रदेशातींल वन्यजीवन वाढीसाठी हें वन्यजीवन अभयारण्य स्थापन करण्यात आलें. आणि ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाने ठरविले की, उल्लेखलेले क्षेत्र हें "उजनी ओलीताखालीचें क्षेत्रातील पक्षी अभयारण्य" म्हणून ओळखले जाईल.

वन्यजीवन (संरक्षण) नियम १९७२ (१९७२ चे ५३) चे खंड १८ मध्यें अधिकाराचा उपयोग विचार विमर्श केल्याप्रमाणे अधिकाराचा उपयोग या द्वारे त्यांचा हेतू जाहीर करते की उल्लेखलेले क्षेत्र हे उजनी ओलीताखालील क्षेत्रात अभयारण्य असे ओळखले जाईल.

परिशिष्ठात म्हटल्याप्रमाणें त्याच्या मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहे,

– परिशिष्ठ –

उजनी ओलीताखालीं येणाऱ्या पक्षी अभयारण्याचे ठिकाण येथील पुणें सोलापूर. अहमदनगर या जिल्ह्यांनी समाविष्ठ असेल.

० उजनी ओ. खालील क्षेत्रातील अभयारण्यात असलेले वन विभागाचे नाव — पुणें, सोलापूर, अहमदनगर वन विभाग

० उजनी ओलीताखालचे क्षेत्रातील अभयारण्याची वैशिष्ठ्ये — परीशिष्ठ– प्रमाणें

(पूर्णसाठा पातळी) १६३० (कांटूर रेषेनें वेढलेले)

| | |
|---|---|
| ० ७९ खेड्यांचे पाण्यात बुडालेले क्षेत्र – | २८७५४–२८ हे. |
| न बुडालेलें क्षेत्र – | ७८९७– हे. |
| एकूण | ३६६५१–२८ हें<br>किवा ३६६–५१<br>चौ. कि. मी. |

० उत्तर सीमा– पाटबंधारे विभागानें उजनी धरणासाठी संपादित केलेले १६३० कांटूर (पूर्णसाठा पातळी) आर. एफ. डब्ल्यू पासून सुरु झालेंले हे सांगवी बिटर–गांव, सोनगांव, उमरड, उंदरगांव, मांजरगांव, वाशिंबे, केतूर, पेववाडी, हिंगणी पोमलवाडी, खातगांव टाकळी, कोठार चिंचोली कात्रज (करमाळा ता.) बाभूळ–गांव, शिपोरा, अखोनी, खेड, आटेगांव, गणेंशवाडी, भांकोरी दुधोडी, बर्डी, सिद्ध–टेंक जळालपूर (कर्जत तालुका) आणि पेडगाव श्रीगोंदा ता. या खेड्यात आहे.

० पूर्व–उजनी धरणांसाठी संपादित केलेले क्षेत्र १६३० एफ. आर. डब्ल्यू कांटूरने सुरु झालेले उजनी शिराळ, सुळी, अकोले, फुटजवळगांव (माढा ता.) कंधर कविटगांव (ता. करमाळा) या खेड्यात आहेत.

० दक्षिण– पा. वि. उ. ध. संपादित व १६३० एफ आर. डब्ल्यू ने सुरु झालेले क्षेत्र तरटगांव काँदलगांव, शहा. माळवाडी, पिंपरी, सुगांव, आजोती, टाकळी, चांडगांव (चांडगांव ते लोणी देवकर) या जि. प. च्या अस्तित्वात असलेंल्या रस्त्यासहीत लोणीपासून राष्ट्रीय महामार्ग ९ ते भिगवण (रस्त्यासह) आणि पाण्याच्या साठ्यामधील उंचवट्यासह रा. महामार्गाच्या पलिकडे जे १६३० एफ आर. एल ने वेढलेला आहे. व पाटबंधारे विभागाने पळसदेव, डाळज, मदनवाडी आणि भिगवण टार रोड ते खेंड १६३० कांटूर पर्यंत राजेगाव रोडच्या पलिकडे भिगवण मधील उंचवटे जे १६३० कांटूरच्या वेढ्यात आहेत. तसेंच नायगाव मल ठण हिंगणी बर्डी, देऊळगाव राजे, शिरापुर, पारगाव, वडगाव दरेकर, ता. दौंड या खेड्यात आहे.

० पश्चिम सीमा–पा. वि. उ. ध. संपादित १६३० कांटूर पासूनचे क्षेत्र हे अजनूज ता. श्रीखोंदा ते वाटलूज, आर्वी ता. दौंड या खेड्यात आहे. सर्व पाणी साठ्यातील बेटे विशिष्ट सिमेपर्यंत या अभयारण्यात समाविष्ट असतील. उजनी ओलिताखालचे अभयारण्य हे ३६६.५१ चौं. कि. मी. आहे.

---

टीप–पुढे सविस्तर जिल्हा, तालुका, गावांवर संपादित केलेल्या जमिनीची सविस्तर आकडेवारी दिली आहे. उजनी जलाशयात बुडालेली गाळपेराची परवानगी असलेले आणि नव्याने संपादित करावयाच्या क्षेत्रासह माहिती देण्यात आली आहे.



• मुद्रक–
धनपाल विश्वनाथ भोसले
हिरा प्रिंटिंग प्रेस, चंद्रमणीनगर,
आमराई, बारामती, जि. पुणें.

• मुखपृष्ठ / सजावट–
यशपाल भोसलें
सुनील खेबडे (पाटील)

• सर्व हक्क सुरक्षित

• प्रकाशक–
विश्वभारती प्रकाशन,
८२४/२ कसबा पेठ,
इंदापूर, जि. पुणें.

• लेखक–
सलीम शेख

• किंमत ५ रुपये

प्रोप्रा.–धनपाल विश्वनाथ भोसले

# हिरा प्रिंटिंग प्रेस

चंद्रमणीनगर, आमराई, बारामती (४१३१०५), जि. पुणें.

आमची वैशिष्ट्ये–

- आकर्षक छपाई
- उत्कृष्ट बाईंडिंग
- बिनचुक व अर्जंट काम

# मराठवाड्यातील अभयारण्ये :

## व्यवस्थापनाचे काही प्रश्न

**निसर्ग मित्र मंडळ**

१२०, शास्त्री नगर, गारखेडा रोड, औरंगाबाद - ४३१ ००५.

प्रकाशक : **प्रा. विजय दिवाण**
अध्यक्ष
निसर्ग मित्र मंडळ,
औरंगाबाद.

मुद्रक **बालाजी ऑफसेट**
प्लॉट नं. ८, एन - २, जे सेक्टर
मुकुंदवाडी, जालना रोड,
औरंगाबाद
फोन : ४८६२२९

संपादक : मानसिंगराव पाटील
सचिव
निसर्ग मित्रमंडळ,
औरंगाबाद

कन्नड (जि. औरंगाबाद) येथे सप्टेंबर २००० मध्ये झालेल्या चौथ्या अभयारण्य परिषदेच्या प्रसंगी ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली.

(केवळ खासगी वितरणासाठी)

# काय व्हावयास हवे ?

**गौताळा-औट्रम घाट अभयारण्य :-**

१. गौतम-औट्रम घाट अभयारण्याच्या चतु:सीमांची आखणी निश्चित कालावधीत पार पाडावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला होता. हे काम त्वरित पूर्ण केले जावे.

२. औरंगाबाद-चाळीसगांव आणि सिल्लोड-नागद हे दोन राज्य महामार्ग या अभयारण्याच्या केंद्र भागातून जातात. या दोन्ही मार्गावर अवजड वाहनांची मोठी वाहतूक होते. वाहतुकीमुळे अभयारण्यातील वन्य-श्वापदांचे स्थलांतरण मार्ग अडवले गेले असून त्यामुळे वन्यश्वापदे जंगलाकांठच्या मनुष्यवस्त्यांत जातात किंवा अपघातात मरतात. म्हणून उपरोक्त दोन्ही राज्य महामार्गावरील वाहतुक रात्रीच्या वेळी पूर्णपणे बंद केली जावी.

३. अभयारण्याची पहिली अधिसूचना जारी होऊन पंधरा वर्षे होत आली आहेत. अंतिम अधिसूचना जारी होण्या आधी सोयगाव-सावळदबारा भागातील जंगलभाग अभयारण्यास जोडला जावा. जेणे करून या अभयारण्यातून मेळघाटाकडे जाणारा कॉरिडॉर तयार होईल.

४. गौताळा-औट्रमघाट अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा त्वरित केला जावा. या आराखड्यामध्ये अभयारण्याच्या सीमेवर वसती करून असणाऱ्या आदिवासी व शेतकरी लोकांच्या सहकार्याने राबविण्याच्या वन-विकास योजनांचा समावेश केला जावा. त्यासाठी गरज पडल्यास वन्यजीव संरक्षण कायदा (१९७२) मध्ये जरूर त्या सुधारणा केल्या जाव्यात.

५. या अभयारण्याच्या सीमेवर अथवा बाहेर असलेल्या आदिवासींच्या अतिक्रमित शेतजमिनी नियमित करून दिल्या जाव्यात. तसेच ह्या आदिवासींच्या जळण, चारा व इमारती लाकडाच्या गरजा भागवण्यासाठी संयुक्त वन-व्यवस्थापन योजना प्रभावीपणे राबविल्या जाव्यात.

६. अभयारण्यातील नैसर्गिक अन्नशृंखला अबाधित राखण्याच्या दृष्टीने जमिनीखालील कंदमुळे, जमिनीवर आच्छादन करणारी गवते व छोटी झुडुपे, मोठी झुडुपे, चारा आणि फळे देणारे वृक्ष, गवताळ कुरणे इत्यादींची योजनाबध्द जोपासना केली जावी, ज्यायोगे या अभयारण्यात छोटे-मोठे शाकाहारी भक्ष्य प्राणीही वाढतील आणि उत्पादक-भक्षक जीवांचे संतुलन राखले जाईल. ह्या योजना परिणामकारक रीतीने राबविण्यासाठी स्थानिक रहिवासी आणि आदिवासींचा समावेश असलेले कार्यकारी मंडळ स्थापन केले जावे.

७. लोकसहभागातून वनविकास करण्यासाठी कायद्यातील अनेक त्रुटी दूर करण्याची गरज आहे. या दृष्टीने अभ्यासक, स्वयंसेवी कार्यकर्ते, कायदेतज्ज्ञ, वनाधिकारी आणि स्थानिक लाभधारक ह्यांचा समावेश असलेला एक अभ्यासगट नेमून त्यामार्फत कायदा दुरूस्तीचे प्रस्ताव तयार केले जावेत.

**जायकवाडी पक्षी अभयस्थान :-**

१. जायकवाडी धरणाच्या जलाशयाचे अधिसूचित क्षेत्रफळ ३४००० हेक्टर्स एवढे आहे. या जलाशयाच्या डाव्या व उजव्या किनाऱ्यांलगतच्या जमिनीवर गाळपेराची शेती केली जाते. हे सगळेच्या सगळे क्षेत्र अभयारण्य म्हणून पुन्हा एकदा अधिसूचित झाल्यामुळे किनाऱ्यालगत गाळपेरा करणाऱ्या शेतकऱ्यावर वन्यजीव संरक्षण कायद्यात प्रतिबंधक आदेश लागू झाला असून त्यांचे उपजीविकेचे साधन हिरावून घेतले जाऊ पाहात आहे.वस्तुत: या जलाशयावर गेली ३० वर्षे पक्षी येतात, गाळपेराची शेती होते आणि मासेमारीही होते. या तीन्हींचा एकमेकांना कोणताही अडथळा होत नाही. त्यामुळे पक्ष्यांच्या प्रजननाच्या व भरण-पोषणाच्या विविक्षित जागा निवडून तेवढ्याच जागांचा प्रतिबंधित क्षेत्रांत समावेश केला जावा. म्हणजे सुमारे ८ ते ९ हजार हेक्टर क्षेत्रच अभयारण्याच्या कायद्याखाली प्रतिबंधित होईल व बाकीच्या क्षेत्रात वन्यजीव संरक्षण कायद्यातील तरतुदींनुसार गाळपेरा व मासेमारीसाठी परवानगी देता येईल. असे केले तर स्थानिक रहिवासी आणि लाभधारकांचा अभयारण्यास असणारा विरोध कमी होऊन त्यांचे सहकार्य अभयारण्य विकासाच्या कामात मिळू शकेल.

२. जायकवाडी पक्षी अभयस्थानाचा व्यवस्थापन आराखडा त्वरित तयार केला जावा. ह्या आराखड्यांत ज्या स्थानिक रहिवाश्यांची गाळपेराची जमीन अभयारण्याच्या प्रतिबंधित क्षेत्रात गेली आहे. किंवा ज्या कोळी, कहार व इतर मच्छिमार लोकांच्या उपजीविकेची साधने हिरावली गेली आहेत, त्यांना पर्यायी रोजगार साधने उपलब्ध करुन देण्याच्या योजनांचा समावेश असावा. यात चहा-फराळाची दुकाने, सायकल भाड्याची दुकाने, वल्हवण्याच्या होड्यां भाड्याने देण्याचा व्यवसाय, गाईड मार्गदर्शक म्हणून काम करणे इत्यादींचा समावेश असावा.

३. जायकवाडी पक्षी अभयस्थान क्षेत्रात पक्ष्यांच्या आश्रयस्थळ विकासासाठी टेकड्या तयार करणे, सँड बार्स व मड फ्लॅटस् तयार करणे, घरटी बांधण्यास उपयुक्त झाडे लावणे, प्लवंग व इतर खाद्य पाण्यात तयार होण्यासाठी संरक्षित विभाग करणे इ. कामे युध्दपातळीवर केली जावीत.

# औरंगाबादचं 'निसर्ग मित्र मंडळ'

- डॉ. सुनीती धारवाडकर

**महाराष्ट्र फाऊंडेशनचा सामाजिक कार्याबद्दलचा तीन लाखांचा पुरस्कार १९९८ मध्ये औरंगाबादच्या निसर्ग मित्रमंडळाला जाहीर झालाय. उद्या हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. त्यानिमित्त प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेतला हा निसर्ग मित्र मंडळाबद्दलचा लेख -**

१९८४ सालची गोष्ट. आमच्या महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातल्या धांदलीमुळे लक्षात आलं की कुठल्या तरी कार्यक्रमाची तयारी सुरु आहे. चौकशी केली, तेव्हा कळलं की, जायकवाडी इथे होऊ घातलेल्या चौथ्या पक्षी-मित्र संमेलनाची ही सगळी गडबड आहे. महाविद्यालयातल्या प्रा. विजय दिवाणांकडे बाहेरची दिलीप यार्दी, श्याम दंडे ही मंडळी येऊन बसली होती. मुळात पक्षी-मित्र म्हणवून घेणारी ही सारी मंडळी नेमकं करतात तरी काय याची उत्सुकता मनात होतीच. शिवाय या पक्षी-मित्र संमेलनाला विख्यात पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली हजर राहणार होते, हेही एक आकर्षण होतं. त्यामुळे कावळा, चिमणी, पोपट यांच्या पलीकडे पक्ष्यांचे फारसं ज्ञान नसतानाही आम्ही काही जणींनी या संमेलनाला उपस्थित राहायचं ठरवलं. पैठण शहराजवळ सपाट जमिनीवर बांधलेलं आशिया खंडातलं सगळ्यात मोठं जायकवाडी धरण आहे, या धरणाच्या तेहेतीस हजार हेक्टर क्षेत्राच्या विस्तीर्ण जलाशयात उथळ पाणथळीचा प्रदेश खूप मोठा आहे. तिथे दर हिवाळ्यात उत्तरेकडून स्थलांतर करुन येणाऱ्या पक्ष्यांच्या शेकडो जाती आढळतात. त्यांचे प्रकार, त्यांच्या सवयी, त्यांचं भरण-पोषण या साऱ्या गोष्टींच्या अभ्यासाला चालना मिळावी या उद्देशाने औरंगाबादच्या उत्साही निसर्गप्रेमींनी महाराष्ट्रपातळीवरच्या या संमेलनाचा घाट घातला होता. पक्ष्यांबद्दल विलक्षण प्रेम असलेले दिलीप यार्दी, पर्यावरणाचे अभ्यासक प्रा. विजय दिवाण, लोकविज्ञान चळवळीत हिरिरीने भाग घेणारे श्याम दंडे, व्यवसायात नफा-तोट्याचा विचार न करता पक्ष्यांचे फोटो घेत फिरणारे छायाचित्रकार रंजन देसाई, सरकारी नोकरीतही पक्षी-निरीक्षण आणि आकाशदर्शनाचा छंद जोपासणारे अभियंता विलास पत्की असे काही मोजके निसर्गवेडे या संमेलनाचे आयोजक होते. जायकवाडीचा परिसर हा पक्षी अभयारण्य म्हणून घोषित केला जावा, अशी या पक्षी-मित्रांची मागणी होती आणि डॉ. सलीम अलींच्या उपस्थितीमुळे या मागणीला बळकटी मिळेल अशी त्यांची धारणा होती. महाराष्ट्रभरातून दीडेकशे प्रतिनिधींचा सहभाग असलेलं हे संमेलन या उद्दिष्टात सफल झालं हे पुढच्या दोनच वर्षांत बघायला मिळालं. १९८६ साली हा परिसर पक्षी-अभयारण्य म्हणून घोषित झाला.

८४ च्या त्या पक्षी-मित्र संमेलनापासून आजपर्यंत औरंगाबादच्या 'निसर्ग मित्र

मंडळा' च्या वाटचालीकडे एक दृष्टिक्षेप टाकला तर हे सहज लक्षात येतं की, फारसं मनुष्यबळ गाठीशी नसताना आणि कुठूनही आर्थिक मदत मिळत नसतानाही केवळ कार्यकर्त्यांच्या आंतरिक इच्छाशक्तीच्या बळावरच हे मंडळ ठसा उमटवण्याजोगी कामगिरी करत आलेलं आहे. मंडळाला 'महाराष्ट्र फाऊंडेशन'चा पुरस्कार घोषित झाल्यानिमित्त मंडळाच्या निरनिराळ्या कार्यकर्त्यांशी बोलले तेव्हा ध्यानी आलं की, वस्तुत: त्यांच्या कामाची सुरूवात तब्बल २८ वर्षांपूर्वी झालेली होती. सरकारच्या लेखापरीक्षण विभागासारख्या अत्यंत रुक्ष खात्यात काम करणाऱ्या दिलीप यार्दी या तरुणाला १९७० सालापासून पक्षी निरीक्षणाचा छंद जडला. नोकरी सांभाळून त्याने सारे रविवार आणि सगळ्या सुट्ट्या या छंदापायी खर्च करायला सुरुवात केली. निरनिराळी उद्याने, जंगले, तळी, अभयारण्यं यांतून फेरफटका मारून पक्ष्यांची छायाचित्रं घ्यायची आणि तासन् तास त्यांचं निरीक्षण करायचं हा त्यांचा नित्याचा परिपाठ झाला. पुढे जशी जशी दिलीपच्या अभ्यासाची व्याप्ती वाढत गेली तसेतसे त्याचे या क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी संबंध येत गेले. मुंबईच्या 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'शी आणि तिचे तेव्हाचे अध्यक्ष डॉ. सलीम अलींशी त्याचे निकटचे संबंध झाले. औरंगाबादमध्ये त्यावेळी निर्मलदादा ग्यानानी हे आपली 'मुकुल हार' ही आदर्श शाळा सांभाळून पक्षी - निरीक्षणाचा छंद जोपासत असत. तसंच 'यूथ हॉस्टेल'चे कर्नल मोडक हेही निसर्गाभ्यास करणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देत असतं. या दोघांच्या सहकार्याने दिलीप यार्दींनी जायकवाडी आणि सुखना जलाशयावर येणाऱ्या पक्ष्यांचं निरीक्षण सुरू केलं. एव्हाना औरंगाबाद शहरातले निसर्ग-अभ्यासक आणि पक्षीप्रेमी हेही दिलीप यार्दींच्या उपक्रमात सहभागी झाले. नंतर विलास पत्की, प्रा. विजय दिवाण, डॉ. सुहास पोरे, अरूण करडखेडकर, श्याम दंडे, डॉ. दिलीप मुळे , डॉ. ब. मो. करमरकर, तारा मुळे या साऱ्या मंडळींनी एकत्र येऊन औरंगाबादमधली पहिली पक्षी-मित्र संघटना निर्मल दादांच्या नेतृत्त्वाखाली सुरू केली. सुरूवातीच्या काळात पक्षी-निरीक्षण करणं आणि लोकांना पक्ष्यांचं महत्त्व समजावून सागणं हेच काम असे. स्थलांतरित पक्ष्यांच्या संरक्षणासाठी 'या पाहुण्यांना मारू नका. ते तुमच्या जगण्यातही महत्त्वाची भूमिका निभावतात' असं आवाहन ही मंडळी लोकांना करत. नंतर हळूहळू पक्षांचा प्रजातीवार याद्या तयार करणं, त्यांची मोजदाद करणं, त्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करणं ही कामं त्यांनी हाती घेतली. त्यातूनच 'जायकवाडी पक्षी अभयारण्या'ची मागणी रूढ झाली.

औरंगाबाद शहराच्या उत्तरेस सातमाळ्याच्या डोंगररांगांमध्ये गौताळा परिसरात घनदाट जंगल आहे. जिल्ह्यातलं हे एकमेव जंगल शिल्लक असून बिबटा, भेकर, कोल्ही, सायाळी, मोर आणि ससे हे प्राणी तिथे आढळतात. हे जंगलही अभयारण्य

म्हणून घोषित व्हावं असे प्रयत्न या कार्यकर्त्यांनी सुरू केले. १९८६ साली जायकवाडी प्रमाणेच 'गौताळा औट्रम घाट अभयारण्या'ची अधिसूचना सरकारने काढली. दरम्यान जायकवाडीच्या पक्षी-मित्र संमेलनानंतर केवळ पक्ष्यांच्याच नव्हे तर एकूणच सर्व नैसर्गिक परिसराच्या संरक्षणासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, अशी जाणीव दृढ होत गेली तेव्हा त्यासाठी कायमस्वरूपी अशी एक संस्था स्थापन करावी असं या मंडळींना वाटू लागलं. याच जाणिवेतून १९८५ साली त्यांनी पहिलं मराठवाडा पातळीवरचं निसर्गप्रेमी संमेलन औरंगाबादमध्ये भरवलं. पुढे १९८७ साली त्यांनी अधिकृतरीत्या 'निसर्ग मित्र मंडळ'ही संस्था स्थापन केली आणि तिची रीतसर नोंदणीही झाली. या मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून प्रा. विजय दिवाण यांची निवड झाली. सचिव म्हणून दिलीप यार्दी, उपाध्यक्ष म्हणून डॉ. करमरकर आणि सहसचिव म्हणून श्याम दंडे आणि रंजन देसाईंची निवड झाली. कोषाध्यक्ष म्हणून मानसिंग पाटील यांनी काम पाहिले. स्थापनेनंतर मंडळाने लोकशिक्षण, अभ्यास प्रकल्प आणि पर्यावरण संरक्षणासाठी चळवळ अशा तिन्ही मार्गांनी आपलं काम जोमाने सुरू केलं.

प्रा. विजय दिवाण हे 'निसर्ग मित्र मंडळा'हे तब्बल नऊ वर्ष अध्यक्ष होते. व्यवसायाने ते प्राणिशास्त्राचे एक निष्णात प्राध्यापक आहेत. लहानपणापासून राष्ट्र सेवा दल आणि इतर समविचारी संघटनांशी त्यांचा संबंध असल्याने 'निसर्ग मित्र मंडळा'च्या कार्याला धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी विचारांचं अधिष्ठान असावं, असा त्यांनी कायम प्रयत्न केला. निसर्गाचं संवर्धन म्हणजे केवळ पशु-पक्षी आणि झाडं-फुलं यांचं रक्षण नव्हे, तर त्यांचं माणूस आणि समाज यांच्याशी असलेलं नातं ओळखून ते सुदृढ करणं हे होय. हा आग्रह त्यांनी नेहमी धरला. त्या दृष्टीने जंगल आणि तळी यांच्या रक्षणाची भूमिका घेताना तेथे राहणारे लोक, आदिवासी, मच्छिमार आणि शेतकरी यांना वगळून चालणार नाही, अशीच भूमिका मंडळाने वेळोवेळी घेतली. विज्ञानाचे शिक्षक असल्यामुळे पर्यावरणातील अभ्यास आणि संशोधनाला सद्यःस्थितीचा संदर्भ आणि उपयुक्तता याची जोड असली पाहिजे, अशी प्रा. दिवाणांची धारणा आहे. 'निसर्ग मित्र मंडळा'च्या बहुतांशी अभ्यास-प्रकल्पाचं नियोजन आणि नेतृत्व त्यांनीच केलेलं आहे. गेल्या बारा वर्षामध्ये मंडळाने जे वैज्ञानिक सर्वेक्षणाचे प्रकल्प राबविले त्यात १९८७ सालचं जायकवाडी परिसर सर्वेक्षण अभियान, १९९४ साली केलेलं पारधेवाडी या भूकंपग्रस्त गावांचं वैज्ञानिक सर्वेक्षण आणि यंदाचं सुखना धरणाच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या गावांचं सर्वेक्षण हे महत्त्वाचं होतं. सर्वेक्षणामध्ये संबंधित गावाच्या शिवारातून जमीन, पाणी, पीक स्थिती, खडकाची झिरपण क्षमता, वृक्ष-घनता इत्यादी गोष्टींचा समग्र अभ्यास केला गेला. अशा सर्व सर्वेक्षणांमध्ये प्रत्येक ठिकाणी एक तात्पुरती प्रयोगशाळा उघडून माती आणि

पाण्याची तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे, गावातील लोकांकडून एका प्रश्नावलीद्वारे आरोग्यविषयक आणि रोजगारविषयक माहितीही गोळा करण्यात आली. मंडळाच्या अशा साऱ्या अभ्यास-प्रकल्पांमध्ये तज्ज्ञ व्यक्ती या नात्याने डॉ. करमरकर, डॉ. पी. एस. कुलकर्णी, मुकुंद फुलगीरकर, अभय हरसूलकर, डॉ. लीला कुलकर्णी, डॉ. आचवल, डॉ. विजय गायकवाड वगैरे मंडळी नेहमी सहभागी होत असतात. या सर्व सर्वेक्षणांत माती-पाणी परीक्षण आणि प्रश्नावलीचं विश्लेषण ही अवघड कामगिरी डॉ. जयश्री देशपांडे या निष्ठेने पार पाडत असतात. यासाऱ्या प्रकल्पांमध्ये उन्हातान्हात फिरून कष्टपूर्वक माहिती गोळा करण्याचं काम जीवन देशपांडे, अपर्णा खेर्डे, दीपक जाधव, विश्वेश मुजुमदार, अतुल खेर्डे इत्यादी स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने करत आलेले आहेत. प्रा. दिवाण आणि यार्दी ही दोघं या सर्व प्रकल्पांचे समन्वयक म्हणून काम करतात. आजपर्यंत 'मराठी विज्ञान परिषद', 'महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोग आणि सिंचन विभाग' यांनी महत्त्वाचे अभ्यास-प्रकल्प 'निसर्ग मित्र मंडळा'कडे सोपवून मंडळाच्या या क्षेत्रातल्या नेतृत्वाची जणू ग्वाहीच दिलेली आहे. अगदी याच वर्षी सिंचन आयोगाने लागोपाठ दोन वेळा जलाशयांची गुणवत्ता आणि त्यांचं व्यवस्थापन या विषयावरच्या दोन राज्यस्तरीय कार्यशाळांचं आयोजन करण्यासाठी मंडळाला आमंत्रित केलं होतं. या दोन्ही कार्यशाळा अत्यंत यशस्वीपणे पार पडल्या, अशी प्रतिक्रिया अनेकांनी माझ्याकडेही व्यक्त केली.

निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण संतुलन याबाबत लोकशिक्षणाचं काम ही मंडळी गेली पंधरा-वीस वर्षं सातत्याने करताना दिसतात. शालेय स्तरावर वृक्षारोपणाचं महत्त्व रुजावं म्हणून १९८३ आणि १९८७ साली 'निसर्ग मित्र मंडळा'ने काढलेल्या भव्य वृक्ष-दिंड्या औरंगाबादकरांना आजही आठवतात. विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर, वकील, कामगार, व्यापारी असे निरनिराळ्या क्षेत्रातले आठ-दहा हजार लोक त्या वृक्ष-दिंड्यातून सामील झाले होते. दरवर्षी निरनिराळ्या शाळा-महाविद्यालयांमध्ये निसर्गाभ्यास मंडळ स्थापन करण्यास चालना देऊन त्याच्यासाठी निसर्ग शिबिरं, अभ्यास, सहली, कार्यशाळा, वृक्षारोपणाचे कार्यक्रम मंडळातर्फे घेतले जातात. पर्यावरण संरक्षणाची गरज, नैसर्गिक परिसंस्था, जंगलं, वन्यजीव या गोष्टींबद्दल व्याख्यानं, स्लाइड शो, चर्चा यांच्याद्वारे माहिती दिली जाते. या उपक्रमांमध्ये मंडळाचे बहुतेक कार्यकर्ते सहभागी होत असतात. त्यातले मुकुंद फुलगीरकर हे गृहस्थ म्हणजे एक अजब रसायन आहे. ते आणि डॉ. अजित दामले ही दोघं शालेय विद्यार्थ्यांची निसर्ग शिबिरं चालवतात. ऐन डिसेंबर महिन्यात, कडाक्याच्या थंडीत तीस-चाळीस विद्यार्थ्यांसह ही दोघं जंगलात मुक्काम ठोकतात. या शिबिरात फुलगीरकर अगदी तल्लीन होऊन जातात. विद्यार्थ्यांसाठी ते

वनस्पतीशास्त्राचा चालताबोलता कोशच बनतात.

लोकशिक्षणाच्या कामात मंडळाचे विलास पत्की यांचाही सहभाग असतो. पाटबंधारे खात्यात अभियंता असलेल्या पत्कींचा जमीन आणि पाणी यांच्याशी जवळचा संबंध आहे. जलाशयावर येणाऱ्या पक्ष्यांच्या निरीक्षणाचा छंद त्यांना जडला आणि ते पक्षी-मित्र झाले. शिवाय पत्कींना आकाशदर्शनाचाही छंद आहे. त्यामुळे रात्री भ्रमणाच्यावेळी ते 'आकाश कसे वाचावे' यावरही बोलत असतात. १७ नोव्हेंबर १९९८ रोजी टेंपल-टटल धूमकेतूमुळे होऊ घातलेला उल्का वर्षाव पाहण्यासाठी मंडळाने खास कार्यक्रम ठेवला होता. तो मला आठवतो. वीस किलोमीटर दूर सुलिभंजन टेकडीवर दीड-दोन हजार लोक जमले. रात्रभर थांबले, उल्का वर्षाव तर काही दिसला नाही, पण विलास पत्की, डॉ. छाया दिवाण आणि ऋषीकेश दिवाण यांनी सादर केलेल्या खगोलशास्त्रीय माहितीमुळे सारे लोक शांतपणे बसून राहिले.

नागरिकांसाठी मंडळातर्फे नियमितपणे आयोजित होणाऱ्या निसर्ग-सहली आणि गिरिभ्रमण कार्यक्रम औरंगाबाद शहरात भलतेच लोकप्रिय आहेत. या कार्यक्रमाचे संयोजक किशोर गठडी आणि अंकुश सोनकांबळे हेही त्यामुळे तितकेच लोकप्रिय झाले. किशोर गठडी हे अगदी विद्यार्थीदशेपासून मंडळाचं काम करत आहेत. ते एक मेडिकल स्टोअर चालवतात. त्यामुळे आठवडाभर व्यवसायाशी बांधलेले असतात. पण रविवारचा सुट्टीचा दिवस आला की ते पहाटेच बाहेर पडतात. मंडळाचे सचिव अंकुश सोनकांबळे हेही त्यांच्यासोबत नेहमी असतात. सोनकांबळे हे नगर रचना कार्यालयात काम करतात. एक सुस्वभावी, हसरा माणूस म्हणून ते साऱ्यांना ज्ञात आहेत. हिमालयातल्या एका संस्थेत गिर्यारोहणाचं रीतसर प्रशिक्षण त्यांनी घेतलेलं आहे. जुलै ते डिसेंबर दरम्यान गठडी आणि सोनकांबळे निसर्ग-सहली अन् गिरिभ्रमणाचे कार्यक्रम पार पाडतात.

हे मंडळ नुसतंच लोकशिक्षण करणारं आणि अभ्यास प्रकल्प राबवणारं म्हणून नव्हे तर प्रसंगी जोरदार आंदोलन चालवणारं मंडळ म्हणून प्रसिद्ध आहे. औरंगाबाद शहरातला दिल्ली गेट तलाव वाचवण्यासाठी 'निसर्ग मित्र मंडळा'ने दिलेला प्रदीर्घ लढा लोकांच्या आजही स्मरणात आहे. अशा आंदोलनामध्ये मंडळाचे सर्वच लोक उतरतात. परंतु श्याम दंडे याची बात औरच! हा एक साधा, सरळ, थोडा भाबड्या स्वभावाचा माणूस. व्यवसायाने एका औषधी कंपनीचा प्रतिनिधी. कोणत्याही प्रकारच्या अन्यायाबद्दल मनात स्वाभाविक चीड बाळगणारा हा माणूस मंडळाच्या आंदोलनामध्ये बिनीचा शिलेदार असतो. काही वर्षं लोकविज्ञान संघटनेत आणि भारतीय जनविज्ञान जत्थ्यात काम केल्यामुळे दंडे यांची वैचारिक बैठकही पक्की आहे. औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती भागात असलेला दिल्ली गेट तलाव बुजवून तिथे घरं बांधण्याची योजना सिडको

प्रशासनाने आखली. मलिक अंबरच्या काळातील 'नहरे अंबरी' या पाणीपुरवठा व्यवस्थेचा एक भाग असलेला हा तलाव केवळ पर्यावरणदृष्ट्याच नव्हे, तर राष्ट्रीय वारसा म्हणूनही जतन करणं आवश्यक होतं. म्हणून सिडकोच्या योजनेच्या विरोधात मंडळाने आंदोलन सुरू केलं. सर्वात आधी निदर्शनं करून तलावावर चालू असलेलं भराव घालण्याचं काम या मंडळींनी थांबवलं. त्यात दंडेच आघाडीवर होते. नंतरची सात-आठ वर्षं या लोकांनी सरकार दरबारी खेटे घालून तलाव वाचवण्यासाठी निवेदन, शिष्टमंडळ, मोर्चे, निदर्शनं चालू ठेवली. सरकारी अधिकारी, सिडकोचे अधिकारी, खात्याचे सचिव, मंत्री अशा साऱ्यांना वेळोवेळी भेटून मंडळाने आपली भूमिका मांडली. सतत आठ वर्षं वाटाघाटी करूनही शासन बधत नाही हे पाहिल्यावर मंडळाने या तलावाच्या रक्षणासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. शेवटी न्यायालयाने दखल घेऊन हा तलाव अबाधित ठेवण्याचं फर्मान काढलं. या प्रकरणासारखंच वर्तमानपत्रांतून गाजलेलं दुसरं एक प्रकरण म्हणजे 'गौताळा अभयारण्य' वाचवण्यासाठी मंडळाने एका खोडसाळ याचिकेत केलेल्या हस्तक्षेपाचं प्रकरण. यात प्रा. दिवाणांनी स्वतःच मंडळाची बाजू न्यायालयात मांडून ही केस जिंकली होती. अशाच पद्धतीने, सनदशीर मार्गाने केलेल्या अनेक चळवळी या मंडळाच्या खात्यावर जमा आहेत. १९८६ साली क्रांतिचौकातील वृक्षतोडीविरुद्ध केलेलं आंदोलन, १९९० साली मसनतपूरनाल्याच्या प्रदूषणाविरुद्ध केलेली चळवळ, १९९६ साली आठ दिवस वाळुज रस्त्यावरच्या वृक्षतोडीविरुद्ध चालवलेलं 'चिपको आंदोलन' या प्रकारची मंडळाची जन-आंदोलनं लोकांना परिचयाची आहेत. या निरनिराळ्या आंदोलनांमध्ये दिवाण, यार्दी, दंडे या नेहमीच्या कार्यकर्त्यांप्रमाणेच रंजन देसाई, मयुरेश डबरी, मोहन खरवडकर, नितीन देशपांडे, गोपीनाथ माई इत्यादींचा पुढाकार होता.

आज 'निसर्ग मित्र मंडळा'च्या कोणत्याही कार्यकर्त्याशी चर्चा केली तर त्यांच्या बोलण्यातून मंडळाच्या कामाबद्दलची निष्ठा आणि परस्परांविषयीचा विश्वास व्यक्त होतो. साऱ्यांच्या मनात निसर्ग आणि पर्यायवरण याबद्दल एक मूलभूत आस्था दिसते. या क्षेत्रातली एकेक समस्या घेऊन तिच्या निराकरणासाठी झटण्याची जिद्द सर्वांमध्ये दिसते. मंडळाच्या कामात स्त्रिया आणि मुलींचा सहभाग मात्र मला तुरळक वाटला. तो वाढवण्याचा प्रयत्न त्यांनी करावयास हवा. मंडळाचे सगळे प्रमुख कार्यकर्ते हे इतरही सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींमध्ये प्राधान्याने दिसतात. दिलीप यार्दी हे आज महाराष्ट्राचे एक नामवंत पक्षीतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. दोन-तीन वर्षांपूर्वी सोलापूरला झालेल्या पक्षी-मित्र संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं आहे. 'नगर जिल्ह्याचे मानद वन्यजीव संरक्षक' असा मानाचा किताब त्याना शासनाने दिला आहे. त्यांचं 'सफर' हे

पक्ष्यांबद्दलचं पुस्तकही प्रकाशित झालं आहे. प्रा. विजय दिवाण यांनी पर्यावरण-विषयक लेखन विपुल प्रमाणात केलेलं आहे. निसर्ग आणि पर्यावरण या विषयावरच्या अनेक परिषदांमध्ये त्यांनी सहभाग घेतलेला आहे. ते एक उत्तम नाट्यलेखक आणि कलावंतही आहेत. उदयपूरच्या पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे कार्यक्रम निर्देशक म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम पाहिलं आहे. त्यांचा भारतीय लोककलांचा मोठा अभ्यास आहे. विलास पत्की हे निसर्ग आणि पर्यावरण या विषयावर उत्तम रीतीने कीर्तन करतात. जल साक्षरता अभियानात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. रंजन देसाई हे छायाचित्रण व्यवसायासोबतच पत्रकारितेतही आहेत. डॉ. अजित दामले हे उत्तम अभिनेते आहेत. श्याम दंडे त्यांच्या व्यवसायिक संघटनेचे कार्यकर्तेही आहेत. काम करणाऱ्यांच्या अशा विविध क्षेत्रांशी असलेल्या नात्यांमुळे समाज, संस्कृती आणि पर्यायी विकास याबद्दल मंडळाच्या भूमिका हे लोक वारंवार तपासून घेत असतात. औरंगाबादजवळच्या जायकवाडी अभयारण्यात गाळपेर करणारे शेतकरी आणि तलावात मासेमारी करणारे मच्छिमार यांचे खूप प्रश्न आहेत. गौताळा-औट्रमघाट अभयारण्यातही ठाकर आणि भिल्ल आदिवासींच्या अनेक समस्या आहेत. या लोकांचं अभयारण्यासाठी विस्थापन करण्याची गरज नाही, असं मत प्रा. दिवाण आणि यार्दी हे ठामपणे मांडतात.

'निसर्ग मित्र मंडळा'ने कोणत्याही परकीय संस्थेकडून मदत घ्यायची नाही हे तत्व कसोशीने पाळलं आहे. मंडळाची कामं मुख्यत: लोकाश्रयावर चालतात. प्राचार्य प्रताप बोराडे, डॉ. विजय बोरगावकर, उद्योजक अनिल कुलकर्णी, मुकुंद भोगले, रमेश वैद्य, काळुसे पाटील, दीपक यार्दी हे लोक मंडळाला आधार द्यायला वेळोवेळी पुढे आलेले आहेत.

'महाराष्ट्र फाऊंडेशन'चा मोठ्या सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याने 'निसर्ग मित्र मंडळा'चे हे कार्यकर्ते आनंदित झालेले तर दिसलेच, पण पुरस्कारामुळे ओघानेच येऊन पडलेल्या जबाबदारीच्या जाणिवेने थोडे गंभीरही झाल्यासारखे वाटले. पुरस्कारामुळे मिळालेलं हे प्रोत्साहन मंडळाच्या पुढच्या अवघड वाटा चोखाळण्यासाठी पुरेसं बळ देवो, ही सदिच्छा!

**निसर्ग मित्र मंडळ**

१२०, शास्त्रीनगर, गारखेडा रोड, औरंगाबाद ४३० ००५.

(दै. आपलं महानगर मुंबई - दि. १/१/९९ रोजी प्रकाशित)

# अभयारण्यातील आग - नैसर्गिक की निमंत्रित ?

१९९९ मध्ये २४ मार्चच्या संध्याकाळी कन्नडच्या प्रा. रमेश सूर्यवंशी यांचा फोन आला. त्यांचा स्वर खूपच चिंतातुर होता. कन्नडजवळ गौताळ्याच्या जंगलात मोठी आग लागलेली असून ती झपाट्यानं पसरत आहे असं त्यांनी सांगितलं. सातमाळ्याच्या या डोंगरातल्या ठाकर आदिवासींच्या जीवनाचे प्रा. सूर्यवंशी हे एक अभ्यासक आहेत. आदिवासी आणि जंगल यांच्यातील नातं जोपासुनच जंगलाचं संरक्षण शक्य आहे ही भूमिका घेऊन सूर्यवंशी आणि त्यांचे काही सहकारी कार्यकर्ते गौताळा परिसरात काम करीत असतात. दोन दिवसांपासून गौताळ्याच्या तपोवन भागात आग भडकेलेली आहे आणि ती पुरणवाडी, हिवरखेडा भागाकडे पसरू लागली आहे असं त्यांनी फोनवर सांगितलं. भडकलेला हा वणवा त्वरेनं विझविण्यासाठी फारशी हालचाल होत नाहीय याची खंतही सूर्यवंशींनी बोलून दाखविली. इतक्या मोठ्या प्रमाणावर आग भडकलेली असेल तर गौताळ्यात तैनात असलेल्या पाच-दहा वनकर्मचाऱ्यांकडून ती विझवली जाऊ शकणार नाही, तिथे एक मोठी यंत्रणाच उतरवावी लागेल हे उघड होतं. म्हणून औरंगाबादेत निसर्गप्रेमी कार्यकर्त्यांनी जिल्हा प्रशासनाला जागं करण्याची धडपड सुरू केली. तिथे प्रतिसाद मिळत नाही असं दिसताच त्यांनी वृत्तपत्रांकडे धाव घेतली. २५ मार्चच्या वृत्तपत्रांमधून गौताळ्याच्या वणव्याच्या बातम्या छापून आल्या तेव्हा, प्रशासनातली मंडळी खडबडून जागी झाली. दरम्यान, वनखात्याचे आणि वन्यजीव विभागाचे लोक ही आग विझविण्याच्या कामी लागले होते. प्रा. सूर्यवंशी, रवींद्र देशमुख हे कन्नडचे कार्यकर्ते आणि अंकुश सोनकांबळे, रंजन देसाई हे औरंगाबादच्या निसर्ग मित्रमंडळाचे कार्यकर्तेही तिकडे पाहोचले होते. २६ मार्चच्या वृत्तपत्रांमध्ये बातम्या छापून आल्या, 'वणवा विझला आहे'. नंतर तिकडे मंत्रीही भेट देऊन आले. त्यांनी असं जाहीर निवेदन कलं की, गौताळ्याच्या वणव्यात फक्त 'पालापाचोळाच' जळाला आहे, वन्यजीवांना कोणतीही हानी पोहोचली नाही. त्यांनी असंही सांगितलं की, पालापाचोळा जळाल्यामुळे नवीन वनस्पती उगवण्यास मदतच होणार आहे. मंत्र्याचं हे निवेदन प्रसिध्द झालं आणि त्यानं सकृत्‌दर्शनी या वणव्याच्या घटनेवर पडदा पडला. निदान वनखातं, वन्यजीव खातं आणि जिल्हा प्रशासनाच्या दृष्टीनं पडदा पडणं ही समाधानाची गोष्ट होती. पण गौताळ्याच्या या जंगलात खरोखरच सर्व काही आलबेल आहे का? वणव्याच्या निमित्तानं याचा शोध घेणं अर्थपूर्ण होईल.

**वणवा-एक भयप्रद आपत्ती**

वनखातं असो किंवा जंगलाच्या आधारानं जगणारे लोक असोत, कुणाच्याही

दृष्टीनं वणवा पेटणं ही एक भयप्रद आपत्तीच होय. कोणत्याही जंगलामध्ये वृक्षांचं जितकं महत्त्व असतं तितकंच, किंवा त्याहूनही अधिक महत्त्व, झुडपं आणि गवत यांच्या आच्छादनाला असतं. खुरट्या वनस्पती आणि गवताच्या जमिनीवरच्या आच्छादनाचं जे नैसर्गिक स्वरुप जंगलात असेल त्यावरून वन्यजीवांच्या आश्रयस्थानांची प्रत ठरत असते. गौताळ्याच्या जंगलात नुसतेच सागाचे वृक्ष नाहीत. सागाशिवाय अंजन, सालई, धावडा, बोंडारा किंवा खैर, शिसू, सिरस निंब असे वृक्षसमूह तिथे आहेत. शिवाय पळस, बेल, चिंच, चंदन, बोर, आवळा, सीताफळ, शेवगा अशा निरनिराळ्या प्रजातींचे इतर वृक्षही आहेत. या वृक्षांशिवाय जमिनीवर आच्छादन तयार करणारी हेनकळ, कामोनी, पिठोरी, लखड, घाणेरी, नागफण, घायपात अशी असंख्य झुडपं आहेत. गौळण, अमरवेल, हरीणदुडी, शतावरी सफेद मुसळीसारख्या औषधी वेली आहेत. पवन्या, कुसळी, शेळ्या, हेमाटा, हरळी, लव्हाळी, नागरमोथा यासारखी गवतं आहेत. हा वेगवेगळ्या वनस्पतींचा वंशानुक्रम कोणत्याही जंगलाचं नैसर्गिक स्वरूप टिकवून धरण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. वणव्याच्या आगीनं हा वंशानुक्रम नष्ट होतो आणि त्याचे दुष्परिणाम जंगलाच्या नैसर्गिक स्वरूपावर होत असतात. गौताळ्यात आच्छादन निर्माण करणारं वार्षिक वाढीचं गवत वणव्यात जळालं तर त्याजागी अनावश्यक अशा बारमाही, खुरट्या वनस्पती उगवण्याची भीती आहे. असं झालं तर अनेक वन्यप्राण्यांची आश्रयस्थानं नष्ट होतील. बिबट्या वाघ हा एकच वन्यप्राणी गौताळ्यात महत्त्वाचा आहे असा अनेकांचा गैरसमज आहे. वस्तुतः तिथे निरनिराळ्या प्रकारचे ससे, मुंगूस, घोरपडी, सायाळी, भेकरं, तरस, कोल्हे, रानमांजरं, साप, अजगर असे छोटे वन्यजीव मोठ्या संख्येनं आहेत. त्यांची आश्रयस्थळं ही गवताच्या आच्छादनातच असतात. आच्छादन वणव्यात जळालं तर हे सारे वन्यजीवही जळून मरतात किंवा त्यांची आश्रयस्थळं नष्ट होऊन जातात. गौताळ्यात नेमकं हेच घडलं. त्यामुळे वणव्यात 'नुसता पालापाचोळा जळाला. काहीही नुकसान झालं नाही' अशी भूमिका घेणं हे चुकीचं आहे उलट भविष्यात अशी आपत्ती पुन्हा उद्‌भवू नये, यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत. ही आपत्ती का ओढावली याचाही शोध घ्यायला हवा.

**जंगलातली आग - नैसर्गिक की निमंत्रित ?**

बावीस मार्चला गौताळ्याच्या जंगलात जेव्हा आग लागली त्याच सुमारास विदर्भात नागपूर जिल्ह्यात, वर्धा जिल्ह्यात आणि बुलडाण्यात असलेल्या जंगलांमध्येही वणवे पेटले होते. या दोन्ही-तिन्ही ठिकाणच्या वणव्यांच्या घटनांमध्ये एक समान गोष्ट अनुभवाला आली. ती म्हणजे त्या त्या जंगलांच्या परिसरात वस्तीला असलेल्या रहिवाशांची असहकाराची भूमिका. गौताळ्यातही कार्यकर्त्यांना हाच अनुभव आला, असं

प्रा. सूर्यवंशींनी सांगितलं. जंगलाच्या परिसीमेवर असलेल्या वाड्या वस्त्यांमधून राहणाऱ्या लोकांना या जंगलाबद्दल आस्था वाटू नये अशी परिस्थिती का निर्माण झाली? जंगलात वणवा पेटल्यावर पहिल्याच दिवशी रहिवासी स्वत:होऊन तो विझविण्यासाठी का पुढे आले नाहीत ? ते वनखात्याची वाट का पाहात बसले ? या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. जंगलाच्या परिसरात असलेल्या खेड्यांमधील आणि पाड्यांमधील लोक अनेक गोष्टींसाठी जंगलावरच अवलंबून असतात. रोजच्या रोज लागणारं जळणाचं लाकूड, घरांसाठी आणि औजारं बनवण्यासाठी लागणारं मध्यम लाकूड, जनावरांसाठी चारा, अन्न आणि औषधीसाठी वापरण्यासाठी इतर वनोपज वगैरे गोष्टी हे लोक जंगलातूनच घेतात. एखादं जंगल राखीव वन म्हणून किंवा अभयारण्य म्हणून कायद्यानं संरक्षित झालं की लगेच लोकांचं जंगलावरचं अवलंबित्व नाकारणं हे चूक आहे. विशेषत: जंगलाशी निगडित असलेल्या आदिवासी आणि अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यापासन तोडून जंगलं संरक्षित राखणं अवघड आहे. १८७८ साली जेव्हा पाहिला भारतीय वन संरक्षण कायदा झालो तेव्हा त्याच्या कलम २६ अन्वये लोकांचं हे अवलंबित्व नाकारण्यात आलं होतं. त्यावेळी आंध्र प्रदेशातल्या कुर्नूल जिल्ह्याच्या कलेक्टरनं तत्कालीन इंग्रज सरकारच्या निदर्शनाला एक महत्त्वाची बाब आणून दिली होती. त्यानं म्हटलं होतं की वर्षातून अनेक महिने वनोपज गोळा करुन ती विकणाऱ्या आदिवासी महिलांची त्यामुळे उपासमार तर होईलच, परंतु उपजीविकेचं हे साधन बंद झाल्याने बहुतांशी आदिवासी जमाती गुन्हेगारीकडे वळतील. त्यानंतर आजपर्यंत अनेक आयोगानी आणि समित्यांनी खेडूतांच्या आणि आदिवासींच्या जंगलाशी असलेल्या नात्याचा ऊहापोह केला आहे. अगदी अलिकडे सर्वमान्य झालेल्या असंरक्षित जंगलाच्या संयुक्त वनव्यवस्थापनाच्या तत्त्वातही हे अवलंबित्त्व मान्य केलेलं आहे. असा अजूनही महाराष्ट्रात मात्र आमचा वन-व्यवस्थापनाचा जनविरोधी दृष्टिकोन अद्याप बदलेला नाही, हे दुर्दैवाचं आहे. पूर्वेकडच्या ओरिसा आणि बिहार या राज्यांमध्ये शासनाच्या किंवा इतर संस्थांच्या मदतींची अपेक्षा न ठेवता जंगलाच्या परिसीमेतील ग्रामीण लोकांनी हजारो कार्यगट निर्माण केले आहे. हे कार्यगट एकूण चार लाख हेक्टर जंगलाच्या संरक्षण-संवर्धनाची काम करीत आहेत.

**रहिवाश्यांचे सहकार्य नाही**

१९८८ मध्ये भारताने अंगिकारलेल्या नव्या वनसंवर्धन धोरणात अशा संयुक्त वनव्यवस्थापनाचा पुरस्कार केलेला आहे. त्यानंतर १९९५ पर्यंत एकेक करुन पश्चिम बंगाल, हरियाणा, ओरिसा, गुजरात, बिहार, आंध्रप्रदेश, काश्मीर, पंजाब, त्रिपुरा, मेघालय, हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि राजस्थानातही लोकसहभागातून वनसंरक्षणाचं

हे सूत्र अधिकृतपणे स्वीकारलं गेलं आहे. महाराष्ट्राने मात्र तत्त्वत: त्याचा स्विकार केलेला असला तरी अंमलबजावणीच्या पातळीवर फारशी समाधानकारक स्थिती नाही. काही जिल्ह्यामध्ये असे संयुक्त वन व्यवस्थापन गट स्थापन झाले. बुलडाणा जिल्ह्यात त्यांचे बऱ्यापैकी कामही आहे. पण इतरत्र फारसे नाही. विशेषत: अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यान म्हणून अधिसूचित असलेल्या जंगलांना वन्य जीव संरक्षण कायदा लागू असल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापनाची उपयुक्त योजना तिथे राबवता येत नाही, हे मोठे चमत्कारिक आहे. वस्तुत: अशा अभयारण्यातच ही योजना राबवण्याची जास्त गरज आहे. गौताळ्याच्या जंगलात अतिक्रमणे नियमित करण्याचा प्रश्न, चराईबंदीचा प्रश्न, वृक्षतोड आणि डुकरे, बिबटे यांच्याकडून खेडूतांना होणाऱ्या उपद्रवाचा प्रश्न यामुळे वर्षानुवर्षे स्थानिक रहिवाशांबरोबर संघर्षाची स्थिती वनखात्यापुढे निर्माण होत राहिली. काही वर्षापूर्वी वनखात्याच्या काही क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी चराईबंदी यशस्वीपणे राबवली होती. रोजंदारीवरील माणसाकरवी देखरेख ठेवून, गवत कापून गोठ्यातच जनावरांना चारणं आणि जनावरे जंगलात चरू न देणं हे लोकांच्या गळी उतरवलं होतं. पुढे आर्थिक तरतूद नसल्याच्या कारणानं या मजुरांवर बडतर्फीचा बडगा फिरला आणि चराईबंदी कागदावरच राहिली. गेल्या दोन वर्षामध्ये तर वनखात्याच्या काही कर्मचाऱ्यांनीच पैसे घेऊन गुरं जंगलात चरू द्यायला सुरूवात केली. या कर्मचाऱ्यांच्या पैसा उकळण्याच्या वृत्तीमुळे, त्यांनी वेळोवेळी दिलेल्या पंचनाम्याच्या धमक्यांमुळे परिसरातील ग्रामस्थ चिडले. वन कर्मचाऱ्यांशी त्यांचे खटके उडू लागले. मध्यंतरी तर एका वनकर्मचाऱ्याच्या घरचा गोठाच कुणीतरी पेटवून दिल्याचे वृत्त आहे. बाहेरच्या कंत्राटदाराकडून पैसे घेऊन त्यांना अवैध लाकूडतोड करून दिली जाते. अशाही तक्रारी ग्रामस्थांकडून होऊ लागल्या. यात खरे किती आणि खोटे किती हा चर्चेचा प्रश्न होऊ शकतो. परंतु जंगलाच्या परिसरात राहणाऱ्या लोकांचा आणि आदिवासींचा विश्वास वनखात्याचे लोक संपादू शकले नाहीत, हे मात्र खरे आहे. येथे वर्षानुवर्ष राहाणाऱ्या काही आदिवासी जमातीची नोंदच नाही. त्यामुळे त्यांना विस्थापित म्हणून पुनर्वसनाचा हक्क मिळू शकत नाही. १८८४ चा जो भू-संपादन कायदा आहे त्याच्या तरतूदी अव्यवहार्य आणि जाचक आहेत. त्यामुळे अभयारण्यांसाठी जमीन संपादन करतांना अनेकांना हक्क नाकारले गेले आहेत. स्वयंसेवी संस्थांनी या कायद्याला सुचवलेल्या पर्यायांमध्ये असं म्हटलेलं आहे, की संपादित होणाऱ्या जमिनीवर गुजराण करणाऱ्या शेतमजूर, कामगार आणि इतर लाभार्थींनाही पुनर्वसनाचा हक्क मिळावा. पण प्रत्यक्ष कायद्यात ती सोय नाही. १९७२ च्या वन्य जीव संरक्षण कायद्यात पूर्वी अशी एक तरतूद होती की ज्यामुळे मुख्य वन संरक्षक हे स्वत:च्या अधिकारात शेतीचे, वहिवाटीचे किंवा मच्छीमारीचे हक्क काही प्रमाणात लोकांना देऊ शकत. पण १९९३

सालापासून का कोण जाणे, ही तरतूद कायद्यातून काढून टाकण्यात आली आहे. या सर्व गोष्टींमुळे पिढ्यान् पिढ्या जंगलाच्या आधारानं जगणाऱ्या लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला असेल तर ते लोक जंगलाच्या रक्षणाच्या कामात फारसं सहकार्य देणार नाहीत हे उघड आहे. गौताळ्यात सावधगिरी बाळगायला हवी. यापुढे तरी गौताळ्याच्या या जंगलाचं संरक्षण संवर्धन करण्याच्या कामी तिथल्या स्थानिक रहिवाशांचे सहकार्य मिळवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर करायला हवेत. जुनी अतिक्रमणं नियमित करून लोकांना अभयारण्याबाहेर पुनर्वसित करणं, वर्षानुवर्षे लोंबकळलेले त्यांचे प्रश्न सोडवणं आणि जंगल संरक्षणाबाबत सातत्यानं जनजागरणाची मोहीम चालू ठेवणं या गोष्टी शासन, अधिकारी आणि स्वयंसेवी कार्यकर्ते यांनी संयुक्तपणे करण्याची नितांत अवश्यकता आहे. अन्यथा, आपत्तींना आपण स्वत: होऊनच निमंत्रण दिल्यासारखे होईल.

**योग्य वनव्यवस्थापन हवे**

सातपुड्याच्या पर्वतरांगामधील वनक्षेत्र हे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचा सीमावर्ती भाग यात पसरलेले आहे. हिमालयाच्या पर्वतरांगांपासून पश्चिम घाटापर्यंत वन्यजीव आश्रयस्थळांची एक सलग साखळी तयार करण्याचे महत्त्वाचे काम विंध्याचल आणि सातपुडा रांगा करतात. ही साखळी अबाधित राहावी म्हणून विदर्भात सातपुडा बचाव अभियान जन्माला आले. यात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रातील निसर्गप्रेमी सामील होते. अतिक्रमणग्रस्त भागातील आदिवासींसाठी पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करणारी जनजागरण मोहीम चालविणे, त्यांना जंगलतोडीपासून परावृत्त करणे आणि जंगल संरक्षणाच्या कामात त्यांचा सहभाग मिळविणे ही उद्दिष्टे होती. या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळाला, होता. गौताळा-औट्‌मघाट अभयारण्याला लागुनच सोयगाव-अजिंठा भागात चांगले जंगल आहे. तिथे वन्यजीवांचे प्रमाणही बऱ्यापैकी आहे. परंतु हे क्षेत्र संरक्षित नाही. त्यामुळे या भागात अवैध वृक्षतोड, वन्यजीवांच्या विषप्रयोगाने हत्या आणि वनक्षेत्राचा ऱ्हास होत असतो. येथूनच अशा अवैध गोष्टी करणारे गुन्हेगार गौताळ्याच्या संरक्षित क्षेत्रातही घुसखोरी करतात. हे ध्यानी घेऊन अजिंठ्याचे हे वनक्षेत्रही संरक्षित करण्याची गरज आहे. असे झाले तर वनसंपत्तीचे होणारे नुकसानही टळेल आणि गौताळ्यापासून अजिंठा-सावळदबारा मार्गे मेळघाटापर्यंत वन्यजीवासाठी एक संलग्न संचार मार्ग तयार होईल. भंडारा जिल्ह्यातील नवेगाव राष्ट्रीय उद्यान आणि नागझिरा अभयारण्य यांच्या परिसरात बांबूची वने मोठी आहेत. बांबूपासून चटया, तट्ट्या वगैरे बनविणारे बुरूड लोकही याच परिसरात राहतात. त्यांना किफायतशीर दरात बांबू उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धारेण आहे. परंतु या धोरणाचा फायदा घेऊन काही हितसंबंधियांनी बांबूची अवैध तोड प्रचंड प्रमाणावर सुरू केली. यात काही व्यापारी, कंत्राटदार आणि अधिकारी

गब्बर झाले पण बिचारे बुरुड मात्र पूर्वीप्रमाणेच हालअपेष्टांचे जीवन जगत आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या संकटापासून महाराष्ट्रातील जंगले वाचविणे आणि ती टिकविणे यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागतील. वनक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी आणि गैर-आदिवासी लोकांच्या गरजांचा अभ्यास करुन त्यांच्या गरजा गावपातळीवरच्या वनीकरणातूनच कशा भागातील हे पाहिले पाहिजे. ओसाड जमिनीवर चराईसाठी कुरणे तयार करणे, शेतातील बांधावर, घरांच्या आवारात आणि गावशिवारतील पडीक जमिनीवर वनीकरण करणे, गौण वनउपज आदिवासींमार्फत गोळाकरुन कोणताही दलाल मध्ये न ठेवता ती शासनाने विकत घेणे, आदिवासींना पर्यायी उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देऊन त्यांचे वनांवरचे अवलंबित्व करणे, या गोष्टींचा अंतर्भाव वन-व्यवस्थापनात असला पाहिजे.

प्रा. विजय दिवाण,
निसर्ग मित्रमंडळ
द्वारका, ९ शक्तीनगर,
औरंगाबाद.

(दै. लोकमत - दिनांक ४ एप्रिल १९९९ रोजी प्रकाशित)

# ''जायकवाडीतील पक्षी संपदा''

- दिलीप यार्दी

पैठण शहराला फार पूर्वीपासून महत्त्व आहे. जशी संताची पार्श्वभूमी या शहराला लाभली आहे. तसेच कलावैभव पण पैठणीच्या स्वरूपाने आहेच. यांच पवित्र भूमीवर महाराष्ट्र शासनाने जायकवाडी धरण बांधले आहे. पैठणपासून ८ कि.मी. अलिकडे हा प्रचंड जलाशय आज समुद्राची आठवण देत आहे व म्हणूनच या जलाशयाला 'नाथसागर' हे नाव दिले आहे. या प्रचंड जलाशयामुळे पैठण परिसराचे सर्व वातावरण बदलले आहे. जलाशयाच्या आजुबाजूला आता बऱ्यापैकी झाडी दिसू लागली आहे. श्री नाथ महाराजाच्या दर्शनासाठी प्रतिवर्षी हजारोनी येणारे भक्तगण याच झाडीत विसावा घेतांना दिसतात तर मान्यवर व्यक्ती पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहात मुक्काम करतात.

विश्रामगृहाच्या सभोवतीस अशोकांच्या उंच उंच मनोऱ्यामध्ये विविध फुलझाडे व या मधून नाथसागरचा अस्ताव्यस्त पसरलेला जलाशय आपले मन मोहून घेतल्याशिवाय राहत नाही. विश्रामगृहाच्या डाव्या बाजूने धरणाची परिसीमा सुरू होते गोलाकार भिंतीच्या मध्यभागी प्रत्यक्ष धरण जणु या जलाशयांला गवसणी घालते. धरणाच्या भिंतीवरून बघितले असता डाव्या बाजूला ज्ञानेश्वर उद्यान व त्याच्याच किंचित उजवीकडे नाथमंदीर असे विलोभनीय दृष्य दिसते.

याच परिसरात गेल्या काही वर्षांपासून युरोप, सैबेरीया, तिबेट, लडाख इ. उत्तरेकडील भागांमधून असंख्य पक्षी हजेरी लावतांना आढळले आहेत. परंतु हे ऐश्वर्य असते सामान्य माणसाच्या दृष्टीआड. त्याला बघावयाचे म्हणजे आवश्यकता असते निरीक्षणांची, तसेच तज्ञांच्या मार्गदर्शनाची.

आपण नाथसागर व आजूबाजूच्या परिसरातील पक्षी जगताचा आढावा घेऊ. आपल्याला या भागांतील पक्ष्यांचे तीन भाग सहज पाडता येतील. पहिला म्हणजे विश्रामगृह व कॉलनीच्या भोवती असलेल्या झाडाझुडपांमध्ये दिसणारे पक्षी. दुसरे पाण्यातील अगर पाणथळ जागी आढळणारे पक्षी आणि तिसरा भाग आसपासच्या माळरानाच्या भागांत दिसणारे पक्षी.

अगदी लहानपणी आई आपल्या बाळाला भरवतांना चिऊची, काऊची ओळख करून देते तर आजी काऊचे घर शेणाचे चिऊचे घर मेणाचे असे म्हणते अशा रीतीने झालेली पक्षांची ओळख सहजासहजी विसरणे शक्य नाही. असा वावर नसला तर वातावरण रुक्ष, निरस, कंटाळवाणे होईल. कळत नकळत माणसाचे जीवन फुलवण्याचे काम हे वातावरण करत असतात.

विश्रामगृह व कॉलनीभोवती असलेल्या नीम (कडूलिंब) शेवगा, अंबा, अशोक

इ. झाडामध्ये पक्षांची चालत असलेली किलबिल ऐकणे, धावपळ डोळ्यांनी बघणे म्हणजे जणु आपण स्वर्गात असल्याचा आभास होणे होय.

इतर पक्षांच्या किलबिलाटांमध्ये तपकीरी रंगाच्या पाठीचा साधारणपणे १२ ते १५'' लांबीचा भारद्वाज त्यांच्या लालबुंद डोळ्याभोवती असलेली तांबडी कडा यामुळे ओळखण्यांत चूक होत नाही. याचे पंख तांबुस विटकरी रंगाचे असतात. या पक्ष्याचा आवाज भुभुत्कारासारखा असतो. त्यामुळे प्रातः समयीचे वातावरण आण खीनच प्रसन्न करतो. व म्हणूनच या पक्षाचे दर्शन सकाळी सकाळी होणे शुभ मानतात. साधारणतः चिमणीच्या आकाराचा रॉबीन किंवा चीरक. लहानशी शिळ घालत धीटपणे अंगणांत अगर आपल्यापासून अवघ्या ५-६ फूटावर येतो नर रॉबीन काळा असून त्यांच्या पंखावर दोन्ही बाजूला पांढरा पट्टा असतो. हा आपली शेपटी हळुवार पण खाली वर करत असतो. तर शिंपी पक्षी आकाराने लहान व हिरवट रंगाचा असतो हा पक्षी सारखी वटवट करीत असतो. झाडा झुडपांमध्ये या पक्षांचा आवाज तर येतो. पण लवकर दिसत नाही. असा हा पक्षी दोन पानांना टाके घालून पिशवी शिवल्याप्रमाणे आपले घरटे बनवतो. याच्या आतमध्ये आपल्या पिल्लांसाठी मऊ गवत व शिवरीचा कापूस असतो. साधारणपणे आंबा सोनचाफा यासारखी लांब पाने असलेल्या झाडांवर ही घरटी आढळतात.

सनबर्ड हा पण एक अत्यंत लहान, देखणा नाजुक पक्षी आहे. सतत या फुलावरून त्या फुलांवर उडत त्यातील मध खात असतो. याचा रंग जांभळा काळपट पण चकाकणारा असतो तर याची मादी फिकट रंगाची व पोटावर पिवळसर रंग असलेली असते. मधूनच हा पक्षी जवळील टेलिफोन अगर विजेच्या तारांवर बसून मोठया आवाजांत एकमेकांना साद देतांना दिसतो. त्याच्या शरीराच्या आकाराच्या मानाने आवाज फारच मोठा असतो.

विश्रामगृहातून आपण बाहेर पडलो व बसस्टँडकडे जाऊ लागलो की समोरच्या तारांवर आपल्याला दिसतात 'ग्रीन बी इटर' किंवा वेडा राघू पोपटाप्रमाणे हिरवट रंग असलेल्या या पक्षाचा आकार चिमणीपेक्षा मोठा असून याच्या शेपटीतून एक एरिअल सारखी वायर बाहेर आलेली असते. टीर टीर आवाज करीत हे पक्षी किटकांची शिकार फार उत्कृष्टपणे करतात. अशाच प्रकारे किटकांची शिकार करतांना आपल्याला दिसतो. काळ्या रंगाचा दुभंगलेल्या शेपटीचा कोतवाल कॉलनीतल्या कुठल्याही विजेच्या तारांवर तसेच चरणाऱ्या जनावरांच्या पाठीवर हे बसलेले आढळतात. मध्यम आकाराचा हा पक्षी त्याच्या परिसरात येणाऱ्या इतर मोठ्या पक्षांचा पाठलाग करून हाकलून देतो व म्हणूनच याच्या आसऱ्याने लहान लहान पक्षी वस्ती करतात व हा सुद्धा नावाप्रमाणे त्यांचे रक्षण करतो. 'खाटीक उर्फ' 'बॅक्ड शाईक' १७ ते २० से.मी. आकाराचा काळा पांढरा पक्षी

आहे. गुलाबी रंगाच्या पंखाच्या कडेला काळे फराटे असतात. चोचीपासून डोळ्यापर्यंत लांब रूंद काळा पट्टा असतो. नावाप्रमाणे हा पक्षी क्रूर असतो. टोळ, किटक, बेडूक, सरडा इत्यादींची शिकार करून हा खाटकांप्रमाणे काटेरी झाडांवर सोचून ठेवतो व सवडीने खातो. याच्यासोबत मैना, ब्राम्हणी मैना, बुलबुल हे आपल्या परिचयाचे पक्षी स्वैरपणे भराऱ्या मारतांना दिसतात.

चाप अगर इंडियन रोलर, ज्याला आपण निळकंठ म्हणतो, तो काश्मीरमधून थंडी पडण्यापूर्वी सप्टेंबरमध्ये आपल्याकडे येतो. याची चोच काळसर, पोट आणि डोके पिवळसर, गळ्याचा रंग तपकिरी, तर पक्षांचा रंग निळा, टोकाला काळे पट्टे, एकूण निळकंठ म्हणजे अप्रतिम रंगसंगतीच. अत्यंत देखणा शुभलक्षणी, कबुतरापेक्षा किंचित मोठा असून निळा रंग उडतांना अतिशय खुलून दिसतो.

मध्येच जुन्या काळ्या गिरणीसारखा आवाज हुक-हुक असा जर ऐकू आला तर जवळपास निश्चित तांबट पक्षी आहे असे समजावे. साधारण चिमणीपेक्षा थोडासा मोठा, रंगाने हिरवा, गळ्याजवळ तांबडे लोलक, डोळ्याभोवती निळसर झाक असल्यामुळे फारच मोहक दिसतो. पण याला हिरव्या पानांमधून शोधणे फारच अवघड असते.

धरणांकडे जाणाऱ्या पंप हाऊस हेड रेग्युलेटरच्या दरम्यान असणाऱ्या तारांवर आपल्याला असंख्य, चिमणीएवढे, पाठीच्या बाजूला निळसर काळे तर पोटाकडे पांढरे, अत्यंत चपळाईने मधूनच पाण्यावर किंवा पाण्यांत सुर मारतांना स्वॅलोज आढळतात. यांच्या संगतीने असंख्य चिमणी ऐवढे मातकट काळ्यारंगाचे मार्टीन आपल्याला पाण्यावर झेपावतांना दिसतात. पाण्यावरील बारीक बारीक किडे अलगद उचलतात यांचे घरटे हे बारीक बारीक चिखलांच्या गोळ्यांनी बाधलेले इतरांच्या सहजासहजी लक्षांत येणार नाही असे, खोलगट बशी अगर कप भिंतीला चिटकवला तर जसे दिसेल त्याप्रमाणे असते.

आपण धरणांकडे चालू लागल्यावर उजव्याबाजूला नाथसागराचा प्रचंड जलाशय अस्ताव्यस्त पसरलेला दिसतो. डाव्या बाजूला बऱ्यापैकी झाडी वाढलेली आहे. या झाडीमध्ये व त्या बाजूने जाणाऱ्या तारांवर वेडे राघू, बुलबुल, तांबडा होला, स्पाटेड, कोतवाल, मैना किंवा सांळुक्या, पाईड मैना हे मनसोक्त विहार करतांना आढळतात. तर पाण्यामध्ये अनेक रंगीबेरंगी पक्षी थव्या थव्याने विहार करतांना दिसतात. हे पाणपक्षी प्रामुख्याने निरनिराळ्या बदकांच्या जातीचे आहेत. यामध्ये टफ्टेड पोचार्ड, कॉमन, पोचार्ड, गडवाल, कूटस, चक्रवाक, पीनटेल इ. अनेक पक्षी युरोप, सैबेरिया, तिबेट इतक्या हजारो मैल लांबून आलेले आहेत. जलाशयाच्या काठाकाठाने पांढऱ्या मानेचे करकोचे, ओपनबील व्हाईट आयबीस दिसतात. पिवळ्या चोचीचा टर्न उर्फ नदीसुरय गोलाकार घिरट्या घालत असतो. मध्येच पाण्यात सूर मारून माशाची शिकार चोचीने

पकडून परत पुन्हा वर जातांना दिसतो त्यांचा हा शिकारीचा कार्यक्रम डोळ्याचे पारणे फेडतो.

कबुतरा येवढा पांढरा स्वच्छ पक्षी संथपणे उडतांना दिसला तर तो नक्कीच समुद्र पक्षी आहे असे समजण्यास हरकत नाही. गेल्या दोन वर्षापासून जायकवाडी जलाशयाचे 'नाथसागर' हे नांव तो सार्थक करतोय. हे पक्षी थव्या थव्याने काठावर तर मध्येच पाण्यांवर चमकतांना आढळतात. किनाऱ्या किनाऱ्याने दलदल भागात तुतवार आपल्या अणकुचीदार चोचीने किडे पकडत इकडे तिकडे पळत असतात. नेहमीच्या परिचयाचे बगळे, टिटव्या या पण आपल्याला दिसतात.

सोनेरी रंगाचे डोके, पंख पांढरट, पिवळ्या रंगाचे पोट असलेले ब्राम्हणी डक हे बदक म्हणजे आपल्या पुराणांत ठिकठिकाणी उल्लेख असलेले चक्रवाक होय. नेहमी जोडीने हमखास वावरणारा हा पक्षी अत्यंत माणूसघाणा आहे. माणसाची चाहूल लागतच कॉक कॉक असा भसाडा आवाज काढत हे पळ काढतात. फेब्रुवारी मार्च मध्ये हे उत्तरेकडे तिबेट लडाख कडे स्थलांतर करतात. पाणकावळे अगर ( कॉरमोरंट) हे सुद्धा थव्याथव्याने काठावर बसलेले दिसतात. त्यांच्यातला एखादा आपले पंख पसरून वाळवतांना आढळतो. पाण्याच्या आत बुडीमारून हा माशाचा पाठलाग करीत त्याला पकडतो.

तपकिरी काळपट पंख, गुलाबी पाय टिटविच्या आकाराचा शेकट्या पक्षी ओळखण्यात चूक होत नाही. किनाऱ्यांवर उगवणाऱ्या गवतामध्ये वॅगटेल (धोबी) याच्या चारही जाती ग्रे, यलो, व्हाईट, व बॅकहेडेड ह्या होत. त्या चार जातीचे वास्तव्य येथे प्रचंड प्रमाणात दिसते. त्यांच्या सोबत पिवळी चोच व काळे पाय, काळी चोच असलेले गायबगळे व लहानबगळेही बऱ्याच प्रमाणात दिसतात.

एकदा मी, निर्मलदादा व विलास पत्की पक्षी निरिक्षणाला गेलो असतांना नाथसागराच्या आजूबाजूला असलेल्या गवतामध्ये बसलेली कॉमन स्नाईपची एक जोडी दिसली. मातकट रंगावर काळपट्टे व लांब चोच असलेले हे पक्षी मातीशी एकरूप होऊन जातात. त्यामुळे ते चटकत दिसत नाहीत. आम्हाला दिसलेले बहुतेक सर्व पक्षी किटक भक्षी आहेत.

सूर्यास्तानंतर आपण विश्रामगृहाच्या हिरवळीवर बसलो असताना सभोवताली नव्यानेच लावलेली अप्रतिम सुंदर बाग आपला दिवसभराचा थकवा क्षणांत दूर करते. या बागेत असलेल्या दिव्यांवर मग किंचाव किंचाव क्चिकिच् असा चिचित्र कर्कश आवाज काढणारे पिंगळेही दिसतात.

विश्रामगृह व आजूबाजूचे पक्षी बघून मन तृप्त होते. परंतु त्याचवेळी खंत याची वाटते की या पक्ष्यांना गुराखी, तसेच चरणाऱ्या गुरांमुळे सतत त्रास होतो व निवांतपणा

मिळत नाही. शासनाने मनांत आणले तर येथेही पक्षांना संरक्षण देता येईल. तसेच पक्षी निरीक्षकांची सोय होईल. तेव्हा नम्र आवाहन करतो की त्यांनी यासाठी योग्य अशी कार्यवाही करावी. लवकरच जायकवाडी येथे भरतपूरप्रमाणे पक्षी अभयरण्याकरून सौदर्यात भर घालावी व मराठवाड्यांत सध्या एकही अभयारण्या नाही याची खंत दुःख दुर करावी.

जायकवाडी येथे पक्षी अभयअरण्य झाल्यास या ठिकाणी आढळणारे बागेतील सनबर्ड, भारद्वाज, राखी वटवट्या, बुलबुल स्थलांतरित कुटचक्रवाक, कॉमन पोचार्ड इ. पाणपक्षी गायरानातील चंडोल, स्कायलार्क चाब, ट्र पिपेंट इ. अशा तीनही प्रकारचे पक्षी आनंदाने गुण्यागोविंदाने, नांदताना दिसू शकतील व सध्या या पक्षाची होणारी शिकार थांबवून आपण सर्वजण स्वर्गीय आनंद उपभोगू शकू.

(दै. मराठवाडा - १९८२ मध्ये प्रकाशित लेख)

# जायकवाडी पक्षी- अभयारण्यास विरोध नको

- प्रा. विजय दिवाण

मराठवाडा विभागाच्या पर्यावरण संरक्षणाबाबत आग्रही भूमिका घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने १९९७ हे साल महत्त्वाचेच म्हटले पाहिजे. कारण याच वर्षी मराठवाड्यातला पहिला वन्यजीव संरक्षण उपविभाग औरंगाबादेत स्थापन झाला आणि गौताळा, नायगाव (बीड), येडशी-रामलिंग या अभयारण्यांसोबतच जायकवाडी (पैठण) येथील पक्षी अभयारण्यही व्यवस्थापनासाठी या उपविभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. निसर्ग मित्रमंडळाच्या आम्हा मोजक्या कार्यकर्त्यांनी ज्या प्रमाणे दिल्लीगेट तलाव वाचविण्यासाठी किंवा गौताळा-औट्रमघाट अभयारण्य अबाधित राहण्यासाठी कडवी झुंज दिली त्याचप्रमाणे जायकवाडीचे पक्षी-अभयारण्य प्रस्थापित व्हावे म्हणूनही वर्षानुवर्षे प्रयत्न कलेले होते. १९८४ सालापासून जायकवाडी येथे पक्षीमित्र संमेलन, परिसर सर्वेक्षण अभियान आणि स्थलांतरित पक्ष्यांची प्रजातीवार नोंदणी करून हा परिसर पक्षी-अभयारण्य म्हणून घोषित व्हावा, यासाठी निसर्ग मित्रमंडळाने परिश्रम घेतले होते. त्यामुळे जायकवाडी जलाशयाच्या परिसरात राहणाऱ्या काही रहिवाशांचा हे अभयारण्य स्थापन होण्यास विरोध आहे, असे जेव्हा कानी आले तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटले. अभयारण्यास असलेला लोकांचा विरोध हा विशेषत: शेवगाव-पाथर्डी आणि नेवासा या नगर जिल्ह्यातील काही तालुक्यांतील आहे, असे ध्यानी आले. तेव्हा पक्षीतज्ज्ञ दिलीप यार्दी, शाम दंडे आणि मी स्वत: असे तिघेजण त्या भागात गेलो. तेथील शेतकऱ्यांशी, काही लोकप्रतिनिधींशी आणि त्या भागातील साखर कारखान्याच्या काही संचालकांशी आम्ही चर्चा केली. तेव्हा जायकवाडी पक्षी अभयारण्याबद्दल या भागातील लोकांना वाटणारी भीती कशी गैरसमजावर आधारित आहे आणि याबाबत त्यांच्याशी संवाद करण्याची कशी गरज आहे, हे ध्यानी आले.

**घबराट कशासाठी ?**

वस्तुत: गौताळा-औट्रमघाट अभयारण्य आणि जायकवाडी पक्षी-अभयारण्य ही दोन ठिकाणे औरंगाबाद जिल्ह्यासाठी भाग्यविधाती रत्ने ठरू शकतात, हे सत्य आहे. पण हे सत्य जिल्ह्यातील लोकांनाच नीट उमगलेलं नाही, असं म्हणावं लागेल. त्यामुळे जायकवाडी पक्षी अभयारण्याच्या घोषित क्षेत्रात हक्क-दावे निकाली काढण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी चौकशीची कारवाई सुरू करताच जलाशयाच्या आसपासच्या रहिवाशांमध्ये घबराट पसरली. अभयारण्याच्या स्थापनेमुळे आपला उपजीविकेचा हक्कच हिरावून घेतला जाईल, अशी भीती वाटून तेथील लोकांनी आपल्या लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली संघटित होऊन अभयारण्याच्या.प्रस्थापनेलाच विरोध दर्शविण्यास सुरूवात केली. अभयारण्याबद्दल मनात असलेल्या शंका-कुशंकांचे निराकरण करण्यासाठी तेथील

झाली. पक्षीतज्ज्ञ दिलीप यार्दी यांनी वारंवार या प्रदेशाला भेटी देऊन तेथील साठ-बासष्ट मच्छिमारांशी वैयक्तिकरीत्या चर्चा केली तेव्हा कुठे त्यांचा विरोध थोडासा कमी झाला. यानंतर नगर जिल्ह्याच्या प्रांतसाहेबांनी जेव्हा चौकशीचे काम सुरू केले तेव्हा त्या भागात गाळपेर आणि उपसासिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांना भीती वाटू लागली. आम्ही या शेतकऱ्यांशी आणि तेथील आमदारांशी चर्चा केली तेव्हा त्यांना वाटणारी भीती गैरसमजुतींवर आधारित होती, असे लक्षात आले. संपूर्ण अधिसूचित प्रदेशात गाळपेराच्या शेतीसाठी दिलेले परवाने रद्द होतील आणि अधिकृत/अनअधिकृत अशा कोणत्याही हक्कदारास गाळपेर करता येणार नाही, अशी भीती लोकांना वाटते. अभयारण्याची अभिसूचना केंद्र शासनाच्या वन्य जीव संरक्षण कायदा (१९७२) अन्वये काढण्यात आली असल्यामुळे या कायद्यातील प्रतिबंधात्मक तरतुदींवर सवलती देण्याचे अधिकार राज्य शासनाला नाहीत. त्यामुळे अधिकारी किंवा नेत्यांच्या सवलतींबद्दलच्या आश्वासनांवर विश्वास ठेवता येत नाही. ही तीन कारणे दाखवून वहिवाटदार शेतकरी पक्षी-अभयारण्यास विरोध करीत आहेत, असे आमच्या ध्यानी आले. कोणताही जलाशय अथवा तलाव, मग तो मानवनिर्मित असो वा निसर्गनिर्मित, हा तयार झाल्यानंतर एका विशिष्ट तऱ्हेने त्यात परिवर्तन होत जाते, हे वैज्ञानिक सत्य इथे ध्यानी घेणे आवश्यक आहे. नव्या तलावाच्या पाण्यात क्षार कमी असतात. त्यामुळे त्यात शेवाळे आणि इतर वनस्पतीही कमी असतात. पावसाचे पाणी वाहून आणणाऱ्या ओहळ आणि ओढ्यांमधून तलावाच्या पाण्याचे क्षार हळूहळू वाढू लागतात. क्षारांमुळे पाण्यात शेवाळे आणि सूक्ष्म वनस्पती वाढतात. त्यांच्या रोटिफर, संधीपाद प्राणी, कीटक व मासे वाढू लागतात. हे सर्व जीव मर्यादित प्रमाणात असतील तर या तलावाची उत्पादकता संतुलित राहते व त्याचे आयुष्यमानही वाढते. क्षारांचे प्रमाण वाढले तर तलावात पृष्ठभागावर अतिरिक्त शेवाळण होते. पाण्यात नायट्रेट व फॉस्फेट क्षार साचतात. सूर्यप्रकाश व प्राणवायू पाण्यात खोलवर पोचू शकत नाहीत. क्षारांच्या अतिपोषणाने तलाव मृतप्राय होतो. त्यातील सजीव नष्ट होऊ लागतात व पाणी प्रदूषित होते. शेतीतून वाहून येणारी खते, कीटकनाशके आणि मनुष्यवस्तीतील सांडपाणी यामुळे तलावांचे शेवाळण वाढते. उथळ तलावावर उतरणाऱ्या पक्ष्यांमुळे, त्यांच्या स्थलांतरित थव्यांमुळे पृष्ठभागीय शेवाळाचे आवरण नष्ट होते. पाण्याचे घुसळण झाल्याने त्यात प्राणवायू मिसळू शकतो आणि सूक्ष्म, तरंगते जीव व पाणवनस्पती पक्ष्यांनी खाल्ल्यामुळे तलावाचे शेवाळण लांबवले जाते. म्हणून पक्षी तलावावर जोपासणे हे महत्त्वाचे ठरते. अन्यथा जायकवाडी जलाशयात वाहून येणाऱ्या गाळाचे प्रमाण ध्यानी घेता येत्या २५-३० वर्षांमध्ये हा तलाव उथळ बनून शेवाळणाकडे वाटचाल करू लागेल असेच दिसते.

**वहिवाटीची चिंता नको :**

जायकवाडी जलाशयाचा संपूर्ण परिसर जरी पक्षीअभयारण्य म्हणून घोषित झालेला असला तरी पक्ष्यांचे पोषण, शाखारोहण व प्रजनन त्यासाठी त्यातील काही विशिष्ट जागाच संरक्षित ठेवणे पुरेसे आहे. ब्रह्मगव्हाण, इसारवाडी, पिंपळवाडी, दहिफळ, दहिगाव, रामडोह आणि शेवता अशा मोजक्या सहा-सात गावांचाच हा परिसर असू शकेल. याव्यतिरिक्त इतर परिसरामध्ये गाळपेर किंवा उपसा पंप चालविण्यावर बंदी घालण्याचे कारण नाही. तेव्हा शतकऱ्यांची ही भीती अनाठायी आहे. शिवाय महाराष्ट्र राज्याचे मुख्य वन्यजीव संरक्षक यांना रहिवाशांना वहिवाटीचे परवाने चालू ठेवण्यास मान्यता देण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या १९७२ च्या वन्य जीव संरक्षण कायद्यान्वयेच दिले गेलेले आहेत, तेंव्हा तीही चिंता करण्याचे कारण नाही. मात्र गाळपेर किंवा उपसा पंपाच्या अधिकृत परवानाधारकांनाच ही सवलत मिळू शकेल. अनधिकृत, बेकायदेशीरपणे ही शेती करणाऱ्यास असे परवाने मिळणार नाहीत, हे उघड आहे. याबाबत शेतकऱ्यांनी व त्यांच्या लोकप्रतिनिधींनी मुख्य वन्यजीव संरक्षक, नागपूर, वन्यजीव संरक्षक नाशिक आणि वन्यजीव उपसंरक्षक, औरंगाबाद यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. या कामी निसर्ग मित्रमंडळ त्यांना अवश्य साह्य करील. जायकवाडी जलाशयाचा विस्तार लक्षात घेता राजस्थानमधील भरतपूरपेक्षाही मोठे आणि संपन्न असे पक्षी-अभयारण्य इथे विकसित करता येईल, हे ध्यानी घ्यावे. जलाशयाच्या परिसरातील लोकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. केवळ अनिश्चित अशा गाळपेरावर अवलंबून न राहता तरूण मुलांना अभयारण्य गाईड बनवणे, पर्यटकांना खाद्यपेये पुरविण्यासाठी छोटी-छोटी दुकाने टाकणे, पक्षी अभयारण्यात फिरण्यासाठी त्यांना सायकली व घोडे भाड्याने देणे, स्वस्त विश्रांतीस्थळे चालवणे, छायाचित्रण साहित्याची दुकाने चालवणे, छायाचित्रण साहित्याची दुकाने चालवणे, मर्यादित क्षेत्रात वल्ह्याच्या होड्या चालविणे, निसर्गप्रेमींसाठी तंबू-राहुट्या व कँप साहित्य भाड्याने पुरविणे या व अशा अनेक नव्या रोजगाराच्या संधी या खेड्यातील लोकांना मिळू शकतील. हे पक्षी-अभयारण्य स्थानिक रहिवाशांच्या सहकार्यानेच नीट विकसित होऊ शकेल हे लक्षात घेऊन शासनाच्या अधिकाऱ्यांनी आणि पर्यावरणवादी संघटनांनी येथील रहिवाशांशी सुसंवाद प्रस्थापित करण्याची अत्यंत गरज आहे.

(दै. लोकमत, रविवार दि. ८ मार्च १९९८ रोजी प्रकाशित)

# अभय दिलेल्यांना का व्हावी भयाची बाधा ?

- प्रा. विजय दिवाण

१९९९ डिसेंबरच्या आठ तारखेला औरंगाबाद जिल्ह्याच्या सोयगाव तालुक्यातील जरंडी भागात एक विलक्षण घटना घडली. तेथील धिंगापूर गावानजिक एक बिबळ्या वाघ मेलेला आढळला. ही बातमी येताच वनखात्याचे अधिकारी तिथे गेले. घटनास्थळी त्यांनी रीतसर तपासणी केली. पंचनामा झाला आणि मग जाहीर करण्यात आले, की हा बिबळ्या विषबाधेने किंवा एखाद्या शस्त्राच्या हल्ल्याने नव्हे तर चक्क उपासमारीने मेला आहे ! ती एक मादी होती. तरणेबांड आणि उमदे असे हे जनावर कित्येक दिवसांपासून खायला न मिळाल्यामुळे खंगून गेलेले होते. अशक्त झालेले होते. जंगलामध्ये तिला शिकार करुन पोट भरण्याजोगे अन्न शिल्लक नव्हते. मरण्याआधी जंगलातून गावठाणात येऊन एक गाय मारण्याचा प्रयत्नही तिने केलेला दिसत होता. पण अंगात शक्ती नसल्यामुळे ती शिकारही तिला साधता आली नाही. शेवटी भुकेने क्षीण झालेल्या त्या दिमाखदार मादीने प्राण सोडले. गौताळा अभयारण्याच्या सीमेला अगदी लागून असलेल्या ओसरत्या जंगलप्रदेशातील ही लक्षणीय घटना. या घटनेच्या एक वर्षभर आधी याच सोयगाव तालुक्यात मोर विहिरा या गावात लोकांनी लागोपाठ दोन बिबळ्या वाघांना विषप्रयोग करून मारले होते. त्याहीवेळी जंगलात खाण्याजोगे अन्न शिल्लक नसल्यामुळे हे बिबळे गावांच्या शिवारात आले. एक नर आणि एक मादी. त्यातील मादी तर गर्भवती होती. अगदी चार आठ दिवसांमध्ये व्यालीही असती. पण भुकेपोटी ती दोन श्वापदे त्या परिसरातल्या शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये आली. तिथे चरणाऱ्या गुरांवर त्यांनी हल्ले केले. शिकार करुन तिच्यावर ताव मारल्यावर ही श्वापदे उरलेली शिकार एखाद्या ठिकाणी लपवून ठेवतात. आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा परत येऊन ते मांस खातात. ही त्यांची नैसर्गिक वृत्तीच असते. ही गोष्ट माहित असल्यामुळे ज्यांची गुरे मारली गेली होती त्या शेतकऱ्यांनी चवताळून त्या उरलेल्या शिकारीच्या मांसात विष घालून ठेवले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी परत येऊन ते मांस खाताच ते दोन उमदे बिबळे गतप्राण झाले.

जंगली श्वापदांनी अन्नाच्या शोधात जंगल सोडून बाहेर येण्याच्या घटना महाराष्ट्रात अलिकडे वारंवार घडू लागल्या आहेत. येऊरच्या आणि बोरिवलीच्या जंगलातून बिबळे शेजारच्या गावठाणंमध्ये घुसतात. गावांत येऊन शेळ्या-बकऱ्यांची शिकार करतात. कन्नडजवळच्या ब्राम्हणी गराडा गावाच्या शिवारात बिबळ्या येतो आणि बाईवर हल्ला करून तिला ठार मारतो. परभणी जिल्ह्यात लांडग्यांचे कळप गावानजिक येऊन लोकांवर हल्ले चढवतात. औरंगाबाद जिल्ह्यात सावळदबारा भागातल्या पिंपळवाडी येथे नीलगायी एका स्त्रीवर शिंगांनी हल्ला करुन तिचा प्राण घेतात. नांदेड जिल्ह्यातल्या भोकर तालुक्यात जंगली अस्वले गुराख्यांवर हल्ला करुन त्यांना जखमी करतात. ह्या घटना वारंवार चढत्या क्रमाने का घडू लागल्या आहेत याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ

आली आहे.

जगात जैव-विविधतेच्या दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या बारा महत्वपूर्ण देशांमध्ये भारताचा समावेश होतो. ही जैव विविधता टिकवून धरणे हे एक मोठे आव्हान आमच्यापुढे आहे. हे आव्हान आम्ही पेलू शकत नाही असे आता दिसू लागलेले आहे. वस्तुत: निसर्गात परस्परांवर अवलंबून असणाऱ्या पशु-पक्षी. प्राणी आणि वनस्पतींची जी एक अनिवार्य अन्नशृंखला आहे तिचा एक भाग माणूसही आहे. हे आम्ही विसरता कामा नये. उत्क्रांतीच्या शिडीवर माणसाचे स्थान हे सर्वोच्च नाही. तर ते त्याच्यासारख्या अनेक भक्षक जीवांच्या बरोबरीचे आहे. पण नेमके हेच विसरून माणसाने इतर जीवांच्या आणि प्राणीमात्रांच्या आश्रयस्थानावर सतत अतिक्रमण केलेले आहे. सतत वाढणाऱ्या बेसुमार लोकसंख्येमुळे वाढत्या लोकवस्त्या आणि विस्तारत जाणाऱ्या शेतजमिनी ह्यांच्यामुळे आपल्या नैसर्गिक जंगलांचा सातत्याने संकोच होत राहिला आहे. माणसांच्या गरजांनाच सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या आमच्या वृत्तीमुळे झाडे-झुडपे आणि पशुपक्षी यांना आम्ही कायम गौण लेखत आलो. गेली शंभर वर्षे भारतात स्वत:च्या तात्कालिक गरजा भागवण्यासाठी माणसांनी बेसुमार जंगलतोड केली. आणि त्यामुळे जंगलात वसतीला असणाऱ्या तमाम वन्यजीवांची आश्रयस्थळे आम्ही नष्ट करीत आणली आहेत. त्यांचे नैसर्गिक अन्न तोडले आहे. सोयगावच्या जरंडी भागातल्या घटनेवरुन हे स्पष्ट होते की त्या भागातल्या जंगलांमध्ये आता हरणे, भेकरे, ससे यांसारखे गवत खाऊन जगणारे प्राणी फारसे शिल्लक राहिले नाहीत. या प्राण्यांचे मांस भक्षण करुनच बिबळे आणि लांडगे जगतात. हरणे शिल्लक नाहीत याचे कारण असे की त्यांना खाद्य पुरवणारी गवताळ कुरणे आणि छोटी झुडुपे शिल्लक नाहीत. ही कुरणे आणि झुडुपे नष्ट होण्याची कारणे म्हणजे मनुष्य-वस्त्या आणि शेती यांचा होणारा विस्तार आणि जंगलांचा घडत असलेला संकोच. हे असेच चालू राहिले तर काय होईल ? आमच्याकडील बहुतांश वन्यजीवांच्या आश्रयाच्या जागा नष्ट होऊन जातील. त्यांचे नैसर्गिक अन्न मिळेनासे होईल. त्यांची पिले देण्याची प्रजननयोग्य स्थळे नष्ट होतील. ब्राम्हणी गराडा गावात बिबळ्याने प्रवेश करणे किंवा परभणी जिल्ह्यात लांडग्यांनी धुमाकूळ घालणे ह्या घटना म्हणजे अशा प्रकारे जैव-विविधतेच्या होणाऱ्या ऱ्हासाचीच उदाहरणे आहेत. ही जैव-विविधता नष्ट करून आम्ही मनुष्यप्राण्याच्या अस्तिवालाच धोका निर्माण करत आहोत, याचे भान राखण्याची आता गरज आहे. वन्यजीवांनी मनुष्यवस्तीत प्रवेश केल्याच्या या घटनांबद्दल आपण आता गंभीरपणे विचार करायला हवा.

वस्तुत: जंगलांच्या संवर्धनाबरोबरच वन्य जीवांच्या संवर्धनासाठीही जगभर युध्दपातळीवर प्रयत्न होत आहेत. तसे सर्वंकष प्रयत्न आपल्याकडे होतांना दिसत नाहीत. पट्टेदार वाघासाठी राबवली जाणारी प्रॉजेक्ट टायगर ही एक अपवादात्मक योजना सोडली, तर इतर वन्यजीवांच्या संरक्षण-संवर्धनाबद्दल उदासीनताच आहे. ह्या संवर्धनाच्या

आवश्यकतेबद्दल लोकांमध्ये अज्ञान आहे. शासनही या कामाला अग्रक्रम देऊ इच्छित नाही. वन्यखात्यामध्ये तर वन्यजीव संरक्षणाच्या कामाकडे तुच्छतेने बघण्याची वृत्ती आहे. खरे तर १९७२ साली वन्यजीवांना पूर्ण अभय देण्यासाठी वन्यजीव संरक्षण कायदा करण्यात आला. अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने स्थापन करून नष्ट होऊ पाहणाऱ्या वन्यप्राण्यांना संरक्षण देण्याची सोय करण्यात आली. महाराष्ट्रात तर वनखात्यांअंतर्गत एक खास वन्यजीव विभागही स्थापन करण्यात आला आहे. पण त्यात महत्वाच्या उच्चस्तरीय जागांवर काम करणाऱ्या बहुतांश अधिकाऱ्यांमधील कल्पनादारिद्र्य, त्यांची राजकीय हितसंबंधापुढे नमते घेण्याची वृत्ती, आणि पुरेसे आर्थिक बळ आणि मनुष्यबळ मिळवण्यात त्यांना येणारे अपयश, यामुळे हा विभाग परिणामकारक पद्धतीने काम करू शकतच नाही. उलट त्यांचा परिणाम असा झालेला आहे की राज्यातल्या वन्यप्राण्यांच्या संरक्षणाची सगळी जबाबदारी फक्त वन्यजीव अधिकाऱ्यांचीच आहे असे मानून इतर वनाधिकारी हात झटकून मोकळे होऊ लागले आहेत. वस्तुत: महाराष्ट्रातल्या सुमारे सहासष्ट हजार चौरस किलोमीटर जंगलप्रदेशापैकी केवळ अडीच टक्के जंगल हे अभयारण्य म्हणून वन्यजीव संरक्षण कायद्याखाली संरक्षित आहे. बाकीचे ९७.५ टक्के जंगल हे अभयारण्यांच्या बाहेरचे आहे. या बाहेरच्या जंगलात राहणाऱ्या आणि वावरणाऱ्या वन्यप्राण्यांच्या संरक्षण-संवर्धनाची जबाबदारी कोणाची? संरक्षण फक्त अभयारण्यातल्या प्राण्यांनाच द्यायचे असा वन्यजीवन संरक्षण कायद्याचा उद्देश आहे काय ? या प्रश्नांची उत्तरे आता मागितली पाहिजेत.

अभयारण्य असो वा नसो. जंगलामधील अन्नोत्पादक जीव म्हणून गवते आणि इतर वनस्पती, शाकाहारी भक्षक म्हणून पक्षी, ससे, हरणे, माकडे, भेकरे असे प्राणी, मांसाहारी भक्षक म्हणून कोल्हे, लांडगे, तरस, बिबळे हे प्राणी, या साऱ्यांच्याच संवर्धनाच्या नियोजनबद्ध योजना सर्वत्र राबवल्या गेल्या पाहिजेत. तरच इथल्या जैवविविधतेचे संरक्षण होऊ शकेल. सोयगाव भागात उपासमारीने बिबळ्या वाघ मरण्याची घटना जिथे घडली तिथल्या जंगलामध्ये चितळ, भेकरे, काळवीटे, माकडे आदि शाकाहारी भक्षक प्राणी योग्य प्रमाणात आणून वाढवणे उपयोगाचे ठरेल. या प्राण्यांसाठी गवत आणि कुरण विकासाच्या योजना राबवाव्यात. गौताळा ओट्रमघाट अभयारण्याची सीमा सोयगाव-सावळदबारा पर्यंत वाढवली गेली पाहिजे. म्हणजे या वन्यजीवांच्या संचारासाठी थेट मेळघाटापर्यंत कॉरिडार तयार होऊ शकेल. आधीच संख्येने कमी होत जाणाऱ्या ह्या वन्य श्वापदांच्या संरक्षणासाठी वेळीच पावले उचलली नाहीत तर चित्त्याप्रमाणे हेही प्राणी भारतातून अल्पावधीतच नामशेष होतील, यात शंका नाही.

(दै. लोकमत - दिनांक १९ डिसेंबर १९९९ रोजी प्रकाशित)

# जन्माला येऊ घातलेले महाराष्ट्राचे वन - धोरण

प्रा. विजय दिवाण

**वन-विषयक धोरण राष्ट्रीय पातळीवर आखायचं, कायदेही केंद्रानंच करायचे आणि या साऱ्यांची अंमलबजावणी मात्र राज्य सरकारनं करायची अशी परिस्थिती होती. त्यामुळे राज्याच्या वनविभागाची अवस्था 'बेगाने शादी मे अब्दुल्ला दिवाना' अशी असायची. आता मात्र महाराष्ट्र राज्यानं स्वतःचं एक वन-विषयक धोरण घोषित करण्याच्या दिशेनं पावलं उचलली आहेत.**

नुकत्याच संपलेल्या उन्हाळ्यात जंगलांमध्ये लागलेल्या आगींच्या बातम्या प्रसिध्दी माध्यमांतून गाजल्या. हिमालयातल्या सूचिपर्ण वृक्षांच्या जंगलांपासून ते पश्चिम घाटातल्या शुष्क पानगळीच्या जंगलांपर्यंत अनेक ठिकाणी उभी झाडं ज्वाळांनी होरपळून नष्ट झाली. भारतातल्या जंगलांचा असा सातत्यानं होणारा विनाश, ही या शतकाच्या अखेरची सगळ्यात चिंतेची बाब म्हणायला हवी. वस्तुतः भारत हा विषुववृत्ताजवळच्या उष्ण कटिबंधातला एक देश आहे. भरपूर सूर्यप्रकाशाचं आणि चांगल्या पावसाचं वरदान या देशाला लाभलेलं आहे. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची झाडं-झुडुपं, वनस्पती आणि निरनिराळे पशुपक्षी यांच्या असंख्य, चित्रविचित्र जाती भारतात आढळतात. अपार जैव विविधता असलेल्या बारा संपन्न राष्ट्रांमध्ये भारताची गणना होते. कागदोपत्री भारतात २३ टक्के जंगल आहे अशी नोंद आहे. प्रत्यक्षात मात्र केवळ साडेएकोणीस टक्केच जमीन जंगलाखाली आहे. त्यातही खरं खुरं म्हणता येईल असं दाट जंगल फक्त अकरा टक्क्यांच्या आसपास आहे. आजच्या घडीला हिशेब केला तर असे दिसं की भारतात जंगलाचं दरमाणशी प्रमाण केवळ ०.०८ हेक्टर प्रत्येकी एवढंच आहे. हेच प्रमाण कॅनडात माणशी १४ हेक्टर, अमेरिकेत१३ हेक्टर आणि ऑस्ट्रेलियात ७.५ हेक्टर आहे. हे सारे विकसित देश आहेत. एकीकडे या विकसित देशांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश केला म्हणून आम्ही ओरडतो. पण दुसरीकडे त्यांच्या तुलनेत नगण्य असलेलं जंगलाचं दरमाणशी प्रमाण आम्ही थोडंही वाढवू शकत नाही. उलट हे प्रमाण वरचेवर घटतच चाललं आहे. भारतातील जंगलं दिवसेंदिवस कमी-कमी होत चालली आहेत. अवाढव्य वाढत जाणारी आपली लोकसंख्या, चरणाऱ्या गुरांची वाढती संख्या, जळण आणि लाकूड यांच्या वाढत्या मागणीनं जंगलांवर पडणारा जादा भार, शेतजमिनीचं सतत विस्तारत जाणारं प्रमाण आणि विकासाच्या नावावर बेमुर्वतपणे उभे केले जाणारे पाटबंधारे आणि खाण उद्योग या सगळ्या गोष्टींमुळे उण्यापुण्या शंभर वर्षांच्या काळातच

युगानुयुगांपासून टिकून राहिलेल्या भारतीय जंगलांची पुरती वाट लागलेली आहे. त्यामुळे आता खरी गरज आहे ती युध्द पातळीवर वनसंरक्षण आणि संवर्धन करणाऱ्या दूरगामी आणि दृष्ट्या वन-विषयक धोरणाची. आजपर्यंत भारतात केंद्राने राष्ट्रीय पातळीवर वन-विषयक धोरण आखायचं, केंद्रानंच वनविषयक कायदे करायचे, आणि त्या साऱ्याची अंमलबजावणी मात्र राज्य सरकारांनी करायची अशी परिस्थिती होती. त्यामुळे 'बेगाने शादीमे अब्दुल्ला दिवाना' अशी राज्यांच्या वनखात्याची अवस्था असायची. आता बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांच्यापाठोपाठ महाराष्ट्र राज्यानंही स्वत:चं असं एक वनविषयक धोरण घोषित करण्याच्या दिशेनं पावलं उचलली आहेत. महाराष्ट्राच्या वन धारेणाचा एक कच्चा मुद्दा १४ जून १९९९ रोजी पुण्यात झालेल्या वनविभागाच्या उच्चस्तरीय कार्यशाळेत विचारार्थ मांडण्यात आला होता. या कार्यशाळेत वनाधिकाऱ्यांसोबतच स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांनाही निमंत्रित करण्यात आलं होतं.

**राष्ट्रीय वन धोरणाची वाटचाल**

भारताच्या वनांचं आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पादनांचं पध्दतशीर उपयोजन व्हावं या हेतूनं ब्रिटीश राजवटीत १८९४ साली इंग्रजांनी पहिलं वनविषयक धोरण प्रसृत केलं होतं. अर्थात वन व्यवस्थापनाला एक प्रशासकीय दिशा आखून देणारं हे धोरण होतं. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५२ मध्ये भारत सरकारनं दुसरं वनविषयक धोरण प्रसिध्द केलं. या धोरणात वनांच्या संरक्षाणाचा आणि संवर्धनाचा विचार प्रथमच केलेला होता. भारतातल्या जंगलांची व्याप्ती एकूण भूभागाच्या एक तृतीयांशपर्यंत वाढवावी असं उद्दिष्ट याच दुसऱ्या वनविषयक धोरणानं कायम केलं. शिवाय राखीव वनं, राष्ट्रीय वनं, ग्राम वनं आणि वनराया असं वनांचं एक कार्यसुलभ वर्गीकरण या धोरणानं वनस्थापनासाठी दिलं. १९५२ नंतरच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर देशानं विकासाची प्रक्रिया जसजशी वेगवान करत नेली तसतसा इथल्या जंगलांवरचा ताण वाढत गेला. विकासाच्या दिङमूढ करणाऱ्या झपाट्यात नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास आणि त्या प्रमाणात पर्यावरणाची हानी ही नवी संकटं दत्त म्हणून उभी राहिली. त्यामुळे एका नव्या दृष्टिकोनातून, साधनसंपत्तीच्या निरंतर संवर्धनाच्या भूमिकेतून आपलं वनविषयक धोरण पुन्हा नव्यानं आखण्याची गरज भासू लागली. म्हणून १९८८ साली भारतानं एक नवं वन धोरण जाहीर केलं. क्रमानं हे तिसरं धोरण होतं. वनं आणि वनोपज यांच्या आधारे जगणाऱ्या वनवासी आणि आदिवासींना किरकोळ वनोपज गोळा करण्याचा अग्रहक्क असावा असं सांगणारं हे धोरण होतं. यानंतर १९९८ साली पुन्हा नवं वन धोरण मांडण्याचा एक प्रयत्न झाला. परंतु त्यावेळी नेमलेल्या मूल्यमापन समितीनं १९८८ सालच्या तिसऱ्या वन धोरणात

फारसे बदल आवश्यक नसल्यामुळे नव्या राष्ट्रीय वन धोरणाची गरज नाही असं मत व्यक्त केल्यानं १९८८ चं राष्ट्रीय धोरणच आजही लागू आहे.

**महाराष्ट्राचं प्रस्तावित वन धोरण**

१९८८ च्या राष्ट्रीय वन धोरणात व्यक्त झालेल्या पारिस्थितीकीय आणि पर्यावरणीय संतुलनाच्या ध्येयाला सुसंगत आणि साधनसंपत्तीच्या निरंतर संवर्धनाच्या तत्वाला अनुसरुन महाराष्ट्राच्या वन विषयक धोरणाचा पहिला मसुदा तयार करण्यात आलेला आहे. इथल्या जंगल-आच्छादनातील प्रादेशिक फेरबदल, लोकवस्त्यांच्या वाढत्या दबावानं उघडी पडणारी जंगल-जमीन, वनोत्पादनांची मागणी, आणि पुरवठा यातील तफावत, महाराष्ट्राच्या नैसर्गिक जंगलांतील जैवविविधतेची जोपासना करण्याची गरज आणि परम महत्वाच्या पश्चिम घाटातील दुबळ्या इकोसंस्थांचं संरक्षण अशा वेगवेगळ्या कारणांसाठी महाराष्ट्र राज्यानं स्वत:चं एक संबंद्ध वनधोरण आखण्याची गरज भासत होती. नव्या विज्ञान तंत्रज्ञानाचा अवलंब करुन वन कर्मचाऱ्यांना उत्तम रीतीनं प्रशिक्षित करून आपल्या जंगलांची उत्पादकता वाढवावी, हाही एक हेतू हे धोरण आखण्यात होता.

नैसर्गिक आणि मनुष्यनिर्मित वनांचं संवर्धन आणि निरंतर विकास करणे, मृदा आणि आर्द्रता संधारणासाठी पडीक जमिनीत वृक्षलागवड करणे, सामाजिक वनीकरण आणि वनशेतीद्वारे खाजगी आणि सामाजिक जमिनीत वृक्षसंपदा वाढविणे, नद्या-तलाव, धरणं यांच्या स्त्रवण क्षेत्रात मोठी वृक्षलागवड करून जमिनीची धूप, पूर आणि गाळ साचणं थांबवणे, वन जमिनींची उत्पादकता वाढवणे, वनांच्या परिसरात राहणाऱ्या ग्रामीण आणि आदिवासी लोकांची जळण, चारा, किरकोळ वनोपज आणि घरगुती वापराचे लाकूड याची गरज भागविणे, लाकूडजन्य वस्तूंना पर्याय शोधून वनांवरचा ताण कमी करणे, वन्य जीवांचे संवर्धन आणि जैव विविधतेची जोपासना करण्यासाठी कृती कार्यक्रम आखणे. जंगल परिसरात राहणाऱ्या लोकांचे विशेषत: महिलांचे सक्रिय योगदान वनसंवर्धन व वनव्यवस्थापनात मिळवणे ही या प्रस्तावित वन धोरणांची उद्दिष्टे आहेत. विशेषत: वन व्यवस्थापनाचा उद्देश राज्याच्या तिजोरीत भर टाकण्याजोगे उत्पन्न मिळविणे हा न ठेवता जंगलाच्यापरिसरात राहणाऱ्या स्थानिक, ग्रामीण व आदिवासी जमातीच्या सहभागातून वनोत्पादनाचा कल्याणकारी वापर करणे हा एक प्रागतिक उद्देश या महाराष्ट्र वनधोरणात नमूद केलेला आहे.

**लोकसहभागातून वनव्यवस्थापन**

जंगलांच्या परिसरात राहणारे गावकरी आणि आदिवासी यांना दूर ठेवून जंगलांचं संरक्षण, संवर्धन शक्य नाही. त्यामुळे या आदिवासी जमातींचा आणि ग्रामीण लोकांचा

प्रत्यक्ष सहभाग वन व्यवस्थापनात असावा हे महत्वाचं सूत्र महाराष्ट्राच्या या वनधोरणांत अंतर्भुत आहे. स्थानिक लोकांशी एक सामंजस्य करार करुन त्यांना लाभधारकांचा दर्जा द्यावा आणि किरकोळ वनोपज समसमान तत्त्वावर गोळा करू द्यावी अशी तरतूद त्यात आहे. वन परिसरातल्या लोकांच्या 'वन रक्षण समित्या' निर्माण कराव्यात आणि त्या स्वयंशासित पध्दतीने कार्यरत ठेवाव्यात अशीही कल्पना आहे. जंगल परिसरात आढळणाऱ्या वाड्या, गावं आणि पाडे यांच्या सर्वंकष विकासासाठी 'संयुक्त परिसर विकास योजना' सर्व शासकीय खात्यांच्या सहकार्यानं राबवावी आणि वन विकासाचा कार्यक्रम हा खऱ्या अर्थानं 'वनसंवर्धनाच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाचा त्यांनीच राबवलेला कार्यक्रम' व्हावा अशी अपेक्षा या मसुद्यात व्यक्त केलेली आहे.

**इतर तरतुदी**

राज्याच्या वार्षिक महसुलाचा ५ टक्के हिस्सा वन व्यवस्थापनासाठी दरवर्षी मिळाला पाहिजे, तरच परिणामकारकरीत्या वनसंवर्धन साधता येईल असे या वनधोरण मसुद्यात म्हटले आहे. वनसंरक्षणासाठी एक 'परिसंस्था संरक्षण निधी' राज्य शासनानं निर्माण करावा. सध्याचा पर्यायी वनीकरणासाठी दिला जाणारा निधी किंवा 'वन-विकास निधी' या नावानं गोळा केला जाणारा निधी देखील 'परिसंस्था संरक्षण निधी' मध्ये मिळवला जावा अशी सूचना त्यात आहे. बांबू, औषधी, वनस्पती आणि गवतासारख्या वनोपजेतून स्वयंरोजगार निर्मितीची व्यवस्था व्हावी. आणि राज्याच्या रोजागार नियोजनात वनीकरण व वनशेतीला अग्रक्रम मिळावा अशी तरतूद आहे.

वनव्यवस्थापनासाठी कर्मचाऱ्यांना पुरेशा प्रमाणात वाहने द्यावीत, टेलिफोन-वायरलेससारखी साधने द्यावीत आणि आवश्यक ती यंत्रसामुग्री पुरवावी, वनाधारित उद्योगांना नैसर्गिक वनांतील वनोपज न पुरवता ती त्यांनी स्वयंनिर्मित वनांमधून पैदा करण्याचं बंधन घालावं, वन-विकास प्रकल्पांच्या एकूण निधीच्या ५ टक्के रक्कम संशोधन कार्यावर खर्च व्हावी, केवळ करमणुकीसाठी सफ़ारी उद्यानं आणि पर्यटनस्थळं म्हणून संरक्षित वनांचा वापर केला जाऊ नये अशा काही महत्त्वाच्या तरतुदीही या वन धोरण मसुद्यात आहेत, राज्याचं स्वतंत्र वनधोरण आखण्याचं धाडस अभ्यासू वनाधिकाऱ्यांनी दाखवलेलं असलं तरी हितसंबंधी राजकारणी, लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार यांना ते कितपत रुचेल हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे हे महाराष्ट्र वनधोरण विधिमंडळात मांडलं जाणं आणि स्वीकृत होणं हे आजतरी अवघड दिसतं.

(दै. मराठवाडा - दि. ५/७/९९ रोजी प्रकाशित )

संपर्काचे पत्ते :

- प्रा. विजय दिवाण - द्वारका, २ शक्तीनगर, औरंगाबाद.
  दूरध्वनी - (०२४०) ३३९१९५
- दिलीप यार्दी - १२०, शास्त्रीनगर, गारखेडा रोड, औरंगाबाद.
  दूरध्वनी (०२४०) ३२७६३८

# तिसरी
# महाराष्ट्र अभयारण्य परिषद
## मालवण, जि. सिंधुदुर्ग

दि. २५ ते २७ ऑक्टोबर १९९६

# वृत्तांत

# तिसरी

# महाराष्ट्र अभयारण्य परिषद

## मालवण, जि. सिंधुदुर्ग

## दि. २५ ते २७ ऑक्टोबर १९९६

# वृत्तांत

प्रकाशक
विकास सहयोग प्रतिष्ठान
११७/८ डॉ. बालिगा नगर
जास्मिन मिल रोड
माहीम पूर्व
मुंबई ४०००१७

मुद्रक
अक्षरछाया
२०३५ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११०३०

संपर्क
शाश्वत
द्वारा कुसुम कर्णिक
मंचर, जि. पुणे ४१०५०३

केवळ खाजगी वितरणासाठी

# प्रस्तावना

अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने म्हणजेच 'संरक्षित क्षेत्र' या विषयावरची महाराष्ट्रातील तिसरी परिषद मालवण (सिंधुदुर्ग) येथे २५ ते २७ ऑक्टोबर '९६ दरम्यान पार पडली. हा विषय तसा परिघाबाहेरचा. सर्वसामान्य लोकांना नवखा. या विषयी लोकांच्या कल्पनाही वेगळ्या आहेत. शिक्षित, नागरी आणि मध्यम वर्गीय लोकांना वाटते की अभयारण्य म्हणजे काहीतरी रम्य, चांगला, उचित असा पर्यावरणीय प्रश्नावरचा रामबाण उपाय आहे, त्यांच्या मनोरंजनाचे एक उचित, शुचित, निष्पाप असे साधन आहे.

अभयारण्यांच्या निर्मितीमुळे कोणाला त्रास होत असेल, लोक विस्थापित होऊन देशोधडीला लागत असतील, लोकांची रोजीरोटी हिसकावली जात असेल, त्यांची संस्कृती नष्ट होत असेल, त्यांचा जगण्याचा हक्कच नाकारला जात असेल, याची कल्पना बाहेरच्या लोकांना येत नाही. शतकानुशतके पिढ्यांपिढ्या जिथे जगल्या, वाढल्या, रमल्या तेथून उखडून बाहेर फेकल्या जातात, वादळात उन्मळून पडलेल्या वृक्ष-वेलींसारखी त्यांनी अवस्था होते पण हे जनसामान्याच्या नजरेआड घडते. त्यामुळे या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते आहे.

अभयारण्य निर्मितीला स्थानिक लोकांचा विरोध होत असेल याची बाहेरच्यांना कल्पनाही नसते. 'ज्याचे जळते त्यालाच कळते' ही परिस्थिती समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने घातक आहे. कुठे काय जळते आहे याची जाणीव समाजाला असणे जरूर आहे, गरजेचे आहे. नाहीतर समाज अशी एक एकात्मिक रचना न रहाता भंगलेले समूह बनतात आणि नंतर यातून विघटनवादी प्रवृत्ती जोर धरतात. हे मानवी अस्तित्वाला घातक आहे. याकरिता

अभयारण्य परिषद घेताना हा प्रश्न समाजाला स्पष्ट व्हावा, पीडित लोकांच्या दुःखाला वाचा फुटावी हा हेतू मनात धरला होता आणि म्हणूनच परिषदेचा अहवाल विस्तृत लिहावा असे ठरवले आणि हा विषय समाजाला परिचयाचा व्हावा म्हणून खोलात जाऊन हकिकत पेश करावी असे ठरवले.

कुसुम कर्णिक
'शाश्वत' संस्था
मंचर

दि. २१ फेब्रुवारी १९९७

जि. पुणे ४१०५०३

# तिसरी महाराष्ट्र राज्य अभयारण्य परिषद – मालवण, जि. सिंधुदुर्ग

### दि. २५ ते २७ ऑक्टोबर, १९९६

## वृत्तांत

महाराष्ट्रातील राज्य पातळीवरची तिसरी अभयारण्य परिषद २५ ते २७ ऑक्टोबर १९९६ ला बॅ. नाथ पै सेवांगण, धुरी वाडा, मालवण, जि. सिंधुदुर्ग येथे संपन्न झाली.

१९९२ साली नारोडी (जि. पुणे) येथे एकजूट संघटनेने आयोजिलेल्या १ ल्या अभयारण्य परिषदेला महाराष्ट्रातील तीन अभयारण्य क्षेत्रातील आणि कर्नाटकातील नागरहोळे राष्ट्रीय उद्यान येथील प्रतिनिधी येऊन या प्रश्नावर अनुभव कथन आणि त्यावरील विचारवंत आणि तज्ज्ञांनी केलेले विवरण असा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम फार अपुरा होता हे लक्षात घेऊन १९९५ च्या दुसऱ्या परिषदेकरिता अधिक संपर्क करायची खटपट केली होती. १९९५ ला कोरेगाव, जि. सातारा येथील 'सत्यशोध' संस्थेच्यावतीने झालेल्या परिषदेला जास्त लोक आले होते. वन अधिकारी तसेच वन्यजीव कायदा अभ्यासक हेही सामील झाले होते आणि मग चर्चा सखोल आणि विस्तृत या बरोबरच व्यावहारिक पाळीवरही झाली. पुढची परिषद यापेक्षा व्यापक होण्याच्या दिशेने आम्ही धडपड सुरू केली.

मार्च ९६ ला जनसंघटनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM) च्या वर्ध्याच्या मेळाव्याच्या वेळी काही जणांबरोबर झालेल्या चर्चेत मालवण मच्छिमार संघटना, नाथ पै सेवांगण या संस्थेने परिषद घ्यायची तयारी दर्शवली आणि मग पुढच्या तयारीला गती आली. मुंबईच्या 'युवा' या संस्थेने आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले.

'शाश्वत' या संस्थेने नेट वर्कींगचे काम हाती घेऊन अनेक ठिकाणी संपर्क

प्रस्थापित करायला सुरुवात अगोदरपासून केली होतीच. आणि मग ऑक्टोबर '९६ ला मालवण येथे बॅ. नाथ पै सेवांगणच्या विद्यमाने ३ री अभयारण्य परिषद झाली.

परिषदेत ठिकठिकाणच्या तळागाळातल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवकथनाला प्राधान्य दिले जाणार हे गृहीत होते. त्याच बरोबर या विषयाचा सर्व बाजूने अभ्यास होण्याच्या दृष्टीने इतर तज्ज्ञ आणि विचारवंत, तसेच शासकीय अधिकाऱ्यांना निमंत्रित केले होते. यात राष्ट्रीय समुद्र संशोधन संस्था, गोवा, बी. एन्. एच्. एस्., इकोनेट, विकास सहयोग प्रतिष्ठानसारख्या संस्थांनी भाग घेतला. शासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग फारच कमी राहिला. निमंत्रणे देऊन, फोनवर होकार देऊनही शेवटी लपंडाव अजूनही खेळला जातो ही गोष्ट खेदाची आहे. वनविभागाने हजेरी लावली पण आणखी सहभाग त्यांच्याकडून अपेक्षित आहे. महसूल विभागाने सहभाग दिला नाही. मत्सव्यवसाय संचालक कार्यालयाकडून सहायक संचालक आले होते.

उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्रथम सेवांगण संस्थेने सर्वांचे स्वागत केले. उद्घाटन प्रा. मधुसूदन पटवर्धन यांच्या मनोगताने झाले. समाजवादी विचारसरणीचे लोक तसेच अशा परिषदांविषयी गैरसमज असतात की हे लोक विकासाच्या विरोधी असतात. परंतु खरेतर लाभ-हानीचा पूर्ण विचार, विस्थापन आणि स्थानिक लोकांच्या अडचणी यांचा विचार प्रथम करायलाच हवा असे त्यांनी मांडले. इकोनेट या संस्थेचे संस्थापक आणि पर्यावरणविद, धरणांच्या लाभहानी विषयीचे एक गाढे अभ्यासक डॉ. विजय परांजपे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडले की मुळात मालवणला संरक्षित क्षेत्रात अरण्य नसताना त्याला अभयारण्य या वर्गात घालताच येणार नाही. याला अभयक्षेत्र, अभय परिसर असे म्हणावे लागेल. याचे व्यवस्थापन वन खात्याकडे देणे योग्य होणार नाही. आज हे क्षेत्र जाहीर होऊन ९ वर्ष होऊनही वनखाते आजवर काय करू शकले हे माहिती नाही.

अभयक्षेत्रात अभय कोणापासून तर अन्यायी आणि चुकीच्या कृतीपासून, हानीकारक मानवी हस्तक्षेपापासून अभय. भारतीय घटनेच्या १९७६ साली झालेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे अशा क्षेत्रांचे जतन लोकांनी करायचे आहे. शासन जतन कसे करते हेही लोकांनी बघायचे आहे. निसर्गधन अबाधित राहण्याकरिताची जबाबदारी घटनेने नागरिकांवर सोपवली आहे. मुळात १९२७ चा ब्रिटिशांनी त्यांच्या वसाहतवादी धोरणांना योग्य असा बनवलेला इंडियन फॉरेस्ट ॲक्ट आजही पायाभूत मानला जातो आहे. स्वातंत्र्यानंतर १९५२ ला जंगल धोरण जाहीर झाले. त्यात स्थानिक माणसाचा विचार फार कमी होता. १९७२ ला वन्यजीव संरक्षण कायदा झाला. तो १९९१ ला सुधारित

बनवला गेला. या कायद्यात असलेल्या चुका सुधाराव्या लागतील. १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा हा सर्व प्रकारच्या पर्यावरण रचनांना लागू आहे. फक्त जंगल संरक्षण नव्हे तर जमीन आणि पाणी याचा वापर कसा असावा याचा विचारही त्यात आहे. पण यात सर्व प्रकारच्या जमीन संरचनाचा विचार झालेला नाहीये. १९९१ ला किनारपट्टी नियंत्रण कायदा – Coastal Zone Regulation Act (CZR Act)) बनवला गेला.

अशा सर्व संबंधित कायद्यांचा अभ्यास करून आपल्याला काम करायला आणि बोलायला हवे. या कायद्याप्रमाणे प्रत्येक राज्याने १९९१ ते १९९६ या काळात एक आराखडा तयार करायचा होता. महाराष्ट्र शासनाच्या अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंटने एक आराखडा बनवला. तो इतका वाईट होता की तो केंद्र सरकारने परत धाडून दिला आहे. शासन सोयीनुसार, विशेषतः बिल्डर लॉबीची सोय बघून झोन पाडते आहे. मुळात या खात्याकडे असा आराखडा बनविण्याला लागणारी क्षमताही नाही. याकरिता आंतरविभागीय समिती बनवायला हवी. वास्तविक, कायदा बनवताना खूप जुन्या घटनांचे आधार घ्यायचे असतात. शिवकालीन बरेच आधार आजही उपलब्ध आहेत. आज्ञापत्रे आहेत. काय करावे, करू नये या विषयीची पथ्ये मांडलेली आहेत. सरकारी कामाकरिता लाकूड लागत असेल तेव्हा लोकांच्या राजीखुशीनेच व्यवहार करावा. 'बलात्कार सर्वथा न करावा' अशी राजाज्ञा आहे. परंतु जेव्हा पथ्य पाळली जात नाहीत तेव्हा आंदोलने करावी लागतात. 'दुसऱ्याच्या छातीवर उभे राहून जो स्वतःचा विकास करील तो नाश पावेल' हे जुन्या काळातही लिहिलेले आहे.

नंतर प्रा. परांजपे यांनी सागरी कायद्याविषयी माहिती दिली. १९८४ च्या आंतरराष्ट्रीय सागरी कायद्यानुसार भरतीच्या कमाल पातळीपासून १२ मैल वा १९ ते २० कि.मी. पर्यंत त्या त्या राष्ट्राचा अधिकार असतो. नंतरचा १८० कि.मी. किंवा कॉंटिनेंटल शेल्फचा भाग जिथपर्यंत असतो, तिथपर्यंतचा भाग आपल्याला आर्थिक लाभासाठी वापरता येतो. २० कि.मी. पर्यंत बाहेरची आक्रमणे पळवून लावण्याचा हक्क आपल्याला आहे. या हक्काबरोबरच ह्या भागातले अनेक प्रकारचे धन, जैविक विविधता रक्षणाची, तो भाग प्रदुषण विरहित ठेवण्याची जबाबदारी पण आपली आहे. १९९२ चा "International Convention on Biodiversity", "जैविक विविधतेविषयीचा करार" या नुसार या विविधतेपासून होणाऱ्या लाभाचा पहिला हक्कदार स्थानिक मनुष्य असेल. याकरिता हे किनारे, यावरील खाऱ्या पाण्यातील मॅनग्रोव जंगल, आतले जलचर, प्रवाळ खडक इ. नैसर्गिक संपत्ती सांभाळणे हे स्थानिक माणसाचे कर्तव्य आहे.

मालवण अभय क्षेत्रात असंख्य जलचर आहेत. हा भाग इतर सागरी भागांपेक्षा खूप स्वच्छ आहे. त्यामुळे इथे जैविक विविधता खूप आढळते. याची माहिती संकलित करण्याचे काम स्थानिक जनतेने, संस्था संघटनांनी करायला पाहिजे. कर्नाटकात असे काम सुरू झाले आहे. महाराष्ट्रात कोकणात रायगड जिल्ह्यात मुरूडपासून १२ कि.मी. वरच्या फणसाड अभयारण्य क्षेत्रात सामाजिक जैविक वैविध्य नोंदपत्राचे (Community bio-diversity register) काम सुरू झाले आहे. पेटेंट कायद्यातून आपल्याला आपले संचित वाचवायचे असेल तर अशी नोंदपत्रे अधिकृतरीत्या तयार करायला हवीत. 'ट्युनिस कोड' खाली (ट्युनिस कोड अन्वये विकासाच्या प्रत्येक योजनेच्या फायद्याचा हक्कदार आणि पहिला वाटेकरी प्रथम स्थानिक मनुष्य असतो.) याला संरक्षण मिळाले आहे. सामाजिक माहिती लिखित आणि सर्वांना ज्ञात असेल तर त्याचे पेटेंट होऊ शकत नाही. नैसर्गिक संरचना-परिसंस्थांचा अभ्यास व्हायला हवा. आज मासेमारी या विषयावर बरेच वाद उठले आहेत. पण आपली संसाधने आपण टिकावू विकास (sustainable development) पद्धतीने वापरायला पाहिजेत. पण मच्छीमार की पर्यटन असा पर्याय असू नये. सागरातील अनेकविध संपत्तीचा बराच वापर करता येण्यासारखा आहे. आणि यातून पिढ्यान्‌पिढ्या इथे जगलेल्या जनसमूहाचे अस्तित्व आबाधित राहील.

आपल्या समस्या सोडवण्याकरिता आपल्याला समंजसपणे संवाद, शासकीय सुधारणा, लोकशक्ती, वर्तमानपत्रे, नाइलाज झाल्यास कोर्टात खटले, त्यांनीही न झाल्यास आंदोलने, सत्याग्रह असे मार्ग हाताळावे लागतील. मात्र याची पथ्ये पाळली गेली पाहिजेत. घटनात्मक मार्ग वापरून हे सारे व्हायला हवे. आंदोलने, सत्याग्रह हे सारे घटनात्मकच आहेत.

नंतरच्या दुसऱ्या सत्रात डॉ. परांजपेंशी चर्चा झाली. 'सामाजिक जैविक वैविध्य नोंदवही' (Community bio-diversity register) ही गाव वा वाडीतल्या लोकांनी तयार करायची आहे. या विषयी सर्व निर्णय – काय नोंदवायचे वा नाही, कोणाला द्यायचे अथवा नाही – हे लोकांनी घ्यायचे आहेत. ही वही नंतर राजपत्रात नोंदवून घ्यावी लागते. १९९२ नंतर फिलिफाईन्स देशाने तसे कायदे करून घेतले आणि तेथे कामही सुरू झाले. आपल्या सरकारने तसे कायदे करायला हवेत.

कुसुम कर्णिक यांनी मांडले की स्थानिक समाजांचे ज्ञान वापरून संशोधन संस्था आणि औषध कंपन्या यांनी लोकांना न सांगता फसवून उत्पादन करून पैसा कमावला आहे आणि कमावत आहेत. नोंदपत्रांच्या आधाराने हे वाढेल त्याचे काय? तर डॉ. सतीश पाटील, कोल्हापूर यांनी मांडले की आयुर्वेद ग्रंथात सर्व माहिती अगोदरच संग्रहित झालेली आहे. त्यामुळे पेटंट कायद्याचा बाऊ

करू नये. श्री. गनीसाहेब कलोट, राधानगरी यांनी मांडले, " सर्व समाजाची असलेली माहिती विकून एखाद्याने पैसा करू नये यासाठी खबरदारी घ्यायला हवी. तसेच समाजाने माहिती दिली तर रॉयल्टी किती आणि कोणाला मिळावी आणि कशी मिळावी याची माहिती उपलब्ध व्हावी. श्री. लाडखेडकर, नागपूर यांनी मांडले की लवकरात लवकर ही माहिती नोंद व्हायला हवी. आताच्या पिढीनंतर ही माहिती उरणार नाहीये. नोंदवही बनवताना बाहेरचे तज्ज्ञ यात जोडून घ्यावेत आणि माहिती परिपूर्ण करावी या करिता संग्रहालये, उद्यानेही बनवावी लागतील. तसेच पुढे याकरिता संपर्कजाल (network) बनवावे लागेल. मौखिक ज्ञान आता लिखित व्हायला हवे. असे मांडले गेले की वेगवेगळ्या कारणांनी जी गावे उठवली जात आहेत (जी सहसा आदिवासी आणि वनस्पतींची जाणकार असतात) त्यांनी हे करावे की नाही असा प्रश्न आहे.

परांजपे यांनी मांडले की परदेशी वा देशातील कंपन्या तसेच संस्थांनी याची लूट करणे थांबवले पाहिजे. चोऱ्यांवर आळा बसायला हवा. स्थानिक लोकांचा फायदा कसा होईल हे बघायला पाहिजे. ज्ञान वा माहिती सर्वांना मिळाली तर त्याची चोरी होऊ शकत नाही. परंपरेमुळे काही ज्ञान सुरक्षित राहिले पण त्यामुळे तोटेही झाले. नोंद करण्याच्या प्रक्रियेत काही चुका होतील हे धरून खबरदारी घ्यायला हवी. परंतु या प्रक्रियेत फायदे बरेच आहेत म्हणून हे करायला हवे आहे. गोष्टी सर्वांना जाहीर झाल्या तर (Universalization of knowledge) अन्याय टाळता येतो. ब्राझिल आणि युराग्वे मधे अशी माहिती वापरून खाजगी व्यापारी कंपन्यांनी उत्पादन केल्यावर त्याची सर्वत्र जाहीर चर्चा होऊन ते उघड झाल्यामुळे अन्यायाला वाचा फुटली. आज सर्वत्र खेड्यांचे शहरीकरण होते आहे. त्यामुळे ज्ञान नष्ट होत चालले आहे. म्हणून नोंदीकरण व्हायला हवे. आंतरराष्ट्रीय निधीतून नोंद करण्यासाठी पैशाची मदत मिळू शकते. यात आज तरी राजकीय हस्तक्षेप सुरू झाला नाहीये.

एकूण मौखिक परंपरागत ज्ञान लिखित होण्याची जरूरी मांडली गेली. त्याच बरोबर जी गावे उठवली गेली, जात आहेत आणि जाणार आहेत त्यांनी यात कसे काय आणि का सामील व्हावे असा प्रश्नही आहे. त्यांचे ज्ञान वापरून घेऊन त्यांना विस्थापित करणे हा त्यांच्यावर अन्याय नाही का? यावर असेही मांडले गेले की अशा नोंद प्रक्रियेमुळे स्थानिकांचे हक्क प्रस्थापित होण्याची शक्यता राहून त्यांचे विस्थापन टळेल. जैविक वैविध्याचा वापर आज देशाला आणि सरकारला करायचा आहे. या ज्ञानाचे मालक म्हणून स्थानिकांचे विस्थापन करणे कठीण जाईल.

बऱ्याच बाबतीतले हक्क लोकांनी आपल्या ताब्यात घ्यायला हवे आहेत. मालवण अभय परिसर कसा असेल, इथे कशाप्रकारे मासेमारी होईल, कशाचे

उत्पादन काढून व्यापार करता येईल हे बघायला हवे. इथली जैविक संपत्ती स्थानिक लोकांना माहिती आहे. बाहेरच्या तज्ज्ञांच्या मदतीने त्यापासून काय आणि कसे बनते हे समजून घ्यावे लागेल. त्याचा अभ्यास स्थानिक लोकांनी करायला हवा. सागरी काकड्यापासून खाद्य पदार्थ बनू शकतात. इथले पर्यटन कशा स्वरूपाचे असेल, नवीन आखणी कशा प्रकारे करायची हे लोकांनी ठरवावे असे परांजपेंनी मांडले.

याच बरोबर या बाबतीतील शक्यता दोन्ही बाजूंनी आहेत. स्थानिकांच्या मदतीने संशोधन प्रकल्पही चालवल्याची उदाहरणे आहेत. तसेच पर्यटनामुळे मुले भीक मागायला, वाईट धंद्याला वळल्याची उदाहरणेही आहेत. त्यामुळे यावर विचारपूर्वक काम करायला हवे असे कार्यकर्त्यांनी मांडले.

तिसऱ्या सत्रात (२६.१०.९६ जेवणानंतर) श्री. वसंत पळशीकर 'लोकसहभागाधिष्ठित अभयारण्ये : तत्त्व आणि व्यवहार' या विषयावर मांडणी करणार होते. परंतु त्यांना येणे शक्य न झाल्याने या विषयावर त्यांनी लिहिलेला बीज-लेख कुसुम कर्णिक यांनी मांडला. अभयारण्यांची सुरुवात, त्यांची मागणी करणारा शहरी उच्चभ्रू वर्ग, तेथे राहणाऱ्या स्थानिकांकडे बघण्याचा त्यांचा तुच्छभाव आणि निर्णयप्रक्रियेत त्यांना वगळण्याची रीत आणि त्यांच्या जीवनावर होणारे आघात लक्षात घेतले गेले नाहीत. या जनसमुदायांबरोबर काम करणारे कार्यकर्ते आणि वन्यजीव रक्षणाचा आग्रह धरणारे असे द्वंद्व उभे राहिले आहे.

या दोन गटात परस्पर सामंजस्य हळूहळू येत आहे. तसेच या संरक्षित क्षेत्रावर विकासवादी आक्रमण होत आहे. त्यामुळे या दोन गटांनी सामंजस्यही वाढवायला हवे आहे. अभयारण्ये वा संरक्षित विभाग यांची गरज आज निश्चित आहे. तसेच याचे व्यवस्थापन निव्वळ शासकीय नोकरवर्गावर सोपवता येणार नाही.

आजच्या परिस्थितीला 'अभय' क्षेत्रांची निर्मिती ही गरज आहे. माणूस आता निसर्गाला स्वतःच्या हस्तक्षेपाने मानवनिर्मित सृष्टीचे रूप देऊ इच्छितो आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' ही वृत्ती आणि 'वृक्षवल्ली आम्हा वनचरे सोयरी' या वेगळ्या वृत्ती आहेत आणि याच्यात आपल्याला निवड करायची आहे. आणि ती करताना एक गतिमान संतुलन साधून निसर्गसृष्टीचे रक्षण-संवर्धन करण्याची जबाबदारी माणसावर आहे. या भूमिकेतून नैसर्गिक संसाधने, जंगल, जमीन, पाणी यांचे नियोजन नव्याने करावे लागेल.

आजच्या परिस्थितीत अभयक्षेत्रे ही अपरिहार्य मानावी लागतील. पण त्यांच्या निर्मितीत तसेच व्यवस्थापनात लोकांचा सहभाग असणे जरूर आहे. यात स्थानिक लोक, शासकीय यंत्रणा, तज्ज्ञ इ. घटकांचा सहभाग खोलात जाऊन ठरवावा लागेल, त्याची रीत आणि यंत्रणा आखावी लागेल. यासाठी लोक

जाणकार आणि पात्र बनणे जरूरीचे आहे, अशा सक्षम ग्रामसभा तयार होणे जरूर आहे.

कुसुम कर्णिकांनी या लेखाचे वाचन आणि थोडक्यात विवेचन केले. नंतर या प्रश्नावर स्वतःचे अनुभव मांडत असताना त्या म्हणाल्या की १९८५ साली भीमाशंकरला अभयारण्य घोषित झाले. सुरुवातीला या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना उठवले जाणार नाही असे लिखित आश्वासन देऊनही नंतर आयोजित केलेल्या सभेत वनअधिकाऱ्यांनी गावांना उठवण्याची भाषा केली. पण सभेत झालेल्या लोकक्षोभामुळे वनविभागाला पुनर्विचार करावा लागला. या भागात लोकांच्या अनेक शतकांच्या वनसंरक्षण-संवर्धनाच्या परंपरा आजही शिल्लक आहेत. अशा लोकांना उठवून त्या जंगलाचे रक्षण होणार नाही. या नंतर अनेक प्रकाराने आंदोलन चालवून लोकाभिमुख अभयारण्याची मागणी आणि त्या नंतर कामाची 'चारपदरी, चतुर्मुखी' प्रक्रियेची मागणी केली आहे. यात स्थानिक जन, त्यांना मान्य असलेली संस्था-संघटना, संबंधित शासकीय अधिकारी आणि या प्रश्नात रस असलेले अभ्यासक, संशोधक, निसर्गप्रेमी असे चारगट आणि या सर्वांनी एकत्र येऊन नियोजन, व्यवस्थापन, देखरेख आणि मूल्यांकन (planning, execution, monitoring and evaluation) या चार प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

या मागणीला प्रतिसाद मिळतो आहे. या प्रकारच्या प्रक्रियेला इतर अभयारण्य क्षेत्रातही सुरुवात व्हावी या करता 'शाश्वत' संस्था लोकजागृती करते आहे.

जंगलाचे शोषण स्थानिक लोकांनी केले नसून कोळसा, जहाजबांधणी, रेल्वे, कागद कारखाने, फर्निचर, बांधकामे यांनी केले आहे. आदिवासी लोकांच्या घरी सरपण जाळले जाते पण फर्निचर नसते. अलीकडे जंगलाचे रक्षण आदिवासी करतात हे सर्वत्र मान्य होते आहे. जंगल वाचवायला हवे पण ते केवळ श्रीमंतांसाठी नाही तर सर्वांसाठी.

अमेरिकेने १८७२ मधे जगातले पहिले अभयारण्य 'यलोस्टोन पार्क' बनवले. त्यावेळी तेथे राहणाऱ्या ३०० लोकांना मारून टाकले गेले. रहिवाशांना आक्रमक ठरवले गेले आणि हे पर्यटकांसाठी बनवले गेलेले अभयारण्य म्हणजे नैसर्गिक संपत्ती, तेथील जंगल, जीवजिवाणू यांचा पर्यटनासाठी वापर केला जातोय. अभयारण्ये म्हणजे प्राणी संग्रहालये बनू नयेत. स्थानिक माणसांना तेथील प्राणी कसे सांभाळावे याचे ज्ञान असते. त्या प्राण्यासह ते त्या जंगलाचे सहवासी असतात. त्यात त्यांच्या देवराया असतात. या देवरायांचे स्थानपरत्वे संरक्षणासाठी केलेले नियम स्थानिक लोक काटेकोरपणे पाळत असतात. बहुतेक ठिकाणी जंगलवासी स्थानिक जमाती वाघाला देव मानतात. ब्रिटिशांना इथली जंगले वापरायची होती, लुटायची होती. त्यांनी भारतात फर्निचर संस्कृती

आणली. डेहराडूनच्या फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटमधे तसेच पुण्याच्या बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडियाच्या कार्यालयात Wood is good असे बोर्ड आहेत. जंगले ही लाकडाची कोठारे-साठे त्यांनी मानली. व्यापारी दृष्टीने जंगले वागवली जात आहेत. सदाहारित वृक्षांऐवजी पानगळी वृक्ष आल्याने जंगलांचे तपमान वाढत आहे. त्यामुळे आगीचा धोका वाढतो आहे.

**चवथे सत्र रात्री ७ ते ८.३०**

परिषदेत अनुभव कथनासाठी बराच वेळ द्यायचा असे ठरले होते. प्रत्येक ठिकाणच्या कार्यकर्त्याने सविस्तरपणे त्याच्या भागातली परिस्थिती, प्रश्न आणि संघर्ष वा कामासंबंधी माहिती सांगितली. श्री. रमेश लाडखेडकर यांच्या अध्यक्षतेखाली हे सत्र सुरू झाले.

**नागझिरा अभयारण्य :** भंडारा हा तळ्यांचा जिल्हा मानला जातो. तिथे जंगलही बऱ्यापैकी आहे. नवेगाव बांध हे पक्षी अभयारण्य आणि नागझिरा अभयारण्य अशी दोन अभयारण्ये इथे आहेत. संजय गजभिये हे पेशाने वकील आणि निसर्गप्रेमी यामुळे नागझिरा क्षेत्राशी संपर्कात आले. या जिल्ह्यात १/३ भाग जंगलाखाली आहे. १९७० साली नागझिरा हे अभयारण्य घोषित झाले. एकूण क्षेत्र १५१ चौ. कि.मी. आहे. यात कमीत कमी गावे घेतली आहेत. थाडेझरी हे एकच गाव या क्षेत्रात येते. तिथे ४०-५० घरे आदिवासी, बौद्ध आणि इतर लोकांची आहेत. तेथील लोक वनखात्यात रोजंदारीने कामाला जातात. अनेक वर्ष काम करूनही वनखात्याने लोकांना नोकरीत कायम केलेले नाही. म्हणून त्यांच्या कोर्ट प्रकरणात गजभिये काम करत असताना या भागात फिरून तिथला अभ्यास झाला. आता या खटल्यांमुळे २०-२२ लोक वनखात्यात कायम झाले आहेत. काही गावे या क्षेत्राच्या सीमेवर आहेत. पावसाळ्यात हा भाग तुटतो. दळणवळण अशक्य होते. त्यामुळे इथल्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ होते. शिकलेली मुले इथे रहायला मागत नाहीत. इथे चोरटी जंगलतोड तसेच इतर वस्तू गोळा करून चोरून विकल्या जातात. बाहेरचे लोक स्थानिक लोकांना कामाला लावून जंगलतोड करतात. लोकांना पैशाकरिता यावर अवलंबून राहावे लागते. योजना करायच्या झाल्या तर त्या वनखात्याकडे मागाव्या लागतात. दिवाळीनंतर वनखाते कामे काढते. इथे शेती पारंपरिक पद्धतीची आणि अपुरी आहे. जीवन कष्टप्रद असल्याने नवीन पिढी कामाला तयार होत नाही. जंगलात रस्ते दुरुस्ती, रखवाली अशी कामे असतात. येथील लोकांचे जंगलाशी आता नाते उरले नाहीये. जंगलापासून लोकांना वंचित ठेवल्याचा हा परिणाम आहे.

आता इथे नक्षलवादी संघटनेचा जोर आहे. त्यांचा लोकांना बराच त्रास होत

असतो. तसेच त्यामुळे लोकांना पोलिसांचा त्रासही वाढला आहे. यापायी लोक फार कंटाळून गेले आहेत. दहशत फार आहे. थोड्या भागात जंगली प्राणी जास्त असल्याने श्वापदांचा त्रास लोकांना सहन करावा लागतो. चोरून जंगलतोड होते. त्या पैशाने दारूचे व्यसन वाढले आहे. त्यामुळे लोक नासले आहेत. बाहेरचे लोक जंगलाचे आणि स्थानिक लोकांचे दंडेलीने शोषण करतात. तेंदूपत्ता गोळा केला जातो. त्याच बरोबर बांबूची चोरटी तोड होते. फेब्रुवारी-मार्चमधे लोक मोहाची फुले गोळा करतात. ही फुले चारून बैलांकडून पावसाळ्यात शेतीची कामे करून घेतली जातात. पूर्वी फुले, मोहाच्या बियांचे तेल बरेच खाल्ले जाई. आता वापरत नाहीत. लोकांच्या गरजा फार कमी आहेत. भाताचे एकच पीक आहे. लोक पुनर्वसनाला तयार आहेत परंतु लोकांच्या अपेक्षा जास्त आहेत. लोक घुंगरकाठी आणि कंदिल घेऊन जंगलात रात्रीचे फिरतात हरणाची गळून पडलेली शिंगे ८० रुपये किलोने विकत असत. आता त्यांचा भाव १२० रुपये झाला आहे. वाघांना विष घालून मारून त्यांची कातडी विकली जातात. नुकत्यात ४ पिल्ले आणि नरमादी असे व्याघ्र कुटुंब दिसले आहे. अंधारवन नावाचे दाट वन आहे. तसेच कुवार जंगलाचा (virgin forest) चा भाग इथे आहे. पूर्वीची छोटी लाइन आता ब्रॉड गेज रेल्वे झाली आहे. मुरूम, खडी, ग्रॅनाइटच्या खाणी सुरू आहेत. पैशाच्या आशेने गावकरी यात सामील आहेत. नक्षलवाद्यांचा त्रास वाढतो आहे. तरुण मुलामुलींना ते जबरदस्तीनेही त्यांच्यात सामील व्हायला लावतात. केव्हाही गावात शिरून तयार अन्न घेऊन निघून जातात. (जंगलात त्यांचा तळ, स्वयंपाक केल्यास धुरामुळे पोलीसांना कळेल म्हणून ते तयार अन्नच लुटून नेतात.) यामुळेही लोक त्रासून पुनर्वसनाला तयार झाले आहेत. या भागात गोसीखुर्द धरणाचा प्रश्न आहेच.

**मेळघाट अभयारण्य :** मेळघाट हा एक विस्तीर्ण असा व्याघ्र प्रकल्प आहे. यात गुगामल राष्ट्रीय उद्यान हा या प्रकल्पाचा गाभाभाग आणि मेळघाट अभयारण्य हा बफरभाग मानला आहे. १६०० चौ. कि.मी. प्रकल्पाचा तिसरा हिस्सा काही वर्षांपूर्वी शासनाने या प्रकल्पातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पासंबंधी तेथील कार्यकर्ते श्री. रंजीत घोडेस्वार यांनी मांडले. यांच्या गटाने १९८० पासून या भागात कामाला सुरुवात केली. रोजगार, शेतीविकास, शिक्षण अशा क्षेत्रात काम सुरू केले. दडपशाही, शासकीय हस्तक्षेप यामुळे काम फारसे होऊ शकले नाही. लोकात जागृती करून चळवळ उभी करायला हवी आहे.

ब्रिटिशपूर्व काळात इथे दाट आणि विविधतापूर्ण जंगल होते. नंतर ब्रिटिशांनी इथे सागाचे प्रमाण वाढवले. पूर्वी वन्यप्राणी विपुल दिसायचे. आता मात्र फारसे दिसत नाहीत. १९७० साली व्याघ्र प्रकल्प आला. हे करताना लोकांना

विश्वासात घेतले गेले नाही. ५९ गावे जी बफरमधे येतात ती उठवायची शासनाची इच्छा आहे. कोअर एरियाच्या सीमेवर ६ गावे येतात. ही सहा गावे पहिल्या टप्प्यात नंतर आणखी २२ गावे दुसऱ्या टप्प्यात उठवायची योजना आहे. या लोकांनी उठावे म्हणून वनखात्याने यांना खूप त्रास दिला आहे. चूक कोणाची आहे हे स्पष्ट होत नाहीये. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे अभयारण्य क्षेत्रातील लोकांचे हक्क ठरवण्याविषयीचे अधिकार असतात. ते म्हणतात की पुनर्वसनासाठी जागा नाहीये. लोकांना अंजनगावाकडची जमीन दाखवण्यात आली आणि नंतर ती मिळण्यासारखी नाही असे सांगितले गेले. काही गावे जनगणनेत दाखवली गेली नाहीत. नंतर तेथील काही गावातून लोकांना हुसकावून लावण्यात आले. अशी न दाखवलेली दोन गावे आजही आहेत. जी गावे व्याघ्र प्रकल्पातून वगळण्यात आली त्यांचे खरे कारण शासन स्पष्टपणे देत नाही. कुपोषणामुळे ही गावे वगळण्यात आली असे वनखाते म्हणते, परंतु प्रत्यक्षात या गावात कुपोषण कमी आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेरच्या आदिवासी भागात जिथे जंगल फारसे नाही तिथे कुपोषण आहे. भूकबळी आहेत. तेथे आता जंगल उत्पादने नाहीत. जमीन आदिवासींच्या हातातून गेलेली आहे. त्यामुळे भूकबळी होत आहेत. जंगल-अभयारण्य-भूकबळी या प्रश्नांचा एकमेकांशी असलेल्या संबंधांचे पुरेसे अध्ययन झालेले नाही. लोकांना जंगलातून कंदमुळे, फळे, भाज्या अशा अनेक गोष्टी खाण्यासाठी मिळतात. जंगलभागात लोक तुलनेने सुखी आहेत. शासकीय सोयी सुविधा बऱ्या आहेत. जागतिक बँकेने रस्ते-पुलांसाठी बराच पैसा दिला. हापसे, तळी बनली आहेत.

इथे पोचिंग, चोरटी तोड, स्मगलिंग हे प्रश्न आहेत. स्थानिक लोक, शासकीय अधिकारी आणि राजकीय नेते यांच्या साहाय्याने पोचिंग केले जाते. दिवसेंदिवस जंगल उत्पादने कमी होत आहेत. प्रश्न फार गुंतागुंतीचे आहेत. त्यांचे सुसूत्रीकरण कसे करावे हे कळत नाही. जंगली जनावरापासून शेतीला खूपच त्रास होतो. रानडुकरांचा खूप त्रास आहे. यावर गजभियेंनी नागझिऱ्यामधील लोकांची डुकराच्या शिकारीची पारंपरिक पद्धत सांगितली की तेथे वाघऱ्या म्हणजे जाळी लावून नंतर हाके घालत डुकरे वाघरीत अडकवतात आणि त्यांना टोचाने मारतात. आता ही शिकार अभयारण्यामुळे बंद पडलीय आणि त्यामुळे डुकरांची संख्या खूप वाढलीय. घोडेस्वार पुढे म्हणाले, सागामुळे चरणाऱ्या जनावरांची संख्या कमी झाल्यामुळे वाघाला शिकार भेटत नाही. मग तो माणसांनी पाळलेल्या ढोरांवर येतो. डुकराला नैसर्गिक शत्रू नाही. माणूस हा एकच शत्रू त्याला आहे. शिकारीला बंदी आल्यामुळे त्यांची संख्या भरमसाठ वाढली आहे. आज वनखात्याने लागवड केली तर डुकरे ती टिकू देत नाहीयेत. उकरून मुळासकट खात आहेत.

गजभियेनी मांडले आदिवासींना जंगलात मिळणारे अन्न हेच त्यांनी खावे का? त्यांना बाहेरच्या लोकांसारखे व्यवस्थित अन्न का मिळू नये हा एक प्रश्न आहे. पण ते मिळत नाही तर त्यांना जंगलातील कंदमुळे, बांबूचे कोंभ, डुकराची शिकार करायला मिळाली पाहिजे.

गनीसाहेबांनी (हे राधानगरी अभयारण्य क्षेत्रात काम करतात आणि राहतात) मांडले की अभयारण्य क्षेत्रात विकास तर करू दिला जात नाही. पुनर्वसन आम्हाला हवे आहे पण ते विकसनशील पुनर्वसन हवे. आमच्या इथले पाणी अडवून आम्हाला विस्थापित केले जाते तर ज्या जमिनीला हे पाणी मिळून शेती पिकते त्या भागातली जमीन आम्हाला हक्काने मिळाली पाहिजे. अनेक ठिकाणी धरणे आणि अभयारण्ये एकत्र येत आहेत. पारधी (भीमाशंकर अभयारण्य) यांनी मांडले की आम्ही आदिवासी राहतो त्या भागातच धरणे आणि अभयारण्ये कशी काय केली जातात? जंगलावर आम्ही आणि आमच्यावर जंगल अवलंबून आहेत. निसर्गावर, जंगलावर आपण जगतो. या मुद्यावर चर्चा व्हायला पाहिजे.

गनीसाहेब - वन्यजीव वाचवायला, प्रदुषण कमी करण्यासाठी जर अभयारण्य करायचे तर आम्हालाही वाचवा. आमचाही विकास व्हायला हवा. आमच्याकडून फक्त त्यागाची अपेक्षा का केली जाते? प्रकल्प तुम्ही (शासन आणि सूचना करणारे शहरी पर्यावरणवादी) तयार करता मग आमचे हक्क का नाकारता? आमच्या पाण्यावर पिके काढली जातात, कारखाने चालवले जातात त्यात आम्हाला वाटा आणि हक्क का नाहीत? स्थानिक लोकांना अभयारण्य क्षेत्रात सर्व त्रास सहन करत रहावेसे वाटते आहे का याचा विचार का होत नाही?

स्थानिक लोकांना या सर्व प्रक्रियेत सामील करून घ्यायला हवे अशी सर्वच कार्यकर्त्यांची आणि इतर उपस्थितांची मागणी होती.

प्रशांत शिंदे आणि पुर्णिमा उपाध्याय हे 'खोज' या गटामार्फत मेळघाटात पाहणी करत आहेत. त्यांनी मांडले की प्रश्न फार गुंतागुंतीचे आहेत. या भागात फारसे कोणीच काम केले नाहीये. शासनानेही दुर्लक्ष केलेले दिसते. कुपोषणाचा मोठा प्रश्न आहे. लोक संघटित नाहीयेत. अभयारण्यातली गावे, वगळण्यात आलेल्या भागातली गावे आणि मैदानातली गावे अशा एकूण ३५० गावांचा प्रश्न आहे.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९९६ ला, पहिले सत्र अनुभव कथनाचे चालू ठेवले होते.

अध्यक्ष श्री. रमेश लाडखेडकर यांनी प्रस्तावना केली की, अनुभव कथन विस्तृत करावे या करता भरपूर वेळ आपण देत आहोत कारण आपण अजून प्रश्न समजून घेण्याच्या प्रयत्नात आहोत. १९९४ ला झालेल्या इंडियन

इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशनच्या (आय. आय. पी. ए.) कार्यशाळेपासून ही प्रक्रिया गतिमान झाली आहे. या प्रक्रियेचा इतिहास सांगताना श्री. आनन्द कपूर (एकजूट, भीमाशंकर अभयारण्य) यांनी सांगितले – भीमाशंकर अभयारण्याचा लढा लढताना ही जाणीव झाली की इतर अभयारण्यात म्हणजे संरक्षित विभागात अशाच प्रकारचे प्रश्न आहेत, म्हणून मग महाराष्ट्रात इतर ठिकाणी संपर्क साधायचा प्रयत्न केला. १९९२ ला पहिली अभयारण्य परिषद एकजूट संघटनेतर्फे नारोडी इथे घेण्यात आली. यात भीमाशंकर, बोरिवली, राधानगरी आणि कर्नाटकातील नागरहोळे या विभागातील कार्यकर्ते एकत्र आले आणि श्री. वसंत पळशीकर आणि प्रा. राम बापट या विचारवंतांनी प्रश्नांची उकल करून मांडणी केली. त्यानंतर आय. आय. पी. ए. ने १९९४ ला दिल्लीत कार्यशाळा घेतली. यात अभयारण्य क्षेत्रातले कार्यकर्ते आणि वन अधिकारी एकत्र येऊन एका मंचावर आमनेसामने बसून बोलले आणि मग प्रश्न दोन्ही बाजूंनी प्रथमच मांडले गेले आणि वनखात्याला प्रश्न मान्य करावे लागले.

या प्रक्रियेतून एक असमाधान उमटले की इथेही कार्यकर्तेच बोलले पण जंगलात राहाणारे, तिथल्या अडचणी सोसणारे स्थानिक रहिवाशी ना बोलले ना त्यांनी काही ऐकले. आणि मग त्यांच्याशी त्यांचा आपापसात संवाद घडावा या करता जंगल जीवन बचाव यात्रेचे १९९५ ला आयोजन झाले. ही यात्रा सात राज्यातून १८ संरक्षित विभागातून स्थानिक लोकांशी, वन अधिकाऱ्यांशी, बुद्धिजीवी वर्गाशी, पत्रकारांशी संवाद साधत दिल्लीत येऊन दोन दिवसांच्या कार्यशाळेत समाप्त झाली. या यात्रेतून प्रश्न खोलात जाऊन स्पष्ट झाले. स्थानिक माणसांना बोलायला, मांडायला संधी मिळाली आणि मग यातून नेटवर्किंगची प्रक्रिया (networking) सुरू झाली. या नंतर लगेच दुसरी अभयारण्य परिषद सातारा जिल्ह्यात कोरेगाव इथे 'सत्यशोध' संस्थेच्या विद्यमाने भरली आणि आता ही तिसरी अभयारण्य परिषद अधिक विस्तृत पायावर संपन्न होत आहे. प्रश्न फार विविध आहेत त्यामुळे ३-४ मुद्याचे प्रश्न निघू शकतील का हे बघायला हवे.

**पेंच उद्यान :** यानंतर प्रथम श्री. विनोद गजभिये यांनी पेंच राष्ट्रीय उद्यानाचा प्रश्न मांडला (महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तालुक्यात आणि मध्य प्रदेशच्या भागात पेंच हे राष्ट्रीय उद्यान आहे. तोतलाडोह येथे नदीवर धरण आहे. यावर वीज उत्पन्न केली जाते. १९७५ ला हे राष्ट्रीय उद्यान घोषित झाले. महाराष्ट्रातील २५९.७१ चौ. कि.मी. क्षेत्र या उद्यानात येते. यात पेंच धरण प्रकल्पासाठी जमीन द्यावी लागली. या धरणासाठी बांधकाम मजूर येथे येऊन राहिले. धरणाचे काम जवळजवळ ३० वर्षे चालल्याने काही

प्रश्न निर्माण झाले आहेत. येथे आलेले मजूर कामावर असताना या भागात त्यांची नवी पिढी जन्माला येऊन मोठी झाली. हे लोक आता त्यांच्या जुन्या गावात जाऊन जगू शकत नाहीत. म्हणून ते इथेच रहायला मागतात. वनखात्याला आणि शासनाला हे मंजूर नाही. यांनी उठून निघून जावे म्हणून वनखाते लोकांना खूप त्रास देत असते. पण लोकांना दुसरा पर्याय नसल्याने ते इथे राहत आहेत आणि या धरण तलावात मत्स्यबीज टाकून तेथे मच्छिमारी करून गुजराण करत आहेत.

नदीवर धरण बांधण्याचे काम ३० वर्षे चालले. नंतर लेबर कॉलनी उठेना म्हणून त्रास द्यायला सुरुवात झाली. घरावरची छपरे काढून टाकली पण लोक हटले नाहीत. या नंतर शामभाई ठाकूर येथे आले. बिडीपत्त्यावर लोक जगत होते. तो धंदा राष्ट्रीय उद्यानाच्या कायद्यामुळे बंद पडला. २० मे ९५ ला मच्छिमारीवरही बंदी आणण्यात आली. दुसरा काही उद्योग नसल्याने उपासमारी व्हायला लागली. म्हणून आम्ही कोर्टात केस दाखल केली. ही केस ॲड. हरणे यांनी चालवली. आमच्यासारखी होत असलेली ही केस तशीच पडली. लोकांनी आंदोलन सुरू केले. २ ऑक्टोबर ९५ ला हजार लोकांनी एकत्र येऊन मच्छीमारी केली. कायद्याने मच्छीमारीला बंदी असली तरी सरकार आम्हाला मासेमारी करू देते पण बाहेर न्यायला परवानगी देत नाही. वन अधिकाऱ्यांनी आमच्यावर खोट्या केसेस भरल्या. यामुळे आंदोलन थंडावले. वन अधिकाऱ्यांनी फसवून लोकांकडून लिहून घेतलें की ते इथले रहिवासी नाहीत आणि मग लोकांना बाहेर काढायला सुरुवात केली. या राष्ट्रीय उद्यानात आठ गावे आहेत पण यापासून तोतलाडोह गावाला वेगळे काढून शासनाने त्रास सुरू केलाय. राष्ट्रीय उद्यानामुळे इथे नेमके काय केले जाणार हे कळत नाहीये. धरण बांधताना एक पिढी मरून गेली. आताची आमची नवी पिढी इथे जन्माला येऊन वाढली. आम्ही कुठे जाणार? सरकार कोणालाही नोकरी वा पगार देऊ शकत नाही तर आमचे भविष्य काय? जागतिक बँकेने २७ कोटी रुपये मंजूर केले आहेत की लोकांना वैकल्पिक रोजगारासाठी वैयक्तिक १० हजार रुपये मिळावेत. दोन्ही राज्यात मिळून ४० गावे या प्रकल्पाखाली आहेत.

यानंतर ॲड. हरणे यांनी लढ्याची माहिती दिली. वनविभागाचा भयानक त्रास इथे आहे. लोकांना पकडून शॉकही देतात. मारहाण करतात. जंगल खूप आणि दाट आहे. अत्याचाराला बाहेर वाचा सुद्धा फुटू शकत नाही. मासेमारी बंद झाली की लोक आपोआप निघून जातील असा वनखात्याचा डाव आहे. या धरणाचे पाणी महाराष्ट्राला आणि वीज मध्यप्रदेशला अशी वाटणी आहे. पार्क झाल्यावर मासेमारी बंद झाली. केस भरली त्यानंतर आंदोलन सुरू झाले. पर्यावरण मंत्री कमलनाथ असताना दिलेल्या अहवालात या उद्यानात गावे, माणसे, गुरे

अजिबात नाहीत अशी नोंद केलेली आहे. शासन खूप खोटेपणा करत आहे. २ ऑक्टोबर ९५ ला इथे मोठे आंदोलन झाले. तरीही आज मासेमारी बंद आहे. मध्यप्रदेशाने मासेमारीला परवानगी दिलेली आहे पण महाराष्ट्रात बंदी आहे.

आमचा उद्यानाला विरोध नाही. जागतिक बँकेने भारतात पर्यावरण विकासाकरिता (eco-development) जी सात क्षेत्रे निवडली आहेत त्यात पेंच राष्ट्रीय उद्यान समाविष्ट आहे. या योजनेतील ३०० कोटी रुपयापैकी पेंचसाठी ६०-७० कोटी रुपये मंजूर आहेत. यात स्थानिक आदिवासींना काही कळत नाही. नुकतेच सिवनी येथे eco-development शिबीर झाले. त्यात आदिवासी कोणीही नव्हते. वन अधिकारी आणि निसर्ग प्रेमी फक्त होते.

श्री. लाडखेडकरांनी मांडले की तोतलाडोहच्या वस्तीचा प्रश्न एक वेगळा प्रश्न आहे. पेंच उद्यानात वीज बोर्डाच्या कॉलनीचा त्रास धरला जात नाही पण तिथे दीर्घ काळ राहिलेल्या मजूरांचा त्रास होतो. तसेच मासेमारीचा प्रश्नही इतर अनेक भागात आहे. तो तसा सार्वत्रिक प्रश्न आहे. मासेमारी ही पर्यावरणाला घातक आहे का? हा विचार करायला हवा. काही स्वयंसेवी संघटनांनी मासेमारीविरुद्ध अर्ज केलाय. इथे स्वयंसेवी संघटना एकमेकांच्या विरोधात उभ्या राहिल्या आहेत. यावर विचार व्हायला हवा. तसे आम्हा विदर्भीयांना मुंबई दूर आणि संपर्काला दुर्लभ आहे.

**कोयना अभयारण्य :** या भागात काम करणाऱ्या सत्यशोध संस्थेचे कार्यकर्ते श्री. अविनाश बि. जे. यांनी कोयना अभयारण्य प्रश्नावर मांडले – या भागात कोयना जीवन हक्क संरक्षण संघटनेच्या विद्यमाने ते तिथे काम करत आहेत. कोयना धरणाचे काम १९६० साली पूर्ण झाले आणि कोयना अभयारण्याची घोषणा १९८५ साली केली गेली. (शासकीय माहिती : क्षेत्र – ४२३.५५ चौ. कि.मी., यात ५० गावे वसलेली आहेत.) धरणामुळे विस्थापित झालेले लोक काही बाहेरच्या भागात गेले तर काही डोंगरावर चढून वस्ती करून राहिले आहेत. बाहेर गेलेले लोक पुनर्वसन होत नाही म्हणून परतही आले आहेत. १९६४ ला भूकंप झाल्याने लोक खूप अस्वस्थ झाले. त्यामुळे स्थलांतर आत बाहेर सुरू असते. मराठा आणि धनगर यांची जास्त करून वस्ती आहे. शेती आणि दुधाचा धंदा हे लोकांचे मुख्य आधार आहेत. जमीनहक्क प्रश्न फार गुंतागुंतीचे बनले आहेत, हे सरकार मान्य करते. अभयारण्यामुळे गुंतागुंत आणखी वाढली आहे. ३०-३१ गावे आहेत. १८ गावे ओस पडली आहेत. काही वस्त्या अतिशय लहान आहेत. पाच गावे तातडीने उठवायची आहेत. धरण दक्षिण-उत्तर पसरलेले आहे. धरणाच्या पश्चिम किनाऱ्यावरची ही पाच गावे तातडीने पुनर्वसन मागत आहेत. तेथे जंगल घनदाट आहे. या गावांचे मागणे आहे की पूर्व किनाऱ्यावरच्या निघून गेलेल्या गावांची जी जमीन आहे तेथे

आम्हाला बसवा. वनखाते आणि एक संस्था यांनी वेगवेगळे रस्ते दाखवले आहेत. गेले ७/८ वर्ष वेगवेगळी जमीन पुनर्वसनासाठी दाखवली जाते आहे. लोकात फाटाफूट झालेली आहे. याचा फायदा शासन घेते आहे. प्रांत अधिकारी (SDO) यांच्या अहवालात त्यांनी त्यांचा अधिकार व्यवस्थितपणे वापरून योजना सुचवल्या नाहीयेत असे दिसते. पाच गावे आज जिथे वसलेली आहेत त्या जागी अभयारण्य करावे. गावांना पूर्व किनाऱ्यावर आणून वसवावे. वासोट्याच्या आसपास अभयारण्य करावे. बाकीच्या भागात आम्ही जन अभयारण्य करू अशा लोकांच्या मागण्या आहेत.

पर्यटनाचे संकट या भागावर आक्रमण करते आहे. महाबळेश्वर आता नासले आहे आणि अपुरे पडते आहे. त्यामुळे उत्तरेकडून मोठ्या प्रमाणावर जमिनीची खरेदी सुरू आहे. पूर्वेकडे बॉक्साइट खदानाची शक्यता आहे. दक्षिणेकडून पोचिंग आणि पश्चिमेकडून आम्ल पर्जन्याचे संकट ग्रासणार आहे.

कोयना अभयारण्य क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमजीवी जनता सहायक मंडळच्या श्री. बाळासाहेब कोळेकर यांना आमंत्रित केले होते. ते येऊ शकले नाहीत त्यामुळे त्यांच्या कित्येक वर्षांच्या अनुभवातून अभयारण्य प्रश्नावर जो प्रकाश पडू शकला असता तो मिळाला नाही.

या भागात सहभागी वनव्यवस्थापन योजना राबवता येईल का हे बघावे असे श्री. लाडखेडकरांनी सुचवले तसेच श्री. आनंद कपूरांनी सांगितले की मध्यप्रदेशातील बरगी धरणातील विस्थापितांनी जमीन मिळवायची खटपट सुरू केली आहे तसे इथे करावे लागेल.

**राधानगरी अभयारण्य :** (१९५८ साली इथे २०.७८ चौ. कि.मी. चे एक लहानसे अभयारण्य घोषित केले गेले. त्यापूर्वी हे जंगल कोल्हापूरच्या महाराजांचे शिकारगाह होते. इथे धरण झाल्यामुळे डूब क्षेत्रातले लोक डोंगरावर चढून जंगल भागात येऊन राहिले आहेत. यानंतर ३५१.१६ चौ. कि.मी. चे क्षेत्र वाढवून १९८५ ला विस्तारित अभयारण्य घोषित झाले. तेव्हापासून इथे आंदोलन उभे आहे. लोकांची पुनर्वसनाची मागणी आहे. यात २८ गावे आहेत. तसेच या अभयारण्याच्या सीमेवर बॉक्साइटच्या खाणीचे काम चालू आहे आणि नंतरचे प्रस्तावित खाणीचे स्थान अभयारण्याच्या अगदी गाभ्याच्या भागात आहे.)

या भागाची माहिती तेथील रहिवासी आणि कार्यकर्ते श्री. गनीसाहेब कलोट तसेच माजी आमदार श्री. शंकर धोंडी पाटील यांनी दिली.

श्री. गनीसाहेब – पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानात हा भाग येत होता. छत्रपती शाहूमहाराजांनी हा भाग शिकारीसाठी निवडला आणि राखून ठेवला. इथे डंगे धनगर हे गुरे पाळणारे आदिवासी जमातीचे लोक आणि मराठे असे लोक

पूर्वीपासून वस्ती करून आहेत. या लोकांचा आणि शाहूमहाराजांचा लोभ होता. या भागाच्या विकासासाठी त्यांनी धरणाची योजना आखून १९०७ ला काम सुरू केले पण ते १९१८ ला बंद पडले. परत १९४० ला परत सुरुवात करून ते पूर्ण झाले. फिरत्या शेतीसाठी म्हणजे दळीच्या शेतीकरता तीन वर्षासाठी जमीन मिळत असे पण पुढे जमिनीची धूप फार झाल्याने शेती होइनाशी झाली आणि लोकांची उपासमार व्हायला लागली. म्हणून धरणग्रस्तांचे आंदोलन सुरू झाले. आम्ही १९७५ च्या दुष्काळात मोर्चे काढले. त्यावेळी आश्वासन मिळाले पण नंतर आणीबाणीच्या काळात प्रश्न तसाच राहिला. आमचे मूलभूत अधिकार होते त्यानुसार जनावरे चारणे, लाकूडफाटा मिळवणे, जंगल उत्पादने, फळे, भाज्या असे घेता येत असे. विस्तारीत अभयारण्य झाल्यावर यावर गदा आली. डंगे धनगर तीन वर्षांकरता कारवी, केंबळीची घरे बांधत, नाचणावरीची भाकर, कधी तरी भात खाऊन जगत. याच प्रकारे थोड्याफार फरकाने मराठेही राहत होते. लोकांच्या गरजा कमी होत्या. या नंतर या भागातून कोकणाकडे जाणारा राज्यमार्ग झाला. त्यामुळे बाहेर संपर्क वाढला आणि लोक बदलले. लोकांना आता विकास हवा आहे. पण वनखाते विकास होऊ देत नाही. पाणी पुरवठा, रस्ते अशी कामं वनखात्याने थांबवली आहेत. जवळची २९ गावे काळम्मावाडी धरणामुळे उठली. आता इथले लोक पुनर्वसन मागत आहेत.

शेतीतील पिके जंगली जनावरे खातात. हा प्रश्न फार बिकट झाला आहे. पूर्वी रानातली जनावरे माणसाला घाबरायची. आता ती पार गावात येतात. गवा या जनावराचा त्रास वाढतो आहे. गव्याच्या डोक्यावर शंकराची पिंड असते असे लोक मानतात त्यामुळे त्याला कोणीही कधी मारणार नाही. चितळ, वाघ हे प्राणी कमी होत आहेत. वनखाते आणि निसर्गप्रेमी म्हणतात की याला स्थानिक लोक जबाबदार आहेत. इथे चोरटी शिकार, वृक्षतोड बरीच होते. बॉक्साइटच्या खाणीचे काम चालू आहे. शास्त्रज्ञ सांगतात की यांचे वाईट परिणाम होणार आहेत. खाण आज अभयारण्याच्या हद्दीवर चालू आहे पण त्यांचा पुढचा भाग हा अभयारण्याच्या अंतर्भागात इदरगंजच्या भागात आहे. इथे खाणीमुळे खूप नुकसान होणार आहे. पूर्वी जंगलभागात रानचिवा खूप होता. ही वनस्पती म्हणजे गव्यांचे महत्त्वाचे खाणे होते. वनखात्याने हा मोठ्या प्रमाणावर तोडून विकला. आता गव्यांना खायला उरले नाही म्हणून ते लोकांच्या शेतावर येतात. वनखाते जी लागवड आज करते आहे त्यात नीलगिरी, कुबाभळ, अकॅशिया अशा गैर जातीची लागवड करते आहे. हे वनखाते जंगलाचे संरक्षण काय करणार? जंगली जनावरांच्या त्रासामुळे लोक पुनर्वसन मागतायत. नदीत पूर्वी जे मासे मिळायचे ते आता मिळत नाहीत.

यावर अध्यक्ष श्री. लाडखेडकरांनी मांडले की, वनसंरक्षणासाठी फक्त

वनखात्यावर अवलंबून राहता येणार नाही. स्थानिक लोकांना त्यात भूमिका घ्यावीच लागेल. वनखात्याच्या वृत्तीत थोडेफार बदल होत आहेत.

यानंतर या परिषदेला नक्की येणार असे काही गट जे बहुधा वादळाच्या वार्तेमुळे आले नसावेत पण ज्यांच्याबरोबर पूर्व तयारीचा संपर्क आणि चर्चा-बैठका झाल्या होत्या अशा अभयारण्य क्षेत्राशी संपर्कात असलेल्या कुसुम कर्णिक यांनी या क्षेत्राचे प्रश्न मांडले.

**रेहेकुरी :** अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर असलेले हे एक अतिशय छोटे अभयारण्य आहे. या क्षेत्रात मोठ्या भागावर काळविट, हरणे फार पूर्वीपासून आहेत. पूर्वी या भागात चित्ते होते त्यामुळे काळवीटांच्या संख्येवर नियंत्रण होते. आता शिकारीमुळे चित्ते संपून गेल्यामुळे हे नियंत्रण उरले नाहीये. दुसरीकडून विकासाच्या कल्पनेतून प्रत्येक माणसाला त्याच्या जमिनीतून निघणारे सर्व पीक स्वतःसाठी हवे आहे. इतकेच नाही तर दिवसेंदिवस जास्तीत जास्त पैसा प्रत्येकाला मिळवायचा आहे. त्यामुळे काळवीट शेतावर आलेले कोणाला खपत नाहीये. यामुळे हे अभयारण्य आजूबाजूच्या लोकांना एक संकट वाटते आहे. शेतावर ही हरणे खूप नुकसान करतात. काही शेतकऱ्यांनी शेतीभोवती तारेचे कुंपण घालून त्याला वीज जोडली आहे. यामुळे प्राण्यापेक्षा काही वेळेला माणसे मेली आहेत. ही वीज बऱ्याच वेळा सरळ विजेच्या खांबावरून घेतली जाते. त्यामुळे दाब खूप असतो आणि माणसे मरतात. लोक यामुळे अभयारण्याच्या विरोधात आहेत. वनखाते आता काही प्रमाणात पर्यावरण विकासाचे काम करून लोकांना थोडा दिलासा द्यायचा प्रयत्न करत आहे.

**उजनी अभयारण्य :** या अभयारण्याचा प्रश्न खूप वेगळा आहे. हा भाग काही काळापूर्वी महामार्ग आणि रेल्वेमार्ग यांच्यामुळे विस्थापनग्रस्त होता. त्यात धरणामुळे मोठ्या प्रमाणात विस्थापन झाले. शिवाय धरणात बुडालेल्या महामार्ग आणि रेल्वेमार्गाला पर्यायी मार्ग केल्याने आणखी विस्थापन झाले. यात धरणाच्या मागच्या फुगवट्यातील पाणथळ आणि उथळ भागात पाणपक्षी येऊ लागल्यामुळे पक्षीमित्रांनी तिथे पक्षी अभयारण्य सुचवले. शासन आणि सूचित करणाऱ्या गटापैकी कोणीच स्थानिक लोकांना विश्वासात घेतले नाही, विचारायचे तर दूरच राहिले. जेव्हा शासनाने हे अभयारण्य घोषित केले तेव्हा प्रचंड लोकक्षोभ होऊन त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांना तेथे जाऊन जाहीर सभेत हे अभयारण्य रद्द केल्याची घोषणा करावी लागली. खरे तर एकदा शासनाने घोषित केलेले अभयारण्य रद्द होऊ शकत नाही, ते लहान मोठे करता येते असे वनखाते सांगते. तरीही वनखात्याच्या "महाराष्ट्रातील अभयारण्याच्या सद्यस्थितीच्या अहवालात" उजनी पक्षी अभयारण्याचा उल्लेखही नाही. म्हणजे जिथे लोक जोर धरतात आणि ते राजकीय दृष्ट्या ताकदवर असतात तिथे

अभयारण्य रद्द होऊ शकते हे उजनीच्या प्रकरणातून सिद्ध झाले आहे.

**नांदूरमधमेश्वर पक्षी अभयारण्य :** या अभयारण्याचे प्रकरण परत एकमेव असल्यासारखे आहे. नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यात एका छोट्या भरण धरणावर (feeder tank) हे क्षेत्र आहे. कादवा नदीवरील धरणातून कालवे न काढता नदीतून पाणी इथवर आणून या भरण धरणापासून पुढे कालवे काढले आहेत. हा बंधारा मुळातच लहान आणि जुना असल्याने, गाळाने बराच भरला असल्याने उथळ पाणथळ प्रदेश (wet lands) तयार झालाय. इथे पूर्वीपासून राहत असलेला आदिवासी महादेव कोळी समाज त्यांच्या जमिनी फसवून इतरांनी बळकावल्यामुळे गरीब आणि वंचित झाला होता. काही वर्षापूर्वी या लोकांनी सोसायट्या तयार करून गाळपेराची जमीन मिळवली आणि त्यावर ते चांगल्यापैकी पिके घेऊ लागले. येथे पक्षी येतात हे पाहिल्यावर पक्षीप्रेमींनी सूचित केल्यावरून १९८६ ला इथे अभयारण्य घोषित केले गेले. सध्या इथे तीन गट एकमेकांच्या विरोधात मागण्या करत आहेत. पक्षीमित्रांचा बंधाऱ्यांची उंची वाढवणे तसेच गाळपेर शेती या दोन्हीला विरोध आहे. कोपरगावचे ऊस बागायतदार नेट धरून आहेत की बंधाऱ्याची धारणक्षमता वाढवण्याकरता त्याची उंची वाढवा. उंची वाढवायच्या योजनेला गाळपेर शेतकरी आणि पक्षीमित्र दोघांचा विरोध आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की ही गाळपेर जमीन हा आमच्या जीवनाचा आधार आहे. पक्ष्यांशी आमचे कधीच वैर नाही. आमच्या शेतीमुळे त्यांना त्रास होत नाही. नाहीतर ते आजपर्यंत इथे टिकले नसते. ही बाहेरची माणसे पक्षी बघायला येतात त्याच्या कितीतरी आधीपासून आमची आणि पक्ष्यांची ओळख आहे. इथे आणखी एक प्रश्न आहे. या जलाशयात मत्स्यबिजे सोडून इथे मासेमारी केली जाते. पक्षीमित्रांचा या मासेमारीला विरोध आहे कारण त्यांच्या मते पक्ष्यांच्या तोंडचा घास काढला जातो. प्रत्यक्षात वस्तुस्थिती लोकांनी सांगितली की कोळ्यांना बारके मासे पकडण्यात रस नाही. त्यांची जाळी मोठ्या भोकांची असल्याने त्यात बारके मासे येत नाहीत आणि पक्ष्यांना या बारक्या माशांची गरज असते. आता सध्या असे चित्र आहे की पक्षीमित्र आणि स्थानिक गाळपेर शेतकरी एकत्र येऊन अभयारण्याच्या बाजूने उभे आहेत. गेल्या वर्षी बांध चार फुटांनी वाढवण्यात आला होता पण स्थानिक शेतकऱ्यांनी आंदोलन करून तो वाढीव भाग तोडफोड करून टाकला.

**कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य :** हे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरचे पुणे जिल्ह्यातील जुन्नर तहसील आणि अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तहसीलच्या घाटभागात येते. भंडारदरा धरणाच्या आतला पाणलोटाचा भाग त्यात येतो. एकूण क्षेत्र ३६१ चौ. कि.मी. या क्षेत्रात ५ गावे आहेत आणि लोकांना वाघ, डुकरे यांचा बराच त्रास होतो. या गावांच्या योजनांना वनखाते नेहमीच

आडकाठी करत असल्याने इथे संघर्ष उभा राहतो आहे. लोकांना वनोपज गोळा करायला बंदी घातल्याने असंतोष आहे. इथले वन अधिकारी सांगत होते की सामाजिक वनीकरण आणि सहभागी वनव्यवस्थापन (JFM) कार्यक्रमाकरिता अधिकारी गावात बैठकीसाठी गेले होते. या कार्यक्रमात कोणती झाडे लावायची यावर चर्चा सुरू असताना जर साग लावणार नसला तर बैठकीत बसूच नका असे सांगून वन अधिकाऱ्यांना लोकांनी घालवून लावले. या भागात काम करणारी सत्यनिकेतन संस्था या प्रश्नात लक्ष घालते आहे. तसेच काही स्थानिक लोकांनी एकत्र येऊन आंदोलन सुरू केले आहे.

**तानसा अभयारण्य**: या अभयारण्याची हकिकत अतिशय गुंतागुंतीची आहे. ब्रिटिशांनी फार पूर्वी मुंबईच्या पाणी पुरवठ्याकरता तानसा बांध बांधून पाणी अडवले. हे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून त्या काळात याच्या पाणलोट क्षेत्रातली सर्व गावे उठवली गेली. त्यानंतर १९७० साली इथे अभयारण्य घोषित करण्यात आले आणि १९८५ ला त्यात आणखी क्षेत्र वाढवून थोडे मोठे करण्यात आले. आता ३०५ चौ. कि.मी.चे क्षेत्र या अभयारण्यात येते. तसा हा भाग मुंबईच्या जवळ आणि मुंबईशी संबंधित आहे. परंतु याचा फारसा अभ्यास झालेला नाही. गेल्या १०-१५ वर्षांच्या काळात जुन्या उठवलेल्या गावांच्या जागा, जमिनी ज्या ओसाड पडल्या होत्या त्यावर जवळपासच्या भागातील वेगवेगळ्या कारणाने विस्थापित झालेले लोक येऊन बसले आणि त्यांनी वस्ती केली आहे. या लोकांना उठवून हुसकावून लावण्याचे प्रयत्न वनखाते करत असते, तर त्यांना प्रत्युत्तर देऊन तेथे आपला हक्क बसवणारी गावे यात सतत संघर्ष चालू आहे. या एकूण अभयारण्याच्या प्रश्नाचा फारसा अभ्यास कोणी केलेला आढळत नाही पण हे क्षेत्र नेहमी अशांत असते.

**बोरीवली राष्ट्रीय उद्यान** : ही चर्चा २६ तारखेला रात्री झाली. विठ्ठल लाड हे श्रमिक मुक्ती आंदोलन मार्फत बोरीवली उद्यानात कार्य करतात.

(बोरीवली उर्फ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे मुंबई शहराच्या उपनगरात आणि ठाणे जिल्ह्यात पसरलेले आहे. १९८३ ला हे उद्यान घोषित झाले. येथील रहिवासी आदिवासी आहेत. हे उद्यान मुंबई शहराच्या जवळ असल्याने इथे पर्यटकांचा वावर मोठा आहे. तसेच बिल्डर लॉबी, झोपडपट्ट्या, दगडाच्या खाणी, देऊळ, विकास प्रकल्प या सर्व गोष्टींचा या उद्यानाला फार त्रास आहे. वास्तविक हे उद्यान, शेजारी असलेली आरे कॉलनी आणि मुंबईला पाणी पुरवठा करणारी विहार, तुळशी ही तळी म्हणजे अखंड प्रदूषण सोसणाऱ्या मुंबईची फुप्फुसे आहेत. इथे राहणाऱ्या आदिवासींना तेथून उठवण्याचे वनखात्याचे नियोजन या लोकांना अतिशय त्रासाचे होते आहे. वनखात्याच्या शासकीय अहवालात अतिक्रमण करणाऱ्यात झोपड्या, मंदिर, शाळा आणि शेती यांचे

उल्लेख आहेत पण बिल्डर आणि दगडाच्या खाणीसारखे प्रबल अतिक्रामक यांचा उल्लेख नाही हे आश्चर्यकारक आहे.)

आरे कॉलनीपासून जंगल सुरू होते. काही भाग राखीव जंगल आणि काही भाग उद्यान असा पसारा आहे. उद्यानाच्या क्षेत्रात आदिवासी गावे वगळली होती परंतु मुंबईत तसेच या क्षेत्रात आदिवासी राहतात हे शासनाला तसेच इतरांनाही मान्यच नव्हते. वनखात्याने १९७४ साली इथल्या सर्व आदिवासींना गोळा करून आश्वासने देऊन 'कुंटण' या गावी नेले. पण तिथे कोणतीच सोय नव्हती. त्यामुळे हे सर्व परत आले आणि आपापल्या ठिकाणी रहायला लागले आहेत. आता या उद्यानात अकरा पाडे आहेत. लोक संघटित नसल्याने वनखात्याचा त्रास चालूच राहिला. श्रमिक मुक्ती आंदोनाने या करिता काम सुरू केले. आदिवासींची दैवते, सणसमारंभ, वसतीस्थाने यांचा अभ्यास करून आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे (TRTI) यांना सादर केले. पण तरीही काही घडले नाही. केल्टी पाड्यावर प्रथम कामाला सुरुवात केली. केल्टे म्हणजे माकडे (हा शब्द भीमाशंकर येथील आदिवासी याच अर्थाने वापरतात) पण वनखाते या पाड्याला अठरा नंबरचा पाडा म्हणते. लोकांचे अस्तित्व नाकारण्याचाच हा कट आहे. फुटक्या तळीचा पाडा या नावालाही इतिहास आहे. या लोकांना रेशन कार्डे नव्हती, जनगणना इथे होत नसे. भूकबळी झाले तरी बाहेर कळतही नाही. या लोकांनी शेती केली तर त्यावर १९८४-८५ या काळातही वनकर्मचारी ट्रॅक्टर घालत, गुरे सोडत. स्थानिक आदिवासी सांगतात आम्ही माणसांची साखळी केली तर आमच्या पोटरीवर पातळ काठ्या सपकन मारत. नंतर चालता येत नसे. लढ्यानंतर आता शासनाने यांचे अस्तित्व मान्य केले आहे. या लोकांची परिस्थिती फार वाईट आहे. खात्यात मजुरी केली तरी यांना जंगलखाते कायम करत नाही. मोर्चे काढले तर खोटी आश्वासने मिळत. तसेच आन्दोलन चालू ठेवल्यावर २५० पैकी ८० मजुरांना कायम केले.

जंगली जनावरे विशेषतः वाघांचा फार त्रास आहे. वाघांना खायला लागणारी जनावरे इथे नाहीत. त्यामुळे ते भुकेपोटी माणसांवर हल्ले करतात. इथे कोणत्याही सोयी सुविधा नाहीत. एका आदिवासीला वरठाला वाघाने खाल्ले पण त्याची काही दाद लागत नव्हती म्हणून ज्यावेळी लायन सफारी पार्कच्या जोडीने आादिवासीचा कॅम्प उभा करून त्याचे सफारी सारखे प्रदर्शन होणार होते. जेव्हा पी. सी. ॲलेक्झांडर येणार होते, त्यावेळी सर्व लोक एकत्र येऊन पार्क बंद आंदोलन करून 'ॲलेक्झांडर वापस जाव' चा नारा दिला. पण आमच्यावर दडपण आणले. लोकांना जेलात टाकले. लोकांवर खटले भरले. सिंहासाठी लोकांच्या विहिरी वापरतात. त्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. या करता पाण्यासाठी मोर्चा काढला. मॅफको आणि वीज बोर्डाच्या कॉलनी या भागात

वनखाते उभ्या राहू देते पण आदिवासींना बाहेर हाकलायचे ठरवते. आम्हा कार्यकर्त्यांना नक्षलवादी वा कम्युनिस्ट ठरवून वनखात्याने त्रास दिलाय. आदिवासींच्या संघटना फोडायच्या कारवाया होतात. नगरसेवक भोसलेंना या आदिवासी लोकांना उद्यानाच्या बाहेर नेऊन त्यांचा विकास करायचा आहे. गणेश नाईक वनमंत्री असूनही या लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष देत नाहीत. बाहेरचे लोक इथल्या जमिनी गडप करत आहेत. ठाकूर बिल्डर इथे खूप जुलूम जबरदस्ती करतो. १९९३ पर्यंत फार अत्याचार होते.

या क्षेत्रात काम करणाऱ्या सी.सी.डी. संस्थेचे श्री. चंद्रशेखर देशमुख यांनी त्यांचे अनुभव मांडले. यांच्या संस्थेचे इथे बालवाड्या, आरोग्यसेवा असे काम चालते. इथे कोणतीही साधी सोय नाही. सात-आठ कि.मी. चालत जाऊन लोकांना बाहेर यावे लागते. ११ पाड्यात २५८ कुटुंबे राहतात. पण यांचे हक्क इथे मान्य केले जात नाहीत. त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्नच येत नाही असे शासन म्हणते. बिगर अदिवासींची इथे वस्ती वाढते आहे. राजकीय प्रतिनिधींना या आदिवासी लोकांच्या मताची पर्वा नाही कारण ते संख्येने फार कमी आहेत. लोकांच्या विकासाचा कोणताही कार्यक्रम काढला तरी त्याला वनखाते नकार देते कारण त्यांना या लोकांचा कोणताही आर्थिक कार्यक्रम करू द्यायचा नाहीये ज्यामुळे त्यांचा हक्क इथे प्रस्थापित होईल. जंगलाला उपयुक्त असा मधमाशा पाळण्याचा कार्यक्रम असला तरी हे नकारच देतात. इथे कल्पतरू बिल्डरचे मोठे प्रकल्प होऊ घातले आहेत. जिजामाता उद्यानात जास्त झालेली रानडुकरे आणि सर्प इथे आणून सोडले आहेत. त्यामुळे लोकांना खूप त्रास सहन करावा लागतो आहे.

**भीमाशंकर अभयारण्य** : (पश्चिम घाटाच्या भागात पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यात हे अभयारण्य १९८५ साली घोषित झाले. इथे महादेव कोळी हे आदिवासी लोक राहतात. अभयारण्यात आठ गावे आहेत. अभयारण्य घोषित करायच्या आधी किंवा नंतर लोकांना कधीच विश्वासात घेतले नव्हते वा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संवाद साधला नव्हता. लोकांचे आणि वनखात्याचे आपापसात कधी बोलणे होत नसे. लोकांशी दंडेली करणे, त्यांना चोर म्हणून वागवणे, शोषण करणे हीच वनखात्याची भूमिका होती. आज ती थोडी बदलली आहे. या आठ गावांना संघटित करून एकजूट संघटनेने लढा दिला. मोर्चे, निवेदने अशा मार्गाने लढा केला. त्यामुळे आता आठ गावे न उठवता प्रकल्प होतो आहे. इथे संघटनेने स्थानिक लोक, सरकारी अधिकारी, संघटना आणि तटस्थ गट यांच्यात संवाद सुरू केलाय आणि आखणी व्यवस्थापन, देखरेख आणि मूल्यांकन या प्रक्रियामधे या चारी गटांनी भाग घ्यावा अशी प्रक्रिया सुरू केली आहे:)

श्री. ढवळा गवारी व लक्ष्मण पारधी या पिंपरगणे या गावातील कार्यकर्त्यांनी माहिती दिली – १९८५ साली अभयारण्य जाहीर झाले. तेव्हापासून संघटनेने जागृती सुरू केली. आदिवाश्याला जंगलाचा शत्रू म्हणतात पण सरकारला आदिवाश्याचे आणि जंगलाचे नाते समजलेच नाही. आम्ही जंगल राखतो. नुकतेच गेल्या उन्हाळ्यात आमची एक बाई जंगलाला आग लागलेली बघून विझवायला इतर कोणी नव्हते तरी एकटी गेली आणि जळून मेली. जंगलातल्या गवताला आग लागली, जंगल पेटले तर गुरे कुठे चरतील याची काळजी तिला लागली म्हणून ती एकटीच धावली आणि भाजून मेली. अशी आम्ही काळजी घेतोय. आदिवासी भागातच धरणे, अभयारण्ये का केली जातात? आम्हाला विस्थापित केले जाते. आम्हाला जंगलाशिवाय जगता येणार नाही. जंगलाची आम्हाला आशा असते. ते राखणे आमचे कर्तव्य आम्हाला वाटते.

श्री. सुनील करकरे हे जागतिक वन्य निधीचे शिक्षण अधिकारी कोल्हापूरला काम करतात. त्यांनी मांडले – काही जंगलात मी हिंडलो आहे. लोकांशीही परिचय झाला आहे. राधानगरी अभयारण्याविषयी जेव्हा कोल्हापूर शहरात चर्चा झाली तेव्हा त्यात तेथील डंगे धनगरांचे प्रतिनिधी नव्हते. खाणीचा प्रश्न या भागाला लागला आहे. यात खोटी आश्वासने दिली जातायत. अपेक्षा उंचावतात पण प्रत्यक्षात काही होत नाही. वन्यजीवांना यामुळे धोका निर्माण झाला आहे.

ज्या भागात शहरी लोकांशी संपर्क झालाय तेथे जंगलात राहणाऱ्या लोकांचेही जंगलाशी नाते उरले नाहीये. अभयारण्यामुळे इथे अजून फारसे विस्थापन झाले नाहीये. राधानगरीत लोकांना बाहेर पडायचे आहे. चांडोलीमधूनही लोक बाहेर पडायला मागत आहेत. सागरेश्वरला रानडुकरांचा त्रास सुरू झालाय. वन अधिकारी लोकांना नीट वागवतही नाहीत. स्थानिक लोकांना माहिती द्यायला हवी आहे. वनखात्याने ती दिली पाहिजे. कुठल्याही प्रश्नाचे उत्तर वनखाते नीट देत नाही. सर्व घटनात पारदर्शीपणा यायला हवा.

श्री. शंकर धोंडी पाटील हे राधानगरीचे माजी आमदार. त्यांनी या अभयारण्याच्या प्रश्नात पहिल्यापासून लक्ष घालून लढा उभा केला आहे. त्यांनी मांडले : धरणे, अभयारण्ये या सारख्या प्रकल्पांमुळे लोक विस्थापित होतात. कायदे कागदावरतीच राहिले आहेत. भांडायला पुढे येणाऱ्या माणसाला फोडून बाहेर काढून इतरांना वाऱ्यावर सोडणे हे शासनाचे धोरण आहे. सगळीकडे भ्रष्टाचार आणि खोटेपणा आहे. गगनबावड्याला आदिवासी आश्रमशाळेत मुले फक्त १२ आणि बराच स्टाफ. ती बंद करावी लागली. डंगे धनगर आदिवासी असायला हवेत पण इतर चांगल्या स्थितीतील धनगर त्यात येऊन फायदा घेतात. पाडगावला होणाऱ्या धरणाचे काम तेथील महिलांनी थांबवून धरले आहे.

अध्यक्ष श्री. लाडखेडकर यांनी मांडले की अभयारण्याची निर्मिती करण्याअगोदर जी पारदर्शकता दाखवायला हवी होती ती कधीच नव्हती. इतःपर केवळ वनखात्यावर या बाबतीत विसंबून राहता येणार नाही. शिकार बाहेरचे करतात. त्याचा आरोप स्थानिकांवर येतो. पण स्थानिकातले काही त्यात न कळत सामीलही होतात. हे थांबले पाहिजे.

२६.१०.१९९६ शनिवारी दुसऱ्या दिवशीच्या दुपारच्या सत्राला कोल्हापूरचे उपवनसंरक्षक श्री. सुनील लिमये हे उपस्थित होते. त्यांनी वन्यजीव संरक्षण कायद्याचे थोडे विवरण केले –

जंगलात राखीव जंगल आणि संरक्षित जंगल (reserved forest, protected forest) असे भाग असतात. राखीव जंगलाचे कायदे अधिक कडक असतात. राष्ट्रीय उद्यान घोषणेबरोबरच निर्माण होते. पण अभयारण्यांचा प्रथम घोषित करण्याचा मानस जाहीर होतो. नंतर तेथे राहणाऱ्या लोकांच्या हक्कांची चौकशी करण्याचे अधिकार कलेक्टरकडे असतात. वन्यजीव संरक्षण सर्वच भागाला लागू असते. वन्यजीवांची शिकार करायला सगळीकडे प्रतिबंध आहे. संरक्षित क्षेत्रात (राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य) अपराध झाल्यास त्याला जास्त कठोर शिक्षा आहे.

संरक्षित विभागाचे नोटिफिकेशन वनविभाग काढतो. या क्षेत्रात राहणाऱ्या रहिवाश्यांच्या हक्कांविषयीची चौकशी आणि निर्णय घेण्याची जबाबदारी महसूल खात्याकडे असते आणि या कामाला खूप वेळ लागतो. बोरीवली आणि ताडोबा या विभागांची ही प्रक्रिया पूर्ण होऊन कलेक्टरचा अहवाल तयार झालेला आहे. मालवणच्या बाबतीतला अहवाल दिल्लीला आरमार कार्यालयात त्यांच्या तपासणीसाठी गेलेला आहे. त्यांचा क्लीअरन्स मिळावा लागेल.

संरक्षित क्षेत्रात आता मासेमारी करता येणार नाही. १९९१ ची कायद्यातली दुरुस्ती व्हायच्या अगोदर अशी अडचण नव्हती. पण या दुरुस्तीने मासे हे वन्यजीवात गणले गेल्यामुळे त्यांच्या शिकारीला परवानगी देता येणार नाही. इथे फक्त गळाने मासे पकडता येतील. याच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाले आहेत. याला काही तर्कावर आधारलेले कारण (rationale) आहे का असा प्रश्न विचारला जातोय. वन्यजीव संरक्षणाकरिता हे करायला हवे आहे का असे प्रश्न उभे होत आहेत. एका बाजूला काही मच्छिमारांना मदत केली जाते आहे आणि दुसरीकडे बंदी आणली जाते आहे.

कार्यकर्त्यांनी प्रश्न केला की शासनाला त्यांच्या शासकीय संस्थांवर जास्त विश्वास आहे तर वनखात्याचे उत्तर होते तुमचा जास्त विश्वास स्थानिक लोकांवरती आहे. हा दोघातला फरकाचा मुद्दा आहे. मग चर्चा झाली की कायद्यात काय लिहिले आहे ते बघायला पाहिजे. एकूण प्रक्रियेत गूढता, गुप्तपणा

फार आहे. कलेक्टर किंवा वनखात्याचे अहवाल आम्हाला बघायला मिळू शकतात का? लोकांना सर्व माहिती मिळू शकते का? मालवणच्या लोकांचा अनुभव आहे की त्यांनी राष्ट्रीय सागरी संशोधन संस्थेचे मुळातले कागद कितीतरी वेळा मागितले पण त्यावर नेहमी उडवा उडवीची उत्तरे मिळाली. कागद अजूनही मिळाले नाहीयेत. या प्रकारे चर्चा झाली.

यावर लिमये – कायद्यात अशी तरतूद नाही. पण तुम्ही प्रत मागू शकता. शासनाची यावर निश्चित तरतूद नाही. आज यावर अपील करण्याची सोय नाही. पण तरीही तुम्ही तसे अपील करू शकता.

विठ्ठल लाड यांच्या प्रश्नावर – उद्यानात राहणाऱ्या गावांचे हक्क अबाधित राहतात का? यावर लिमयांनी सांगितले की ते अबाधित राहतात. मालवण समुद्रातले प्रवाळ आणि अल्गी वाचली पाहिजे आणि लोकांचे जगण्याचे हक्कही अबाधित राहिले पाहिजेत हे बघायला हवे आहे.

लिमयांना विचारलेला प्रश्न, तुमच्या भागात प्रश्न काय आहेत आणि त्याचे उपाय तुम्हाला काय वाटतात? यावर श्री. लिमये म्हणाले, आमच्या भागात अडचणी आहेत. स्थानिक लोकांशी अगोदर संवाद करायला हवा होता पण तो होऊ शकला नाहीये. लोकांच्या सहभागाशिवाय जंगल संरक्षण होऊ शकणार नाहीये. पण एखादा भाग पूर्ण निर्मनुष्य केल्यास तेथे निसर्ग संवर्धन चांगले होते.

या चर्चेत शेवटी श्रीमती कुसुम कर्णिक यांनी मांडले की, शासनाने प्रत्येक भागात संवाद प्रक्रिया सुरू करावी आणि ही आमच्या परिषदेची मागणी वनअधिकाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठांना कळवावी.

या नंतर संध्याकाळी मालवण मच्छिमार संघाच्या लोकांनी मांडले की सर्वांनी वन अधिकारी श्री. लिमये आणि श्री. पुराणिक यांच्या समवेत प्रत्यक्ष समुद्र किनाऱ्यावर एकत्र उभे राहून चर्चा करावी म्हणून सर्वजण सिंधुदुर्ग किल्ल्याच्या परिसरातल्या किनाऱ्यावर जाऊन प्रत्यक्ष चर्चा झाली. यात मालवण सागरी अभयारण्यासंबंधी मुद्दे निघाले. किनाऱ्यावर आणि जवळपासच्या भागातले अनेक मच्छिमार या चर्चेत सामील झाले. या किनाऱ्यावर जे स्थानिक ट्रॉलर आहेत, ते ये-जा करत असतात आणि अशा वेळेला त्यातले थेंबभर तेलही सांडले नाही पाहिजे या प्रकारचा कायदा पाळणे शक्य नाहीये. त्यावर कायदा शब्दाने नाही तर त्याच्या मतितार्थाने बघितला जाईल असे श्री. लिमयेंनी सांगितले. किनाऱ्यावर जर ५० मी. वा ५०० मी.चा किनारपट्टी कायदा (Coastal Zone Regulation Act) लावला तर कोळ्यांचे फार नुकसान होणार आहे. तसेच मालवण अभयारण्य क्षेत्रात किनाऱ्यावरचा भाग दाखवण्यात आला आहे. तो भाग खाली करायचा प्रयत्न झाल्यास फार मोठा लोकक्षोभ होईल. तसेच कोळ्यांना जागेवरून विस्थापित केले नाही पण मच्छिमारी बंद

केली तर ते जागच्या जागी विस्थापित होतील. इथे पर्यटकांसाठी आम्हाला उठवले जाणार आहे. यावर लिमये यांनी स्पष्ट केले की कोणालाही विस्थपित करून अभयारण्य केले जाणार नाही. जमलेले लोक आपले मुद्दे व्यवस्थितपणे मांडून त्यावर चर्चा करत होते. अशा प्रकारची चर्चा या अभयारण्याबाबत कधीच झालेली नाही आणि ती सुरू झाल्याबद्दल लोकांना समाधान वाटत होते.

**दि. २७ ऑक्टोबर ९६, रविवार**

हा अखेरचा दिवस मालवण अभयारण्याच्या चर्चा सत्राने सुरू झाला. यात स्थानिक मच्छिमार संघाचे प्रतिनिधी, सहायक मत्स्य व्यवसाय संचालक श्री. म. स. भांडारे, बी. एन्. एच्. एस्., मुंबई या संस्थेचे मॅनग्रोव जंगलाचे अभ्यासक डॉ. संजय देशमुख तसेच राष्ट्रीय सागर संशोधन संस्थेचे (NIO) डॉ. अरविंद उंटवाले आणि डॉ. अरुण परुळेकर (ज्यांनी हे अभयारण्य सूचित केले आहे) आणि पत्रकार हे परिषदेच्या इतर उपस्थितात सामील होते.

मालवणचे श्री. अरविंद हुले (कृती समिती अध्यक्ष) यांनी प्रथम परिस्थितीविषयी मांडणी केली.

शासनाने शास्त्रज्ञांना सांगितले होते की, मरीन पार्कसाठी जागा ठरवा त्याप्रमाणे त्यांनी मालवण येथे ते सूचित केले. मरीन पार्क घोषित होऊन दहा वर्षे झाली आहेत पण या बाबतीत लोकांना काहीही स्पष्टता नाहीये. डॉ. उंटवाले नगरपरिषद कार्यालयात येऊन चर्चा करणार होते. त्यांना आम्ही सांगितले होते की लोकांच्यात प्रत्यक्ष अभयारण्याच्या जागेवर येऊन चर्चा करा. चर्चा कार्यालयात बसून होऊ शकणार नाही. आम्ही नकाशे मिळवले. आम्हाला झोन्स दाखवण्यात आले. यात जमिनीवरचा भागही आरक्षित केला आहे. ५० मी. पर्यंतचा किनाऱ्यावरचा भाग संरक्षित क्षेत्रात घेतला आहे. याचे कारण विचारल्यास उत्तर मिळत नाही. कागदपत्रात हा भाग विरळ वस्तीचा दाखवला आहे. प्रत्यक्षात मात्र इथे दाट लोकवस्ती आहे.

सुरुवातीला लोकप्रतिनिधी, मंत्रीही अज्ञानी होते. शासनाने आम्हाला विश्वासात घेतले नाही. व्यापारी वर्गाने या प्रकल्पाचे स्वागत केले. लोकांना नोटीसा मिळायला लागल्या आहेत. समुद्रात सीमा कशा घालणार? लोकांना वाटले भिंती उभारणार पण नंतर सांगितले गेले की समुद्रात तरंगणारे बोये टाकतील. ट्रॉलरनी तेलमिश्रीत पाणी बाहेर टाकू नये. पण हे कठीण आहे. त्यापेक्षा आम्हाला पर्यायी बंदर द्या. त्या करता सर्जेकोट आणि आनंदवाडी बंदर प्रकल्प शक्य असल्याचे सांगितले आहे. प्रकल्प घोषित झाला तेव्हा मालवण बंदरात बोटी कमी होत्या आज बोटी बऱ्याच वाढल्या आहेत. जमिनीवरच्या

नोटीसा रद्द करा अशी आमची मागणी आहे. आम्हाला काळजी वाटते की आज इथे जेवढे क्षेत्र या प्रकल्पासाठी आखले आहे. त्यात मोठी वाढ होऊ शकेल. ऑस्ट्रेलियात ग्रेट बॅरियर रीफ या सागरी अभयारण्यात अशा प्रकारे बरीच वाढ झाली आहे. गाभ्याच्या भागाचे प्रदूषण टाळण्याकरता शासन प्रकल्पाचा भाग वाढवत असते.

प्रकल्पाविषयी चर्चा करण्यासाठी शासनाबरोबर बैठक झाली पण त्याचे इतिवृत्त ठेवले गेले नाहीये. श्री. भाईसाहेब पै नगराध्यक्ष असताना १३.२.१९८८ ला चर्चा होऊन काही एकमताचे मुद्दे नमूद केले गेले होते. सागरी अभयारण्य क्षेत्रात खोदकाम व यांत्रिक मच्छिमारी होऊ नये. यांत्रिक बोटी (ट्रॉलर्स) ये-जा करू शकतील पण त्यांच्यामुळे प्रदूषण होता कामा नये. पारंपरिक रापण, गीलनेटला परवानगी असावी. संरक्षक भिंत असू नये. अभयारण्य क्षेत्राचा विस्तार करू नये. चिवलावेळ इथे धक्का बांधावा. नंतर ही धक्का योजना रद्द झाली आणि सर्जेकोट ही जागा ठरली. स्थानिक लोकांचे स्थलांतर करू नये. बारीक साइजची जाळी (पर्सिन नेटस्) वापरू नयेत.

असेही ठरले होते की नागरी समिती स्थापन करावी पण ती झाली नाही. ७ जानेवारी १९९२ ला लोक जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चाने गेले पण जिल्हाधिकारी भेटले नाहीत. या परिषदेला ते येतील असे आश्वासन मिळाले होते, पण ते आले नाहीत.

या भागाला वन्यजीव कायदा लावून इथे मासमारी बंद न करता इथे मत्स्यसंवर्धन कायदा करावा. सागरी संशोधन संस्थेने हा प्रकल्प सुचवला आहे. तो राबवण्याचे काम वनखाते करणार आहे. जमिनीवर सीमांकन व्हायचे आहे. तो प्रश्न महत्त्वाचा आहे. भरतीच्या रेषेपासून ५० मी. की ५०० मी. हे स्पष्ट नाहीये. प्रांत अधिकारी (उपजिल्हाधिकारी ज्यांच्यावर या प्रकल्पाच्या हक्कांच्या चौकशीचे काम आहे) श्री. अहीर यांनी लोकांना नोटीसा दिल्या आहेत. ७ जानेवारी १९९२ ला मोर्चाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले की दांड्याला एक सभा घ्या आणि जे लोक या प्रकल्पामुळे भयग्रस्त झालेले आहेत त्यांना सर्व गोष्टी स्पष्ट सांगून दिलासा द्या. लोकांचा फायदा या प्रकल्पाने होणार असल्याचे जे मांडले जाते आहे ते लोकांना समजावून द्या.

शासनाने पर्यटन महोत्सव भरविला त्यावेळी चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा होती, परंतु त्या वेळच्या जिल्हाधिकारी श्रीमती संजीवनी कुट्टी यांनी भूमिका घेतली की आजवर बरीच चर्चा झालेली आहे. तेव्हा 'no more discussion'. श्री. उंटवाले म्हणाले होते की आणखी चर्चा करू. पण लोक फार अस्वस्थ झाले होते. परिस्थिती स्फोटक होती आणि २६ जानेवारीसारख्या दिवशी काही अनुचित घडू नये या करता आम्ही सभेतून निघून गेलो. आजही

राजकीय पुढारी सांगत आहेत की कोणाचे विस्थापन होणार नाही.

सर्जेकोट येथे सुसज्ज बंदर बांधावे असे ठरले होते परंतु हे बंदर गैरसोयीचे आहे. अभयारण्याची सीमा किनाऱ्यावरच्या वस्तीच्या ठिकाणी आखू नये अशी आमची मागणी आहे. नाहीतर परिस्थिती फार स्फोटक होईल असा इशारा जनता देते आहे.

वन अधिकारी श्री. पुराणिक यांनी सांगितले की शासन प्रथम इराद्याची सूचना (notice of intention) जाहीर करते. नंतर कलेक्टर हे वनबंदोबस्त अधिकारी म्हणून या भागातील लोकांच्या हक्कांची चौकशी करतात. मग नोटीसा पाठवल्या जातात आणि हरकती मागवतात. महसूल विभागाने या प्रकल्पातील महत्त्वाचे अंतिम निर्णय घ्यायचे असतात. मालवण अभयारण्यात मच्छिमारी व्हावी की नाही, किल्ला, किनारा हे क्षेत्र वगळावे की नाही हे त्यांनी ठरवायचे असते. वन अधिकारी वा वन खाते हे निर्णय घेत नसते.

लोकांनी मांडले की मच्छिमारीचा आमचा धंदा बंद पडला तर जागी राहूनही लोक विस्थापित होतील. त्यावर पुराणिकांनी मांडले की, अभयारण्यात हे सारे, मच्छिमारी इ. चालू राहिले तर ते योग्य होईल का हे शास्त्रज्ञांनी सांगावे. आम्ही जे काही घडते त्याचे परिणाम नोंदवू आणि कळवत राहू. परिणाम लक्षात घेऊन कायद्यात बदल घडवून आणावे लागतील. यावर मच्छिमार संघाचे कार्यकर्ते श्री. रमेश धुरी यांनी मांडले की शास्त्रज्ञांनी या प्रश्नात लक्ष घालायला हवे. कृष्णनाथ तांडेल यांनी विचारले की ऑस्ट्रेलियात प्रकल्पाचे क्षेत्र जसे वाढवले गेले तसे इथे कशावरून होणार नाही? इथल्या किनारपट्टीवर देवगड नंतर सुरक्षित बंदर म्हणून फक्त मालवणच आहे. बंदर म्हणजे आम्हा मच्छिमारांच्या जीवनात फार महत्त्वाचे आश्रयस्थान असते. जीवित हानी आणि वित्तहानी होऊ नये म्हणून हे आमचे आशास्थान असते. वादळवारा सोसत समुद्रावर संचार करणाऱ्या कोळ्यांना याचे फार महत्त्व असते. आज इथला मच्छीचा व्यापार ५० कोटी रुपये प्रती वर्ष आहे. इथे आता २८० यांत्रिक बोटी म्हणजे ट्रॉलर्स असणार आहेत. आज १७२ आहेत आणि २५० नौका आहेत. आऊट बोर्ड इंजिनाच्या खूप बोटी आहेत. नौकेतून बाहेर पडणारे पाणी डिझेलमिश्रीत म्हणजे प्रदूषित असतेच. इथे जर त्या विषयी कडक कायदे झाले तर यांत्रिक नौका बंद पडतील. इथे अभयारण्य करताना सारे ठरवावे लागेल की इथे किती आणि कोणत्या प्रकारच्या नौका वावरतील. त्याविषयी संशोधन करून नियम ठरवावे लागतील. आज १० हजार लोक मालवण बंदरावर होणाऱ्या पारंपरिक रापण मासेमारीवर जगत आहेत. या सर्वांनी राष्ट्रीय उत्पन्नात भर घातली आहे. इथे मासेमारीतून निर्माण होणारा पैसा आणि त्यावर अवलंबून असलेला समाज हा पर्यटन उद्योगापेक्षा जास्त आहे. अभयारण्य झाल्यास लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न

तसेच यांत्रिक नौकांचेही पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण होतील. एन्. आय. ओ च्या माध्यमातून इथल्या जैविक विविधतेबाबत संशोधन झाले आहे. त्याला आव्हान न देता आम्ही अपेक्षा व्यक्त करतो की त्यांनी या एवढ्या मोठ्या विस्थापनाच्या प्रश्नाची उकल करावी.

राष्ट्रीय सागर संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद उंटवाले आणि डॉ. अरुण परुळेकर या परिषदेला उपस्थित राहिले आणि त्यांनी लोकांच्या अडीअडचणी, समस्या आणि भावना समजून घेतल्या ही या परिषदेची फार महत्त्वाची उपलब्धी आहे. डॉ. उंटवालेंनी प्रथमच हे स्पष्ट केले मी संशोधक म्हणून काम करतो. या अभयारण्यासंबंधीच्या सरकारी यंत्रणेचा मी भाग नाही. या सागरी अभयारण्याची वाढ होईल की नाही हे मी सांगू शकत नाही. शास्त्रज्ञ म्हणून भारताच्या पश्चिम किनारपट्टीचा आम्ही अभ्यास केला. त्यात मालवणचा किनारा हा विविधतेने समृद्ध आहे. शास्त्रज्ञांच्या दृष्टीने सागरातील अनेक वेगवेगळे जीव आणि वनस्पती हे महत्त्वाचे असतात. हे सर्व जीव आम्हाला महत्त्वाचे वाटतात. मासेमारी करणाऱ्यांना काही ठराविक जाती महत्त्वाच्या असतील. डॉ. कासिम हे फार मोठे सागर तज्ज्ञ. यांना आम्ही सांगितले की हा किनारा जैविक विविधतेने भरलेला आहे आणि तो सुरक्षित राहिला पाहिजे. किल्ल्याच्या भोवतालचा भाग गाभ्यामधे धरलाय. तेथे जैविक विविधता खूप आहे. परिसर स्वच्छ आहे. या गाभ्याच्या संरक्षणासाठी भोवती बफर झोन आखलाय. त्यांच्या पलीकडे वापरायचा, वावरायचा (manipulation) झोन असतो. १९७८ ला इथे पाणबुडे आणून संशोधन केले आहे. इथे प्रवाळ, मोत्याचे शिंपलेही आढळले आहेत. या गोष्टी आम्ही जाहीररित्या बोलत नाही कारण लोक ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी समजतील आणि हा भाग नष्ट होईल. हा असा भाग दुसरीकडे हलवता येत नसतो. या अशा भागाचा वापर कसा करायचा हे आपण ठरवायचे आहे. आम्ही सागराच्या भागाचा अनेक प्रकारे अभ्यास करत असतो. सिंधुदुर्ग किल्ल्याचे बेट, याच्या भोवती आणखी बारीक बेटे आणि खडक आहेत. हे खडक वेंगुर्ला रॉक पर्यंत पसरलेले आहेत. ग्रेट बॅरियर रीफ सारखीच ही जागा आहे. वावर-वापराचा भाग म्हणून वेंगुर्ल्यापर्यंतचा भाग उत्तम आहे. समुद्रात भिंत बांधता येत नसते म्हणून त्याचे संरक्षण करण्याच्या वेगळ्या रीती उभ्या कराव्या लागतात.

भरतीच्या रेषेपासून ५०० मीटर पर्यंतचा सर्व भाग संरक्षित करावा हे जरुरीचे आहे. नवीन उद्योगधंदे, घरे यापासून या भागाला मुक्त ठेवावे. या विषयी इंदिरा गांधींनी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले होते. या पत्राला अनुसरून आम्ही कच्चा आराखडा तयार केला. यात लोकांचे विस्थापन व्हावे असा हेतू नव्हता. ५०० मीटर एवढा परिसर शक्य नव्हता म्हणून ५० मीटर एवढा भाग

धरला. किनारा संरक्षण प्रदेश कायदा (Coastal Zone Regulation Act) आमच्या मनात नव्हता. या भागात मासेमारीचा व्यवसाय खूप जोरात आहे. बोटींची संख्या वाढते आहे. या सागर संपत्तीला कशापासून धोका पोचेल याचा विचार व्हायला हवा आणि मग तो निवारण्याकरिता काय करायचे हे ठरवायला हवे. बोटींना पर्यायी व्यवस्था म्हणून वेगळे बंदर द्यायला हवे. योग्य सोयी-सुविधा दिल्यास लोक हा प्रकल्प स्वीकारतील. मी स्थानिक माणसाचा विचार करणाऱ्यापैकी आहे. इथे पर्यटन सुरू झाले तर कुटीर उद्योग, हॉटेल यातून स्थानिक लोकांना धंदा मिळेल. कौशल्याचा वापर करून लोक इथेच जगू शकतील. विस्थापन होणार नाही. आम्हा संशोधकांच्या नजरेत विदेशी पर्यटक आणि परदेशी चलन कमावण्याचा विचार नव्हता. जैविक संपत्तीचे रक्षण करावे आणि स्थानिकांचा फायदा बघावा हा विचार होता. गाभ्याच्या भागात यांत्रिक बोटींची मच्छिमारी आजही होत नाही. गळाच्या मासेमारीला हरकत नाहीये. इथे गाभ्याच्या भागात खडक असल्याने रापणही होऊ शकत नाही.

शेवटच्या विधानावर स्थानिक लोकांनी आक्षेप घेतला कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या भागात पूर्वीपासून आणि आजही रापण पद्धतीने मासेमारी चालूच असते.

भाग वाढवला जाईल का असा प्रश्न मच्छीमार श्री. तारी यांनी विचारला. त्यावर डॉ. उंटवाले यांनी सांगितले की या विषयावर ते काहीच सांगू शकत नाहीत.

श्री. अमित बर्वेंनी प्रश्न उपस्थित केला की १९७८ ला अभयारण्य सूचित झाले. त्यानंतर इथे लोक जे काही करत आहेत त्यामुळे या भागावर काही विपरीत परिणाम झाल्याचे जाणवले आहे का? तसेच विकास सहयोग प्रतिष्ठानचे श्री. हर्षल यांनी विचारले, संशोधनात स्थानिक लोकांचा सहभाग होता का? बी. एन्. एच्. एस्. चे संशोधक डॉ. संजीव देशमुख यांनी मांडले की आजही सर्व गोष्टी चालू असताना जैविक विविधता टिकून असेल तर कायद्याने संरक्षण देण्याची गरज आहे का? यावर विचार व्हावा. शेवटी श्री. लाडखेडकर यांनी मांडले की इथे जैविक विविधता आहे. तिचे काय करायचे हे स्थानिक माणसाने ठरवायला हवे.

डॉ. उंटवालेंनी मांडले की हे संचित फक्त मालवणच्या लोकांचे नाहीये तर सर्वांचे आहे. उद्याच्या पिढ्यांचेही आहे. लाडखेडकर – अंतिम जबाबदारी स्थानिक लोकांनीच घ्यायची आहे. याला अभयारण्य बनवायचे असेल तर कारभाराची जबाबदारी वनविभागावर टाकलेली आहे. महसूल विभागाने लोकांच्या हक्कांच्या चौकशीची प्रक्रिया चालवायची आहे. तेव्हा त्यांच्याशीही आपल्याला संपर्क साधायला हवा. सनदशीर मार्गाने आपल्याला जावे लागेल.

वनविभागाला कायद्याच्या चौकटीच्या मर्यादा आहेत. कलेक्टरना पटवावे लागेल की इथे स्थानिक लोकांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. उद्या या प्रश्नावर लढा द्यायचा असला तर आपल्याला त्याचे धोरण आणि मुद्दे ठरवावे लागतील.

संजीव देशमुख – पुण्याला विजय परांजपे यांच्या इकोनेट संस्थेतर्फे जैविक विविधतेवर परिषद झाली. त्यात पश्चिम बंगालचे एक कार्यकर्ते आले होते. त्यांचा भाग बाहेरच्या हस्तक्षेपापासून आजही मुक्त आहे. त्यांनी मांडले की जे आमचे आहे ते आम्ही आबाधित राखू. त्यात आम्हाला बाहेरचा हस्तक्षेप नको. आम्हाला पाहिजे तर आम्ही सरकारची वा संशोधकांची मदत घेऊ शकतो.

डॉ. परुळेकर हे एन्. आय्. ओ चे मान्यवर संशोधक आणि अंटार्टिका मोहिमेतील एक संशोधक. यांनी मांडले की हे अभयारण्य ही एक संकल्पना आहे. संशोधनात आम्हाला हे सर्वाधिक जैविक विविधता स्थान वाटले. यात महाराष्ट्र राज्यातील शास्त्र आणि तंत्रज्ञान विभागाने विशेष रस घेतला. मुळात सूचित केलेल्या भागापेक्षा अभयारण्य क्षेत्र वाढवलेले दिसते. किनाऱ्याचा भाग जो आम्ही सूचित केला होता त्यापेक्षा जास्त भाग नकाशात दाखवला गेला आहे. हा बदल केव्हा आणि कसा झाला हे बघायला हवे. नकाशा बदलला गेला आहे हे खरे. भरतीची पाणी रेषा ही सीमा आम्ही धरली होती. मालवण किनाऱ्यावरील प्राणी Marine fauna of Malwan Coast याचा अभ्यास आम्ही केला. या जैविक संपत्तीचा उपयोग करून उत्पादने काढणे यावर आमचा प्रयत्न असतो. इथे आज जी परिस्थिती आहे ती बघता इथे झालेल्या संशोधनात परिस्थितीवर वापराचा झालेला परिणाम होकारार्थी म्हणजे चांगला आहे. १९६६ ला या विषयावर मी प्रबंध लिहिला. पिरोटन हे गुजरात मधले सागरी अभयारण्य आम्हीच सूचित केले. ते भारतातले पहिले सागरी अभयारण्य आहे. वन विभागाला सागरी पर्यावरणाविषयी प्रशिक्षण कसे आणि कोठे देता येईल हे आम्ही सुचवले आहे. असेच इतर भाग – विशाखापटनम, मद्रास, पोरबंदर, गोवा हेही आम्ही सुचवले आहेत.

मालवण सागरी अभयारण्यावरील चर्चेला मालवणमधील स्थानिक मच्छिमारांपैकी बरेच लोक उपस्थित होते. त्यांनी चर्चेत फार गंभीरपणे भाग घेतला. वन विभाग आणि संशोधक यांच्याशी चर्चेला प्राधान्य दिले गेले. त्यामुळे मालवण अभयारण्याचे इतर पैलू चर्चेत येऊ शकले नाहीत. स्थानिक मच्छिमारांची मागणी आहे की इथे अभयारण्य न करता 'सागरी उद्योग केंद्र' उभारा. त्यांनी हे मान्य केले आहे की गाभा क्षेत्र ३.१८२ चौ. कि.मी. यात यंत्रनौकांनी मासेमारी कोणी करणार नाही. ती आजही होत नाही. परंतु किनाऱ्यावरील ५०० मी. चा जो भाग संरक्षित क्षेत्र दाखवले आहे, त्यात दाट लोकवस्ती आहे ते त्यांना अजिबात मान्य नाहीये.

शासकीय योजनेत पर्यटनावर असलेला भर त्यांना मान्य नाहीये. मत्स्य संशोधन करावे असा त्यांचा आग्रह आहे. परंतु पर्यटन हा योजनेचा केंद्रबिंदू मुळीच असू नये. लक्ष्मीपुत्रांना फक्त परवडेल अशा सोयी – काचेचा तळ असलेल्या बोटीतून सागरी तळाची सफर वा मोठी तारांकित हॉटेल्स – यांना स्थानिक जनतेचा विरोध तीव्र आहे. या प्रकल्पाने होऊ शकणाऱ्या विस्थापनामुळे लोक भयभीत आणि अस्वस्थ तसेच प्रक्षुब्ध आहेत. मरीन पार्क ऐवजी मरीन इस्टेट उभारा ज्यामुळे लोकांचा फायदा होईल अशी लोकांची मागणी आहे. लोकांना पूर्णपणे अंधारात ठेवून हालचाली केल्या जातात. त्यामुळे लोक चिडून आहेत. कमी होत चाललेल्या जीवांच्या विषयी संशोधन करून कारणे शोधून प्रभावी उपाय योजना करावी अशी होकारार्थी मागणीही लोक करत आहेत.

**शेवटचे समारोपाचे सत्र**

या सत्राचे अध्यक्षपद ॲड. हरणे यांनी सांभाळले. एकजूट संघटनेचे (भीमाशंकर अभयारण्य) श्री. आनन्द कपूर यांनी सुरुवातीला परिषदेचा आढावा घेतला.

जमलेल्या अनेक संस्था, संघटना, व्यक्ती यांचे मिळून एक व्यासपीठ बनले आहे. यात आणखी वाढ व्हावी याकरिता प्रयत्न करायला हवेत. शासकीय यंत्रणेशी संपर्क, संवाद साधण्याकरिता एखादी कायम संस्था असावी. ही औपचारिक वा अनौपचारिक असू शकेल. या बाबतीत थोडा अधिक विचार करावा लागेल. या परिषदेत एक वैशिष्ट्यपूर्ण गट जमला आहे. लोकांचे लढे या प्रश्नावर काही ठिकाणी उभे राहत आहेत. हक्कांसाठी संघर्ष करून ते मिळवावे लागत आहेत. काही ठिकाणचे लढे पुढे गेले आहेत आणि त्या ठिकाणी समस्या काही प्रमाणात सुटत आहेत. काही ठिकाणी मात्र समस्या असूनही लढे उभे नाहीयेत. जंगलाचे व्यवस्थापन फक्त वनखात्याने करून भागणार नाही. त्यात स्थानिक लोकांचा वाटा आणि पुढाकार असायला हवा. लढे उभे करून, यशस्वी करून तिथे लोकसहभागाचे ढाचे उभे करावे लागतील. काही ठिकाणी स्थानिक लोक यापुढे जाऊन 'आपले अभयारण्य' उभे करत आहेत. हे धन आमचे आहे, ते आम्ही राखणार या भूमिकेतून लोक पुढे येत आहेत. 'लोक अभयारण्य' उभी राहत आहेत. आमच्या भागात काय करायचे ते आमचे आम्हीच ठरवू. आनन्द कपूर यांनी सांगितले की राजस्थानातील सरिस्काच्या क्षेत्रात काही गावांनी एकत्र येऊन १२ चौ.कि.मी.चे क्षेत्र संरक्षण देऊन पुनरुज्जीवित केले आहे. तेथे चांगले जंगल उभे राहिले आहे आणि काही हरणे आणि दोन बिबटे तेथे दाखल झाले आहेत. याला ते लोक सोनचिडी म्हणतात. सँक्चुरी शब्द त्यांना पसंत नाही.

मालवणच्या लोकांनी स्वतःच्या नैसर्गिक संपत्तीचे नोंदीकरण सुरू करावे. पारंपरिक पद्धती तपासून त्यांचे मूल्यमापन आणि नोंद करायला हवी. त्यातून संरक्षण नीती उभी राहील. प्रत्येक भागातील लोकांनी आपापल्या भागाचा अभ्यास आणि संरक्षणाच्या योजना बनवाव्यात. त्या करता वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणही घ्यायला हवे. स्थानिक वा indigenous ज्ञानाची नुसती नोंद नाही तर त्याचा वापरही करायला हवा. पर्यटन हे कोणत्याही प्रकल्पाचे केंद्र-सूत्र नसावे.

परिषदेने संबंधित प्रश्नावर काही ठराव पारीत केले त्याची यादी स्वतंत्रपणे दिली आहे.

पुढील परिषद विदर्भात व्हावी असे तेथील सहभागींनी मांडले आणि ते सर्वांनी मान्य केले.

# तिसरी अभयारण्य परिषद - मालवण

## दि. २५ ते २७ ऑक्टोबर, १९९६

**बॅ. नाथ पै सेवांगण, धुरी वाडा, मालवण,**
**जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६६०६**

## ठराव

१. पेंच राष्ट्रीय उद्यानातील तोतलाडोह जलाशयाच्या महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रात जलाशय निर्माण झाल्यापासून करण्यात येणाऱ्या मासेमारीवर, वन्यजीव संरक्षण कायद्यातील १९९१ च्या दुरुस्तीच्या आधारे बंदी घालण्यात आलेली आहे. लोकांचा जगण्याचा मूलभूत अधिकार लक्षात घेऊन ही बंदी त्वरित उठवण्यात यावी व लोकांना पुन्हा मासेमारीची परवानगी देण्यात यावी.

२. मालवण येथील प्रस्तावित सागरी उद्यान प्रकल्पामुळे कोणाही स्थानिक मच्छिमाराचे व अन्य रहिवाशांचे विस्थापन होऊ नये. तसेच सागरी उद्यानाचे गाभा क्षेत्र व संरक्षित क्षेत्र यात पारंपरिक मत्सव्यवसाय चालू राहण्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नसावा आणि मालवण बंदरातून यंत्रचलित नौकांचे उच्चाटन केले जाऊ नये व सदर उद्यानाला 'वाईल्ड लाइफ प्रोटेक्शन ॲक्ट' लागू न करता जैविक सागर संपत्तीचे जतन करावे.

३. संरक्षित क्षेत्र प्रकल्प जाहीर करण्याची प्रक्रिया ही पारदर्शी व लोकाभिमुख होण्याकरता संबंधित अभयारण्य संदर्भातली माहिती/कागदपत्रे ही प्रकल्पग्रस्त सुचवतील त्या प्रतिनिधी संस्थेला/व्यक्तीला देण्याची सोय करण्यात यावी.

४. अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने जाहीर करण्यामुळे त्या परिसरातील जनतेच्या हक्कांसंबंधी निर्माण होणारे प्रश्न सोडवण्याकरिता संबंधित लोक जेव्हा निषेध/आंदोलनाचा मार्ग अवलंबतात तेव्हा दमनशक्तीचा वापर करून

शासनाकडून दडपणूक केली जाते. पेंच अभयारण्यातील मच्छिमार करत असलेले शांततामय आंदोलन दडपण्याचा प्रयत्न हे याचे एक उदाहरण म्हणून घेता येईल. या दडपणाचा आम्ही निषेध करत आहोत. या प्रकारच्या दडपणाचा मार्ग भविष्यात कुठल्याही क्षेत्रात वापरला जाऊ नये. स्थानिक जनतेबरोबर खुल्या विश्वासाच्या वातावरणात चर्चेचा मार्ग अवलंबूनच संबंधित प्रश्न सोडवले जावेत.

५. संरक्षित क्षेत्रात विशेषतः जेथे वन्यजीव आणि जंगल असेल अशा ठिकाणी खनिज संपत्तीकरता खोदकाम करून ती नेण्यास परवानगी देऊ नये. तसेच तेथील जमीन कोणत्याही व्यक्तीस अगर संस्था/कंपनीस लीज अगर अन्य मार्गाने देऊ नये. अशा प्रकारे खोदाई झाल्यास वन्य जीवांचा नाश होणार असून पर्यावरणावर त्याचा गंभीर परिणाम होणार असतो. या करिता यावर बंदी असावी. राधानगरी अभयारण्यालगत खाजगी मालकीच्या क्षेत्रात बॉक्साइट खाणी चालू आहेत. त्या बंद करण्यात याव्यात तसेच आणखी ठिकाणी राधानगरी अभयारण्य क्षेत्रातील अंतर्भागात खनन करण्यास परवानगी देऊ नये.

६. सर्व अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने याचे व्यवस्थापन हे सहभागी पद्धतीनेच केले जावे. तसेच या संबंधित सर्व पातळ्यावरील प्रक्रियेत स्थानिक लोक व लोकांनी सुचवलेल्या संस्था/संघटना/व्यक्ती यांना समान पातळीवर सहभागी केले जावे.

# तिसरी अभयारण्य परिषद – मालवण

## दि. २५ ते २७ ऑक्टोबर, १९९६, मालवण

## सहभागींची नावे व पत्ते

| | |
|---|---|
| १. पुर्णिमा उपाध्याय | 'खोज', १/९ अत्तरवाला चाळ, रामवाडी, गुंफारोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६० (मेळघाट अभयारण्य). |
| २. प्रशांत शिंदे | — " — |
| ३. अविनाश बि. जे. | 'कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना', भुंजे कॉलनी, कोरेगाव, जि. सातारा ४१५५०१ (कोयना अभयारण्य). |
| ४. चंद्रशेखर देशमुख | सी. सी. डी. ट्रस्ट, आदिवासी हक्क समिती, पाली-चिंबई म्युनि. शाळा, खो. नं. ८, चिंबई रस्ता, वांद्रा (प.), मुंबई ४०००५० (बोरीवली राष्ट्रीय उद्यान). |
| ५. नितीन शिंदे | — " — |
| ६. गनीसाहेब कलोट | मु. पो. फेजिवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर (राधानगरी अभयारण्य). |
| ७. शंकर धोंडी पाटील | माज़ी आमदार, ११३-अ हराळे गल्ली, सरदार तालीम जवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर (राधानगरी अभयारण्य). |
| ८. विठू येंगू झोरा | रामनवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर (राधानगरी अभयारण्य). |
| ९. बाबुराव घोरपडे | फेजिवडे (राधानगरी अभयारण्य). |
| १०. शंकर गणपती पाटील | पडळी (राधानगरी अभयारण्य). |
| ११. सदाशिव विठोबा शिंदे | रामनवाडी (राधानगरी अभयारण्य). |

| | |
|---|---|
| १२. आबा महादेव पाटील | कंथेवाडी (राधानगरी अभयारण्य). |
| १३. संजय बाबुराव पाटील | कंथेवाडी (राधानगरी अभयारण्य). |
| १४. मारुती जाधव | तळाशी (राधानगरी अभयारण्य). |
| १५. ॲड. पी. आर. हरणे | जनवन आंदोलन समिती, ६३ हनुमान नगर, मेडिकल चौक, नागपूर (पेंच राष्ट्रीय उद्यान). |
| १६. विनोद गजभिये | नेहरू युवा मत्स्य समिती, तोतलाडोह, ता. रामटेक, जि. नागपूर ४४००१८ (पेंच राष्ट्रीय उद्यान). |
| १७. ॲड. संजीव काशिनाथ गजभिये | भंडारा नेचर क्लब, महाल रोड, भंडारा ४४१९०४ (नागझिरा आणि नवेगाव बांध अभयारण्ये). |
| १८. रंजीत घोडेस्वार | कोरूकोरा, मु. कुसुमकोट (खु.) पो. कुसुमकोट (बु.) तह. धारणी, जि. अमरावती ४४४७०२ (मेळघाट अभयारण्य). |
| १९. विठ्ठल लाड | श्रमिक मुक्ती आंदोलन/जाग, २१७/४ महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड वसाहत, अशोकवन, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६ (बोरीवली राष्ट्रीय उद्यान). |
| २०. किसन वरठे | — " — |
| २१. माणिक सापरे | — " — |
| २२. कुसुम कर्णिक | शाश्वत ट्रस्ट, मंचर, जि. पुणे ४१०५०३ (भीमाशंकर अभयारण्य). |
| २३. आनन्द कपूर | एकजूट संघटना, मंचर, जि. पुणे ४१०५०३ (भीमाशंकर अभयारण्य). |
| २४. ढवळा गवारी | मु. पिंपरगणे, पो. तिरपाड, तह. आंबेगाव, जि. पुणे (भीमाशंकर अभयारण्य). |
| २५. लक्ष्मण पारधी | — " — |
| २६. अमित बर्वे | १८ श्री सहवास, गवाण पाडा, मुलूंड, मुंबई ४०००८१ (जव्हार क्षेत्र). |
| २७. बाळासाहेब कामथे | 'मासूम', १६५ अर्चना अपार्टमेंट, हडपसर, पुणे ४११०२८. |
| २८. जगदीश जाधव | 'समर्थन', खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी समुद्र किनारा, (उत्तर) मुंबई ४०००२५. |

| | |
|---|---|
| २९. राजाराम जाधव | — " — |
| ३०. बळीराम ठाकूर | मु. पो. नितवडे, ता. भूदरगड, जि. कोल्हापूर. |
| ३१. डॉ. सतीश पाटील | 'वसुंधरा पर्यावरण न्यास', ४६ सानेगुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर. |
| ३२. शिवाजीराव घाटगे | डब्लू. डब्लू. एफ्. च्या समोर, राजाराम पुरी, पहिली गल्ली, कोल्हापूर. |
| ३३. रमेश लाडखेडकर | निसर्गसेवा संघ, ५०९ जुनी रामदास पेठ, नागपुर ४४००१०. |
| ३४. रेखा लवू पवार | मु. पो. त्रिंबक, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६१४. |
| ३५. मंगला लवू पवार | — " — |
| ३६. सुनील लिमये | वन अधिकारी, कोल्हापूर. |
| ३७. सुभाष पुराणिक | परिक्षेत्र वन अधिकारी, कोयना अभयारण्य. |
| ३८. श्रीपाद जगन्नाथ लेले | आर्. सी. एफ्. थळ वायशेत, सी ७/४ आर्. सी. एफ् वसाहत, अलिबाग. |
| ३९. डॉ. संजय देशमुख | बी. एन्. एच् एस्. शहीद भगतसिंह मार्ग, मुंबई ४०००२३. |
| ४०. माधवी इनामदार | — " — |
| ४१. डॉ. अरुण परुळेकर | राष्ट्रीय सागरी संशोधन संस्था, दोनापावला, गोवा ४०३००४. |
| ४२. डॉ. अरविंद उंटवाले | — " — |
| ४३. सुनील करकरे | शिक्षणाधिकारी, विश्व प्रकृती निधी, कोल्हापूर. |
| ४४. म. स. भांडारे | सहा. मत्सव्यवसाय संचालक, मालवण, जि. सिंधुदुर्ग. |
| ४५. मधुसूदन श्रीधर पटवर्धन | बॅ. नाथ पै सेवांगण, धुरीवाडा, मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६०६ (मालवण अभयारण्य). |
| ४६. रमेश रामचंद्र धुरी | — " — |
| ४७. अ. ना. कांबळी | — " — |
| ४८. ल. रा. मालवणकर | — " — |
| ४९. गणपत द. तारी | — " — |
| ५०. चंद्रकांत कृ. तारी | — " — |
| ५१. कुसुम चं. तारी | — " — |
| ५२. राजश्री चं. तारी | — " — |
| ५३. प्रफुल्ल म. धुरी | — " — |

| | | |
|---|---|---|
| ५४. | आनंद कृ. चव्हाण | — " — |
| ५५. | शरद म. धुरी | — " — |
| ५६. | ज्ञानेश्वर ज. मालंडकर | कुबल रापण संघ, दांडी, मालवण. |
| ५७. | शामसुंदर स. ढोके | — " — |
| ५८. | रमेश गो. कुबल | मालवण. |
| ५९. | विष्णू वसंत ढोके | मालवण. |
| ६०. | सुरेश दिगंबर रोगे | मालवण. |
| ६१. | कृष्णनाथ तांडेल | सर्जेकोट, मालवण. |
| ६२. | अरविंद तु. हुले | अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा मच्छिमार कृती समिती, मालवण. |
| ६३. | प्रताप वि. खराडे | मालवण तालुका श्रमिक संघ. |
| ६४. | द्वारकानाथ य. तोडणकर | मालवण तालुका श्रमिक संघ. |
| ६५. | हर्षल ना. मिराशी | विकास, सहयोग प्रतिष्ठान, ११७/८ बालिगा नगर, माहीम, पूर्व मुंबई ४०००१७. |
| ६६. | विजय परांजपे | इकोनेट, १५ संकल्प, शामसुंदर सोसायटी, म्हात्रे पुलाजवळ, पुणे ४११०३०. |
| ६७. | विजय शेट्टी | दै. तरुण भारत कार्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. |
| ६८. | अर्जुन राणे | दै. सकाळ, मालवण. |
| ६९. | विकास गावकर | दै. सकाळ, मालवण. |
| ७०. | प्रफुल्ल देसाई | दै. रत्नागिरी टाईम्स, मालवण. |
| ७१. | पी. के. चौकेकर | दै. रत्नागिरी एक्स्प्रेस, मालवण. |
| ७२. | दत्तात्रय सीताराम चव्हाण | दै. तरुण भारत, मालवण. |
| ७३. | विजय तांबे | मु. पो. कणकवली. |

## हजर न राहू शकलेले पण परिषदेशी संबंधित कार्यकर्ते

| | | |
|---|---|---|
| १. | वसंत पळशीकर | १५० गंगापुरी, वाई, जि. सातारा ४१२८०३. |
| २. | प्रा. डॉ. जय सामंत | स्कूल ऑफ ॲप्लाईड सायन्सेस, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४. |
| ३. | सलीम शेख | ८२४ कसबा पेठ, इंदापुर, जि. पुणे ४१३१०६ (उजनी अभयारण्य). |

| | | |
|---|---|---|
| ४. | रा. वि. पाटणकर | सत्यनिकेतन, राजूर, ता. आकोले, जि. अहमदनगर ४२२६०४ (कळसूबाई अभयारण्य). |
| ५. | कॉ. शंकर चा. भोईर | मु. पो. लेनाड (खु.) ता. शहापुर, जि. ठाणे (तानसा अभयारण्य). |
| ६. | मारुतीराव वाघमोडे | रेहिकुरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर (रेहिकुरी अभयारण्य). |
| ७. | शरद कुलकर्णी | आदिवासी जाणीव जागृती केंद्र, मयुरेश अपार्टमेंट, ब/३० कस्तुरबा हाउसिंग सोसायटी, विश्रांतवाडी, पुणे ४११०१५. |
| ८. | दिलीप गोडे | सचिव, विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, बार्बेट इंडस्ट्रिज, तिडके आश्रम, गणेश पेठ पोलीस स्टेशन जवळ, नागपुर ४४००१४ (नवेगाव अभयारण्य). |
| ९. | गौतम बंदोपाध्याय | नेटवर्क, मध्यप्रदेश अभयारण्ये, 'एकता परिषद', सेक्टर I, घर नं ११९२, पो. शंकरनगर, रायपुर, म. प्र. ४९२००७. |
| १०. | ज्ञानेश देऊलकर | बॅ. नाथ पै. सेवांगण, मालवण. |
| ११. | देबी गोएंका | बॉम्बे एन्वार्नमेंट ॲक्शन ग्रुप, काळबादेवी म्युनि. शाळा, खो. नं. ५४, २ रा मजला, मुंबई ४००००२. |
| १२. | आशिष कोठारी | भारतीय लोक प्रशासन संस्थान, इंद्रप्रस्थ इस्टेट, रिंग रोड, नई दिल्ली ११०००२. |
| १३. | क्लॉड अल्वारीस | द गोवा फाऊंडेशन, मापुसा क्लीनिकच्यावर, मापुसा, गोवा ४०२५०७. |
| १४. | मेधा पाटकर | नर्मदा बचाव आंदोलन, ब-१३ शिवम फ्लॅटस्, एलोरा पार्क रोड, बडोदा, ३९०००७, गुजरात. |

# अभयारण्य बैठक वृत्तांत

## दि. ७ सप्टेंबर १९९८

स्थळ :

टाटा समाजशास्त्र संस्था

सायन तुर्भे रोड, देवनार, मुंबई ४०००८८

# प्रस्तावना

तिसरी अभयारण्य परिषद ऑक्टोबर १९९६ ला मालवण सागरी अभयारण्य परिसरात बॅ. नाथ पै सेवांगण संस्थेच्या परिसरात संपन्न झाली. त्यानंतर काही कारणामुळे चवथी अभयारण्य परिषद जी विदर्भात व्हायची ठरली होती ती लांबणीवर पडत राहिली आहे. या परिषदेमध्ये बऱ्याचशा अभयारण्य (यात राष्ट्रीय उद्याने गृहीत धरली आहेत) भागात रहाणाऱ्या लोकांचे प्रश्न आणि समस्या मांडल्या जातात आणि परिस्थिती स्पष्ट होते. त्यामुळे असे एकत्र येणे फार जरूरीचे ठरते. शिवाय यंदा या संरक्षित क्षेत्रात (अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यान) नवीन आणि अवघड समस्या उभ्या राहिल्या आहेत. याकरता असे ठरले की '**शाश्वत**' संस्थेने पुढाकार घेऊन एका दिवसाची बैठक आयोजित करावी. त्यानुसार मुंबईत 'टाटा समाजशास्त्र संस्थे'त ७ सप्टेंबर १९९८ ला ही बैठक झाली.

१९९७ मध्ये दिल्लीच्या जागतिक वन्य निधी संस्था (WWF) आणि ॲड. राज पंजवानी यांनी सुप्रीम कोर्टात एक दावा दाखल केला आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार देशात अनेक ठिकाणी संरक्षित क्षेत्रे घोषित करण्यात आली आहेत. प्रथम शासन असे अभयारण्य वा राष्ट्रीय उद्यान घोषित करण्याचा मानस जाहीर करते. यानंतर तेथील रहिवाश्यांच्या हक्काचे दावे चौकशी अधिकाऱ्याकडे दाखल केले जाऊन त्यावर चौकशी अधिकारी निर्णय देतो. मग त्या निर्णयाची कार्यवाही झाल्यावर या क्षेत्राची अंतिम आणि पक्की घोषणा केली जाते. बहुतेक ठिकाणी ही पुढची प्रक्रिया झालेली नाही. या खटल्यात मागणी करण्यात आली आहे की ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून अंतिम उद्घोषणा होऊन ही क्षेत्रे खऱ्या अर्थाने संरक्षित क्षेत्रे म्हणून जाहीर व्हावीत. या खटल्यामुळे सुप्रीम कोर्टाने सर्व राज्यसरकारांना आदेश दिला आहे की एका वर्षाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण करून अंतिम घोषणा जाहीर करावी. या आदेशामुळे पुढची चक्रं फिरू लागली आहेत.

बहुतांशी संरक्षित क्षेत्रं ही जंगल भागात, दूर, दुर्गम, डोंगराळ आणि अवघड ठिकाणी आहेत, जिथे शासन फार क्वचित पोचते. चौकशी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी – सहसा या भागातला उपजिल्हाधिकारी या कामावर नियुक्त केला जातो – हा चौकशी आणि निवाडा अधिकारी असतो. तो गावांना नोटीस देतो की लोकांनी त्यांच्या मालमत्तेविषयी, हक्क, सोयी, सुविधा यांविषयीचे दावे त्याच्याकडे दाखल करावेत. मग या दाव्यांची चौकशी होऊन सदर अधिकारी आपला निवाडा देतो आणि ही प्रक्रिया पुरी करतो. ते अधिकार अबाधित ठेवायचे वा नाकारायचे वा नुकसानभरपाई देऊन लोकांना पुनर्वसित करायचे याचा निवाडा आणि कार्यवाही पुरी झाल्यावर अंतिम घोषणा केली जाते. नेमलेल्या अधिकाऱ्याच्या नेहमीच्या कामातून वेळ काढून हे अवघड भागातले किचकट काम एका वर्षाच्या आत जमण्यासारखे नाही. त्यातच या अधिकाऱ्यांना या प्रश्नावर कधी प्रशिक्षित केले गेले नाही. या कामाविषयी शासनात फारशी कोणाला माहिती नाही. या कायद्यातील अनेक तरतुदींची अंमलबजावणी फारशी कधी केली जात नाही. त्यात परत स्थानिक लोकांना पूर्णपणे अंधारात ठेवून सर्व कार्यवाही केली जाते. मुळात हे दूरच्या आणि अवघड भागातले लोक बहुतेक अशिक्षित असतात त्यामुळे त्यांना काही माहिती असणे कठीणच असते.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार अनेक संरक्षित क्षेत्रांत कारवाई सुरू झाली आहे. लोकांना नोटिसा मिळाल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी नोटिसांत चुकीचे शब्दप्रयोग झाले आहेत. सर्व देशभरात अशा क्षेत्रांत त्यामुळे गोंधळ उडाला आहे. लोकांना नोटिसांचे अर्थ नीट समजले नाहीत. कित्येक ठिकाणी या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे लोकांची रोजीरोटी थांबणार आहे. त्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले आहेत. लोक आंदोलनाची आणि त्याही पलीकडच्या कृतीची भाषा बोलत आहेत. मुळात या भागात वन विभाग आणि लोकांचे नाते विळ्याभोपळ्याचे आहे. वनविभागाचा जुलूम, अन्याय, अत्याचार, बेपर्वाई, भ्रष्टाचार, लोकांवर आकस यामुळे लोकांत आधीच असंतोष आहे. त्यात ही भर पडली आहे.

यात भर म्हणून बऱ्याचशा राज्यांत – महाराष्ट्र राज्यातही – 'परिसर विकास योजना' चालू आहे. जागतिक बँकेचं कर्ज घेऊन त्यावर ही योजना राबवली जाते आहे. दुर्दैवाने या योजनेच्या उद्दिष्टानुसार लोकांना त्यांच्या परिसरापासून अलग करण्याचे धोरण आखले गेले आहे कारण स्थानिक लोकांच्या गरजांमुळे या परिसराचा – जंगलाचा – ऱ्हास होतो आहे असे गृहीत धरले आहे. मुळात हे गृहीत कोणत्याही संशोधनावर आधारित नसून ब्रिटिशांच्या वसाहतवादी दृष्टीचाच हा वारसा आहे. विश्व बँक आणि पश्चिमी देशांची समजूत अशीच आहे.

या सर्व घडामोडींचा परिणाम फार विपरित होऊ शकतो हे ध्यानात घ्यायला हवे. ही सर्व क्षेत्रे आणि तेथील लोक जंगल-जल-जमीन या नैसर्गिक संसाधनांशी जोडलेले आहेत. त्यांचे त्यांच्या परिसराशी जवळचे नाते आहे. त्या परिसराला विशेषतः तेथील जंगलाला 'माता' मानणारे हे लोक आहेत आणि त्या नात्याने त्या परिसराचे बारकाईने संरक्षण करणारे लोक 'परिसर जन' इथे आहेत. इथल्या प्राण्यापक्ष्यांशी त्यांचे भावनिक, सांस्कृतिक आणि भौतिक नाते आहे, जवळीक आहे. काही भागात वाघदेवाची देवळे आहेत. अशा स्थितीत जर लोक आणि वन्यजीव तसेच जंगल यांचे नाते बिघडले तर फार नुकसानकारक ठरेल. या वन्यजीवांना लोक स्वतः त्रास सहन करूनही राखतात पण जर त्यांच्यामुळे विस्थापनाची वेळ आली तर लोकांच्या भावना बदलतील आणि मग या मुक्या प्राण्यांचा आणि या वनराईचा त्राता कोण? वनविभाग – त्याचा सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग – अगदी बंदुकांसह (त्यांच्या मागणीनुसार) तैनात केले तरी ते या वन्यजीवांना लोकक्षोभापासून वाचवू शकणार नाहीत. हे सारे भाग त्या दृष्टीने अतिशय संवेदनशील आहेत. हे सर्व संबंधितांनी लक्षात घ्यायलाच हवे.

संरक्षित क्षेत्र बनवण्याची प्रक्रिया समजून घ्यायला पाहिजे. या शतकाच्या पूर्वार्धात पूर्वाश्रमीचे शिकारी बऱ्याच वेळा वन्यजीवप्रेमी बनले कारण त्यांना या वन्यजीवांच्या संरक्षणाची जरूर भासायला लागली. ब्रिटीश काळातच ही प्रक्रिया सुरू झाली. या वन्यजीव शिकाऱ्यांच्या जोडीला वनविभागातले लोक शिकारीत आघाडीवर होते आणि मग या दोन गटांनी ही प्रक्रिया सुरू केली. आज शिकारी यात नाहीत पण त्यांची जागा शहरी वन्यजीवप्रेमींनी घेतली आहे. त्यांच्या स्वतःच्या आवडीसाठी ते जंगलभाग तसेच इतर भाग हिंडत असतात. त्यांच्या मनोरंजनाचाही यात मोठा भाग असतो. यांची दोस्ती सहसा वनअधिकाऱ्यां-बरोबर असते कारण जंगलात त्यांना शहरी आणि इतर सोयी-सुविधा वनविभाग पुरवू शकतो आणि मग हे वन्यजीवप्रेमी एकादा भाग अशा दृष्टीने समृद्ध दिसला की त्यावर लक्ष केंद्रित करतात, तेथे भेटी देऊन अभ्यास करतात आणि मग हे वनविभाग संरक्षित करण्याकरिता शासनाला सूचित करतात. या प्रक्रियेत स्थानिक माणसे पूर्णपणे वगळली जातात. वास्तविक स्थानिक लोकांनी या वन्यजीवांचे सहअस्तित्व मान्य केलेले, स्वीकारलेले असते तेव्हाच हे वन्यजीव तेथे वास्तव्य करून असतात. परंतु या परिस्थितीकडे डोळेझाक करून उलट या लोकांनाच वन्यजीवांचे – जंगलाचे शत्रू मानले जात आहे आणि मग सारे कायदे त्यांना हकलण्याकरिता, त्याचे अधिकार, त्यांचे व्यवहार सीमित करण्याकरिता केले गेले आहेत. कायदे सुचवणारे लोकही शहरी, शिक्षित, अधिकारावर असणारे, संपर्क माध्यमे आणि शासनाशी जवळीक ठेवणारे आणि प्रभावशील असतात. वनविभागाची तर स्थानिक लोकांविषयीची वृत्ती ब्रिटीश वसाहतवादी

आहेच. कायदे करण्यात या दोन गटांचा महत्त्वाचा भाग असतो.

असे कायदे साहजिकपणे स्थानिक जनतेच्या विरोधात जातात. जिथे लोक पुढारलेले, संघटित आणि जागृत असतात तिथे मग उठाव होऊन संरक्षित क्षेत्र पूर्णपणे रद्द होऊ शकते. पण जिथे लोक अल्पसंख्य, अतिशय आतल्या भागातले, पहिल्यापासून दबलेले, शोषित, अशिक्षित आहेत तिथे लोकांची परिस्थिती खराब राहते, लोक विस्थापित होतात, अन्यायाला बळी पडतात आणि निर्वासित बनतात. अशा पर्यावरण निर्वासितांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. याचबरोबर असे लक्षात येते आहे की जिथून लोकांना हटवले गेले तिथला परिसर चांगला होण्याऐवजी खराब होतो आहे.

अशी दोन ठळक उदाहरणे आहेत. भरतपूर पक्षी अभयारण्यात लोकांच्या म्हशींची चराई बंद करण्यात आली. त्यामुळे पाण्यात गवत अतोनात वाढून पाणी तुंबून राहू लागले. तशीच म्हशींच्या शेणाने पाण्यात किडे-कीटक, मासळी भरपूर निर्माण होत असे. ते बंद झाल्यावर पक्ष्यांना खाद्य मिळेनासे झाले आणि दुरून येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांची संख्या कमी झाली. अशीच परिस्थिती हिमालयात 'फुलोंकी घाटी'ची झाली. चराई बंद झाल्याने गवत खूप उंच वाढले आणि जमिनीसरशी पसरणाऱ्या फुलझाडांना त्याने गुदमरून टाकले. त्यामुळे अनेक गोष्टींवर पुनर्विचार व्हायला हवा आहे. परंतु सामान्य माणूस, नियोजनकार, कायदेमंडळ, राजकीय नेतागण, शास्त्रज्ञ यांचे कोणाचेच या विषयावर लक्ष वा अध्ययन नाही. वनविभागाला या प्रकारची दृष्टी नाही वा प्रशिक्षण नाही. यात धोरणे ठरवण्यात पुढाकार घेणारी विश्व बँक आणि पश्चिमी देश यांना पूर्वेकडील परिसराचा, लोकजीवनाचा, लोक आणि परिसर यांच्या नात्याचा तपास नाही. परिणामतः चुकीची धोरणे, नियोजन आणि योजना आखल्या जात आहेत आणि त्यातून जन-वन यांचा संबंध दृढ होण्याऐवजी तुटत चालला आहे. शहरी शिक्षितांच्या अपुऱ्या अभ्यासाचा प्रभाव या प्रश्नात गोंधळ निर्माण करतो आहे.

या साऱ्या वस्तुस्थितीचे प्रतिबिंब अभयारण्य बैठकीच्या चर्चेत पडलेले स्पष्ट जाणवते आहे.

# वृत्तांत

दि. ६ ऑक्टोबर ९८ च्या संध्याकाळपासून लोक बैठकीसाठी येऊ लागले. नांदूर मधमेश्वरच्या गावातून बऱ्याच संख्येने लोक आले. मालवणचे साथी येऊन पोचले. बोरिवली उद्यानात काम करणारे कार्यकर्ते तर मदतीसाठी अगोदरपासून हजर होते. त्या रात्री टाटा समाजशास्त्र संस्थेच्या अतिथी गृहात आम्ही १७-१८ जण जमलो होतो.

दि. ७ ला सकाळी १० वाजता बैठकीला सुरुवात झाली. बैठकीला एकूण पन्नास जण होते. नऊ क्षेत्रांतून प्रतिनिधी आले होते. वेळ खूप कमी होता. तिसऱ्या अभयारण्य परिषदेत प्रत्येक ठिकाणची परिस्थिती सविस्तर मांडली गेली होती. त्यामुळे आताच्या परिस्थितीला आणि समस्यांना बैठकीत प्राधान्य द्यावे असे ठरवले. अध्यक्षस्थानी कोयना परिसरातले कार्यकर्ते श्री. अविनाश बी. जे. (सत्यशोध संस्था) हे होते.

१९८० सालापासून भीमाशंकर प्रकल्पामार्फत कुसुम कर्णिक आणि आनंद कपूर यांचे काम भीमाशंकर जंगल परिसरात (ता. आंबेगाव, जि. पुणे) सुरू झाले. इथल्या लोकजीवनाशी परिचय, लोकांच्या जीवनशैलीविषयीचा अभ्यास त्यांनी सुरू केला. १९८५ ला येथे भीमाशंकर अभयारण्य घोषित झाले. पण स्थानिक माणसांना अफवांशिवाय काहीही माहिती दिली गेली नव्हती. गावे उठवली जातील असे ऐकायला मिळाल्यामुळे वनविभागाशी पत्रव्यवहार सुरू केला. परंतु तरीही खरी आणि स्पष्ट माहिती वनविभागाने कधीही दिली नाही. सभा, मार्चे, निवेदने, पदयात्रा, पत्रव्यवहार, प्रत्यक्ष भेटणे अशा मार्गाने वनविभागाशी संपर्क जारी ठेवला. या भागातली १०० आदिवासी गावे धरणात बुडत व कमी होत आता ३० उरली आहेत. त्यात अभयारण्यामुळे आणखी गावे उठल्यास हे आदिवासी – महादेव कोळी जमात – शेवटी नामशेष होतील. फक्त वनविभागाशी संपर्क न ठेवता संपर्क वाढवून इतर संबंधित शासकीय विभाग,

संशोधक, निसर्गप्रेमी, पत्रकार, संस्था-संघटना अशा अनेकांशी संपर्क सुरू केला. इतकेच नाही तर महाराष्ट्रात इतर अशा संरक्षित क्षेत्रात 'संपर्कजाल' सुरू केले. त्यातून या संबंधात परिषदांचे आयोजन सुरू केले.

यातून भारतातील जंगलप्रश्नाचा अभ्यास सुरू केला. भारतात १८६४ साली ब्रिटिश राज्यकर्त्यांनी वनविभाग सुरू केला. त्या काळात भारतात अतिशय विस्तृत आणि संपन्न अशी वनक्षेत्रं सर्वत्र होती. ब्रिटिशांना त्यांचे राजकीय तसेच आर्थिक साम्राज्य वाढवण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी कच्च्या मालाची, लाकडाची फार गरज होती. मोठमोठ्या बोटी बांधण्यासाठी, रेल्वेसाठी त्यांना उत्तम इमारती लाकूड, पॅकिंग आणि इतर गोष्टींसाठी साधे लाकूड हवे होते. तसेच अनेक विकास कामांकरता जंगल तोडून जमीन हवी होती. शेतीक्षेत्र वाढवून जास्तीत जास्त शेतसारा मिळवण्याची जरूर होती, युद्धकाळात अधिक धान्य पिकवण्याची गरज होती. याकरिता त्यांनी सर्वत्र वनांचे मोठ्या प्रमाणात दोहन केले. अनेक ठिकाणी जंगलाचे रूपांतर वनलागवड – प्लांटेशनमध्ये – एक प्रजातीय लागवडीत केले गेले. यामुळे वन परिसरावर फार विपरित परिणाम झाले. लोकांच्या आणि वन्यजीवांच्या जरूरीची, गरजेची वनसंपदा नष्ट होऊन उद्योगक्षेत्राला लागणाऱ्या लागवडी झाल्या. जंगलात वेली-झुडपे यांचे नष्टचर्य आले कारण ती टिंबर म्हणून उपयोगाची नव्हती. जंगले तोपर्यंत स्थानिक जनतेच्या, जनसमुदायांच्या मालकीची होती. किंबहुना मालकी हा व्यवहारच नव्हता. सब-भूमि-गोपालकी यातून ज्याने-त्याने स्वतःच्या कष्टाप्रमाणे आणि जरूरीप्रमाणे त्यातून हवे असेल ते आणि तेवढेच घ्यावे, संचय करू नये, फुकट घालवू नये अशी रीत होती. पण हे ब्रिटीश राज्यकर्त्यांना चालणार नव्हते. त्यांनी कायदे करून 'विजेत्याचा अधिकार' मांडून बरेच वनप्रदेश राखीव जंगले वा संरक्षित जंगले म्हणून वर्गीकृत केले. त्या वेळी म्हणे स्थानिक लोकांशी करार करण्यात आले. त्या कराराचे कागद स्थानिक माणसांना उपलब्ध होणे कठीण, दुसरे म्हणजे हे करार लांडगा-कोकराचे करार होते. भीमाशंकरच्या जंगलात राहणारे स्थानिक लोक आजवर त्या जंगलातून सरपण, घराकरता, अवजाराकरता लाकूड, वनौषधी, कंदमुळे-फळे-फुले असे अनेक पदार्थ वापरत आहेत. हे पूर्वापाराचे वापर करारात कुठेच का धरले गेले नाहीत या प्रश्नाचे उत्तर कोणी देणार आहे का? आज या लोकांना अधिकार आहे फक्त पाणी आणि रस्ते यांचा. लोकांचे अधिकार अशा प्रकारे नाकारण्यात आले, कुठे ते सवलतीत बदलून गेले. त्यात परत ही सारी लिखापढी लोकांना अपरिचित होती, अगम्य होती. त्यांना अक्षरज्ञान नव्हते तर इंग्रजांचे इंग्रजीमधून लिहिलेले कायदे त्यांना कळणे, त्यांच्यापर्यंत येणे असंभव होते.

ब्रिटिशांना भारतातील कच्च्या मालाचे जास्तीत जास्त दोहन आणि लूट

करायची होती. त्याकरता त्यांनी रेल्वे भारतात आणली. रेल्वे आणि रस्ते यांचे जाळे सर्वत्र पसरले. रेल्वे करता स्लिपर्स, पूर्वीची स्टेशने, इमारती बरेचसे लाकडी होते त्याकरता, पहिली इंजिने लाकडाच्या इंधनावर चालवत असत त्याकरता तसेच रेल्वे व रस्ते बनवण्याकरता आणि त्यावर काम करणाऱ्या परप्रांतीय मजुरांच्या गरजांकरता असे प्रचंड प्रमाणात जंगल नष्ट झाले. औद्योगीकरणामुळे शहरे उभी राहिली. शहरांच्या ऊर्जेच्या गरजेकरता पूर्वी लाकडी कोळसा खूप वापरला गेला. १९६४ च्या सुमाराला भीमाशंकरच्या भागात कोळशाचे अकरा कंत्राटदार जंगलावर तुटून पडले होते.

गेल्या शतकात आणि या शतकाच्या पूर्वार्धात आणखी एक विचार सुरू झाला. इंग्रजांनी स्वतःच्या मर्दुमकीसाठी, मनोरंजन आणि खेळ अशा कारणांसाठी शिकारीचा खेळ भारतात सुरू केला. मचाणावर बसून बंदुकीच्या आधारावर आणि लोकांना हाकारे करायला लावून, समोर अमिष म्हणून प्राणी बांधून इंग्रजांनी आणि आपल्याकडच्या राजे-महाराजे आणि श्रीमंतांनी भरमसाठ शिकारी केल्या. वाघांच्या, हरणांच्या, काळविटांच्या, रानरेड्यांच्या ट्रॉफीज दिवाणखान्यात लावून सजावटी केल्या. यामुळे १९०० च्या सुमाराला जंगली प्राण्यांची संख्या खूप रोडावली. त्यामुळे वनअधिकाऱ्यांना चिंता पडायला लागली आणि मग शिकारबंदी-अरण्ये निर्माण केली गेली. गेल्या शतकात अमेरिकेत राष्ट्रीय उद्याने बनवून ती पर्यटकांसाठी राखण्याची टूम निघाली. याच चालीवर ब्रिटिशांनी भारतात १९३५ च्या सुमाराला काही अभयारण्ये घोषित केली. दोन महायुद्धे, वाढते औद्योगीकरण याने प्रचंड प्रमाणावर जंगल कटाई सुरू झाली. आणि मग जंगले वाचवायला हवीत, वन्यप्राणी संरक्षण करायला हवे असे प्रकर्षाने वाटायला लागले आणि अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने बनवण्याची कल्पना जोर धरू लागली. ज्या ठिकाणी चांगल्यापैकी जंगल टिकून होते आणि वन्यजीव टिकून होते ते जंगलप्रदेश अशा प्रकारे संरक्षित वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात येऊ लागले. पूर्वाश्रमीचे शिकारी वन्यजीवप्रेमी बनले आणि त्यांची आधीपासून वनअधिकाऱ्यांबरोबर दोस्ती आणि शिकारीत भागीदारी होतीच. त्यामुळे या शहरी वन्यजीवप्रेमींनी संरक्षित वनक्षेत्र बनविण्यात मोठा पुढाकार घेतला. यांचे स्थानिक लोकांशी मैत्रीचे नाते कधीच नव्हते. त्यांच्या दृष्टीने हे संस्कृतीहीन, जनावर सदृश रानटी लोक होते. त्यांना काही अधिकार, हक्क, सहभाग असायला हवा अशी भावना नव्हती. जंगल वा वन्यपशूंच्या विनाशात या लोकांचा सहभाग नव्हता वा ते त्याला जबाबदारही नव्हते, पण ते कायम जंगलाचे शत्रू असे वन्यजीवप्रेमी आणि सरकारी अधिकारी या दोन्ही गटांनी गृहीत धरले. वास्तविक हे परिसर-जन जंगलाला 'आई' मानून तिच्या दुधावर जगणारे लोक आहेत. परंतु आजही यांना जंगलातून हुसकावून लावण्याची

धोरणे वनविभाग आणि वन्यजीवप्रेमी आखत आहेत.

सुरुवातीला उजनी अभयारण्य (जे रद्द झाले आहे) क्षेत्रात काम करणारे श्री. सलीम शेख यांनी उजनीविषयी मांडले. त्यांनी सांगितले की उजनी जलाशयाच्या उथळ भागात पक्षी आधीपासून येत होते. शेतीचे नुकसान करत असले तरी लोकांनी त्यांना कसलाही त्रास दिला नसल्याने पक्षी मजेत होते. पण लोकांना न विचारता, न सांगता सवरता अभयारण्य जाहीर केले गेले. ३६६ चौ. कि. मी. क्षेत्र अभयारण्यात समाविष्ट करण्यात आले. या क्षेत्रात पर्यटन वाढणार या अपेक्षेने बाहेरच्या अनेकांनी, खासदारांनी जमिनी खरेदी केल्या. एका मोठ्या नटाने १६ एकर जमीन खरेदी केली आहे की पुढेमागे पर्यटन सुरू होईल.

जेव्हा लक्षात आले की या ठिकाणी अभयारण्य घोषित झाले आहे तेव्हा लोकांत काही जाग नव्हती. अभयारण्य म्हणजे काय याची कल्पना नव्हती. पण नंतर सलीमने स्वतः याचा अभ्यास करून लोकजागृती करायला सुरुवात केली. पहिल्या सभेला ६ लोक जमले होते पण नंतर जसजशी माहिती पसरत गेली, १०-१२ गावांत बैठका घेतल्या, लोकक्षोभ वाढत गेला आणि मग १५-२० हजार लोकांची सभा भिगवणला झाली आणि दोन दिवसात हे अभयारण्य रद्द झाले.

यानंतर 'गौताळा औतराम' हे औरंगाबादच्याजवळचे अभयारण्य, इथून आलेले प्रतिनिधी श्री. बद्रीनाथ कत्तारे यांनी मांडले, '१९८५ ला पहिली नोटीस जाहीर झाली पण आम्हाला काहीच कल्पना नव्हती. यात २२ गावे येतात. पर्यटक यायला लागले. पक्षिमित्र येऊ लागले. वनविभागाचा वावर वाढू लागला. सरपण चराई बंदी व्हायला लागली. तेव्हा लोक जागे व्हायला लागले. विरोध सुरू झाला. मोर्चा, धरणे असे कार्यक्रम सुरू झाले. नुकतेच शासनाचे चौकशी अधिकारी म्हणून प्रांत अधिकारी आले. बरोबर रेंजर होते. गावे उठवली जातील, नुकसानभरपाई मिळेल, पुनर्वसन करू असे सांगायला लागले. लोक म्हणाले आम्हाला अभयारण्य नको. आम्ही अभयारण्य होऊ देणार नाही. उपोषणाला बसायचे ठरले तर आम्हाला सांगण्यात आले की तुमचे अधिकार अबाधित ठेवू. त्यामुळे उपोषण मागे घेतले. अभयारण्यात येणाऱ्या जळगाव जिल्ह्यात आदिवासी क्षेत्र आहे. १९७४ आणि ७८ चा कायदा आम्ही समजून घेतला. आदिवासींनी या काळापर्यंत ज्या जमिनी कसल्या असतील त्या त्यांना कागदोपत्री नोंद करून नावावर मिळण्याची तरतूद या कायद्यात आहे. कष्टकरी संघटनेचे श्री. प्रदीप प्रभू यांनी आम्हाला या कामात मदत केली. औरंगाबाद खण्डपीठात खटला दाखल केला. या अभयारण्यामुळे १० गावांतील ८०० कुटुंबे विस्थापित होतील. ३ ते ३॥ हजार एकर उपजाऊ जमीन अभयारण्यात जाईल, आमचा लढा चालू आहे.'

नांदूर मधमेश्वर अभयारण्यातील लोक बैठकीत जास्त संख्येने उपस्थित

होते. ते बऱ्याच दिवसांपासून लढा देत आहेत. १९८२ पासून त्यांचा प्रयत्न चालू आहे. यात ९ गावे १८०० हेक्टर जमीन गुंतलेली आहे. ही सर्व गाळपेराची सुपीक जमीन आहे. या भागात मच्छिमारी चालते त्यामुळे भाई बंदरकर – मच्छिमारांचे नेते – यांनी मदत केली. या प्रश्नात १५०० कुटुंबे येतात. प्रभावितांत बहुसंख्य आदिवासी आणि दलित कुटुंबे आहेत. 'खा. माधव पाटील यांना आम्ही भेटलो. त्यांनी तात्पुरती स्थगिती दिली.' येथील एक प्रमुख कार्यकर्ते श्री. गंगाधर रामचंद्र सोनावणे यांनी मांडले – '११ गावांचे आमचे दुःख फार मोठे आहे. आमच्याकडे गोदावरी नदीवर हा खूप जुना बंधारा आहे. २० वर्षांपूर्वी सलीमअली प्रथम इकडे आले. ते कुटुंबासह बोटीतून हिंडायचे, त्यांनी विडिओ फिल्म काढली आणि त्यांनी प्रथम हे पर्यटन स्थळ म्हणून सुचवले. सरकारने ते मान्य केले. आम्हाला कोणी विचारले नाही का सांगितले नाही. परस्पर कारभार झाला. गावागावातून दवंड्या पिटल्या गेल्या. पत्रके देण्यात आली. सहा महिने ती पत्रके तशीच पडून राहिली. परस्पर कळवले गेले की नागरिकांचा काही विरोध नाही.

आमची जमीन सुपीक आहे. पंजाबपेक्षा चांगला गहू इथे पिकतो. या ११ गावातले ५० हजार लोक या शेतीवर अवलंबून आहेत. हे सर्व विस्थापित होतील, अन्नाला मोताद होतील. आम्हाला लढा द्यावाच लागेल. आमच्यातल्या मोठ्या शेतकऱ्यांनी केसी लावल्या. त्यांच्या जमिनी शासनाने सोडून दिल्या.

नांदूर मधमेश्वरच्या परिसरात अभयारण्य करण्यासारखी परिस्थितीच नाही. जवळच ओझरला मिग विमानांचा कारखाना आहे. तेथून विमाने मोठा आवाज करत सतत हिंडत असतात. या बंधाऱ्याची उंची वाढवून याचे पाणी नांदेडला शंकरराव चव्हाणांच्या भागात जाणार आहे. बंधाऱ्याची उंची वाढली तर पक्षी बंद होतील कारण मग पाणी खोल होईल.

आम्हाला इथून उठवून इथे अभयारण्य करायची योजना आहे. आम्ही इथे गेली ५० वर्षे गाळपेराची शेती करतो आहोत. आमचे आंदोलन जोरात सुरू आहे. आणि पुढेही सुरू राहील. आम्ही कष्ट करतो आहोत आणि कष्टाला तयार आहोत. येथील शेतकरी आणि त्यांच्यावर अवलंबून असणारे ३५ हजार लोक बेकार होतील. आम्ही विस्थापित झालो तर आम्हाला अवैध धंदे करावे लागतील.

पूर्वी आमच्याकडे काळवीटही होते. पक्षी भरपूर येत असत. पण मधल्या काळात उन्हाळ्यात बंधाऱ्यात पाणी आटून गेले. मग हळूहळू पक्षी-प्राणी कमी पडले. शिवाय मिग विमानांचा कहार चालू असतो.'

यानंतर मालवण सागरी अभयारण्यातील कार्यकर्ते श्री. प्रताप खराडे यांनी मांडले – 'सागरी संस्थेने आमच्याकडे संशोधन केले ते फक्त २ महिने.

संशोधन पूर्ण वर्षभर करून काय ते सुचवायला हवे होते. आमच्या २५ हजार लोकांचे जीवन या भागावर अवलंबून आहे. या बंदरातून ३० कोटींची उलाढाल होते. इथे समुद्राच्या भरतीच्या रेषेपासून ५०० मी. पर्यंतचे सर्व क्षेत्र प्रतिबंधित करून तेथील लोकांना उठवायचे आणि पर्यटन वाढवायचे, हॉटेले करायची अशी योजना आहे. १९८२ ला पालकमंत्र्यांनी आम्हाला सांगितले की तुम्हाला काही अडचण होणार नाही. आणि आता नुकतेच आमच्याकडे अभयारण्य हद्दीचे फलक लावले आहेत. आम्ही याच्या विरोधात आंदोलन प्रखर करू.'

तेथील श्री. अशोक पेडणेकर यांनी मांडले – '१९८० पासून आम्ही ऐकत होतो. पण खऱ्या गोष्टीपासून आम्हाला अंधारात ठेवले. यंदा चतुर्थीच्या अगोदर अभयारण्याचे फलक लावले. लोकप्रतिनिधींना आम्ही विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की फलक कोणी लावले त्यांना माहिती नाही. यात खरे काय ते आम्हाला कळत नाही. आम्हाला नीट कोणी काही सांगत नाही. अचानक सांगतात की ही हद्द आता इथून उठा. असले हे रक्षक आम्हाला नकोत. आम्ही आमचे रक्षण करू. लोकांच्या हिताकरता असेल आणि आमचे काही नुकसान नसेल तर आम्ही ही योजना मान्य करू पण आम्हाला समूळ विस्थापित करून देशोधडीला लावणारे हे अभयारण्य आम्हाला नको. आम्ही यापुढे आंदोलन प्रखर करू. प्रत्येक मच्छिमार नागरिक यापुढे आंदोलनात आल्याशिवाय राहणार नाही.'

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या प्रश्नावर राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे कार्यकर्ते श्री. जोशी यांनी विचार मांडले – अभयारण्याच्या प्रश्नावर आंदोलन झाले पाहिजे आणि आपण सर्वांनी त्यात आले पाहिजे. मी स्वतः निवृत्त वनअधिकारी आहे. मी या बैठकीला बोलवण्याकरिता वनअधिकाऱ्यांना भेटलो पण त्यांनी सांगितले की ही बैठक वनखात्याच्या विरोधात आहे. त्यांनी सांगितले की वन्यजीव संरक्षण कायद्यात गावे उठवावी लागतील असे लिहिलेले आहे. मी पूर्वी वनअधिकारी होतो. तरीही आज मला यांचा राग येतो. आमच्या इथल्या अभयारण्यात ४० गावे प्रभावित होणार आहेत. आमच्या संस्थेचे काम गेली कित्येक वर्षं या भागात चालू आहे. तरीही आम्हाला वनखाते विश्वासात घेऊ शकत नाही. इथे कळसूबाईच्या भागात चार जिल्ह्यांचे कोपरे येतात. इथल्या भंडारदरा धरणामुळे १०० वर्षांपूर्वी विस्थापित झालेले लोक आज इथे कसे तरी जगतायत. इथे अगोदरचे वनअधिकारी स्वतः आदिवासी होते. ते सांगायचे की अभयारण्यामुळे आपल्या लोकांचा फायदा होईल. आज ते आणखी मोठे अधिकारी झालेत. आमची मात्र विस्थापित होण्याची पाळी आली आहे. आमचे वनउपजविषयीचे सर्व हक्क नाकारले गेले आहेत. आम्हाला हिरडा, बेहडा, मळवा, शिकेकाई, मध काहीही गोळा करू दिले जात नाही. लोकं आता हळूहळू

जागी होत आहेत. दोन वर्षांपासून चळवळ सुरू झाली आहे. अभयारण्य हटाव म्हणून हजारो सह्यांचे अर्ज आम्ही पाठवले आहेत. पण हे सोपे नाही. या भागाच्या विकासासाठी म्हणून पैसे येतात पण ते पूर्णपणे या भागाकरता खर्च केले जात नाहीत. शिक्षा म्हणून टाकलेले अधिकारी या भागात पाठवले जातात. ते या भागात रहातच नाहीत. ते शहरभागात राहतात. आम्ही आता कंटाळलो आहोत. श्री. मधुकरराव पिचड, श्री. अशोकराव भांगले आमच्याबरोबर आहेत. पण लोक आंदोलनासाठी एकत्र येऊ शकत नाहीत कारण लोकांचे हातावरचे पोट आहे, मजुरी बुडवून येता येत नाही.

बॉम्बे फॉरेस्ट मन्युअलमध्ये आमच्या हक्कांच्या नोंदी आहेत, सवलतींच्या नोंदी आहेत. त्या अबाधित ठेवा अशी आमची मागणी आहे. प्राणी वाचवायचे आहेत तसाच माणूसही वाचवायचा आहे. आमच्याकडे आम्हाला नीलगिरी, सुबाभूळ अशी झाडे नको आहेत. आम्हाला लागतात ती फळझाडे लावा. इथे जंगलात न राहता बिबटे बाहेरच्या भागात फिरतात. कित्येकदा विहिरीत पडतात कारण त्यांना पाणी मिळत नाही, भक्ष्य मिळत नाही. एकदा एक बिबट्या तहानेने व्याकुळ होऊन बेशुद्ध पडला. एका बिबट्याने मुलावर हल्ला केला. हे बिबटे अभयारण्याबाहेरच्या गावात फिरतात तर मग अभयारण्याचा काय उपयोग? तिथे त्यांना जरूर त्या गोष्टी मिळत नाहीत त्यामुळे ते बाहेर पडतात. अभयारण्याच्या भागात बांध-बंधारे व्हायला हवेत. बिबट्यांना खायला इतर प्राणी असायला हवेत. त्यांना प्राणी मिळाले नाहीत तर ते लोकांवर, त्यांच्या जनावरांवर हल्ले करतात. एकीकडे पर्यटकांची गर्दी वाढते आहे. धरणाकरता, धबधब्याकरता लोक येतात. नंतर अभयारण्याकरताही येतील. पण स्थानिक लोकांच्या प्रश्नाचे काय?

बोरिवली राष्ट्रीय उद्यानातील स्थानिक लोकांबरोबर काम करणारे श्री. नितीन शिंदे यांनी मांडले – इथून २५-३० कि.मी.वर शहरापासून जवळ २५० कुटुंबे, जवळपास तीन हजार लोक राष्ट्रीय उद्यानाच्या आत पाड्यापाड्यांवर राहतायत. १९७२ ला या भागाचा अभ्यास झाला. ७३ ला उद्यान बनले. स्थनिक लोक पूर्ण अशिक्षित होते. वनअधिकाऱ्यांची दंडेली होती. लोकांना जमिनीचे कागद ठेवण्याचेही माहीत नव्हते. त्यामुळे कोणत्याही गोष्टीला लोकांनी विरोध केला नाही. इंदिरा गांधींच्या काळात लोकांना बाईंच्या शाब्दिक आश्वासनामुळे विश्वास वाटला. लोकांना काहीही माहिती नव्हती. चौकशी अधिकारी नेमला गेला. त्याने आणि वनअधिकाऱ्याने संगनमताने लोकांचे अधिकार रद्द केले. नंतर आणीबाणीत दहशत निर्माण झाली त्यामुळे लोक दबून गेले. लोकांना फसवले गेले. लोकांच्या पुढाऱ्यांना टिपून प्रत्यक्ष मारले गेले. लोक त्यामुळे घाबरले. काही वर्षांपूर्वी काही लोकांना पालघर तालुक्यात खुटल या गावात

ट्रकमध्ये घालून पुनर्वसनासाठी नेले. चार खुंट्यांवर गवताचे छप्पर आणि दोन एकर जमीन. जमिनीत कापलेल्या झाडांची खुटे तशीच होती. लोकांना खर्चासाठी ५० रुपये दिले गेले. लोकांना सांगितले होते की प्रथम त्यांनी पुढे जावे नंतर त्यांची जनावरे पाठवली जातील. लोकांनी जनावरांची चौकशी केली तर त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाली. लोकांना जगायचा मार्गच उरला नाही. लोक भीक मागायला लागले. काही काळाने लोक आपल्या ठिकाणी परत आले आणि त्यांनी वस्ती केली पण त्यांना त्यांच्या जमिनी वापस कधीच मिळाल्या नाहीत. अधिकाऱ्यांकडे गाड्या आल्या आहेत. लोकांना उकळून हे पैसे मिळवले आहेत.

वनखात्याने लोकांना फूस लावून बेकायदा गोष्टी करायला लावल्या. रेंजरने स्वतः सांगितले की तुम्हाला हवी तशी घरे बांधा आणि नंतर लोकांना गुन्हेगार ठरवले. शहरी पत्रकारांनी नेहमी लोकांच्या विरोधात लिहिले. आमची बाजू कधी मांडली गेली नाही. दारूच्या भट्ट्या इथे अधिकाऱ्यांच्या मदतीने चालतात. बदनाम मात्र फक्त स्थानिक लोक होतात. पर्यटक खूप नुकसान करत आहेत. ते स्वतः दारूच्या शोधात फिरतात. स्थानिक लोकांकडे दारू मागायला येतात. लोकांना वनखात्याला भिऊन रहावे लागते आणि त्यांच्या कलानेही वागावे लागते. आमच्या संस्थेने (कमिटेड कम्युनिटीज डेवलपमेंट) गेली आठ वर्षे इथे काम केले आहे. लोकजागृती झाल्याने आता लोक घाबरत नाहीत. आम्हाला जंगलात आमच्या रीतीने राहू द्या अशी लोकांची मागणी आहे. स्थानिक लोकांना सामील करून घेऊन संरक्षित विभाग करायला हवेत.

आता नवीन योजना आखली गेली आहे असे समजले. २६० लोकांचे पुनर्वसन पार्कच्या आतमध्येच होणार आहे. लोकांचा सहभाग या योजनेत असणार आहे. परिस्थिती बदलते आहे असे वाटते आहे. परंतु खरे तर शासन आम्हाला आमचे वाटत नाही. ८०,००० लोकांचे पुनर्वसन होऊ शकणार नाही हे आम्हाला माहीत आहे. अवैध धंदे शासनाने पूर्णपणे बंद करावेत अशी लोकांची मागणी आहे.

यावर उजनीचे श्री. सलीम शेख यांनी सांगितले की त्यांच्याकडचा एक जण बोरिवली उद्यानाच्या आत राहून दारूचा धंदा करतो तो सांगत होता की वनअधिकाऱ्याला दररोज ५०० रुपये द्यावे लागतात. इतके पैसे अधिकाऱ्याला मिळत असताना धंदा बंद होणार कसा?

भीमाशंकर अभयारण्यातील कोंडिबा तळपे यांनी मांडले – आमच्याकडे शेकरू या प्राण्याकरता अभयारण्य केले आहे. पण या प्राण्याला आमच्यापासून भय कधीच नव्हते. वनअधिकारी सांगतात की आम्ही आदिवासी लोक जंगलाचे नुकसान करतो. एकीकडे आम्हाला सांगितले गेले की आमच्या अधिकारांवर

बंधन येणार नाही पण आता आम्हाला सरपण आणायला, वनोपज घ्यायला बंदी केली जाते आहे. आम्ही मोठ्या प्रमाणावर वनउपजावर गुजराण करतो. जंगलाचे आणि आमचे नाते हे माय-लेकराचे नाते आहे. आम्ही कोकणातली आग आमच्या जंगलात पसरू नये म्हणून जाळरेषा उन्हाळ्याच्या सुरुवातीला करून ठेवतो. रात्री बेरात्री आग लागली तर धावून जाऊन विझवतोय. आमच्या जनावरांचा चारा जळून गेला तर आमची गुरे कुठे चरतील? आमची एक तरणी बाई दुपारी लागलेली आग एकटीने विझवताना जळून मेली. तिची पोरंलेकरं, नवरा, घर सारे आता उघडे पडले. रानडुकरे आमच्या शेतीवरच जगतात पण त्याची भरपाई आम्हाला मिळत नाही. ती आम्हाला मिळाली पाहिजे. वाघ आमची गुरे उचलतात. त्याची भरपाई आम्हाला मिळू शकत नाही. आमच्या जंगलाचे रक्षण आम्हीच करू शकतो. आमच्या जगण्याचा आधार आहे आमचे जंगल. ते वाचवण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करू. पण त्याचबरोबर आमचे जंगल आम्ही सोडणार नाही. तेथील आहुपे गावचे उपसंरपंच श्री. रमेश लोहकरे यांनी सांगितले की पर्यावरण वाचावे, पाऊस पडावा याकरिता जंगल वाचावे हे खरे आहे तसेच इथले लोक पण इथेच रहावेत. बाहेरून पर्यटक येतात, खूप नासधूस करतात. पण आम्ही नासधूस कधीच करत नाही, तर आम्हाला बाहेर हकलायच्या गोष्टी केल्या जातात. मंत्री, आमदार म्हणतात की आम्हाला यातले काही माहीत नाही. आदिवासी पट्ट्याकडे सरकारचे ध्यान नाही. आम्हाला वाटते मतदानच करू नये. राखीव जागा आहे पण लायक उमेदवार मिळत नाही.

कोयना अभयारण्य क्षेत्रात काम करणारे सत्यशोध संस्थेचे कार्यकर्ते श्री. अविनाश. बी. जे. यांनी सांगितले – कोयना अभयारण्याचा विस्तार ४२३ चौ. कि. मी. आहे. यात ५० गावे येतात. १२ हजार लोकसंख्या अभयारण्यात आहे. १९६० च्या सुमाराला कोयना धरणामुळे लोक उठवले गेले. काही बाहेर गेले. पुनर्वसन फारसे झालेच नाही. लोकांनी डोंगरावर जंगलात वसाहती केल्या. भूकंपाने लोक परत उद्ध्वस्त झाले. कोयना धरणामुळे, नंतर भूकंपामुळे आणि आता अभयारण्यामुळे लोक विस्थापित होत आहेत. १९८५ ला अभयारण्याची घोषणा झाली. लोकांना फारसे काही कळले नाही. सरकारने लोकांना समजावून दिले नाही. धरणाकरता संपादित केलेली जमीन – त्यातून जी उरली ती आज वनखात्याकडे आहे. ती वास्तविक मूळ मालकाला मिळायला हवी होती. त्याबद्दल आमची मागणी आहे. अभयारण्य झाल्यापासून लोकांना त्रास खूप वाढला आहे. वनखाते फार अन्याय करते आहे. मध सोसायटीचा एक मेंबर अभयारण्य क्षेत्राच्या बाहेर आहे. त्याला वनकर्मचाऱ्याने सांगितले की त्याच्या मधमाशा मध अभयारण्यातून आणतात त्यामुळे त्याने दंड दिला पाहिजे. संस्थेमार्फत लोकजागृती होऊन जेव्हा त्या भागात एक मोठी अभयारण्य परिषद झाली आणि

गावागावांतून लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला तेव्हापासून वनकर्मचाऱ्यांचा त्रास कमी झाला आहे.

वनखात्याने सर्व रस्त्यावर अभयारण्याचे मोठेमोठे बोर्ड लावले आहेत. त्यावर प्राण्यांची चित्रे आहेत. त्यामुळे लोक प्रथम घाबरले पण नंतर यावर विचार करून लोकांनी आपापल्या गावाच्या वेशीवर आपले बोर्ड लावले.

**इथले जंगल-जमीन-हवा-पाणी सारे आमचे आहे. आम्ही हे जपले आहे. शहरातले जंगल कुठे गेले ते सांगा. पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झालाय. पण आमचे जंगल आम्ही राखले आहे. ते आमच्या हातातून हिसकावले जाते आहे. मरेपर्यंत सत्याग्रहाने लढण्याचा आमचा निश्चय आहे.**

वनखात्याची हद्द दाखवणारे दगडी बुरूज असतात. आम्ही ३१ जानेवारी ९८ ला ९०० सह्यांचे निवेदन देऊन बुरूज तोडून टाकले. आम्हाला जन-अभयारण्य चालेल पण जनविरोधी अभयारण्य नको. आम्ही आमच्या चुलीकरता डोक्यावरून मोळी आणतो त्यावर वनखात्याचे लक्ष राहते पण या जंगलाला जो खरा धोका आहे त्यावर यांचे लक्ष नाही. कोकणाकडून लोटे परशुरामकडून येणारा काळा पाऊस जंगल टिकू देणार नाही. पूर्वेकडच्या भागात बॉक्साइटकरता संशोधन झाले आहे. महाबळेश्वर आता संपल्यात जमा असल्याने पर्यटन कोयनेच्या परिसरात घुसते आहे. कोयना धरणाची उंची वाढवण्याचा प्रस्ताव आहे. तसे झाले तर आणखी जंगल बुडेल. या सर्व आपत्तीने आमचे जंगल ग्रासले जाते आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्यातले जुने आणि जाणते कार्यकर्ते श्री. गनीसाहेब कलोट यांनी मांडले – प्रथम कोल्हापूरच्या छत्रपतींनी एक छोटे अभयारण्य केले. इथे चांगल्यापैकी जंगल होते. नंतर राधानगरी धरण झाले. धरणग्रस्तांचे पुनर्वसन त्या काळात होतच नसे. धरणग्रस्तांनी डोंगर चढून वर येऊन तिथे वस्त्या उभारल्या. राजरोस आणि चोरटी जंगलतोड गेली कित्येक वर्षं चालूच आहे. जंगल आक्रसत गेले तसे वन्य प्राण्यांना ठिकाण उरले नाही. त्यांच्या काही जाती नष्ट झाल्या. आता गवा रेडा आणि रानडुकरे शिल्लक आहेत. पुढे काळम्मावाडी धरण झाले. आणखी गावे विस्थापित झाली. जंगल बुडले. आता दोन धरणांनी या जंगलाला घेरले आहे. जे प्राणी पूर्वी सर्व भागात फिरत असत ते आता स्थानबद्ध झाले. गवा पूर्वी माणसांच्या वाऱ्याला थांबत नसे. आता तो राजरोस गावाजवळ फिरत असतो. हा भित्रा प्राणी आता निर्भय झालाय आणि जंगलात राहणारे लोक घाबरले आहेत. गवा हायवेवरच्या गाड्यांसमोर उभा रहातो. आता अभयारण्याचा विस्तार होऊन त्यात २८ गावे घेतली आहेत. या गावांचा विकास या विस्तारित अभयारण्यामुळे थांबला आहे. यामुळे लोकांची पुनर्वसनाची मागणी आहे. आम्ही मुळातले धरणग्रस्त असल्याने

आम्हाला पाण्याखालची जमीन मिळायला हवी. शासन म्हणते लोकांनी जमीन दाखवावी. ती आम्ही देऊ. लोकांना हे मान्य नाही.

आमच्याकडे बॉक्साइटच्या खाणी जंगलाच्या कडेला चालू आहेत. (अभयारण्याच्या आतल्या भागात इंडाला कंपनीने खाणीचे काम सुरू करण्याचा घाट घातला होता. त्यावर बरीच ओरड झाली. मुंबईच्या एका संस्थेने हायकोर्टात खटला दाखल करून हे खाणकाम बंद केलेय.) खाणीमुळे जंगलाचा विनाश होईल. मग वन्यजीव लोकांच्या शेतावर साहजिकपणे येतील. कायद्याने अभयारण्य क्षेत्रापासून २५ कि.मी. परिसरात खाणीचे काम करता येत नाही. परंतु सीमेवर दुर्गमानवाडला खाणीचे काम चालू आहे. फॉरेस्ट खाते काही करू शकले नाही.

लोकांना वनखाते त्रास देते, आश्वासने दिली तर ती पाळत नाहीत. आमच्या भागात पाण्याचे चांगले झरे आहेत. हे पाणी पाटाने किंवा नळाने गावात आणून वापरता येईल. परंतु याला वनखात्याची बंदी आहे. विहिरीवर मोटार बसवायची तर विजेची लाईन न्यायला वनखात्याची बंदी आहे. १९५८ ला छोट्या अभयारण्यात फक्त तीन गावे होती. नंतर १९८५ साली यात २८-२९ गावे सामील करण्यात आली. विचारणे-सवरणे, सांगणे वनखात्याच्या रीतीत बसत नाही. गावातली मुलकी पडही अभयारण्यात सामील केली आहे. १९३९ च्या युद्धकाळात कोळशाकरता इथे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाली. आजही चोरटी जंगलतोड चालू आहे. वनअधिकारी चर्चा करू म्हणतात पण नंतर भेटायचेही टाळतात. आमची मागणी आहे पुनर्वसनाची. अभयारण्यामुळे पर्यावरणसंरक्षण होणार आहे पण आमचेही संरक्षण झाले पाहिजे.

दुपारच्या सत्राचे अध्यक्षपद श्री. सलीम शेख यांनी स्वीकारले. या सत्रात श्री. बी. जे. अविनाश यांनी वन्यजीव (संरक्षण) कायद्याविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी मांडले – या कायद्यात पूर्वी वन्यप्राणी संरक्षण होते. आता यात वनस्पतींनाही संरक्षण दिले आहे. मी वकील नाही पण कार्यकर्ता म्हणून काम करताना या कायद्याचा अभ्यास करावा लागतो आहे. कायद्याची भाषा किचकट असल्याने ती समजणे कठीण जाते. शिवाय कायद्याबाबत काय भूमिका घ्यायची हे ठरवावे लागेल. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध असहकार, कायदेभंग करायचा तसेच कायद्याचा अभ्यास करून लढायचे आहे.

वन्यजीव कायद्यातील कलम १८ प्रमाणे संरक्षित क्षेत्राची अधिसूचना जाहीर होते. नंतर लोकांना नोटीस दिली जाते की त्यांनी आपल्या मालमत्तेची आणि हक्कांची माहिती चौकशी अधिकाऱ्यासमोर हजर करावी. मेळघाट अभयारण्यात काम करणाऱ्या एका संस्थेने गावागावांतून लोकांकडून त्यांच्या मालकीचे तसेच

पारंपरिक आणि सामूहिक वापराच्या हक्कांसंबंधीचे विस्तृत दावे हजर केले आहेत. आमच्या संघटनेचा निर्णय आहे की आम्ही सरकारचे फॉर्म भरून देणार नाही. अधिकाऱ्यांना आम्ही गावात येऊही देणार नाही.

सध्या या कायद्यात बदल करायची तयारी चालली आहे. १९५१ चा मुंबई राज्याचा कायदा होता. नंतर १९७२ ला देशाच्या पातळीवर कायदा तयार करण्यात आला. नंतर १९९१ मध्ये यात काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्यात ७ प्रकरणे आहेत. यातले चौथे प्रकरण अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यान यांविषयी आहे. प्रथम शासन अभयारण्य जाहीर करण्याचा मानस जाहीर करते. त्याची माहिती लोकांपर्यंत नेण्यासाठी यात तरतुदी आहेत. या क्षेत्रातील गावागावांतून नोटीस दिली पाहिजे, गावातून दवंडी पिटून लोकांना याची माहिती दिली पाहिजे. नंतर चौकशी अधिकारी – हा कलेक्टर वा त्याने नेमलेला अधिकारी असतो – लोकांना नोटीस देतो की त्यांनी दोन महिन्यांच्या काळात स्वतःच्या मालकी हक्कांची माहिती दिलेल्या नमुन्यात भरून दाखल करावी. लोकांचे परंपरागत आणि सामूहिक अधिकार यांची नोंद झाली नसल्याचे शासन मान्य करत नाही. चौकशी अधिकाऱ्याला चौकशीनंतर या संबंधात निवाडाही द्यायचा असतो की लोकांचे अधिकार मान्य करून त्यांच्यासकट हे अभयारण्य बनवायचे की लोकांना नुकसानभरपाई देऊन पुनर्वसित करायचे. यात दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की लोकांच्या मताला कुठे जागा नाही. (या कायद्यात शेवटी दोन अनुसूची दिल्या आहेत. यात प्राण्यांच्या शिकारीविषयीचे नियम आणि याद्या दिल्या आहेत.)

शासनाने पुनर्वसित करताना दिलेली भरपाई अमान्य असल्यास अपील करण्याचा अधिकार कलम २५ मध्ये दिलेला आहे.

वनअधिकारी, स्थावर मालमत्ताधारक आणि सार्वजनिक वाटांवरची रहदारी सोडून इतरांना अभयारण्यात बंदी आहे. (यात तेथे राहणाऱ्या लोकांचे नातेवाईकही येतात. सारिस्का राष्ट्रीय उद्यानात यामुळे हरिपुरा गावात बाहेरचे लोक मुलगी लग्नात द्यायला तयार होत नाहीत आणि त्यामुळे इथले बरेचसे पुरुष अविवाहित राहिले आहेत.) प्रकरण ६, कलम ५० प्रमाणे कायद्यानुसार गुन्हा घडला असल्यास घरात प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा अधिकार वनअधिकारी तसेच पोलीस सबइन्स्पेक्टरला आहे. (काही मागास भागात या कलमाचा उपयोग स्थानिक आदिवासींना हैराण करण्याकरिता, त्यांच्याकडून पैसे मिळवण्याकरता केला जातो आहे.)

अभयारण्य क्षेत्रात जर कोणा माणसाच्या ताब्यात प्राणी वा प्राण्याचे अवयव सापडले तर स्वतःचे निरपराधीपण सिद्ध करायची जबाबदारी त्या माणसावर आहे. कोयनेच्या क्षेत्रात माळदेव गावात एका धनगराला त्रास द्यायच्या उद्देशाने

वनकर्मचाऱ्यांनी त्याला प्रथम आपल्याबरोबर शिकारीसाठी उद्युक्त केले. नंतर रानडुकराचे मांस त्यांच्या घरात टाकून त्याला पकडले. कायदा, त्याचा हेतू आणि व्यवहार यात तफावत होते आहे. गार्डापासून कोणत्याही अधिकाऱ्याच्या कामात अडथळा आणणे हा गुन्हा ठरू शकतो. कलम ६० च्या प्रमाणे वनअधिकाऱ्याकडून झालेला गुन्हा सद्भावनेने झाला आहे असे सिद्ध झाल्यास तो गुन्हा नाही असे धरले जाते.

१९९१ची कायद्यातली दुरुस्ती लोकसहभागाची, संस्था किंवा व्यक्तीच्या सहभागाची अपेक्षा करते आहे. पण ती फक्त जंगलात होणाऱ्या चोरी-गुन्हे पकडण्याच्या संदर्भात. त्यांना बाकी कोणत्याही बाबतीत संस्था वा लोक सहभाग मान्य नाही.

या कायद्यात कुठेही लोकांच्या पारंपरिक जीवनशैलीचा उल्लेख नाही.

त्यात आणखी एका गोष्टीची भर पडली आहे. विश्व प्रकृती निधी (WWF) आणि ॲड. राज पंजवानी यांनी सुप्रीम कोर्टात जो खटला दाखल केलाय. यात वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीची मागणी केली आहे. संरक्षित क्षेत्रे-अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने निर्माण करण्याचे काम सर्व चौकशी आणि निर्णय होऊन अखेरची घोषणा करून स्थापित केली जावीत अशी मागणी या खटल्यात केली आहे. सुप्रीम कोर्टाने यावर सर्व राज्यांना आदेश दिला की एका वर्षाच्या काळात ही सर्व प्रक्रिया त्यांनी पूर्ण करावी. सप्टेंबर १९९८ ला ही मुदत संपते आहे. बऱ्याच राज्य सरकारांना हे करणे जमणार नाही.

चौकशी आणि निर्णय यात जिल्हाधिकाऱ्याचा शब्द अखेरचा असतो. त्याच्या आदेशानुसार भूमी संपादन केली जाते. भूसंपादनाचा जुना ब्रिटिशांच्या काळातला १८८४ चा कायदा आजही चालू आहे. यात लोकांच्या म्हणण्याला कुठेही वाव ठेवलेला नाही. बंगालमधील आराबारी प्रयोगातून संयुक्त वनव्यवस्थापनाचे प्रकल्प वनखात्याने सुरू केले आहेत. आमची मागणी आता संयुक्त संरक्षित क्षेत्र व्यवस्थापनाची आहे. कोयनेत लोकांचा सहभाग घेऊन अभयारण्य व्यवस्थापन करावे असा आमचा प्रस्ताव आहे. तिथल्या उपवनसंरक्षकांनी या बाबतीत संमतीही दर्शवली आहे.

यानंतरच्या चर्चेत सुप्रीम कोर्टातील खटला आणि वन्यजीव कायद्याविषयी चर्चा झाली. कुसुम कर्णिक यांनी मांडले की वन्यजीव कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी आयोग नेमलेला असताना आता कोर्टाने दिलेले आदेश घाईचे ठरतील. नोटिसांमध्ये लोकांना त्यांच्या मालमत्तेचे पैशात मूल्य द्यायला सांगितल्यावर लोकांनी त्याचा अर्थ विस्थापन होणार असा लावला तर ते चूक म्हणता येत नाही.

जंगल-जंगली जीव संबंध नाजूक आणि गुंतागुंतीचे आहेत.

मिग कारखाना वा पाण्यात मळी सोडणाऱ्या कारखान्याला कोणी थांबवू शकत नाही. फक्त गरिबांना उठवण्याची कारवाई होऊ शकते.

सरिस्का अभयारण्यात चाललेल्या संगमरवराच्या खाणी सुप्रीम कोर्टाने त्याच्या विरोधात निर्णय देऊनही बंद झाल्या नाहीत. उलट सुप्रीम कोर्टाच्या निरीक्षक संघावर कलेक्टरसमोर हल्ला करण्यापर्यंत खाणमालक असलेल्या धनदांडग्यांची मजल गेली. असे असताना स्थानिक लोकांनी २७ दिवस रस्ता रोकोचा सत्याग्रह करून खाणकाम बंद पाडले.

यानंतर बैठकीत नुकतेच हजर झालेले वनअधिकारी श्री. नितीन काकोडकर, उपवनसंरक्षक, ठाणे यांचे अध्यक्ष श्री. सलीम शेख यांनी स्वागत केले. श्री. काकोडकरांनी या बैठकीत सुरुवातीपासून लोकांची गाऱ्हाणी, अडचणी आणि विचार ऐकण्यासाठी जायला हवे होते असे सुश्री कुसुम कर्णिक म्हणाल्या.

श्री. काकोडकरांनी वनखात्याची बाजू मांडताना सांगितले – इथे चाललेली चळवळ चांगली आहे. पण यात एकच बाजू मांडली जाते. दुसरी बाजूही समजावून घेतली जावी. लोकांना भडकवू नये. जनजागृती आणि जनप्रक्षोभ यात फरक आहे. कायदा वनअधिकाऱ्यांनी केला नाही. तो देशाच्या जनतेने, लोक प्रतिनिधींनी बनवला आहे. कायद्यात त्रुटी आहेत. त्या बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. मी जेव्हा मंत्रालयात होतो तेव्हा बघितले आहे की अभयारण्य करा अशा लोकांच्या मागण्या येत असतात. यात निसर्गप्रेमी, पर्यावरणवादी तसेच राजकीय पुढारी असतात. पुढाऱ्यांना वाटते की या प्रकल्पामुळे त्यांचा फायदा होईल.

पर्यावरणाचा ऱ्हास व्हायला लागला, वन्य प्राण्यांच्या जाती नष्ट व्हायला लागल्या तेव्हा या दिशेने कायदा बनवला गेला. जैविक विविधता टिकवली पाहिजे. जैविक विविधतेत आपल्या देशाचा क्रमांक दहावा आहे. ही जैविक विविधता सुरक्षित कशी ठेवता येईल यावर विचार सुरू झाला आहे. आज देशात अशी संरक्षित क्षेत्रे फक्त ४ ते ५ टक्के जमिनीवर आहेत. या क्षेत्रांत गावे आहेत, लोक आहेत. तानसा अभयारण्यात ९१ गावे आहेत. फणसाडच्या परिसरात ३० हजार लोकवस्ती आहे. संरक्षित क्षेत्राची सीमा प्रत्यक्ष सीमेबाहेर ५ ते १० कि.मी. धरली जाते. क्षेत्र संरक्षित करण्यासाठी प्रभाव क्षेत्राचा म्हणजे या ५ ते १० कि.मी. परिघापर्यंतच्या क्षेत्राचा अभ्यास केला जातो. मेळघाट अभयारण्यात ५९ गावे होती. पुनर्रचना करताना काही क्षेत्र वगळले त्यामुळे आता यात २२ गावे आहेत. अभयारण्यातून विस्थापन आवश्यक नाही. तानसा अभयारण्यात आता फक्त राखीव वनक्षेत्र घेतले आहे. गावाचे क्षेत्र यातून वगळलेले आहे. कायदा समजून घ्यायला हवा. लोकांची दिशाभूल करून त्यांना भडकवू नये. मेळघाट राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेवर (याचे नाव गुजामल राष्ट्रीय उद्यान असे

आहे) ६ गावे आहेत. या फक्त ६ गावांचे पुनर्वसनही सोपे नाही. यासाठी लोक सहमती आवश्यक आहे. सहमती मिळताना खूप काळ लागतो. लोक तयार झाले तरी परत मत बदलतात. कायद्यानुसार आता संरक्षित वनक्षेत्र विस्थपितांच्या पुनर्वसनासाठी वापरता येईल. या पुनर्वसनासाठी पैशांची तरतूद केंद्र शासन करते. आदिवासींसाठी कुटुंबामागे एक लाख रुपयांची याकरता तरतूद आहे. आणखी पैसे राज्यसरकारकडून मागावे लागतील. पैसे मंजूर होऊन हातात येण्याच्या प्रक्रियेला वेळ लागतो. त्यातच लोक बदलतात. अडचणी वाढतात, कुटुंबे वाढतात, त्यामुळे मागणी वाढत जाते. पुनर्वसन अवघड होत जाते. गावाचे क्षेत्र जर संरक्षित क्षेत्रातून वगळलेले असेल तर पुनर्वसनाची, चौकशीची गरजच नाहीये. तसंच मुख्य वनसंरक्षकांच्या सल्ल्यानुसार लोकांचे अधिकार अबाधित राहू शकतात. चराईबंदी व्हायलाच हवी असे नाही.

पाण्यावर मासेमारीचे अधिकार यासंबंधी दोन क्षेत्रांत – पेंच आणि मालवण भागांत – वाद आहे. मालवणमध्ये किनाऱ्यावर मच्छिमारी होत नाही. आत जायला मार्ग देता येईल. पूर्ण मुभा द्यायचाही विचार चालू आहे. सागरी जीव वाचवण्याचा प्रश्न आहे. नुकत्याच नागपूरच्या वनखात्याच्या कार्यशाळेत यावर चर्चा झाली आणि सर्व क्षेत्रात लोकांशी चर्चा व्हायला हवी असे ठरवले गेले. सहव्यवस्थापनाचे तत्त्व आता संरक्षित क्षेत्रातही मान्य होते आहे. वनअधिकारीही तुमच्यातला एक असतो. चुका होत असतात, अहंकारही आहेत पण आता परिस्थिती बदलते आहे.

पूर्वी वनग्रामे होती. या गावांत सर्व व्यवस्था वनखाते करत असे. लोक सहभाग देत असत. जंगलात आग लागली तर लोक विझवायला जात असत. रेंजरला बरेच अधिकार होते. तो सर्व ठरवत असे. आज आमच्या हातात काही उरले नाही. आम्ही फक्त बंदी-प्रतिबंध करू शकतो. हे खरे आहे की परत वनग्रामे करता येणार नाहीत. सध्या ग्रामविकास योजना, परिसर विकास योजना आखल्या जात आहेत. सरपणाला पर्याय मिळू शकेल यावर काम चालले आहे. सरपण वाचवण्यासाठी बिनधुराची चूल, सौर ऊर्जा, गॅस असे पर्यायही विचाराधीन आहेत. छोटीशी सुधारणा होऊन आठवड्याला बाई तीन वेळा रानात सरपणाला जाण्याऐवजी दोन वेळा गेली तरी माझे १/३ लाकूड वाचेल. (अधिकाऱ्यांना अजूनही जंगल त्यांचे वाटते आणि लोकांचे आहे असे वाटत नाही.) लोकांना पर्यायी उपजीविकेसाठी धंदे देता येतील. यातून जंगल वाचू शकेल, आज लोक गॅस घ्यायला तयार आहेत. पहिले खरेदीचे पैसे वनखाते भरेल. नंतरचे १३५ रु. प्रती सिलेंडर लोक भरायला तयार आहेत. (हा गॅस वापरणे लोकांना परवडणार नाही, तो उपयोगाचा होणार नाही. त्यामुळे लोक तो बाहेर स्वस्तात विकून टाकतील. शिवाय या प्रकारात भ्रष्टाचार होईल तो

वेगळाच. पण जागतिक बँकेचा पैसा आहे, बँकेला यातली समज नाही. त्यामुळे सारा आनंद आहे.) अशातून जंगलावरचा ताण कमी होईल. असे पर्याय उपलब्ध करून दिले जातील.

तानसा अभयारण्यात ग्राम संरक्षक समित्या बनवल्या आहेत. आमचे प्रयत्न फार तोटके आहेत हे खरे आहे. पंचवार्षिक योजनेत प्रत्येक विभागाला बजेट मिळते. सध्या आठवी पंचवार्षिक योजना चालू आहे. यात वनखात्याचे बजेट मात्र १% आहे. पाकिस्तानात हे बजेट ४ ते ५% आहे.

आजही वनअधिकाऱ्यांना लोकांच्यात जायला नको असते हे खरे आहे.

मालवणच्या लोकांनी मांडले की वनखात्याचा आमच्याशी संपर्कच नाही. आम्हाला न विचारता बोर्ड लावले गेले. त्यामुळे आता संघर्ष उग्र होणार आहे. यावर काकोडकरांनी सांगितले की तुमच्या भावना आम्ही वरती कळवू.

भीमाशंकरच्या लोकांनी मांडले – ओसाड जमिनीवर काही केलेत तरी जंगल लागू शकत नाही पण तिथे भात खाचर तयार करून आम्ही भात पिकवू शकतो. आमची उताराची जमीन वनखात्याने घ्यावी आणि अशी जमीन बदल्यात द्यावी. यावर काकोडकरांनी मांडले की फणसाड अभयारण्यातल्या लोकांनीही अशीच अदलाबदल मागितली आहे.

गौताळ्याच्या लोकांनी मांडले की अगोदर लोक अडाणी, त्यात कायदे फार गुंतागुंतीचे आहेत. ते आम्हाला कोणीही समजावून देत नाही.

नांदूर मधमेश्वरच्या सोनवणेंनी मांडले – आम्ही गेली कित्येक वर्षं इथे गाळपेराची शेती करतो आहोत. मोठी जनसंख्या उपजीविकेसाठी या क्षेत्रावर अवलंबून आहे. हे क्षेत्र आजच्या कायद्याला अनुसरून अभयारण्याकरता योग्यच नाही. आम्ही आमची जमीन सोडू शकत नाही. आम्ही प्रखर आंदोलन करू. कष्ट आम्ही करतोच आहोत. कष्टाला वा त्रासाला आम्ही तयार आहोत. ३५,००० लोकांना बेकार आणि निराधार बनवणारे हे अभयारण्य करता येणार नाही. आम्ही उठवले गेलो तर आम्हाला अवैध धंदे करण्यापलीकडे पर्याय उरणार नाही. पूर्वी आमच्याकडे बरेच काळवीट होते. पक्षीही भरपूर येत होते. पण मधल्या काळात उन्हाळ्यात बांधात पाणी राहात नसे आणि मग प्राणी, पक्षी साहजिक कमी झाले. मिग विमानांचा पक्ष्या-प्राण्यांना त्रास आहे. या परिस्थितीचा विचार करायला हवा आहे. पक्षी आणि आम्ही एकत्र नांदू शकतो. स्थानिक जनतेचे हे म्हणणे आहे. अभयारण्याची आमची मागणीच नाही. मागणी-पुरवठ्याचे तत्त्व बघायचे तर सरकारने आमच्याकरता संघर्षाचा पुरवठा कशासाठी केलाय? आम्ही तर मागितला नव्हता संघर्ष.

काकोडकर – या अभयारण्याचा हेतू महत्त्वाचा आहे. भारतात भरतपूरच्या अभयारण्यात पक्षी मोठ्या प्रमाणावर येतात. तसेच ते नांदूर मधमेश्वरलाही

येतात. हे पक्षी हिवाळ्यात जास्त येतात. त्याकरता हे अभयारण्य करणे महत्त्वाचे आहे. (भरतपूर अभयारण्यातून लोकांची गुरे चरायला बंदी केल्यापासून तेथे येणाऱ्या पक्ष्यांची संख्या घटली आहे हे आता शास्त्रज्ञ मान्य करतात, अजून वनखाते हे लक्षात घेत नाही.)

गावकरी – आम्ही शेती कित्येक वर्षे करतो आहोत. शेतीमुळे पक्ष्यांच्या संख्येत फरक पडत नाही.

काकोडकर – शेतीमध्ये खते, जंतुनाशके वापरली जातात.

पिठे – शेती फक्त गाळपेरातच होते असे नाही. बाजूचे सर्व क्षेत्र शेतीचे आहे. तेथे खते जंतुनाशके वापरली जातात, ती तुम्ही थांबवू शकत नाही. आमच्या शेजारच्या क्षेत्रावर तुम्ही बंधने घालणार का? साखर कारखान्याचे सांडपाणी नदीत सोडले जाते ते बंधाऱ्यात येते. त्याच्यामुळे पाणी प्रदूषित होते त्याच्याबद्दल काय?

वनअधिकारी – हे प्रश्न तुम्ही मांडले पाहिजेत.

पिठे – कुठे मांडायचे? कोण आम्हाला विचारते आहे? अभ्यास न करता अभयारण्य बनवले गेले आहे.

अधिकारी – सलीम अली यांनी या अभयारण्याचा प्रस्ताव मांडला होता. वन्यजीव सल्लागार मंडळात त्याची चर्चा झाली असणार. प्रस्ताव प्रथम त्यांच्याकडे जातात.

कुसुम कर्णिक – लोकांना न सांगता, न विचारता वन्यजीव सल्लागार मंडळात हा प्रश्न विचाराकरतासुद्धा पाठवला नाही पाहिजे.

रमेश – बाहेरचे लोक काहीही न विचारता, न विचार करता गोष्टी कशा सुचवतात? ही लोकशाही कशी काय म्हणायची? हा विषय पंतप्रधानांपर्यंत नेला पाहिजे. आम्हाला जणू हक्कच नाहीत.

यानंतरच्या चर्चेत लोकांनी पुढील मुद्दे मांडले – सूचना लोकांपर्यंत कधीच पोचवली जात नाही. लोकांशी चर्चा आणि विचारविनिमय होत नाही. धरणे वा अभयारण्ये बाहेरच्या लोकांच्या आणि आमदार मंत्र्यांच्या फायद्याकरता होतात. स्थानिक लोकांना फक्त त्याची झळ पोचते. आमचे परंपरागत अधिकार मानले जाणार का?

अभयारण्यासंबंधी माहिती मिळवणे अतिशय अवघड जाते. लोकांना वर माहिती मिळूच शकत नाही. वनविभाग याविषयी मदत करत नाही. आम्हाला चौकशी अहवाल मिळू शकत नाहीत. कधी सांगतात की ते पब्लिक डॉक्युमेंट आहे तर कधी ते गोपनीय असल्याचे सांगून नाकारले जाते. याबाबत काय ती निश्चित माहिती मिळायला हवी.

गनीसाहेब कलोटांनी राधानगरी अभयारण्याविषयी सांगितले की विस्थापन

आणि पुनर्वसन या प्रक्रियांमध्ये फरक आहे. पुनर्वसनात फक्त खाजगी मालकीच्या बाबी धरल्या जातात. आमचे सामूहिक, सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक हक्क लक्षात घेतले जात नाहीत. आमच्या आजूबाजूच्या परिसरावर, नैसर्गिक संसाधनांवर आमचा अधिकार आहे.

पुनर्वसन फार संकुचितपणाने होते. आमचे सर्व अधिकार आम्ही सांगू. लोक माहिती देऊ शकतील. पण सरकार ती मान्य करणार का?

यानंतर टाटा समाजशास्त्र संस्थेचे डॉ. परशुरामन यांच्या हस्ते श्री. अविनाश बी. जे. यांच्या जनतेची जंगल पुस्तिका मालेतील ‘कायद्याचा सापळा’ या पुस्तिकेचे प्रकाशन झाले.

यानंतर पुढील ठराव पारित करण्यात आले.

१. स्थानिक लोकांच्या सहभाग व मान्यतेशिवाय शासनाने अभयारण्य बनवण्याची प्रक्रिया सुरू करू नये.

२. अभयारण्याबाबत स्थानिक लोकांचे सर्व हक्क अबाधित ठेवून त्यांना सर्व प्रक्रियांमध्ये सहभागी करून वन्यजीव संरक्षण कायदा लागू करावा.

३. अभयारण्याकरता स्थानिक माणूस विस्थापित होणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी.

४. मालवण तसेच पेंच अभयारण्य क्षेत्राचा अभ्यास करून लोकांच्या उपजीविकेचे साधन असलेली मासेमारी कशा प्रकारे चालू ठेवता येईल याविषयी लोकांशी चर्चा करून शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

५. राधानगरी अभयारण्याच्या सीमेवरील बॉक्साइट खाणींचे काम पर्यावरणाला नुकसानकारक असल्याने त्वरित बंद करावे.

यानंतर टाटा समाजशास्त्र संस्था, डॉ. परशुरामन, ऑक्सफॅम (नागपूर), वनअधिकारी तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानले गेले आणि बैठक समाप्त झाली.

□

## संपर्कासाठी पत्ते

१. भीमाशंकर अभयारण्य - श्री. ढवळा मंबाजी गवारी, मु. पिंपरगणे, पो. तिरपाड, ता. आंबेगाव, जि. पुणे ४१०५०३

२. बोरिवली राष्ट्रीय उद्यान - नितीन शिंदे, सी. सी. डी. ट्रस्ट, पाली-चिंबई म्युनि. शाळा, खोली नं. ८, सेंट जोसेफ रोड, चिंबई, बांद्रा (प.), मुंबई ४०००५०, फोन : ०२२-६४४३३४५

३. गौताळा औतराम अभयारण्य - बद्रीनाथ कत्तारे, द्वारा आदिमजाती सेवा मंडळ, डॉ. टी. एस्. पाटील, कन्नड, जि. औरंगाबाद ४३११०३

४. कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य - श्री. जोशी, द्वारा सत्यनिकेतन, राजूर, ता. आकोले, जि. अहमदनगर ४२२६०४

५. कोयना अभयारण्य - अविनाश बी. जे., सत्यशोध, कोरेगाव, जि. सातारा ४१५५०१, फोन : ०२१६३-२००२०

६. मालवण सागरी अभयारण्य - रमेश धुरी, द्वारा बॅ. नाथ पै सेवांगण, मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६०६, फोन : ०२३६५-५२२५०

७. नांदूर मधमेश्वर अभयारण्य - गंगाधर रामचंद्र सोनावणे, चापडगाव, पो. करंजगाव, ता. निफाड, जि. नाशिक / प्रभाकर पिठे, कोढूरे, ता. निफाड, जि. नाशिक

८. राधानगरी अभयारण्य - गनीसाहेब कलोट, फेजिवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

९. भीमाशंकर अभयारण्य - कुसुम कर्णिक/आनंद कपूर, शाश्वत, मंचर, जि. पुणे ४१०५०३, फोन : ०२१३३-२३६०८

१०. उजनी अभयारण्य - सलीम शेख, कार्यवाह, विश्वभारती, ८२४ कसबा पेठ, इंदापूर, जि. पुणे ४१३१०६, फोन : ०२१११-२३३६९

११. आशिष कोठारी, कल्पवृक्ष, श्री दत्त कृपा, ९०८ डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, फोन : ०२०-३५४२३९

१२. श्री. माधव गोगटे, मुख्य वनसंरक्षक, नागपूर

देणगी मूल्य रु. ५/-

प्रकाशक : कुसुम कर्णिक, शाश्वत, मंचर, जि. पुणे ४१०५०३

मुद्रक : अक्षरछाया, २०३५ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११०३०

उठा, जागे व्हा, आणि संघटित व्हा

अभयारण्य क्षेत्रातील भाऊ बहिनींनो !

# गौताळा अभयारण्य

## माणसं जगविण्यासाठी की वनखाते पोसण्यासाठी ?



दि. १, २ व ३ सप्टेंबर २०००

## महाराष्ट्र राज्य अभयारण्य परिषद (चौथी)

''जैन कॉम्प्लेक्स'' कन्नड, जि. औरंगाबाद.

**आदिम जाती सेवा मंडळ, कन्नड जि. औरंगाबाद**

(रजि. एजीडी १७/७०/एफ२४५)

**आदिवासी ढोर न्हाय, माणूस हाय, माणूस हाय,**

**भीक नको, हक्क हवाय, हक्क हवाय**

# • आमच्या मागण्या •

- अभयारण्य परिसरातून माणसांना (आदिवासी अन्य जाती जमाती) हुसकावून लावू नये. स्वातंत्र्य, अभयारण्य शासन वा कायदे हे माणसासाठी आहेत, म्हणून माणूस हा केंद्र बिंदू असावा.
- या परिसरातील सर्व आदिवासी जमातींची नोंद घेवून, त्यांना जातीची प्रमाणपत्रे द्यावीत.
- अभयारण्य बाबतीला संपूर्ण खर्च, नियाजेन, विविध योजना, उपक्रम ह्यात पारदर्शकता असावी. वेळोवेळी स्थानक वृत्तपत्रांतून, बैठकीतून, सभांमधून त्यांना प्रसिद्धी मिळावी.
- अभयारण्य परिसरात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासींची नोंद घेवून त्यांच्या राहण्याच्या व कसण्याच्या अतिक्रमित जमिनी प्रमाणीत करुन त्याचें नांवे करावेत.
- अभयारण्य क्षेत्रातील प्रत्येक योजनेत स्थानिक लोकांना सहभागी करुन घेवून त्यांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा.
- अभयारण्य क्षेत्रातील श्रद्धास्थाने ही या विभागाने जपावित, त्यांना संरक्षण देवून पावित्र्य राखावे जेणे करुन श्रद्धास्थानाच्या निमित्ताने अधिक पर्यटक आल्कृष्ट होतील. ऐन मध्यवर्ती अभयारण्यात गार्ड लोक न भीता थांबूही शकतील.
- स्थानिक, ऐतिहासिक रस्ते, किल्ले, वास्तू, भुयारे, मंदिरे याचें संरक्षण करुन त्यांच्या संशोधनास प्रोत्साहन द्यावे.
- अभयारण्य परिसरातील मूळच्या वनस्पती आणि वनौषधी यांच्या लागवडीत प्रोत्साहन देवून त्यांचे जतन व संशोधन व्हावे.
- वनोपजावर स्थानिक लोकांचा पिढ्यान्‌पिढ्या असणारा हक्क हा अबाधित ठेवावा, जनावरे चारतांना, रान केळीची पाने वापरतांना, लाकूड - फाटा वा पाने-फुले घेतांना घेतले जाणारे हप्ते त्वरीत बंद करावेत.
- वन व वनोपजांचा पारंपारिक वापर करतांना वनअधिकाऱ्यांनी वेळोवेळी त्रास देवून आदिवासींच्या हक्कावर अतिक्रमण करु नये.

# गौताळा अभयारण्य माणसं जगविण्यासाठी की वनखाते पोसण्यासाठी ?

"दि. १, २ व ३ सप्टेंबर २००० (चवथ्या) महाराष्ट्र अभयारण्य परिषद निमित्ताने गौताळा ऑट्राघाट अभयारण्य परिसरातील समस्त भूमिपुत्रांचे गाऱ्हाणे"

बद्रिनाथ कतारे
सचिव, आदिम जाती सेवा मंडळ

कमा चिमादोरे
अध्यक्ष, आदिम जाती सेवा मंडळ

डॉ. टी. एस. पाटील
कार्याध्यक्ष, आदिम जाती सेवा मंडळ

प्रा. डॉ. रमेश सूर्यवंशी
अभ्यासक/संशोधक कन्नड कॉलेज

**(केवळ खाजगी वितरणासाठी)**

◆ प्रकाशक ◆
पांडु किसन कडाळे
(सरपंच, चिवळी ता. कन्नड)

● आदीम जाती सेवा मंडळ, कार्यकारी मंडळ ●

| | |
|---|---|
| सुक्राम महादू उघडे | रावजी सोमा पथवे |
| सुखलाल रामसिंग सोनवणे | कमलाबाई बद्रिनाथ कत्तारे |
| तात्याराव संपतराव कदम | काळु खेमा पथवे |
| सनाबाई काभू आघान | तुळशीराम पिलाजी खडके |

## गौताळा अभयारण्यामुळे निर्माण झालेल्या समस्या हा प्रश्न शासनाच्या कानावर नाही असे नाही - कारण हा काही पत्रव्यवहार

- दि. १८ एप्रिल १९९७ - डॉ. टी. एस. पाटील, सचिव समाजकल्याण - मंत्रालय विस्तार भवन मुंबई.
- दि. २५.१२.१९९६ - सर्व वृत्तपत्रे व संबंधित मंत्री - करंजखेड सभेत निवेदनपर पत्र, आदिम जाती सेवा मंडळ.
- दि. ११ ऑक्टो. १९९७ - कै. बाळासाहेब पवार यांनी संबंधितांना पाठविलेली पत्रे.
- दि. १७ नोव्हें. १९९९ - हिमाचल प्रदेश वनमंत्री मा. रुपसिंह यांना व संबंधितांना निवेदन पत्रे.
- दि. १४ जाने. २००० मा. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री यांना डॉ. रमेश सुर्यवंशी यार्चे पत्र.
- दि. २४.१२.९७ - उपविभागीय अधिकाऱ्यांच्या जाहिर प्रकरणांवर आक्षेप,आदिम जाती सेवा मंडळ.
- दि. १०.११.९७ श्री. गोविंदस्वरुप साहेब, सचिवालय, यांना कै. बाळासाहेब पवार यांचे पत्र.

## • शासनातर्फे आलेली काही पत्रे •

- दि. २८ फेब्रु. १९९७ - समाजकल्याण, मंत्रालय विस्तार भवन जा. क्रं. सीबीसी - १०९७/३५०/प्र.क्र.५७/ मावक - ५.
- दि. ५.३.९७ मनोहर जोशी मुख्यमंत्री क्र. मुसंस/संकिर्ण/१६६/९७.
- दि. १७.११.९७ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास प्रकल्प औरंगाबाद क्रं. १०९७/निरि/का-४/२६३७
- दि. २८.१०.९७ प्रकल्प अधिकारी, ए. आय. वि. प्र. औ,बाद यांचे संचालक आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांना पत्र मु. संकिर्ण १०९०/का-४/ कां-४/९७/२६०७
- दि. १८ ऑक्टो. ९७ अव्वर सचिव, श्री. वि. श्री. कायंडे, मुख्यमंत्री सचिव, क. मुसंस/सकावि/३१७१
- दि. ११.११.९७ समर्थन, मुंबई यांचे कै. बाळासाहेब पवार यांना पत्र.
- दि. १६.९.९७ व दि. ९.७.९७ - जा. क. ९७/एमजी/कावी, मा.तहसीलदार यांना सिल्लोडहून उपजिल्हाधिकाऱ्यांनी पाठविलेले पत्र.

## महाराष्ट्र राज्य अभयारण्य परिषदेच्या (४ थी) निमित्ताने

# दोन शब्द

''गौताळा ऑट्रमघाट-अभयारण्य'' या नावाने कन्नड परिसरातील २६० चौरस किलोमीटरचे क्षेत्र. राज्य शासनाने १९८६ मध्ये सुरक्षित क्षेत्र म्हणून अधिसूचित केले आहे. नेहमी प्रमाणे अभयारण्याची घोषणा करतांना वा निर्णय जाहिर करण्यापूर्वी स्थानिक लोकांना मुळीच विश्वासात घेतलेले नाही. उलट शासनाची माहिती जनतेपर्यंत पोहचू दिली नाही. अभयारण्याचे फायदे तोटे याविषयी स्थानिक जनसमूहाशी कोणत्याही प्रकारचा सुसंवाद साधून चर्चा केलेली नाही.

दि. २५.१०.९७ रोजी जाहीर केलेल्या जाहीर प्रगटनाद्वारे कन्नड तालुक्यातील २२ गावांतील एकूण १४,६४४ हेक्टर जमिनीवर वनोत्तर कामास बंदी घालण्यात आली. या जाहीर प्रगटनाची प्रत आणि त्यात असलेला मजकूर सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवू शकलेला नाही. काहींनीच आपले हक्क, हित संबंध याविषयी दावे दाखल केलेले आहेत.

या अभयारण्यामुळे फक्त आदिवासी, दलित, मागासवर्गीय यांचेच प्रचंड नुकसान होत आहे. हा गोड गैरसमज आजही गावागावातील, वाडी वाडीवाडीतील सर्वसामान्य नागरिकांत पसरला आहे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की डोंगरात राहणारे आदिवासी मागासवर्गीय यांच्या सोबतच कन्नड तालुक्यातील साधारणतः २२ गावांच्या परिसरात राहणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्यांना सुद्धा या अभयारण्यासाठी जबर किंमत मोजावी लागत आहे. या गावांमध्ये आंबा, कळंकी, वडनेर, उपळा, अंधानेर, गौताळा, हिवरखेडा, ब्राम्हणी, मोहर्डा, निंभोरा, तपवोन, उंबरखेड, चिमणापूर वाडी, चिमणापूर, खोलापूर, मेहून, गोपेवाडी, लोंजा, हरसवाडी, सायगव्हाण, भिलदरी, हसनाबाद या गावांच्या परिसरांचा समावेश होतो. या अभयारण्याच्या कायद्यानूसार अभयारण्य क्षेत्र परिसराला संपूर्ण कुंपण घालून त्यात माणूस आणि त्याचे पाळीव प्राणी यांना प्रवेशास संपूर्ण बंदी आणली गेली आहे. यामुळे या परिसरात शेतकरी, शेतमजूर, वनोपजनांवर जीवन जगणारे आदिवासी आणि इतर मागासवर्गीय यांना प्रवेश करता येणार नाही. यात प्रवेश असेल फक्त तो शहरातून मौजमजा करण्यासाठी आलेल्या युवक युवतींनाच. **अभयारण्यांने आपल्याला काय दिले ? या प्रश्नाचे उत्तर तितकेसे समाधानकारक कोणालाही देता येणार नाही. मात्र अभयारण्याने आपल्या परिसरातील जनतेचे काय हिरावून नेले ह्या बाबीचे सविस्तर उत्तर देणे शक्य आहे.**

## • अभयारण्यामुळे वहीवाटीचे रस्ते गेलेत •

अभयारण्य क्षेत्रातील कन्नड तालुक्यातील या २२ गावातील शेतकऱ्यांच्या शेतात जाणारे वहीवाटीचे रस्ते या अभयारण्य कायद्यामुळे बंद झालेत. माळरानावर असलेल्या आपल्या शेतजमीनीत गुरे, अवजारे घेवून अअभयारण्याच्या क्षेत्रातून जाण्यावर बंदी आली आहे. दोन गावांना जोडणारे परंपरागत वहीवाटीचे रस्ते सुद्धा या अभयारण्य क्षेत्रात गेल्यामूळे बंद करण्यात आले असून माणसामाणसातील संपर्क सुद्धा तोडण्यात आला आहे. निंभोरा ते उंबरखेडा, तपोवन ते निंभोरा, वाडी ते तपोवन, तपोवन ते रामपूरवाडी, उंबरखेडा ते वासडी, खोलापूर ते गोपेवाडी हे वहीवाटीचे रस्ते आता माणसांना वापरता येणार नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य गरीब जनतेचे कृषि कार्यात, सोयरीकत संबंधात, कमी वेळातील दळवळणाच्या सोयीमध्ये बाधा येवून त्यांची कायमची अडचण झाली आहे.

## • अभयारण्यामुळे ऐतिहासिक पुरावे नष्ट होणार •

आपल्या इतिहासाची साक्ष देणारे आणि इतिहास संशोधनास उपयुक्त असणारे जुने अवशेष तर या अभयारण्यामुळे नष्ट तर होणारच शिवाय त्या कायद्यांच्या बंधनामुळे या परिसरातील इतिहास संशोधन कायमचे बंद पडेल. या परिसरात डॉ. शंकर अण्णा साळी यांनी पाटणे परिसरातील मानवी वसाहतीच्या इतिहासावर संशोधन केले. यापरिसरातून दक्षिण पथाचा मार्ग गेलेला होता. यांच परिसरात इतिहास प्रसिद्ध पितळखोरा लेण्या आहेत. त्या शिवाय धारेश्वर लेण्याही आहेत. किलेअंतूर आणि अनेक हेमाडपंथी मंदिरे, दंदकथा असणारी भुयारे आहेत. तेथे प्रत्यक्ष जावून संशोधन करणे, त्याचें जतन करणे, अभयारण्य कायद्यामुळे शक्य होणार नाही. सिताखोरी, टपाल्याघाट, गौतमऋषी आश्रम, सितान्हानी, भवानी मंदिर येथे ऐतिहासिक संशोधन होणे गरजेचे आहे. मात्र ते अभयारण्य कायद्यामुळे बंद पडणार. या भूभागात असणारे अनेक ऐतिहासिक अवशेष संशोधनाशिवाय काळाच्या ओघात नष्ट होणार.

## • स्थानिक वनस्पती व नैसर्गिक डोंगराला धोका •

अभयारण्य घोषीत झाल्यानंतर त्या ठिकाणी असणाऱ्या स्थानिकच्या वातावरणात नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या वनस्पती आणि वनौषधी यांचे संवर्धनाचा कुठलाही कार्यक्रम या खात्याकडे नाही. याउलट प्रचंड वृक्ष तोड झाल्याने दिसेल त्या जागी सागाची झाडे लावण्याचा सपाटा सुरु आहे. त्यामुळे त्या झाडांच्या पानगळीनंतर बीया भाजण्यासाठी जंगलात लावली जाणारी आग आणि त्या झाडांच्या रुंद पानांमूळे सतत राहणारी सावली यामूळे या परिसरातील मूळ, स्थानिक औषधी व कंदमूळे ही नष्ट होण्याच्या मार्गावर

आहेत. ही स्थानिक लोकांच्या दैनंदिन उपयोगाची वनसंपदा नष्ट करुन कारखानदार आणि शहरवासीय यांना फर्निचर पुरविण्यासाठी सोने म्हणून गणला जाणारा साग सर्व जोपासला जात आहे.

## • परिसरातील शेतजमीनींना धोका •

अभयारण्य परिसर घोषित झाल्यामुळे या परिसरातील अभयारण्यात राहणाऱ्या आदिवासींना हुसकावून लावले जाणार, हे आदिवासी अतिक्रमीत जमीनी करुन वेळापज गोळा करुन शिकार करुन पोट भरत, पिढ्यान्‌पिढ्या जगत होते. त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या कसत असलेल्या जमिनी हिसकावून घेवून त्यांना पोटभरण्यासाठी शासन कोणते साधन उपलब्ध करुन देणार ? उपाशीपोटी इतरांकडचे हिसकावून खाण्याचा विचार त्यांनी करावा काय ?

जंगलात राहून जंगलातील रानडुक्कर सारख्या प्राण्यांची ते शिकार करुन खात. अभयारण्य कायद्यामुळे ह्या शिकारीवर संपूर्णबंदी आल्याने रानडुकरांच्या संख्येत दरवर्षी प्रचंड वाढ होत आहे. या रानडुकरांनी जंगलातील जमीन उकरुन कंदमुळे खावून संपविल्यामुळे वा कंदमुळेच तेथे शिल्लक नसल्यामुळे, परिसरात शेतमालाचे प्रचंड नुकसान सुरु केले आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीतील उभ्या पिकांचे नुकसान ही रानडुकरे करीत आहे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवायचे, त्यांची संख्या मर्यादित ठेवण्याचे कोणतेही नियोजन या खात्याकडे नाही. त्यामुळे येत्या काही वर्षात परिसरातील कोणत्याही शेतजमिनीत रानडुकरांमुळे कोणतेही पीक येवू शकणार नाही.

जंगलात फक्त सागासारखीच झाडांचे संवर्धन सुरु असल्याने प्राण्यांना, पक्षांना उपयुक्त फळझाडे, मूळे, पाने या जंगलात न मिळाल्याने माकडे, निल गाई, हरण, ससे, मोर, रानडुकरे ही शेतजमिनीकडे आकर्षिली जावून शेतीचे दिवसेंदिवस नुकसान करीत जाणार आहेत.

जंगलाच्या आणि वन्य प्राण्यांच्या वाढीसाठी, त्यांच्या विकासासाठी कोणतेही नियोजन नसल्याने केवळ आंधळेपणे कायद्याची अंमलबजावणी केल्याने माणूस हा अभयारण्यासाठी की अभयारण्य हे माणसासाठी हे आकलन होणार नाही.

## • अभयारण्यात गेलेली श्रध्दास्थाने •

आपल्या सांस्कृतितील सन वार उत्सव आणि देव देवता यांचे निसर्गाशी नाते जोडलेले आहेत. ऋषिपंचमी, पोळा, पोळ्याची कर या सारख्या विविध सणांना ग्रामीण आणि आदिवासी जनतेची आपल्या श्रध्दास्थानाला भेट देण्याची अतूट इच्छा असते. श्रध्दास्धानाच्या निमित्ताने आपले जंगल तो डोळे भरुन पहात असतो. त्याची श्रद्धास्थानेच जर जंगलात नसली तर तो वेळ काढून मुद्दाम जंगलात येणार ही नाही. अपल्या परिसरातील या

अभयारण्य क्षेत्रात हिंदु, मुस्लिम यांची बरीच श्रध्दास्थाने आहेत. त्यात गौताळा, गौतम ऋषी आश्राम, काले सय्यद मियां दर्गाह, कालीमाता मंदिर, मारोती मंदिर, सीता न्हानी, सीता खोरी, पानदेव, शेडे महादेव, गायमुख, किल्ले अंतुरची भवानी आणि दर्गाह यांचा समावेश कता येईल. आपली ही जुनी श्रद्धास्थाने टिकवण्यासाठी जपण्यासाठी प्रत्येक जण धडपड करतो त्यामुळे तिथे स्वच्छता व पावित्र्य व मंगलमय् वातावरण नहेमी टिकून राहते. अभयारण्य कायद्यामूळे दररोजच्या आणि सणावाराच्या पुजेला, नवसांना आणि यात्रेला कायमची बंदी आली आहे. याउलट शहरातून निसर्गाचा अस्वाद घ्यायला आलेली मंडळी या श्रद्धास्थानांचा दारु पिंणे, मटन खाणे आणि आडोसा म्हणून वापर करणे यासाठी वापर करीत आहेत. यातून वन खात्याचेकर्मचारी, मौजमजा करायला आलेल्या युवक, युवती आणि स्थानिक श्रध्दाळू यांच्यात नेहमी खटके उडत आहेत. यातून काही तथाकथित पर्यावरणवादी कायद्याची धमकी देवून त्या श्रध्दास्थानाचे हेतूपुरस्कर पावित्र्य भंग करुन जातीय तणाव वाढवतात. दरवर्षी सणावाराला या गौताळा जंगलात आपल्या श्रध्दा स्थानासाठी जाणाऱ्या परिसरातील समस्थ मंडळीला अभयारण्य कायद्याने मज्जाव करुन जंगलात सर्वत्र दारूच्या बाटल्या गुटख्याच्या पुड्या, वॉटर बॅग्स, कॅरीबॅग्स फेकणाऱ्याला गुलहौसींना रान मोकळे करुन दिले आहे.

### ● अभयारण्यामूळे मुख्य रस्तेही बंद झाले आहेत ●

गौताळा औटमघाट अभयारण्यातून गेलेल्या जुन्या आणि नव्या मुख्य रस्त्यांना टप्प्याटप्प्याने संपूर्ण वाहतूक बंदी आणली जात आहे. पट्टण, पितलगंगा हा दक्षिण पथाचा गौताळा अभयारण्यांतून एक ऐतिहासिक मार्ग हजारो वर्षापासून या मार्गाने लोकांची ये-जा सुरु आहे. आजही परिसरातील लोक पीतळखोऱ्याहून पाटणा देवी याच मार्गाने जातात. दुसरा मार्ग टपाल्या घाट. खान्देश आणि मराठवाडा यांना जोडणारा हा महत्वाचा जुना मार्ग. हा सीता न्हानी पासून भिलदरीत उतरणारा ३० फुट लांबीच्या आणि ५ ते ७ फुट रुंदीच्या पायऱ्या असणारा संपूर्ण डोंगर खाली उतरून जाणारा मार्ग. आजही सायगव्हाण, भिलदरी या भागातून लोक याच मार्गाने येतात.

जनतेच्या पैशांवर तयार झालेला कन्नड ते नागद, नाग ते सिल्लोड, (म्हैस घाट मार्गे) करंजखेडा ते वासडी, पिशोर ते कन्नड या सर्व डांबरी सडका आज अभयारण्य घोषित झाल्यामुळे बंद करण्याच्या विचाराधीन चालले आहे. आजही रात्री सात नंतर रामपूरवाडी, मेहुण, सायगव्हाण, नागद या भागातून गंभीर आजारी माणूस देखील कन्नड दवाखान्यात आणता येत नाही. नौकरी, शिक्षण वा व्यापार या निमित्ताने ये - जा करणाऱ्यांना उशीर झाल्यास कायद्याच्या बंधनांनामुळे या अभयारण्यातून जाता येत नाही.

## • परिसरातील पाझर तलाव अभयारण्य क्षेत्रात •

शेतकऱ्यांच्या आणि परिसरातील इतर जमिनी घेवून यां परिसरात गेल्या काही वर्षात अनेक पाझर तलावांची निर्मिती झाली. गावालगत, जंगलालगत असणाऱ्या या पाझर तलावाचा उपयोग शेतकऱ्यांच्या गुराढोरांना पाणी पिण्यासाठी बऱ्याच प्रमाणात होत होता. हिवरखेडा, चिमणापूर, खोलपुर, रामपुरवाडी, उंबरखेड, सावरगाव, अंबरखेड तांडा, मेहुण सायगव्हाण, भिलदरी, लोंजा, गोपेवाडी, कळंकी, आंबाळा या गावातील धरणे आणि पाझर तलाव हे अभयारण्य क्षेत्रात घेतल्या गेल्यामुळे या पाझर तलावांवर पिण्याच्या पाण्यासाठी आणि वापरच्या पाण्यासाठी या परिसरातील शेतकऱ्यांना आदिवासींना आणि त्याच्या जनावरांना चुकूनही फिरकता येत नाही.

## • वनोपज वापरावर बंदी •

अभयारण्य घोषित झाल्यामुळे या परिसरात राहणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि आदिवासी या सर्वांना जंगलातील कोणत्याही वस्तूला, झाड पाला, लाकूड फाटा यांना हात लावता येणार नाही. आदिवासींना आपल्या झोपडीसाठी लागणारे वा शेतकऱ्यांना आपल्या शेतासाठी लागणारे लाकूड तोडता येणार नाही. वैदूंना जंगलातील वनौषधींना हातही लावता येणार नाही. डिंक, तेंदू पत्ता, मोहाची फुले, मोहाची टोळी, पळसाच्या पत्रावळी, आराटी, बोराटी, घाणेरीयांच्या कुंपण काट्या, गवत, वाळलेले जळावू लाकूड या कोणत्याही वस्तूंना, परिसरातील नागरिकांना हात लावता येणार नाही. पोळ्याच्या दिवशी बैलाच्या गळ्याभोवती बांधावयाचे पळसाच्या मुळ्यांचे चौरे वापरल्याबद्दल रामपूर, उंबरखेडे येथील शेतकऱ्यांवर खटले दाखल झाले. वर्षानुवर्ष जेवणासाठी वापरत असलेली रान केळीची पाने आता आदिवासींना आणि परिसरातील लोकांना वापरता येणार नाहीत. धारेश्वर, नाचनवेल परिसरातील लोकांनी जेवणासाठी रानकेळीची पाने वापरली असता त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात आला. जंगलात राहणाऱ्या आदिवासींचे संपूर्ण जीवन चक्र हे जंगल आणि वनोपजावर अवलंबून असते. जंगलावर असलेला त्याचा परंपरागत अधिकार हिरावून घेणे म्हणजेच त्याचे जीवन हिरावून घेणे होय.

## • बैल चराई बंदी •

अभयारण्य क्षेत्र घोषित झाल्यामुळे या २२ गावातील शेतकऱ्यांना आणि आदिवासींना आपली जनावरे मोकळी जंगलात, परिसरात, चारता येणार नाहीत. या सर्वांना आपली जनावरे गोठ्यातच चारा घालून जगवावी लागतील. ही बाब कुणालाही शक्य होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना, दूध व्यवसाय करणाऱ्यांना आणि आदिवासींना यापुढे जनावरेच बाळगता येणार

नाहीत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची जनावरांवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था कोलमडल्याचा धोका निर्माण झाला आहे.

अशा प्रकारे अभयारण्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांना विस्थापीत करण्याचा, कंगाल करण्याचा हा एक कट आहे. पर्यावरणाच्या नावांवर जागतिक बँकेकडून प्रचंड अनुदान लाटून ग्रामीण जनतेला विस्थापीत करुन, पगारी नौकरशाही पोसण्याचे षडयंत्र स्वातंत्र्याची पन्नासी साजरी करतांना सुद्धा यशस्वी रित्या घडत आहे. आदिवासी जंगलाशिवाय जगूच शकत नाही हे नोकरशाहींना चांगले माहित आहे. त्यांना पावलोपावली त्रास देवून हे वन्य अधिकारी धान्य, पैसा, कोंबडे, बकरे, आणि शरीर याची पावलोपावी मागणी करतात. यां परिसरातील शेतकऱ्यांचा अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे त्यांचे पशूधन आणि ते परिसरात चरणारच आणि हे वन अधिकारी प्रत्येकाकडून खंडणी वसूल करणार. अशा पद्धतीने या परिसरातील सामान्य जनता अभयारण्य कायद्यामुळे नागवली जात आहे. आणि वन अधिकारी व कर्मचारी प्रत्येक शहराच्या ठिकाणी फ्लॅटस घेत आहेत. याचा अर्थ अभयारण्य हे केवळ मौज मजा करणाऱ्या शहरातील लोकांसाठी आणि वन खात्यातील कर्मचाऱ्याचें संसार चालविण्यासाठी आहेत. यात कुणाचे दुमत असू नये. यासाठी परिसरातील सर्व नागरिकांनी जागे व्हा, आणि संघटित व्हा. आपल्याला अभयारण्ये, जागतिक बँक, वन खाते आणि 'भोंगळ पर्यावरणवादी यांना पोसण्यासाठी निर्माण होवू द्यावयाचे नसून ते स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देणारे, सर्वसामान्य शेतकऱ्यांना, आदिवासींना, वन संपदा व वन्य जीव संपदा यांना वृध्दींगत करणारे करावयाचे आहे. त्यासाठी जनहिताचे कायदे व सामान्य जनतेच्या हितासाठीचे अभयारण्य बनविण्यासाठी आपण जागरुक राहू या, एक होवू या.

## • पर्यावरणवादी व वनखाते यांचा खोटा प्रचार •

अभयारण्य कायदा, अभयारण्यक्षेत्रात स्थानिक लोकांना प्रवेशास आणि वनोत्तर कामास बंदी घालतो. जंगलाचे संगोपन फक्त वन अधिकारी, वन कर्मचारी आणि शहरात राहणारे पर्यावरणवादीच करु शकतात. हा खोटा प्रचार आणि प्रसार केला जातो आहे. त्यातून परिसरातील आदिवासींना शेतकऱ्यांना हुसकावून लावण्याचा कट रचला जात आहे. जंगलाचे खरे संरक्षक जंगलात राहणारे आदिवासी. त्यांनी जंगलाला सुरक्षित ठेवले. कामापुरतीच वनोपजे त्यांनी घेतली. जंगल आपले आहे, त्यांचे संरक्षण आपणच केले पाहिजे ही आपलेपणाची भावना फक्त स्थानिक नागरिकांतच आणि आदिवासींमध्येच राहू शकते. जंगलाला लागलेली आग आणि बेछूट होणारी जंगालची लूट हा जंगलांतला आदिवासी उघड्या डोळ्यांनी पाहूच शकत नाही. 'जंगल टिकेल तर आपण टिकू'', ही भावना त्यांच्या मनात सतत असते. मात्र इतरांना ही

वनसंपदा आपल्या दोन्ही हातांनी लुटावीशी वाटते. आणि या लुटीवर कोणी लक्ष ठेवू नये म्हणून त्यांना या जंगलात आदिवासीचे वास्तव्य नको वाटते म्हणून या अभयारण्य परिसरात स्थानिक सर्वसामान्य नागरिक आणि आदिवासी या वनखात्याला, नको वाटतात.

वन अधिकाऱ्यांच्या मगरुर वागणुकीमूळे त्यांच्या खंडणीसत्रामूळे आणि अभयारण्य कायद्यामूळे ही वनसंपदा आपली नसून वनखात्याची वा शासनाची आहे व तिच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी त्यांचीच आहे, अशी परकेपणाची भावना आदिवासी आणि स्थानिक लोकांत रुजविण्यात वन खातेच कारणीभूत आहे.

## • प्रश्न आदिवासींचा •

औरंगाबाद जिल्ह्यात मोडणाऱ्या या गौताळा अभयारण्य क्षेत्रात आणि परिसरात आदिवासीच नाहीत असे शासन मानते. त्याशिवाय या सुरक्षित क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमणे, कोणत्याही आदिवासी व मागासवर्गीयांनी केलेले नाही, असे शासन मानते.

औरंगाबाद जिल्ह्यात आदिवासींची नोंद पाहता कागदोपत्री कन्नड तालुक्यात आदिवासी नाहीत असे शासन मानते. म्हणूनच आजवर तहसीलदार, उपजिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी ठाकर ही आदिवासी जात असणाऱ्यांना जातीचे प्रमाणपत्र देण्याचे आजवर टाळले आहे. प्रत्यक्षात या परिसरात ३२ ठाकरवाड्यातून सुमारे २० हजार ठाकर आजही वास्तव्य करुन राहतात. हीच बाब भिल्ल आणि कोळी या आदिवासी बावत ही आहे.

वन खाते, अभयारण्य खाते आणि शासन हे अभयारण्य क्षेत्रात वा वनक्षेत्रात अतिक्रमण झाले आहे हे कागदोपत्री आजही मान्य करीत नाही. त्यामुळे अभयारण्य परिसरातील आदिवासींना वेळोवेळी तयार झालेल्या कायद्यापासूनचे संरक्षण आजही मिळू शकलेले नाही. प्रत्यक्षात हे आदिवासी स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुमारे, १५० वर्षापूर्वी पासून या जंगलात राहत असून सुद्धा कामचुकार नौकरशाहीने त्यांची नोंदच घेतलेली नाही. त्यामुळे ते कसत असलेली अतिक्रमित जमीन आणि रहात असलेल्या अतिक्रमित जागेवरील झोपडे हे १५० वर्षापासून आजपर्यंत त्यांच्या मालकीचे झालेले नाही. या संदर्भात आणि आदिवासीच्या इतर अनेक समस्या बावत 'आदिम जाती सेवा मंडळ', माजी आमदार डॉ. टी. एस. पाटील, माजी खा. कै. बाळासाहेब पवार, डॉ. रमेश सुर्यवंशी यांनी वेळोवेळी शासनाला, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र पुणे यांना पत्रव्यवहार केला आहे. या संदर्भात स्थानिक वृत्तपत्रातून जे लिखान झाले आहे त्यातील काही लेख याच पुस्तिकेत वाचकांसाठी पुर्नप्रकाशित केले आहेत. त्यांतून वाचकांना या स्थानक

आदिवासींच्या मूळ समस्येची कल्पना येईलच.

हे आदिवासी या परिसरात १५० वर्षापासून राहात असूनही त्यांच्या अस्तित्वाची आणि अतिक्रमणाची नोंद न घेतल्यामुळे आजही कागदोपत्री ते ह्या जंगलात राहत नाही. त्यामुळे त्यांना ह्या अभयारण्यातून हुसकावून लावतांना कोणताही मोबदला देण्याची वा त्याची सोय लावण्याची गरज शासनाला वाटत नाही. त्याच्या नावावर कागदोपत्री कुठलीही जमीन वा मालमत्ता नसल्यामुळे ते आपला हक्क सिद्ध करु शकत नाहीत. आज शासन या अभयारण्य क्षेत्रात कोणताही आदिवासी राहात नव्हता व राहत नाही असे म्हणत असले तरीही त्यात शासनांचा आणि अभयारण्य खात्याचा खोटारडेपणा आहे. जुन्या काही कागदपत्राच्या आधारे या क्षेत्रात आदिवासींची अतिक्रमणे १९७२ पूर्वी होती व ती शासनाने मुद्दाम प्रमाणित केली नाही असे म्हणण्यास भरपूर वाव आहे. या पुराव्या आधारे आदिवासी या डोंगरात राहात होते, हेमान्य करावेच लागेल. काही करावे असे.

१) सीव्हील कोर्ट कन्नड दंडाची पावती क्रं. ६५ दगडू माहदू ठाकर तर क्रं. ५६ रावजी भाऊराव ठाकर यांच्या नावे दि. २३.४.१९७० ची असून ते पेडकवाडी येथील वन अतिक्रमणासंदर्भात आहेत.

२) चिमणापूर येथील सुखलाल रामसिंग सोनवणे (भिल्ल) यास दि. १६.१०.७० जा. क्रं. ७/जेएमबी/१७१७ तहसील कार्यालय कन्नड यांनी गायरान जमिनीवरील अतिक्रमण संदर्भात नोटीस दिली होती.

३) दि. २५.११.६९ रोजी कन्नड सत्र न्यायालयात दगडू महादू ठाकर, पेडकवाडी यास अतिक्रमण संदर्भात ३ डिसेंबर ६९ रोजी हजर राहण्याचा आदेश दिला होता. केस क्रं. ६५६/६९

४) औरंगाबाद येथील फिरत्या पथकाचे वन क्षेत्रपाल मो. धो. निवळे यांनी दि. १४.१०.७८ रोजी तालुक्यातील काही तलाठ्यांना (उदा. करंजखेडा आदेश क्रं.५) आपल्या परिसरातील वन जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी हजर राहण्याचा आदेश दिला होता.

यासारख्या अनेक पुराव्याच्या आधारे आदिवासीची अतिक्रमणे ही कायद्याच्या चौकटीत बसणारी असूनही त्यांना त्या - त्या वेळी न्याय न दिल्यामुळे आणि त्यांची नोंद त्या वेळी न झाल्यामुळे त्यांना आज कायद्याच्या आधारे कोणतेही संरक्षण न देता या परिसरातून हुसकावून लावण्यापलिकडे कोणताही पर्याय वन खात्याकडे नाही. असेच पावलो पावली शासन आणि वनखाते यांच्या हालचाली वरुन लक्षात येते.

# 'गौताळा अभयारण्य व आदिवासी ठाकर'

औरंगाबाद निसर्ग मित्र मंडळाला नुकताच अमेरिका निवासी मंडळींचा महाराष्ट्र फाऊंडेशन तर्फे तीन लाख रुपयांचा पुरस्कार मिळाला. निसर्ग संवर्धन, वृक्षारोपण, वन्यजीवांचे सर्वेक्षण व पर्यावरण संरक्षणाची निकट या महत्वाच्या बाबी जनतेमध्ये रुजविण्याचा प्रयत्न निसर्गमित्र मंडळ करते. मंडळाचे प्रकल्प समन्वयक हे अभयारण्याच्या कक्षेतील लोकांना जागृत करण्याच्या मागे लागले आहेत. महाराष्ट्रात जिथं - तिथं अभयारण्य निर्माण करण्यात आली. तेथे स्थानिक आदिवासींवर अन्याय झाला. अजूनही त्यांना न्याय हक्कासाठी संघर्ष करावा लागतो आहे. असाच अन्याय गौताळा अभयारण्य क्षेत्रात राहणाऱ्या ठाकर आदिवासींवर होतो आहे. कायद्यातील काटेकोर तरतूद व महसूल आणि वनखात्याच्या बेपर्वाही मुळे हे आदिवासी देशोधडीला लागणार आहेत. निसर्गमित्र मंडळाची महत्वाची मागणी आहे की, गौताळा अभयारण्यातील आदिवासींना विस्थापित करु नका. त्यासाठी जरुर तर कायद्यात दुरुस्ती करा.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने अजिंठा डोंगर परिसरातील दोनशेंसाठ चौ. किमीचा भूप्रदेश १९८८ मध्ये ''गौताळा औट्रमघाट वन्यजीव अभयारण्य'' या नावाने सुरक्षित क्षेत्र म्हणून अधिसूचित केला. या अभयारण्याच्या परिसरात पितळखोरा लेणी व अंतुर किल्ला ही ऐतिहासिक पुरातण स्थळे आणि पाटणादेवी, कालीमठ व गौतमऋषी मंदिर ही धार्मिक स्थळे येतात. या क्षेत्रात औरंगाबाद जिल्ह्यातील, कन्नड तालुक्यातील बावीस व जळगाव जिल्ह्यातील सहा गावांचा समावेश होतो. गौताळा अभयारण्यामुळे ठाकर जनतेच्या हक्कासंबंधी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जनावरांसाठी जंगले सुरक्षित करून प्राणी पोसण्यास नघालेल्या सरकारने या अभयारण्याच्या क्षेत्रातल्या आदिवासी मानव प्राण्याच्या पुनर्वसनाची त्यांची अस्तित्वाची व हक्काची कोणतीही योजना तयार न करताच बेधडकपणे हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. अभयारण्य क्षेत्रात अभ.य कोणापासून, तर अ. ायी व चुकीच्या वृत्ती पासून. पण ज्यांनी जंगल पोसली, वाढविली, टिकविली, ज्यांनी जंगलाचें खरे शत्रू लाकूड व्यवहारांतील प्रतिष्ठित दलाल या बाहेरच्यांना चोरटी वृक्षतोड व शिकारी करण्यास प्रतिबंध केला. त्या जंगलप्रेमी डोंगरदेवावरच विस्थापित होण्याची वेळ आली आहे. वन्यजीवांच्या जपणुकीच्या नावाखाली त्यांच्या जगण्याचाच मुलभूत हक्क हिरावून घेण्याचा हा उद्योग आहे. अभयारण्य उभारतांना प्रथम लाभहानीचा

पूर्ण विचार, विस्थापन, संरक्षण आणि स्थानिक लोकांच्या अडीअडचणी यांचा विचार करावयास हवा. १९७२ ला वन्यजीव संरक्षणं कायदा झाला. तो १९९१ ला सुधारित बनविला गेला. शासनाला वन्यजीव वाचवायला, प्रदूर्षण कमी करायला देशी, परदेशी पर्यटकांची हौस भागवायला, अभयारण्य हवं असेल तर त्या क्षेत्रातील जनतेच्या भविष्याचा, हक्काचा, संरक्षण करण्यांचा विचार अगोदर झाला पाहिजे. घटनेप्रमाणे शासन आदिवासींचे रक्षण करायला बांधील आहे. १९५० साली घटनेच्या रुपाने चेक आदिवासींना मिळाला असला तरी शासनानं तो या सातमाळा डोंगर भागात वटविलाच नाही. या क्षेत्रातल्या पडीक जमिनी ठाकरांनी पिढ्यान्‌पिढ्या पासून कसण्यायोग्य केल्या पण महसुल व वन खात्यांनी त्यांच्या नावाच्या नोंदी कधी घेतल्याच नाही. कसणाऱ्यांच्या नावे जमिनी करा म्हणून अनेकवेळा मोर्चे निघाले. सत्याग्रह झाला. अनेकांनी तुरुंगवासाच्या शिक्षा भोगल्या. याच गौताळा अभयारण्याच्या क्षेत्रात १९६९ साली समाजवादी पक्षातर्फे ९ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट या काळात फार मोठ्या प्रमाणात सत्याग्रह झाला. जवळपास ९०० आदिवासींनी ७ दिवस ते एक महिनाअशा शिक्षा भोगल्या. पण पोलिस आणि वनखात्यातील कर्मचाऱ्यांनी ज्या सर्वेनंबर मधील अतिक्रमित जमिनीवर सत्याग्रह केला. त्या क्षेत्रातील जागेंची कागदोपत्री नोंदी काही घतेल्या नाहीत. सत्याग्रह केलेल्या क्षेत्राता पंचनामा न करताच सगळ्यांना पोलीस व्हॅनमध्ये कोबण्यात आलं. या अगोदरच्या काळात व नंतरही या जंगल जमिनी करणाऱ्या ठाकरांवर वन कर्मचाऱ्यांनी अनेकवेळा खटले दाखल केले. न्यायालयाने तुरुंगवासाच्या शिक्षा फर्माविल्या. तरीही ठाकरांचा गेल्या चाळीस - पन्नास वर्षाचा आक्रोश काही वन खात्याच्या कानावर गेला नाही. दरवर्षी दारु, कोंबड्या आणि द्रव्याच्या नशेत ते बेधुंद राहिलेत. या भ्रष्ट वन कर्मचाऱ्यांनीच आदिवासी ठाकरांचा जमिनी हक्क प्रश्न दरवर्षी मिळणाऱ्या वर कमाईने अधिकच गुंतागुंतीचा बनवून टाकला. आता तेच बाई - बाटलीला चटावलेले जंगल कर्मचारी सांगतात, की या जमिनी आमच्या मालकीच्या आहेत. आम्ही वाटेल तेंव्हा खाली करुन घेवू. आदिवासी जंगलाच्या राजांना आता हे वन्य अधिकारी उपरा, परका ठरवित आहेत.

या डोंगर परिसरात आदिवासींचे प्रबोधन करुन त्यांच्या जीवन मरणांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी ''आदीम जाती सेवा मंडळ'' या नावाची संस्था १९७० पासून कार्यरत आहे. समाजात अगदी शेवटच्या पायरीवर जे आदिवासी आहेत. त्यांचा विकास व्हावा, स्थान उंचावावं, तसेच आदिवासी उपयोजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक लाभांच्या योजनांची आंमलबजावणी व्हावी अशी अनेकविध उद्दिष्ट्ये संस्थेची आहेत. दि.२५.१२.९६ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना या परिसरातील करंजखेड या गावी आले असतांना आदिवासी ठाकर समाज आणि श्रमजीवी संघटनेतर्फे प्रत्यक्ष भेटून एक निवेदन देण्यात आले, ते असे.

''महोदय, आम्ही अजिंठा डोंगर परिसरातील कन्नड, ४० गाव, सोयगाव व खुल्ताबाद तालुक्यातील डोंगरात राहणाऱ्या समस्त ठाकर जातीच्या वतीने आपणास प्रस्तुत निवेदन देवून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. १) १९५० च्या गणनेच्या आधार घेवून शासन या अजिंठा डोंगर परिसरात ठाकर ही जात वास्तव्यास आहे हे कागदोपत्री मान्य करावयास तयार नाही. २) परिसरात डोंगरकपारीला, डोंगरात ठाकरांचं वास्तव्य गेल्या १०० ते १२५ वर्षापासून आहे. चाळीस वाड्यांमधून जवळपास वीस हजार ठाकर या अभयारण्य क्षेत्रात राहतात. ३) शासन औरंगाबाद जिल्ह्यात ठाकर ही जातच नाही असे सांगून या लोकांना जातीची प्रमाणपत्र देत नाही. त्यामुळे शासनाचा विविध सोयी सवलतीपासून त्यांना कायमचे वंचित राहावे लागते. ४) भंडारदरा धरणामुळे जी सात ठाकर गांवे बुडाली तेथून काही ठाकर बंधू इथं वास्तव्याला आलेत. इथल्या वन जमिनीवर त्यांच्या दोन - चार पिढ्या जगल्या. तरीही जंगल विभाग त्यांच्या जागा अतिक्रमित समजून नेहमीच त्रास देते. ५) पिढ्यान्‌पिढ्या पासून कसत असलेल्या शेतजमिनी या अजूनही ठाकरांच्या नावी झालेल्या नाहीत. त्यामुळे पिके भरास आली की, वनखाते वृक्षारोपनाचा बहाना करीत उभ्या पिकांची नासधूस करते. ६) या परिसरातील ठाकर हे ठाकरच असून त्यांची भाषा, आडनांव, पोषाख, रीतीरिवाज, देवदेवता, सण, उत्सव, कुलदेवत, रुढीपरंपरा, यात्रास्थळं हे नगर, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यातील ठाकरांप्रमाणेच आहेत. तिथल्या ठाकरांशी यांचे नाते संबंध व बेटी व्यवहार आहे. तरी शासनाने सत्यस्थिती पडताळून अजिंठा डोंगर परिसरातील या ठाकरांची नोंद घ्यावी व त्यांना जातीची प्रमाणपत्रं द्यावीत. त्यांच्या राहत्या झोपड्यांची जागा तसेच व रस्ता हक्काने कसत असलेल्या जमिनी त्यांच्या नावे करुन ठाकरांचे जंगलातले हक्क कायम ठेवावेत. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सव साजरा करतांना पन्नास वर्षांनी का होईना या अर्धपोटी जीवन जगणाऱ्या आदिवासी ठाकरांच्या झोपड्यात स्वातंत्र्याची पहाट उगवू द्यावी, त्यांना स्वतंत्र भारताच्या नागरिकात सामावून घ्यावे ही नम्र विनंती.

**बद्रिनाथ कतारे**
महासचिव

**कमा धिमादोरे**
अध्यक्ष

**डॉ. टी. एस. पाटील**
उपाध्यक्ष
माजी आमदार

**प्रा. डॉ. रमेश सूर्यवंशी**
संशोधन अधिछात्र

**आदिम जाती सेवा मंडळ कन्नड.**

निवेदन सोबत शेकडो नावे, गावे व अगंठे सह्या होत्या.

देश स्वतंत्र झाल्यानंतर जंगलात व दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींसाठी शासनाने बरेच उपक्रम राबविले. तरीही नोकरशाहीच्या अडेलतट्टूपणामुळे ठाकरांना लाभ झालेला नाही. आजही बऱ्याच आदिवासींना

हलाकीचं व कुपोषणाचं जीवन जगावं लागतं. अधुनमधून भुकबळी पडतात. कन्नडपासून सिल्लोड, ४० गाव, नागद, सोयगाव, कळंकी, या मार्गावरील परिसरात सह्याद्री पर्वताची रांग पसरली आहे. निजाम आणि इंग्रजांच्या राजवटीतील छळांना कंटाळून त्याकाळी भिल्ल, ठाकर या जातींनी स्थलांतर केलं. सुरक्षित भाग म्हणून गौताळा परिसरातल्या डोंगराच्या कुशीत आश्रय घेतला. त्या जागी डोंगराच्या पायथ्याशी झोपड्या बांधून ते वंशपरंपरेने राहत आले. जंगलाला लागून असलेली दऱ्याखोऱ्यातील काहीशा डोंगर उतारावरील तसेच तेथील लहान सऱ्यांच्या जमिनी झाडं - झुडपं तोडून, उतारावर दगडांचे बांधा घालून ठाकरांनी वहिती योग्य केल्या. या जमिनी त्या स्वतःच्या मालकीच्या समजतात. पण पीक भरास आली की पोलीस नाही तर जंगल खात्याचे कर्मचारी येतात. ठाकरांना पैश्यांसाठी अडवितात. दारु पिवून अत्याचार करतात. नाही तर जवरदस्तीने पोलीस कोठडीत डांबतात. कोर्टातक खटले दाखल करतात.

या आदिवासी ठाकरांचं मूळ स्थान संगमनेर, अकोला, इगतपुरी या परिसरातलं आहे. तिथल्या ठाकरांची व यांची कुलनामे, कुलदैव, देवदेव्हारे ही एकच आहेत. स्त्री - पुरुषांचे वेश, नृत्यकला, बोलीभाषा, आणि रीतीरिवाजातही फरक नाही. पण १९५१ च्या आणि त्यानंतर १९८५ च्या आदिवासी गणनेतही त्यांना शासनाकडून न्याय मिळाला नाही. ठाकर म्हणून नोंद केली नाही. त्याचं जन्म - मृत्यु रजिस्टर नाही. ग्रामसेवक तसेच तलाठी ठाकरांच्या या वसाहतीची, त्यांच्या अतिक्रमित जमिनींची, नोंद ठेवीत नाहीत. या अन्यायाला कोण जबाबदार ?

जातीच्या प्रमामपत्राकरिता म्हणे दि. १० ऑगस्ट १९५० साली वास्तव्याचा पुरावा द्यावा लागतो. आदिवासींनी या नोंदी आणायच्या कुठून? जन्म-मृत्यू या दाखल्यात तर जातीची नोंदच नसते. रानावनात जन्मलेल्या मुलांचे जन्मदाखले कसे मिळवायचे ? शासनाने १९७५ साली ग्रामीण भागातील भूमिहून मजुरांना घरबांधणीसाठी जागा देण्याची योजना आखली. शासनाचे स्पष्ट आदेश असूनही अनेक ग्रामपंचायतींनी त्याची अंमलबजावणी केली नाही. निदान अतिक्रमित नोंदवहीत गाव नमुना एक इ मध्ये तरी नोंद घ्यायला हवी होती. काही ठाकरांकडे अतिक्रमित जमिनीचा कब्जा आदेश आहे. पण अजानता व अशिक्षितपणामुळे सर्वच ठाकरांनी ते कब्जा आदेश काही जपून ठेवलेले नाहीत. काही तलाठ्यांमुळे घराचा ताबा देवूनही ठाकरांच्या नावे झोपड्या झालेल्या नाहीत. तीच अवस्था शेत जमिनीची. शासनाने काही ठाकराचंया नावेअशा अतिक्रमित जमिनी नियमानुकूल करुन दिल्यात. मात्र जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशांच्या प्रति महसूल खात्याने काही जंगल खात्याकडे पोहोचत्या केल्या नाहीत. मग अशा मालकी हक्काच्या जमिनीवर जंगल खाते स्वतःच्याच कब्जा समजून वृक्षारोपणाचे खड्डे खोदते. त्यातून संघर्ष पेटतो. एकच उदाहरण देतो. कन्नड तालुक्यातील जेहूर

परिसरातील पेडकवाडी इथल्या ठाकरांच्या वहीत्या जमिनीवर दि. २७ मे ९६ रोजी वनखात्याने खड्डे खोदण्यास सुरुवात कली. या जुलमाचा परिणाम म्हणून २८ व २९ मे ला सर्व आदिवासी ठाकर आणि जंगल खात्याचे लोक व पोलीस यांच्यात चकमक उडाली. शेवटी आदिम जाती सेवा मंडळाचे चिटणीस बद्रिनाथ कतारे, संचालक रावजी पथवे व चिवळी गावचे ठाकर सरपंच पांडु कडाळे यांनी पुरावे म्हणून जमिनीच्या मालकीचीकागदपत्रे फौजदारांना दाखविली. तेंव्हा प्रकरण मिटलं. पण नोकरशाहीच्या चुकीमुळे असे अन्याय बऱ्याचदा होतात. ठाकरांना उठसुठ पोलीस स्टेशनवर बोलावून त्रास दिला जातो.

शासनामार्फत आदिवासींसाठी विविध स्वरुपांच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मात्र या परिसरातील बऱ्याच आदिवासींना त्या सोयी सवलती पासून वंचित राहावं लागतं. योजनांचा लाभ उठवण्यासाठी तहसील कार्यालयातून आवश्यक ते फॉर्मस, जेणे, भरणे त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रें, अटी व पुरावे देणे, या साऱ्या तांत्रिक गोष्टी पूर्ण करुन अर्ज दाखल करणे असल्या अग्नीदिव्यातून अडाणी आदिवासींना बाहेर पडणं अवघड जातं. तशात भ्रष्ट नोकरशाही त्यांना पदोपदी अडवते. आता कन्नडतालुक्यातील एकूण २२ गावा लगतच्या ठाकर आदिवासींना गौताळा अभयारण्याच्या नावाखाली कायमचे हुसकावून लावले जात आहे. त्यांना ना कुठं आश्रय देता येणार ना कोणताही मोबदला मिळणार. कारण महसूल व वनखात्याने त्यांच्या झोपड्या व अतिक्रमित जमिनीच्या नोंदीच घेतलेल्या नाहीत. कारण स्पष्ट आहे. नोकरशाहीचा भ्रष्टाचार, बेफिकीरी व कामचुकारपणा. पण याची कठोर शिक्षा मात्र मसीब ठाकरांना भोगावी लागणार आहे.

२४ ऑक्टोबर ९७ रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी सिल्लोड, यांनी जाहीर प्रगटनच्या चक्रमुद्रित प्रती काढल्या. त्या अभयारण्य क्षेत्रातल्या काही मोजक्याच ग्रामपंचायतीवर चिटकावल्या. त्याही जाणूनबुजून डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात. त्यात वन्य जीव (संरक्षक) अधिनियम १९७२ सुधारणा कायदा १९९१ च्या तरतुदीनुसार अभयारण्य क्षेत्रात वनोत्तर कामांना बंदी घातली. अशा प्रकारची जाहीर प्रगटण मुद्दाम मुदत संपायच्या थोडेच दिवस आधी लावली गेली. ऑक्टोबर महिन्यातील जाहीर प्रगटन हे नोव्हेंबर महिन्यात भूमिगत होतं. तेच जानेवारीत मुदत संपायच्या आठ दिवस आधी भिंतीवर प्रगटते. ही लपवाछपवी कशासाठी ? याचा अर्थ उघड आहे, की लोकांनी मुदतीच्या आत म्हणजे २६.१२.९७ पूर्वी दावे दाखल करायला नकोत. तरीही आदिमजाती सेवा मंडळाचे जागरूक चिटणीस बद्रीनाथ कतारे यांच्या सावधगिरीमुळे २४ डिसेंबरलाच हरकत दावा दाखल करण्यात आला. कतारेंना आदिवासी विषयी आत्मियता आहे. त्यांच्या प्रश्नांची प्रखर जाणीव आहे. त्यांच्या हक्कासाठी सतत चळवळी करणारा, भांडणारा, हा त्यागी नेता

आहे. त्यांची पत्नी मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविते. तर ध्येयवेडे कतारे ठाकरांच्या मुलभूत समस्यांसाठी त्यांच्यातील दैववाद व अंधश्रध्दा दूर करण्यासाठी रानोमाळा वनवन भटकतात. त्यांच्या अशा धडपडीमुळेच ठाकर समाजाच्या गळ्यातले ते ताईत बनले आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांना शासनाच्या जाहीर प्रगटनाची प्रत मिळू नये म्हणूनच नोकरशाहीने हा अन्याय केला होता.या अभयारण्य क्षेत्रात आदिवासी नहीतच. अशी नोंद घेणाऱ्या याच शासनाचा विरोधाभास असा की ठाकर आदिवासींची मुलं याच भागातल्या शासनाच्याच आदिवासी आश्रमशाळा असलेल्या शाळेत शिक्षण घेत आहेत. याच क्षेत्रात खाजगी आदिवासी आश्रमशाळा ही आहेत. शाळेतील दाखल्यावर त्यांची जात म्हणून ठाकर आदिवासी अशी स्पष्ट नोंदवलेली आहे. वास्तविक स्वातंत्र्यपूर्व काळापासून कन्नड शहरात भिल्ल वसतीगृह अस्तित्वात होतं. त्यांच्या शाळेच्या दाखल्यांवर ठाकर म्हणून नोंदी आहेत. तरीही तहसीलदार व उपजिल्हाधिकारी ठाकर जातीचं प्रमाणपत्र देण्यास तयार नाही. या अभयारण्य भागात चार – पाच आदिवासी आश्रमशाळा आणि भिल्ल वसतीगृह असतांना या भागात आदिवासी ठाकरांचं अस्तित्वच नाही असं शासन कसं काय म्हणून शकतं ? असं असेल तर मग वरील आश्रमशाळा कुणासाठी उघडल्या ? शासन या प्रश्नाचं ही स्पष्टपणे उत्तर देत नाही. या आदिवासी पट्ट्यात आजही अक्षरशः 'अंधेर नगरी चापट राजा' अशी परिस्थिती आहे. तेंव्हा अडाण्या ठाकरांनी आपले न्याय्य हक्क साबूत राखण्यासाठी कोणाकडे जावे ?

शासनाने १.४.१९७२ ते ३१.३.७८ या कालावधीत पडीक जमिनी व वन जमिनींवरील, शेती प्रयोजनासाठीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे आदेश दिलेले आहेत. या सातमाळा डोंगर परिसरात तर या मुदतीच्या कित्येक वर्षं आधीपासून हे ठाकर शेती करीत आहेत. तरीही त्यांच्या नावे वनजमिनीच्या नोंदी केलेल्या नाहीत. म्हणजे प्रत्यक्षात शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. ही चूक कोणाची ? आता शासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीने आदिवासींच्या ताब्यातील तत्कालीन वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबतचे दावे तपासून निर्णय घेण्याचे आदेश दिलेले आहेत. आदिवासींच्या कल्याणासाठी ही समिती गठित केलेली असली तर आजपर्यंत या डोंगर परिसरात कोणताही समिती सदस्य फिरकलेला नाही. त्यामुळे अतिक्रमित जमिनीबाबत पात्र या अपात्र निर्णय घेवून त्या जमिनी ठाकरांच्या नावे झालेल्या नाहीत. सध्या या अभयारण्य भागातील १५४ अतिक्रमितांची प्रकरणे याचिका क्रमांक ९६ / १९८८ उच्च न्यायालय खंडपीठ येथे चालू आहे. ही प्रकरणे पात्र अतिक्रमणे असून त्यांना हुसकावून लावू नये, असा हुकूम १५ जानेवारी १९८८ रोजी न्यायालयाने दिला. परंतु जे न्यायालयात जाऊ शकले नाहीत त्याचं काय ? या डोंगर परिसरात अभयारण्य क्षेत्रात जवळपास

चाळीस वाड्या वस्त्यातून आदिवासी राहतात. त्यांची राहण्याची, वस्तीची जागा सुद्धा अतिक्रमित आहे. कागदोपत्री त्यांच्या झोपड्या व शेतीचं कुठंही अस्तित्व नाही. ते न्यायालयातही गेलेले नाहीत. अशा अडाणी, भोळ्या भावड्या ठाकरांचे काय होणार ? त्यांच्याकडे किरकोळ कागदपत्रं व नोंदीसाठी सतत दारु कोंबड्या व पैशांची मागणी केली जाते. कधीतर स्त्रियांचंही शोषण होतं. अशी भ्रष्ट नोकरशाही यंत्रणा शासकीय समितीला सत्य परिस्थिती सांगून सहजा - सहजी त्यांना पात्र म्हणून घोषित करणार आहे काय ? जे सहाय्यक जिल्हाधिकारी अभयारण्याबाबत जाणुनबूजून जाहिर प्रगटन उशिरा जाहीर करतात तेच अतिक्रमित जमिनीची पात्रता ठरविणाऱ्या समितीचे न्यायिक सदस्य आहेत. समिती गठित होवून व उच्च न्यायालयाने आदेश देवूनही आजपर्यंत तरी अतिक्रमितांची पाहणी व पात्रता पडताळणी गेलेली नाही.

गौताळा अभयारण्य ही आजची कल्पना आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे जागतिकीकरणाच्या लाटेत सरकारला पर्यटन संस्कृतीने चांगले झपाटले आहे. तरीही पर्यटन विकासाच्या गोंडस नावाखाली आदिवासी भुमिपुत्रांचा जगण्याचा हक्क हिरावून घेणं ही एक शोकांतिका आहे. अभयारण्य हे जंगली प्राण्यांच्या जपणुकीसाठी, त्यांच्या संरक्षणासाठी आहे. मात्र ते जंगल पोसणाऱ्या आदिवासी नावाच्या द्विपायी माणूस प्राण्याच्या संरक्षणासाठी नाही, असाच याचा अर्थ काढावा लागेल. आदिवासी वनदेवतेला सर्वस्व मानून जगतात. जंगल जगविण्यासाठी रात्रंदिवस खपतात. प्रसंगी जीव धोक्यात घालून जंगलात लागलेल्या आगी विझवतात. त्यांच्या आज्या - पंज्यापासून ते जंगल राखून आहेत. हे आदिवासी कंदमुळे खातात. पोटापुरती जमिनी कसतात. आज आपण या ठाकरांना हुसकावून जंगली जनावरांसाठी अभयारण्य करायला निघालो आहोत. त्यांच्या ताब्यातील शेती आणि वस्तीची जागा वनखाते आपल्याच मालकीची समजते. त्यामुळे त्याच्या पुनर्वसनाचा व मोबदला देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असं वन महसूल खाते म्हणत आहे.

गौताळा अभयारण्यात अनेकविध जातींची खूप औषधी वनस्पती आहेत. आजही देशभरातील औषधी कंपन्यांची माणसं ठाकरांकडून वनौषधी व कंद, पोत्यांने भरुन नेतात. या आदिवासींना जंगलातून हुसकावून लावले, तर पिढ्यान्‌पिढ्यापासून ठाकरांना अवगत असलेली ही वनौषधीची विद्या नष्ट होणार आहे.

या क्षेत्रातील आदिवासींचा अभयारण्याला विरोध नाही. त्यांचं म्हणणं पिढ्यान्‌पिढ्या पासून कसत असलेल्या अतिक्रमित जमिनी आमच्या नावे करुन द्या. आमच्या जगण्याचा अधिकार मान्य करा. या मातीतल्या कुपोशित माणसांना उध्वस्त करुन प्राण्यांना जोपासना हे न्यायाला धरुन होणार नाही. स्वतंत्र भारतातही आम्हाला गुलामी अवस्थेत राहावं लागत असेल. आमचं शोषण होणार असेल आणि शासन दुर्लक्ष करणार असेल तर माणूस म्हणून

जगण्यासाठी संघटित जनआंदोलन अटळ आहे. माणसांना मारुन जनावरं पोसण्यात कुठली आली मानवता. अभयारण्य उभारतांना माणूस आणि वन्यप्राणी दोघांचं संरक्षण होणं आवश्यक आहे. आदिवासी शिवाय अभयारण्य, या कल्पनेपेक्षा आदिवासी माणसाच्या सहकार्याने अभयारण्य, हा विचार अंमलात आला गेला पाहिजे. अभयारण्य विकासाच्या प्रक्रियेत गरीब, उपेक्षित आदिवासींना सहभागी करुन घेतलं नाही. तर जंगल विकास व रक्षणाच्या कार्यक्रमाला अपेक्षित यश लाभू शकणार नाही. आदिवासींची अतिक्रमित जमिन म्हणजे त्यांची कवच कुंडलीच हिरावून घेतली तर प्रश्न तीव्र स्वरुप धारण करणार. या अन्यायविरोधात त्यांच्या मनात असंतोषाचे अंगार फुलणार. शेवटी तो मागासलेला असला तरी जिता - जागता माणूस आहे. तेंव्हा अधिकारी वर्गाकडून त्याला माणसासारखी वागणूक मिळाली पाहिजे. या गौताळा अभयारण्याच्या परिसरात ठाकर, भिल्ल, कोळी, दलित व बंजारा समाज मोठ्या प्रमाणात राहतो. हे याच परिसरातून निवडून आलेले आजी - माजी आमदार, खासदार सारे कबूल करतात. इतकेच नव्हे तर खाजगीत तहसीलदार, तलाठी तसे त्या - त्या गावचे आजी - माजी सरपंच देखील मान्य करतात. अडचण आहे ती केवळ तांत्रिक स्वरुपाची. असं असूनही शासनाच्या कब्जातल्या दप्तरात ठाकर हा शब्द कुठेच आढळत नाही. त्यांना ठाकर ही जमात दिसूनही कागदोपत्री ते विसंवादी सुद्दढ काढतात.

दिनांक २५.१२.९६ रोजी करंजखेड येथल्या सभेत मुख्यमंत्री तसेच बाळासाहेब ठाकरे व इतर मंत्र्यांना आदिम जाती सेवा मंडळातर्फे निवेदन दिले होते. त्या निवेदनावर समाजकल्याम मंत्रालयाने २८.२.९७ रोजी खुलासा मागविला की, ''या ठाकरांना कोणत्या संवर्गात समाविष्ट करावे, अशी आपली इच्छा आहे'' ? आदिवासी ठाकरांचा एस. टी. (अनुसूचित जमाती) हा वर्ग ठरलेलाच आहे, म्हणून खरं तर ठाकर म्हणूनच नोंद घ्यायला हवी. पण हे घडत नाही. त्याला उघड कारणं म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांची लाचखोरी प्रवृत्ती. याची शिक्षा मात्र सहाय्यक जिल्हाधिकारी या गरीब आदिवासी ठाकरांना देत आहेत. त्यांनी खरं तर प्रत्यक्ष पाहणी करुन वयोवृद्ध ठाकरांशी आणि आजी - माजी लोकप्रतिनिधींशी बोलावं. वस्तुस्थिती माहिती करुन घ्यावी. सत्य पडताळून बघावं. नंतर खात्री झाल्यावर ठाकरांना अनुसूचित जमातीचं प्रमाणपत्र द्यावं. भारताच्या संविधानामध्ये आदिवासींना सामाजिक न्याय मिळाव, यासाठी अनेक तरतुदी केलेल्या आहेत. या सोयी सवलती मिळविण्यासाठी सध्या आदिवासी व्यक्तीला शासनाच्या उपजिल्हाधिकाऱ्याकडून जातीचे प्रमाणपत्र (दाखला) मिळविणे आवश्यक असते. अभयारण्य क्षत्रातील लोकांचे हक्क ठरविण्याविषयीचे अधिकार त्यांच्याकडेच आहेत. जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जवळपास शंभर ठाकरांनी तहसीलदाराकडे अर्ज दाखल केले. त्यांना तहसीलदारांनी खालीलप्रमाणे उत्तरं दिली. ''अर्जासोबत कागदपत्रें जोडली नाहीत ती सादर

करावीत. खालील कागदपत्रं दाखल करा.'' १) अनुसूचित जातीी वशिष्ट्ये २) प्राचीन जीवनमान ३) भौगोलिक अलिप्तता ४) भिन्न संस्कृती ५) स्वभावातील बुजरेपणा ६) आर्थिक, सामाजिक मागासलेपणाबद्दल माहिती ७) मंडळ अधिकारी यांचा चौकशी अहवाल ८) रक्ताच्या नात्याचा पुरावा टी. सी. सह ९) नातेवाईकाचां तसेच जात - पडताळणी पुरावा टी. सी. सह. १०) १९५० व १९७७ पूर्व कोठे राहत होते. ११) प्राथमिक शाळेचा दाखला.

या पत्रामदील अनुक्रमांक दहा विहीत नमुन्यात अर्ज आणि अनुक्रमांक बारा तलाठी व सरपंच याचे प्रमाणपत्र या दोन्हीवर काठ मारली आहे. याचा अर्थ अर्जदारांनी विहित नमुन्यात अजकेला असून त्या सोबत तलाठी व सरपंच यांचे प्रमाणपत्र जोडले आहे असा होतो. तहसीलदारांच्या या भयानक अटी वाचल्यावर अज्ञानी ठाकरच काय पण सुशिक्षित नागरिकही चक्रावून जातील. अनुसूचित जमातीची वैशिष्ट्ये, प्राचीन जीवनमान, भौगोलिक अलिप्तता, भिन्न संस्कृती, स्वभावातील बुजरेपणा, मागासलेल्या संबंधी माहिती व याबावत ठाकर आदिवासींनी कोणती माहिती कोणाकडून आणून कागदपत्रे सादर करावीत अशी तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांची अपेक्षा आहे ? जातीचा दाखला मिळविण्यासाठी पूर्ण करावयाच्या या जाचक अटींचा विचार केला की आपण फार मोठा गुन्हाच करीत अहोत की काय असचं ठाकरांना वाटतं. म्हणून 'भिक नको पण कुत्रां आवर' अशी त्यांची अवस्था झाली. आता तर म्हणतात जात ठरविण्यासाठी कोर्टाचा निकाल हवा. कोणतीही जमात आदिवासी आहे की नाही हे ठरविण्याचे सहा निकष आहेत. हे निकष लावूनच केंद्र सरकारने ''दि शेड्यूल कास्ट ॲन्ड शेड्यूल व्हाईब्ज ऑर्डर्स (अमेंडमेंट) ॲक्ट १९७६ (कायदा क्रमांक १०८/१९७६) भारतावरील वेगवेगळ्या राज्यात कोणकोणत्या अनुसूचित जाती आणि जमाती आहेत हे ठरविलेले आहे. या कायद्याच्या कलम चार नुसार परिशिष्ट भाग दोन १ मध्ये महाराष्ट्रातील ४७ अनुसूचित जमातींचा अंतर्भाव केलेला आहे. त्यातील अनुक्रमांक ४४ ला ठाकर, ठाकर, का, ठाकर, का ठाकर, मा. ठाकर, मानकर ही जमात निर्देशित केलेली आहे. पण याचे भान तहसीलदारांनी ठेवलेले नाही. एकदा निकष लावून ठाकर ही अनुसूचित जमात लोकसभेने कायदा पास करुन ठरविल्यानंतर पुन्हा त्या जमातीच्या व्यक्तीला तेच निकष सिद्ध करायला सांगणे म्हणजे जाणूनबुजून प्रमामपत्र देण्याचे नाकारने असा होत नाही का ? हा उघड उघड अन्याय आहे. लोकसभेने आवश्यक ती सखोल चौकसी केली. आवश्यक निकष लावले. कायदा करुन ठाकर ही अनुसचित जमात ठरविली. तेच निकष परत सिद्ध करण्याचा लेखी हुकूम तहसीलदार कसे काय देवू शकतात ? आदिवासींना उद्ध्वस्त करण्याचं हे षड्यंत्र तर नाही ना ? कोणत्याही परिपत्रकात प्राचीन जीवनमान, भिन्न संस्कृती, स्वभावातील

बुजरेपणा वगैरेंबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करणे आवश्यक ठरविलेले नाही. तरीही प्रमाणपत्रासाठी तहसीलदार भलतेच पुरावे मागताआहेत. अशा विचित्र अटी पूर्ण करणे शक्य नसल्याने बऱ्याच ठाकरांना दाखल्याची आशा सोडून द्यावी लागते. यात महाराष्ट्र शासनाची निश्चित बदनामी आहे. तेंव्हा शासनानं तांत्रिक अडचण सोडवावी, तसेच शासनाच्या आदिवासी कल्याण खाते विकास विभाग तसेच महसूल खात्याचे मंत्री व उच्च अधिकाऱ्यांनी यात जातीने लक्ष घालून या गौताळा अभयारण्यातील ठाकरांचा जगण्याचा हक्क मिळवून द्यावा, जेणेकरुन अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य सरकारांनी ज्या विविध कल्याणकारी योजना आखलेल्या आहेत, ज्या जमातींसाठी करोडों रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचा लाभ घेता येईल.

एकदाचे हे ठाकर आदिवासी आहेत व पिढ्यान् पिढ्यापासून डोंगर दऱ्यातली जमीन कसता आहेत हे सिद्ध झालं की, त्या जमिनी महसूल खात्याला त्यांच्या नावे करता येईल. एकदाची त्यांची मालकी सिद्ध झाली की, त्यांना वन अधिकारी जमिनीवरुन हुसकावून लावू शकणार नाही. मग हे ठाकरचं अभयारण्य व त्यातील वन्य जीवांचं रक्षण करण्यासाठी, जंगलातील आग विझविण्यासाठी चोरटी वृक्षतोड रोखण्यासाठी पुढे येतील. तेच ठाकर जंगलावर कुऱ्हाड चालविणारयांना पकडतील. कुणा, सलमान, सैफ अलीला अभयारण्यातील शिकारी करण्यापासून दूर ठेवतील, असा विश्वास वाटतो.

तेंव्हा लोकशाही शासनानं दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या, पिढ्यान् पिढ्यापासून उपेक्षित गणल्या गेलेल्या ठाकरांना न्याय द्यावा. ''माणूस म्हणून जगा आणि जगू द्यावे''. तसेच त्यांना अस्मिता मिळवून देवून त्यांचे मुलभूत हक्क मान्य करावेत. निसर्ग मित्र मंडळांनीही ठाकरांच्या या अस्तित्वाच्या, जीवन मरणाच्या प्रश्नासाठी आवश्यक ती पावलं उचलावीत.

●●●

(पूर्व प्रसिद्धी - सत्याग्रह) (विचारधारा) (एप्रिल ९९)

- डॉ. टी. एस. पाटील
(माजी आमदार कन्नड - ४३११०३)

# अभयारण्यासाठी आदिवासींचा छळ

मुस्लिम राजवट आणि इंग्रट राजवट यांच्या छळाला कंटाळून भिल्ल, ठाकर या आदिवासींनी स्थलांतर करुन औरंगाबाद जिल्ह्यांच्या अजिंठा डोंगर परिसरात सुरक्षित आश्रय घेतला. जंगलात राहून त्या वनसंपदेवर, तेथील जमिनीवर त्यांच्या दोन - चार पिढ्या जगल्या. त्यांना आता सुरक्षितता वाटत होती. पण त्यांचे दुर्दैव त्यांची पाठ सोडायला तयार नाही. आता पुन्हा औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील एकूण बावीस गावांलगतच्या आदिवासींना ''गौताळा अभयारण्याच्या '' नावाखाली तेथूनही कायमचे हुसकावून लावले जात आहे. त्यांना ना आश्रय देता येणार ना कोणताही मोबदला. कारण स्पष्ट आहे नोकरशाहीचा कामचुकारपणा. शिक्षा मात्र समस्त आदिवासींना.

## • वनोत्तर कामास बंदी •

सहायक जिल्हाधिकारी सिल्लोड यांनी २४ ऑक्टो. १९९७ रोजी जाहीर प्रगटनाच्या चक्रमुद्रती प्रती काही गावांच्या ग्रामपंचायतींच्या इमारतींवर डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात चिकटविलेली आढळली. त्यात ''वन्यजीव (संरक्षक) अधिनियम १९७२ सुधारणा कायदा १९९१ च्या तरतुदींनुसार अभयारण्यात कन्नड तालुक्यातील बावीस गावांच्या क्षेत्रांमध्ये वनोत्तर कामास बंदी करण्याच्या दृष्टिकोनातून वन्यजीवन संक्षक कायदा १९९१ चे नियम २१ नुसार व शासन महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्रं. डब्ल्यू एल. पी. - १०९४ प्र. क्र. ५१६ - फ - १ दिनांक ७ जानेवारी १९९७ नुसार उपविभागीय अधिकारी सिल्लोड हे चौकशी करण्यासाठी सक्षम असल्याचे प्राधिकृत केलेले आहे.'' आणि ''कायद्याच्या तरतुदीनुसार व्यवस्थापनाचे काम उपवनसंरक्षक (वन्यजीव) नासिक याचंयाकडून करण्यात येत आहे''.

## • गोपनीय जाहीर प्रगटन •

अशा प्रकारचे जाहीर प्रगटन तहसील, तलाठी, वनखाते यांच्यामार्फत शक्यतोवर उशिरात उशिरा पण मुदत संपण्याच्या आत ग्रामपंचायतीच्या भिंतीवर (काही गावांतच) चिकटविण्याची व्यवस्था केली गेली. ऑक्टोबर महिन्यातील जाहीर प्रगटन हे नोव्हेंबर महिन्यात भूमिगत होते. ते ८/१० जानेवारीनंतर म्हणजे मुदत संपण्याच्या ८/१० दिवस आधी जाहीर करण्यात आले. अर्थात दाव्याची कटकट टाळण्यासाठी गोपनीय ठेवलेल्या जाहीर प्रगटनावर जागरुक कार्यकर्त्यांमुळे २४ डिसेंबरलाच हरकत दावा दाखल करण्यात आला. आदिवासी भागातील आदिवासींना, कार्यकर्त्यांना व समाजसेवकांना या जाहीर प्रगटनाची प्रत मिळू नये हा प्रयत्न या नोकरशाहीने का करावा त्याचे उत्तरही या परिसरातील आदिवासींवर झालेल्या अन्यायाच्या इतिहासातच सापडते.

### • अस्तित्वाची नोंदच नाही •

दीडसे – दोनशे वर्षापूर्वी या डोंगराच्या परिसरात चाळीस वाड्या वस्त्यांतून सुमारे वीस हजार ठाकर हे आदिवासी जातीचे लोक राहतात. पिढ्यान्पिढ्या ते जंगलातील जागेवर राहतात. तेथील नदी – नाल्यांची जमीन, दगडांचे बांध घालून, माती टाकून करण्यायोग्य करून शेती करतात. त्यांची मुले वडनेर, नागद, गराडा या गावच्या आश्रमशाळेत शिकतात. शाळेतील दाखल्यावर त्याची जात ठाकर आदिवासी अशी नोंदवलेली असून त्यांना तहसीलदार, उपजिल्हाधिकारी ठाकर या जातीचे प्रमाणपत्र देत नाहीत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे म्हणणे असे की, औरंगाबाद जिल्ह्यात आदिवासी असल्याची नोंद नसल्याने त्यांना तसे प्रमाणपत्र देता येत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून कन्नड शहरात भिल्ल वसतिगृह अस्तित्वात आहे. आश्रमशाळा आणि भिल्ल वसतिगृह या भागात असले तरी आदिवासींचे अस्तित्व या भूभागात असल्याचे शासनास मान्य नाही. या संदर्भात माजी आमदार डॉ. टी. एस. पाटील, माजी खासदार बाळासाहेब पवार, सामाजिक आदिवासी कार्यकर्ता बद्रिनाथस कतारे, संशोधक डॉ रमेश सुर्यवंशी यांनी या संदर्भात संबंधितांना वैयक्तिक निवेदने व पत्रव्यवहार वेळोवेळी स्वतंत्ररित्या केलेला आहे. मात्र अद्याप कुणालाही समाधानकारक उत्तर संबंधितांकडून आलेले नाही.

### • अतिक्रमित जमिनी कायदा या आदिवासींसाठी नाही •

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रं. एल. ई. एन १०७८/३४८३/ ग-१ दि. २७.१२.१९७८ आणि शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफ. एल. डी. /१०७९/१३६६/फ-३ दि. १२.९.१९७९ आणि शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०९५/२३२५/प्र. क्र. ९६/ज-१ दि. २० डिसें. १९९५ नुसार दि. १.४.१९७२ते दि. ३१.३.१९७८ या कालावधीत पडिक जमिनीवरील / गायरान जमिनीवरील व वन जमिनीवरील शेती प्रयोजनासाठीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे आदेश दिलेले आहेत. मात्र या डोंगर परिसरात या मुदतीच्या कित्येक वर्षापूर्वीपासून हे आदिवासी शेती करीत असूनही त्यांच्या या जमिनी नियमानुकूल समजण्यात आलेल्या नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून त्यांचे अस्तित्व व त्यांच्या अतिक्रमित शेतजमिनीची नोंद अद्यापही करण्यात आलेली नाही. नोकरशाही व शासन या आदिवासींची नोंद घ्यायला या डोंगर परिसरात अद्यापपर्यंत फिरकलेले नाहीत.

### • दुसरी संधी •

उपरोक्त परिस्थिती आणि सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ७.३.९५ चा निर्णय व मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि. ४.११.९५ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने या आदिवासींच्या कल्याणास्तव दुसरी संधी देवून महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ उपजिल्हाधिकारी, १ सहायय्क वन संरक्षक व आदिवासी आयुक्त यांनी पद

निर्देशित केलेला १ सहायक प्रकल्प अधिकारी वर्ग - २, आदिवासी विभाग यांचा समावेश असलेली एक समिती संबंधित जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केली. या समितीने या आदिवासींच्या ताब्यातील तत्कालीन वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबतची पात्रता, अपात्रता पाहून निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.

शासनाने आदिवासींच्या कल्याणासाठी ही समिती गठित केली तरी आजपर्यंत या डोंगर परिसरात कोणताही समिती सदस्य फिरकलेला नाही व अतिक्रमित जमिनीबाबत पात्र - अपात्र निर्णय घेवून आदिवासींच्या नावे त्या जमिनी करुन दिलेल्या नाहीत. याशिवाय रामपूरवाडी, मेहूण, उमरखेडा, उमरखेडतांडा, आंवाळा आणि कन्नड तालुक्यातीलच इतर गावांतील १५४ अतिक्रमितांचे प्रकरण याचिका क्र. ९६/१९८८ उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे चालू आहे. ही प्रकरणे पात्र अतिक्रमणे असून त्यांना हुसकावून लावू नये असा हुकूम १५ जाने. १९८८ रोजी न्यायालयाने दिलेला आहे.

## • न्यायालयात न गेलेल्यांचे काय ? •

या डोंगर परिसरात जवळ जवळ चाळीस वाड्या, वस्त्यांतून आदिवासी राहतात. त्यांची राहण्याची वस्तीची जागासुद्धा अतिक्रमित आहे. त्यांची शेतीसुद्धा वनअतिक्रमित आहे. त्यांचे अस्तित्व आणि त्यांच्या शेतीचे अस्तित्व कागदोपत्री कुठेही नाही. ते न्यायालयातही गेले नाही. आजपर्यंत त्यांना गावकऱ्यांनी, शासनाने व वनखात्य.ने हुसकावून लावलेले नाही. अर्थात त्यांच्या अस्तित्वाची जाणीव अद्याप कुणाला (कागदोपत्री) नाही. न्यायालयात गेलेल्यांच्या अतिक्रमणाची पात्रता ठरेलही पण जे न्यायालयात गेलेले नाहीत, जाऊ शकत नाही अशा निरक्षर, अडाणी, बुजऱ्या स्वभावाच्या आदिवासींचे काय होणार?

## • भ्रष्टाचार •

आदिवासींच्या किरकोळ कागदपत्रांसाठी, नोंदीसाठी कोंबडे व पैशाची मागणी केली जाते अशा तक्रारी आहेत. तेथे कार्यरत असणारी यंत्रणा या समितीला सहजासहजी सत्य परिस्थिती सांगून त्यांना पात्र म्हणून घोषित करणार काय ? त्यात हे क्षेत्र नासिक उपवन संरक्षकाच्या ताब्यात अभयारण्य म्हणून जाणार. आंबा, कलंकी, उपळा, अंधानेर, गौताळा हिवरखेडा, ब्राम्हणी, मोहडी, निभोरा, तपोवन, उंबरखेड, चिमणापूरवाडी, चिमणापूर, खोलापूर, मेहूण, गोपेवाडी, लोंजा, हरसवाडी, सायगव्हाण, भिलदरी आणि हसनाबाद या कन्नड तालुक्यांतील बावीस गावांतील एकूण १५६४४ हेक्टर ३५९ आर जमिनीवर ''गौताळा ऑट्रमघाट अभयारण्य'' कुंपण घालून ताबा घेणार. जे सहायक जिल्हाधिकारी अभयारण्याबाबत जाहीर प्रगटन करतात तेच अतिक्रमित जमिनीची पात्रता ठरविणाऱ्या समितीचे सदस्य आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या आदिवासींची साधी नोंद शासनाने घेतलेली नाही, आदिवासी ठाकर या परिसरात आहे की नाहीत हे शासनाला योग्यरित्या पटवून देवू शकलेले नाहीत,

त्यांची राहण्याची व कसण्याची अतिक्रमित जागा त्यांना कायद्याने देण्यासाठी पुढे सरसावले नाहीत. समिती गठित होवून उच्च न्यायालयाने आदेश देवूनही अतिक्रमितांची पाहणी व पात्रता पडताळलेली नाही, तेच शासनाचे अधिकारी आता जाहीर प्रगटन तेही गोपनीय ठेवून उशिरा प्रगटन करुन अज्ञान, अडानी, अशिक्षित आदिवासींकडून २६.१२.९७ च्या आत म्हणणे वा दावा मागवतात, ही सुवर्णजयंती साजरी होत असणाऱ्या भारतात राहणाऱ्या आदिवासींची शोकांतिकाच म्हणावी.

## • आदिवासी हुसकावून अभयारण्य ! •

गौताळा ऑट्रमघाट हे अभयारण्य ही आजची कल्पना आहे. निसर्गाच्या संतुलनासाठी ते आवश्यकही आहे. आधीच कुठून तरी हुसकावून दिलेल्या आदिवासी स्वातंत्र्यापूर्वी या डोंगरात आश्रयाला आले. त्यांची नोंद कुठेही नाही. झोपडीची जागा, त्यांची जमीन आणि ते स्वतः शासनाच्या दप्तरात नोंद झालेले नाहीत. त्यामुळे अभयारण्य क्षेत्रातील जागा शासनाला ताब्यात घेताना कोणतीही अडचण नाही. आदिवासींच्या अतिक्रमणाची नोंद नसल्याने त्यांना मोबदला देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तेथे ठाकर आणि भिल्ल हे आदिवासी आश्रयाला आहेत याचीही नोंद कुठे नाही. त्यांच्यासाठी भांडणारी सुशिक्षित माणसे वा संघटनाही नाही. त्यामुळे त्यांना हुसकावून देवून अभयारण्य होण्यात कोणतीही अडचण नाही. त्यांच्या विस्थापनाचीही काळजी करण्याची गरज नाही कारण जे कागदोपत्री अस्तित्वात नाहीतच त्यांचे विस्थापन होणार तरी कसे ?

**अभयारण्य हे वन्यजिवांचे सरंक्षणासाठी आहे. ठाकर किंवा भिल्ल या आदिवासी मानव जातींच्या प्राण्यांच्या संरक्षणासाठी नाही. ही बाब या नोकरशाहीने अधिक स्पष्ट केली आहे.**

## • जंगलाचा राजा भिकारी होणार •

आदिवासी हे जंगलांचे राजे. हे आदिवासी कंदमुळे खातात, पोटापुरती जमीन कसतात, जंगलात त्यांचा मुक्त वावर असतो. ते जंगलाचे राजे आहेत. आदिवासी जंगलात राहतात म्हणून ती वने आजही टिकून आहेत.

ते वृक्षांना देव मानतात. वृक्षतोड ते करीत नाहीत. म्हणूनच सापउतारा भागातील पाच भिल्ल राजांना गुजरात सरकार आजही पेन्शन देते. भारतात हा एकमेव आदर्श आहे. गुजरात सरकार या भिल्लांना पेन्शन देण्याचे मुख्य कारण म्हणे त्यांचे मूळ जंगल संरक्षित राहिले. आज आपण आदिवासी हुसकावून देवून अभयारण्य ( फक्त वन्य प्राण्यांसाठी) निर्माण करायला निघालो आहोत. त्या भागातील जनतेच्या डोळ्यांत धुळफेक करुन अभयारण्य विकसित करण्याच्या जोरदार हालचाली करण्यात येत आहेत. आदिवासींच्या ताब्यातील शेती आणि वस्तीची जागा ही वनखाते आपल्याच मालकीची समजत असते. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्नच उद्भवत नाही असे वनखाते म्हणणार. पारतंत्र्यात आदिवासींतच्या जमिनी होत्या त्या आता स्वातंत्र्यात वनखात्याच्या किंवा भारत

सरकारच्या झाल्या आहेत. हे आदिवासी डिंक, चारोळ्या, गोडंबी, तेंदूपत्ता, बिबे गोळा करतात. अभयारण्यात वृक्षारोपणासाठी व इतर कामांसाठी अल्पमजुरीवर राबतात. वृक्षांचे, जंगलाचे संरक्षण करतात. जंगल कायद्यामुळे त्यांना गुरे पाळता येत नाहीत, दुग्ध व्यवसाय करता येत नाही. आदिवासी जंगले राखतात. पण पर्यावरणाच्या गप्पा मारणारे ही जंगले तोडण्यास कारणीभूत ठरतात. डोक्यावर मोळी नेणाऱ्यांची कुऱ्हाड जप्त होते पण रात्रीच्या अंधारात ट्रकने लाकडे नेणाऱ्यांना दिव्यांच्या झोतात रस्ते दाखविले जातात ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

गौताळा अभयारण्यात खूप वनौषधी आहे. आजही व्यापाऱ्यांची माणसे औरंगाबादहून येवून पोत्याने कंद काढून नेतात. आदिवासी मात्र आजाराच्याच वेळी कामापुरते कंद काढतात. या जंगलात जटाशंकर, सफेदमुसली, मुरुडशेंग, बेहडा, हिरडा, आवळा, बेल, चिंच, रामकंद, कवंदर, तांबुलकंद, गोमिठ्या, मनचंदी, सुलेकंद, हामण, शेवगा, गेरसडा, काचन अशा अनेक उपयुक्त औषधी वनस्पती आहेत. हे आदिवासी अनेक रोग आव्हानात्मकरित्या वनौषधींनी दुरुस्त करतात. या आदिवासींना जंगलातूनच हुसकावून लावले तर ही वनौषधींची विद्या नष्ट होणार. जंगलावर अवलंबून असणाऱ्या आदिवासींची जीवनाची नाळ तोडण्याचा प्रयत्न या अभयारण्य संस्कृतीने चालवला आहे.

## • आदिवासी नाहीत तर जंगले नाहीत •

आदिवासींमुळेच जंगले संवर्धित होतील, टिकून राहतील. जंगलाचा वापर करण्याच्या अयोग्य पद्धतींमुळे जंगले नष्ट होत आहेत. जंगलात स्थानिक आदिवासीशिवाय जंगल संवर्धनाच्या गोष्टी म्हणजे हवेत बंगले उभारण्यासारखे आहे. गावालगतच्या टेकड्या, कॉलेजमागील टेकड्या सुरुंग लावूनउडविल्या जात आहेत, महसूल विभागाचे खिसे गरम होत आहेत. त्या टेकड्या सुशोभित करण्याचे सोडून आदिवासींना हुसकावणे गैर आहे. तपोवन ते गौतम ऋषी आश्रम आणि पुरणवाडी या परिसरातील डोंगराचे सर्वात मोठे पठार हे काळ्या कसदार जमिनीचे आहे. तेथे कोणताही आदिवासी राहत नाही. पण तेथले प्रत्येक मोठे झाड कापून ट्रकने वाहून नेलेले आहे. हा भूभाग खालून सर्वसामान्यांना दिसत नाही. उलट कळंकी, आंबाला परिसरात आदिवासींच्या वस्त्या आहेत तेथे जंगल त्यांच्या मदतीने चांगले फोफावते आहे. याचा अर्थ जेथे आदिवासी आहेत तेथे जंगले शिल्लक आहेत.

पर्यावरण संरक्षणाची शासनाची भूमिका ही बेगडी असून सह्याद्रीच्या बहुसंख्य आदिवासी असलेल्या डोंगरपट्ट्यात २४ अभयारण्ये शासनाने घोषित केली आहेत.

## • वन्यप्राणी व वनवासींना संरक्षण हवे •

अभयारण्ये उभारण्याची घाई अविचाराने केली जात आहे. अभयारण्ये होणे आवश्यक आहे पण ती उभारताना आदिवासींना हुसकावणे गैर आहे. अभयारण्य उभारणारी यंत्रणा आणि आदिवासी यांच्यात सुसंवाद साधला जावा. या योजनेत आदिवासींचे पूर्ण सहकार्य घ्यावे. त्यांना विश्वासात घ्यावे. त्यांच्या मदतीने अरण्ये व अभयारण्ये उभारावीत, शंभर ठाकर आणि दोनशे भिल्ल ही माणूस जातीचे प्राणी हुसकावून देवून दहा वाघ आणि पंधरा हरणे यांना अभय देणे हे न्यायाला धरून नाही. जेथे अन्याय होणार तेथे अस्तित्वासाठी लढा हा अटळच राहणार. अभयारण्ये उभारताना माणूस आणि वन्यप्राणी दोहोंचे संरक्षण होण्यासाठी शासनाने नवीन विचारप्रणाली स्वीकारणे आवश्यक आहे. त्यासाठी तज्ज्ञांकडून नवे विचार, नवे प्रयोग, अमलात आणण्याची आवश्यकता आहे. पूर्वी गावाशेजारी आमराईत आंबा लावणाऱ्याला त्या झाडाची अर्धी फले दिली जात म्हणून आमराया होत्या. तसे आजही शेताच्या बांधावर झाडांच्या संख्येनुसार काही प्रमाणात शेतसारा माफ करणे शक्य आहे. दरवर्षी त्याच त्याच खड्ड्यात वृक्षारोपण करून अनुदानावर खर्च करण्यापेक्षा ते परवडणारे ठरले. खाजगी वखारी व लाकडू कटाई यंत्रे बंद करावीत. आवश्यक त्या लाकडांची कटाई व विक्री हा व्यवसाय शासनानेच राबवावा. लाकूड खरेदी – विक्रीची नोंद शासनाकडे असल्यास नोंदणीशिवायचे लाकूड इतरत्र वापरलेच जाणार नाही. इमारती व फर्निचरमध्ये लोखंड, पत्रा, फायबर यांच्या वापरास प्रोत्साहन देवून त्यांचे दर कमी ठेवावेत. जंगलाची संरक्षणाची जबाबदारी त्या त्या भागांतील आदिवासींवर सोपवून प्रोत्साहनपर त्या त्या वस्त्यांना अनुदान, बक्षिसे, पेन्शन द्यावे. डिंक, तेंदूपत्ता, बेहडा, हिरडा व इतर वनौषधींचा माल शासनानेच खरेदी करुन मग खाजगी लोकांना विक्री करावा. अशा अनेक उपक्रमांची अंमलबजावणी शासन तज्ज्ञांची मते बोलावून राबवू शकते. त्यामुळे गुत्तेदार, कंत्राटदार यांच्यामुळे होणारी आदिवासींची लूट तर थांबविता येईलच पण त्यातून निर्माण होणारा नक्षलवादही संपविता येईल. थोडक्यात आदिवासीशिवाय अभयारण्ये या कल्पनेपेक्षा आदिवासींसह अभयारण्ये या विचाराला प्रोत्साहन देणे अगत्याचे आहे. प्राण्यांना अभय देता देता माणसांचा विसर पडू नये. मानवी जीवनासाठी अभयारण्ये निर्माण करतो आहोत याचा अर्थ फक्त ''शहरातील मानवी जीवनासाठीच अभयारण्यांची निर्मिती'' असा होवू नये. मानवासाठी अभयारण्ये असतील तर आदिवासी मानवाचाही त्यात विचार होणे महत्वाचे आहे.

●●●

– प्रा. डॉ. रमेश सुर्यवंशी

(पूर्व प्रसिद्धी, दै. मराठवाडा दि. ७ मार्च ९८)

# आदिवासी पट्ट्याची नोंद कधी घेणार ?

भारत आपल्या स्वातंत्र्याचा सुवर्ण जयंती महोत्सव साजरा करीत असताना औरंगाबाद जिल्ह्यातील आदिवासी ठाकर हे आजही स्वातंत्र्य आणि महाराष्ट्र शासन यांचविषयी अनभिज्ञ आहेत. 'अजिंठा डोंगराच्या कुशिथ आम्ही वसलो आहोत' असा आक्रोश ते पिढ्यान् पिढ्या करीत आहेत. मात्र त्यांच्या आक्रोशाकडे ना जनतेचे लक्ष आहे ना शासनाचे.

पितळखोरा लेण्या ते अजिंठ्याच्या लेण्या या डोंगर परिसरात चाळीस वाड्यांतून जवळजवळ वीस हजार ठाकर राहतात. ते आदिवासी असून त्यांची 'ठाकर' ही स्वतंत्र बोली आहे. पुरुष लोक बंडी व लंगोट वापरतात. तर स्त्रिया कमरेभोवती लुगडे लुंगीसारखे आडवे गुंडाळतात. डोक्यावर विशिष्ट रंगाची व प्रकारची फडकी पांघरतात. स्त्रियांच्या गळ्यात काचेच्या मण्यांच्या असंख्य माळा असतात. त्यांच्यात कांबडनृत्य प्रकार आढळतो. त्यांची विवाहपद्धथी, अंत्यसंस्कार, परंपरा इतर जातींच्या लोकांहून भिन्न आहे. पुरुष लंगोट लावून मासेमारी, शिकार आणि मजुरी करतात. अतिक्रमित जमिनींवर भातशेती, नागली, कराळ इ. पिके घेतात. या आदिवासी ठाकरांचे वास्तव्य गेल्या १०० ते १५० वर्षांपासून या परिसरात आहे. त्यांनी कधी लूटमार, दरोडे, खून हे प्रकार न केल्यामुळे त्याचंयाकडे कुणाचेही लक्ष गेलेले नाही. हे शांतताप्रिय असून जाती पंचायतीवरच अढळ विश्वास ठेवतात. गुन्हेगाराला जाती पंचायतच शासन करते. ते पूर्णतः स्वावलंबी असून प्रत्येक घरातला सदस्य आवश्यक असणारे सुतारकाम, लोहारकाम, गवंडीकाम, बुरुडकाम स्वतःच करतो.

त्यांचे मूळस्थान पूर्वपारंपार कथेनुसार कोकण, संगमनेर, अकोले, इगतपुरी हा परिसर सांगतात. त्यांचयत या परिसरात ३५ कुलनामांचे लोक आढळतात. कुलनामांनुसार त्यांचे देव्हारे ते बहिरवाडी, शमशेरपूर, बोरोली, पांजरा आदी ठिकाणी सांगतात. मुसलमानांशी लढा देताना, पळून जाताना कमरेभोवती गुंडाळलेले पातळ स्त्रियांनी आजही तसेच पोषाखाच्या रुपाने सांभाळले आहे अशीही कथा मिळते.

आजही ते कंदमुळे खातात. त्यांना अमुल्य अशा औषदी सनस्पतीची जाण आहे. अनेक शहरांतून औषधोपचारासाठी या जंगलात लोक ठाकरांकडे येतात.

शासनाचे म्हणणे असे की, औरंगाबाद जिल्ह्यात ठाकर ही आदिवासी जमात नाहीच. महाराष्ट्राच्या इतर भागांतील ठाकर या जातीला शासनाने परिशिष्ट १ दी शेड्यूल्ड कास्ट अ‍ॅण्ड शेड्यूल्ड ट्राइब्ज ऑर्डर (अमेंडमेंड) अ‍ॅक्ट

१९७६ कायदा क्रं. १०८/१९७६ मधील परिशिष्ट दुसरे (कलम ४ नुसार) भाग नऊ महाराष्ट्र यादीचा क्रमांक ४४ (चौरेचाळीस) नुसार अनुसूचित (एस. टी.) जमातीत समावेश केलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या फायद्यापासून औरंगाबाद जिल्ह्यातील ठाकर वंचित ठेवले गेले आहेत. १९५१ च्या आमि त्यानंतर १९८५ च्या आदिवासी गणनेतही या ठाकरांना न्याय दिला गेलेला नाही.

हे ठाकर ज्या परिसरात वावरतात, राहतात त्या परिसरातील अजी, माजी लोकप्रतिनिधींनी त्यांच्यासाठी आजपर्यंत काहीही केले नाही. ठाकर या भागात आहेत असे आमदार, खासदारच काय पण तलाठी, तहसीलदार हेही कबूल करता. पण कागदोपत्री शासन दप्तरात औरंगाबाद जिल्ह्यात ''ठाकर'' हा शब्द कुठेही आढळत नसल्याने त्याला जातीचे प्रमाणपत्र द्यावे तरी कसे हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. त्यांना हे ठाकर आदिवासी आहेत हे डोळ्यांनी दिसत असूनही डोळ्यावंर पट्टी बांधून ''कागदोपत्री कुठे आहेत ठाकर?'' हा प्रश्न विचारणे सोयीचे वाटते.

या संदर्भात करंजखेड येथल्या सभेत सर्वमंत्र्यांना आणि श्री. बाळासाहेब ठाकरे यांना ''आदिमजाती सेवा मंडळा''मार्फत निवेदन दिले होते. २५.१२.९६ च्या निवेदनावर समाजकल्याण मंत्रालयाने २८.२.९७ रोजी खुलासा मागविला की, ''या ठाकरांना कोणत्या किती संवर्गात समावष्टि करावे अशी आपली इच्छा आहे?'' त्याचा वर्ग हा एस. टी. हा ठरलेलाच आहे. गरज आहे ही जात औरंगाबाद जिल्ह्यात आहे अशी नोंद घेण्याची. कन्नड येथील तहसीलदारसुद्धा कागदोपत्री ठाकर असल्याची नोंद घ्यायला तयार नाहीत. ठाकर जातीचे लोक आहेत हे ते मान्य करतात. पण प्रमाणपत्र देवू शकत नाहीत. सिल्लोडचे डेप्युटी कलेक्टरही शासन दप्तरी या भागात ठाकर असल्याची नोंद दाखवा मगच जातीचे प्रमामपत्र देवू असा सूर काढतात. या संदर्भात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्याशी पत्रव्यवहार केला. संचालक श्री. विलासराव पाटील यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली. औरंगाबाद जिल्ह्यात ठाकर ही आदिवासी जमात शासन कागदोपत्री नसल्याने आम्ही काहीच करु शकत नाही हाच सूर त्यांनी काढला. त्यांना ठाकरांच्या वस्त्याचें, घराचें, स्त्री - पुरुषांचे फोटो दाखविले.

शासनाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी डोंगर कपारीच्या या ठाकरांची तेंव्हा नोंद केली नाही. त्या अधिकाऱ्यांच्या चुकीची, कामचुकारपणाची शिक्षा या ठाकरांना का म्हणून द्यावी ? तलाठी, तहसीलदार, कलेक्टर हे शासनाचे अधिकारी आहेत. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी, सत्यासत्यता पडताळून

पाहावी. ठाकर हे जर त्यांना मान्य नसतील तर या ठाकरांना कुठल्या तरी जातीखाली माणूस म्हणून तर संबोधावे लागेलच. त्यांच्या जातीचे शासकीय संशोधन करुन कागदोपत्री नोंद घ्यावी. अजिंठा डोगराच्या परिसरातील चांदोर, इंदिरानगर, तल्लखवाडी, जळगाव बु., माणिकपुंज, रनखेडा, पिंपरखेडा, कसारी, कुसुमतेल, वल्ठन, लोढण्याची वाडी, टाक्याचीवाडी, गुजरदरी, म्हसोबाची वाडी, चिवळी, कलंकी, तांदुळवाडी, पेडकवाडी, अंबाला, वडनेर, कोळवाडी, राज्याची वाडी, जेहूर, बिबखेडा, शिरोडी, धाणडोह, महादेवखोरा, शिपघाट, खोलापूर, गोपेवाडी, सावंतवाडी, काळदरी, निमडोंगरी, निरगुडी या अतिदुर्गम भागांत ठाकरांच्या वस्त्या आहेत. या वस्त्यांमधून अगिवले, घान, आवाले, उघडे, कडाळे, कातोरे, कावडे, खडके, गावंडे, गांगड, गिरे, डोके, दोरे, पथवे, पारधे, पोकळे, बांगरे, भाले, भुतांबरे, मधे, मेंगाळ, लोथे, वडपे, वाजे, वारधे, सराई, सावध, सिंद या कुलनामांचे ठाकर राहतात.

आजूबाजूच्या शाळांमधून या ठाकरांची पोरे शिकतात. कॉलेजला आल्यावर त्यांना जातीची प्रमाणपत्रे न मिळाल्याने त्यांना शिष्यवृत्ती ९ व इतर सायीसवलतींपासून वंचित राहावे लागते. हा प्रश्न जवळजवळ वीस हजार ठाकरांचा आहे. जातीचे प्रमामपत्र आदिवासी कल्याणच्या सोयी सवलतींसाठी सर्वांनाच अ. श्यक आहे. शासनाने अजिंठ्याचा डोंगर परिसर हा आदिवासी पट्टा नोंदणीत सोडूनच दिलेला आहे. स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत असताना आदिवासींना दुर्लक्षून चालणार नाही. शासनाने, आदिवासी मंत्रालयाने या परिसरातील ठाकर या आदिवासींची पाहणी करणे आवश्यक आहे.

या भागात आदिवासी नाहीतच अशी नोंद घेणाऱ्या याच शासनाचा विरोधाभास असा की नागद, वडनेर, ब्राम्हणई येथे शासनाच्या आदिवासी आश्रमशाला आहेत, बऱ्याच खाजगी आश्रमशाळा आहेत. कन्नड येथेही स्वातंत्र्यपूर्व काळापासून भिल्ल बोडिंग होतीच. येथे शिकणाऱ्या मुलांच्या शाळेच्या दाखल्यावंर 'ठाकर' जात आहे. पण तेवढ्यावरच त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही. अंबाला हे स्वतंत्र ग्रामपंचायतीचते गाव शंभर टक्के ठाकरांचे आहे. अनेक ग्रामपंचायतींवर ठाकर जातीचे सदस्य आहेत. या ठाकरांच्या मागणीचा पाठपुरावा करणारी कोणतीही संघटना त्यांच्या पाठीमागे उभी नाही म्हणून या खऱ्या आदिवासींना सोयी सवलतींपासून किती दिवस वंचित ठेवणार ?

●●●

– डॉ. रमेश सुर्यवंशी

(पूर्व प्रसिध्दी, दै. मराठवाडा, ४ सप्टेबर १९९७)

शिकलेला नसल्याने त्याच्याशी नाते दाखवून त्याच्या जातीप्रमाणे जातीचे प्रमाणपत्र घेण्याचा प्रश्नच मिटतो. अनुसूचित जमातीसाठी मागावयाच्या शासनाच्या नव्या आदेशानुसारच कोणताही रकाना या ठाकरांना भरता येणे शक्य नाही. या जातीच्या प्रमाणपत्राकरिता नमुना स्वतंत्र आदेशान्वये दिलेला आहे. (शा. नि. क्र. सी. बी. सी. १६८०//३३६६८/३१५ दि. २९.१०.८०) या आदिवासींना जन्म - मृत्यू रजिस्टरच नाही. शाळेच्या रजिस्टरचा प्रश्नच नाही. गावचे ग्रामपंचायत या ठाकरांच्या वसाहतीची नोंदच ठेवीत नाहीत. मग जातीचे प्रमाणपत्र मिळावे तरी कसे ?

जातीचे प्रमाणपत्र नाही तर तो आदिवासी नाही. त्यामुळे त्यास आदिवासी योजने अंतर्गत काहीह ीदेता येत नाही. या चक्रातून मुक्तता करण्यासाठी आदिवासींपर्यंत आणि शासनापर्यंत पोहोचणारा कार्यकर्ता हवा. या डोंगर परिसरात फक्त एकच असा कार्यकर्ता आढळला तो म्हणजे ''श्री बद्रिनाथ कतारे'' या कार्यकर्त्यास आदिवासी आणि शासकीय अधिकारी याव्यतिरिक्त कुणीही ओळखत नाही.

## • घरांची नोंद नाही •

कन्नडपासून २५ कि. मी. अंतरावर कळंकी या गावावरुन डोंगर उतरून खाल गेले तर चिवळी हे ग्रामपंचायतीचे गाव. या गावाअंतर्गत म्हसोबाची वाडी, टाक्याची वाडी, उंबरवाडी, मेंगाळवाडी, कोकणीवाडी या ठाकरवाड्या आहेत. येथे ठाकरांची साठ कुटुंब्रे राहतात. या सर्व कुटुंबांच्या स्वतःच्या झोपड्या आहेत. पण या झोपड्यांची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नाही. ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रस्थापित त्यांची वस्ती अतिक्रमित समजतात. जंगलखाते आपल्या जंगलातील जागेत त्यांचे अतिक्रमणे समजते. तर गाव त्यांचे अतिक्रमण गायरानात समजते. पण प्रत्यक्षात काही ठाकरांकडे मला तत्कालीन तहसीलदार श्री. पाटील बी. एस. यांचे दि. २३.७.१९७५ चे पत्र क्र. ७५ एल. एन. डी. १२१ महा. जमीन महसूल नियम १९७१ मधील २९ - चा आदेश जो जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचा आदेश क्रं. ७५ एल. एन. डी. १२ दि. १०.४.१९७५ नुसार दिला गेला होता, ते पत्र मिळाले. ''ग्रामीण भागातील भूमिहीन मजुरांना घर बांधणीसाठी जागा देण्याच्या योजनेनुसार'' त्या त्या जागांचा कब्जा - हक्क त्या त्या ठाकरास दिला आहे. दुर्दैव असे की, १९७५ चा शासनाचा निर्णय आजपावेतो २० वर्षात ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचलेला नाही. ग्रामपंचायतीत कारभार पाहणाऱ्या प्रस्थापित सरपंच आणि ग्रामसेवकांना त्याची गरजही भासलेली नाही. या ठाकरांच्या घरांची नोंद या ग्रामपंचायतींनी घेवून त्यांना घरपट्टी मागण्याच्या तसदी अद्याप घेतलेली नाही. अशा पद्धतीने आदिवासींच्या हक्कांवर गदा येते. जंगल खाते ती जागा अतिक्रमित समजते. ग्रामपंचायत त्यांना प्रोत्साहन देते. या गैरसमजातून शासन व आदिवासी हा लढा पेटतो. काही ठाकरांकडे तो कब्जा

आदेश अद्याप सुस्थितीत आहे. पण सर्वच ठाकरांनी तो कागद झोपड्यात २०/२५ व,र्ष जपून ठेवावा ही अपेक्षा कोणीही सूज्ञ करणार नाही.

### • ठाकरांची जमीनही त्यांची नाही •

घराचा ताबा देवूनही ते घर (झोपडीच) ठाकरांच्या नावे नाही. तशीच अवस्था त्यांच्या शेत जमिनीचीही आहे. नव्वद टक्के ठाकराची जमीन ही काही गुंठ्यातच मोजता येते. त्यांच्यात श्रीमंत ठाकर असा नाहीच. डोंगर उताराची, नाल्याची जमीन दगडांचे बांध घालून जमिनीचा तुकडा ते मोठ्या अंगमेहनतीने कसतात. शासनाने काही ठाकरांना अशा जमिनी त्यांच्या नावेही करुन दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये त्या जमिनी त्यांना दिल्या. मात्र अशा आदेशाची प्रत जंगल खात्याला नोकरशाहीने पोहोचती न केल्याने जंगलखाते त्यांच्या जमिनींवर वृक्षारोपणाचे खड्डे खोदते. त्यातून जंगलखात्याकडून या आदिवासींवर अन्याय होतो. उदाहरणच द्यावयाचे झाले तर जेहूर परिसरातील पेडकवाडी उर्फ राज्याची वाडी. जी पेडक्या या किल्ल्याच्या दक्षिणेकडील उतारावर आहे. दि. २७ मे १९९६ रोजी वनखात्याने वहित्या जमिनीवर खड्डे खोदले. त्याचा परिणाम म्हणून २८ व २९ मे रोजी सर्व आदिवासी आणि जंगलखात्याचे लोक व पोलिस यांच्यात चकमक उडाली. त्यात दोन्ही गटाचें लोक जखमी झाले. पोलिस जीपचेही नुकसान झाले. स्वयंसेवी संघटनेने मध्यस्थी करुन जमिनीची कागदपत्रे - पुरावे सादर केले. या आदिवासींवर नोकरशाहीच्या चुकीमुळे झालेल्या अन्यायाची दखल गुन्हे दाखल न झाल्यामुळे कुणीही घेतली नाही.

### • आदिवासी दारिद्र्यरेषेखालीही येत नाहीत •

अशा या बेघर आणि भूमिहीन आदिवासींचा समावेश शासनाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या नोंदीतही नाही. याचे कारण स्थानिक ग्रामसेवक, ग्रामपंचायतचा होय. दारिद्र्यरेषेखाली येणाऱ्या कुटुंबांची यादी सरपंचाच्या स[illegible]शक्तीआधारे ग्रामसेवक चार भिंतीत बसून बनवीत असतात. प्रस्थापितांच्या कुटुंबांची नोंद होते. पण या आदिवासींच्या कुटुंबाची नोंद हेतुपुरस्सर टाळली जाते. कारण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शासन देत असलेल्या जास्तीत जास्त योजना या गावाबाहेरील आदिवासींना देण्यात प्रस्थापितांना भूषण नसते. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर कन्नड तालुक्यातील चिवळी या ग्रामपंचायतींची बैठक गणेश विसर्जनाच्या दिवशी म्हणजे दि. २६ सप्टेंबर रोजी पार पडली. त्य.ात ग्रामसेवकाने प्रसिद्ध केलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीत ३० आदिवासी कुटुंबाची नावेच नाहीत. त्या तीसमध्ये काही ठाकर तर अन्य बंजारा कुटुंबे आहेत. शासन सढळ हस्ते देत असलेल्या योजनाही नोकरशाही या आदिसीपर्यंत पोहोचू देत नाहीत.

### • आदिवासींना नोकरी तर नाहीच •

शासन आदिवासी कल्याण योजने अंतर्गत आदिवासी तरुणाची नावे संबंधित विभागांना नोकरभरतीस्तव पाठविते. अशी नावे पाठवूनही त्यांना तोंडी

मुलाखतीत बाद करण्यात आले. दोन विभागात मुलाखतीस गेलेल्या दोन तरुणांनी ही माहिती दिली. दोघेही ठाकर. त्यांना प्रत्येकी २० व २५ हजार रुपयांची मागणी नोकरीसाठी करण्यात आली. ''संपूर्ण ठाकुरवाडी विकूनही, हा ठाकर तरुण पंचवीस हजार उभे करु शकत नाही''. याची जाण या नोकरशाहीला नाही. नोकरशाही अशांना सरळ मुलाखतीस गैरजर किंवा आदेश देवूनही हजर झाला नाही किंवा अन्य सबबी दाखवून मोकळी होते. आदिवासी तरुण याची तक्रार कुठे करावी हे न कळल्याने चुप बसतो.

## • आदिवासी राजकारणापासून वंचित •

आदिवासींना पंचायतराजमध्ये सामावून घेता यावे म्हणून शासनाने ग्रामपंचायतीत काही सदस्य हे राखीव गटातील उमेदवार ठेवले. याचा फायदा आदिवासींना झाला. बहुतांश ग्रामपंचायत निवडणुकीत आदिवासी सदस्य म्हणून निवडून आलेही. पण ''हे आदिवासी काय पंचायत संभाळणार'' अशीच हेटाळणी हे प्रस्थापित गावेगोवी करताना आढळून येतात. चिमणापूर, करंजखेडा, दस्तापूर, निरगुडी, माणिकपुंज, जळगाव बु., कळंकी, तांदुळवाडी, आंबाला, जेहूर, बीबखेडा, जुनापानी, लोढरा, कोळवाडी निमडोंगरी यासारख्या ग्रामपंचायतीतून या डोंगर परिसरातील आदिवासी सदस्य म्हणून निवडून आले आहेत. उपरोक्त ग्रामपंचायतीतून ठाकर या जातीचे ४४ सदस्य आहेत. पण बहुतांश सदस्यांचा सूर असा की गाव, ग्रामपंचायत त्यांची मते अजमावीत नाहीत. त्यांची मते विचारात घेतली जात नाहीत. त्यांना बैठकीत ग्रामपंचायत सदस्य म्हणून कोणतीही किंमत नाही.

अशा प्रकारे आदिवासींसाठी शासनामार्फत विविध योजना त्यांच्या राबविल्या जातात. मात्र या योजना एक तर आदिवासीपर्यंत पोहोचतच नाहीत किंवा त्या योजनेसाठीची कागदपत्रे, त्यातील तांत्रिक अडचणी ते पूर्ण करु शकत नाही. तालुक्याच्या गावाहून आवश्यक कागदपत्रे, फॉर्मस् नेणे, ते भरणे, त्यासाठी आवश्यक ते पुरावे देणे आणि परिपूर्ण भरलेला अर्ज दाखल करणे हे डोंगरदऱ्यांत राहणाऱ्या आदिवासींना शक्य नसते. एवढे असूनही काही आदिवासी ते पूर्ण करुन या सर्व चक्रव्युहातून बाहेर पडतात. पण त्या व्यूहाच्या दाराशी असणारा हा नोकरशहा त्याला तेथेच अटकाव करतो. वास्तविक पाहता या शासकीय कर्मचाऱ्याने आदिवासीसाठीचे अर्ज परिपूर्ण भरून घेणे, योग्य ती तांत्रिक कार्यपद्धती पार करुन त्यांना सर्व सोयीसवलती मिळवून देणे या बाबींसाठी झटायला हवे. आदिवासींच्या अडचणी, गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचविण्याचा आणि त्यांचे जीवन सुकर करण्याचा तो एक महत्वाचा दुवा आहे. आदिवासींसाठी झटणे तर दूरच पण ''आदिवासींना शासनाने देवू केलेल लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचू न देणे, किंवा दिलेले हिसकावून घेणे'' अशी नोकरशाहीची प्रवृत्ती वाढत आहे.

●●●

– प्रा. डॉ. रमेश सुर्यवंशी

(पूर्व प्रसिद्धी, दै. मराठवाडा दि. ७ ऑक्टोबर १९९६)

## “अजिंठा डोंगर परिसरातील ठाकरांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन संक्षिप्त अहवाल”

महाराष्ट्राच्या नगर, ठाणे, नासिक आणि पुणे या जिल्ह्यात ठाकर ही आदिवासी जमात प्रामुख्याने आढळते, ठाकर ह्या जातीला शासनाने परिशिष्ट १, दि. शेड्यूल्ड कास्ट ॲण्ड शेड्यूल्ड ट्राईब्ज ऑर्डर (अमेंडगेंड) ॲक्ट १९७६ कायदा क्रं. १०८/१९७६ मधील परिशिष्ट दुसरे (कलम ४ नुसार) भाग नऊ महाराष्ट्र यादीचा क्रमांक ४४ (चौरेचाळीस) नुसार अनुसूचित (एस. टी.) जमातीत समावेश केलेला आहे.

१९५१ आणि तद्नंतर १९८५ ला शासनाने या आदिवासींच्या वास्तव्याची पडताळणी केली आहे. या आदिवासींच्या गणणेत किंवा पडताळणीत औरंगाबाद जिल्ह्यातील ठाकरांची नोंदच झालेली नाही. शासन दप्तरी नांदगांव, चाळीसगांव, सोयगांव, कन्नड, खुलताबाद या तालुक्यातील अजिंठा डोंगरात राहणाऱ्या ठाकरांची दखल घेतलेली नाही. त्यामुळे या अजिंठा डोंगर परिसरातील ठाकर हे तहसील, आदिवासी विकास योजना, बाल व महिला कल्याण योजना आदि योजनांपासून वंचित ठेवले जात आहेत. आदिवासी म्हणून मिळणाऱ्या सोयी व सवलती पदरात पाडून घेण्यासाठी या ठाकरांजवळ जातीचे प्रमामपत्र नाही. नांदगांव, कन्नड, चाळीसगांव आणि सोयगांव येथे तहसील कार्यालय त्यांना जातीचे प्रमाणपत्र देवू शकत नाही. कारण या परिसरात ठाकर ही जात अस्तित्वात आहे, अशी शासन दप्तरी कुठेही नोंद आढळत नाही. प्रमाणपत्र देण्यासाठी सबळ दप्तरी पुरावा कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळू शकत नाही. आज ही कन्नड तहसील कार्यालयात गेल्या दोन वर्षापासून जातीच्या प्रमाणपत्रासाठीचे ठाकरांचे दोनेकशे प्रस्ताव पडून आहेत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण केंद्र पुणे यांच्या कडे ही अजिंठा डोंगर परिसरात ठाकर असल्याचा कोणताही पुरावा वा नोंद नसल्याने जातीचे प्रमाणपत्र मिळवण्यास्तव होणारे प्रयत्न निष्फळ ठरत आहे.

मात्र प्रत्यक्षात गेल्या दिड - दोनशे वर्षांपासून ठाकर या जातीचे वास्तव्य या डोंगरात आहे. गणणा किंवा सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गणणेतून हे ठाकर कायमचे सुटून गेले आहे. शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणा म्हणा की, नजर चुक म्हणा ह्यामुळे ह्या परिसरातील आदिवासी ठाकरांवर अन्याय झाला आहे.

**वस्ती - स्थाने :-** अजिंठा डोंगर परिसरात पुढील प्रमाणे या आदिवासी ठाकरांच्या वस्त्या आहेत.

**कन्नड तालुका (औरंगाबाद जिल्हा)** - गोपेवाडी, शिपघाट, खोलापुर,

महादेव खोरा, धामनडोह, निमडोंगरी, आंबाला, कोळवाडी, कलंकी, चिवळी, तांदुळवाडी, शिरोडी, बीबखेडा, पेडकवाडी, रांज्याची वाडी.
**सोयगांव तालुका (औरंगाबाद जिल्हा) :-** सावंतवाडी, काळदरी, कोंडबारी,
**खुलताबाद तालुका (औरंगाबाद जिल्हा) :-** निरगुडी,
**चाळीसगांव तालुका (जळगांव जिल्हा) :-** गुजरदरी, वलठ्ठन, पिंपरखेडा,
**नांदगांव तालुका (नाशिक जिल्हा) -** लोढरा, कुसुमतेल, कसाबखेडा, जळगांव बु., कसारी, मणिकपुंज, चांदोर, रनखेडा, तन्हडवाडी, इंदिरानगर.

**कुलनामे:-** उपरोक्त वाड्या वस्तीतून जवळ जवळ वीस हजार ठाकर जातीचे लोक राहतात. या परिसरात ठाकरांची कुलनामे (आडनांवे) अशी आढळतात. आगिवले, आघान, आवाले, उघडे, कडाळे, कातवारे, खडके, गावंडे, गांगड, गीरे, किंवा गिन्हे, दोरे, पथवे, पोकळे, भुतांबरे, भेंगाळ, लोथे, वडपे, वाजे, सराई, सावत किंवा सावता.

**देवदेवता :-** ठाकर 'कळसुआई' हे मुख्य दैवत मानतात. वृक्षदेवतांची पुजा करतात. लग्नकार्यात निंब वा वडाच्या वृक्षाला देवूक बांधतात. जंगलातील 'पारधीन आई' तर नदीतील 'मावली आई' यांची पुजा करतात. नववर व वधू आपल्या देव्हाऱ्याची पुजा करायला जातात. कुलनामानुसार या ठाकरांचे देव्हारे पुढील ठिकाणी आहेत.

| **कुलनाम** | **देव्हाऱ्याचे स्थान** |
|---|---|
| पथवे | बहिरवाडी |
| सावता | बोरोली (ता. इगतपुरी) |
| उघडे | पांजरा (ता. अकोला) |
| भेंगाळ | शमशेरपुर, दिगंबर व केळी |
| मधे | चिंचुंडी (अकोले) |

हे ठाकर लोक म्हशा, पाचमुख्या, चौठ्या, येताळ, मावलाया, घोरपड्या, इर, मारोती, इ. देव भजतात. बोरोली येथील 'संतोबा' हे श्रद्धास्थान असून तेथे दरवर्षी यात्रा भरते. तेथे गुन्ह्यांची कबुली अपराधी लोक करतात.

**विवाह प्रथा :-** ठाकर या आदिवासी जातीची विवाह प्रथा वैशिष्ट्येपूर्ण आहे. वर पक्षाने वधू पक्षाला द्याज किंवा खांदोडा द्यावयाचा असतो. द्याज म्हणून द्यावयाच्या वस्तूत ''तीन पायली तांदुळ, बारा पायली बाजरी, दोन पायली दाळ, मानाचे (ऐपती नुसार) २५/३० रुपये, सरी सारखा दागिना आणि वधू पक्षाचे कपडे'' याचा समावेश असतो. वर पक्ष विवाहामुळे कर्जबाजारी होवून आयूष्यभर सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी वेठबिगार बनतो. वरपक्षाचे लोक वधूकडे मागणी घालायला जातात. भिन्न कुलमानातंच लग्न होतात. सुतकी भाऊबंद असणारे कुलनामाअंतर्गत विवाह निषिद्ध मानतात.

विवाह सोहळा 'ताथ्या मांडवी' किंवा शिळ्या मांडवी असू शकतो. विवाह विधीत हळद, घटस्थापना, तेलावन, चुचकरन्, देवूक, मांडो, मानपान, शेवंती, टाळी, फळभरणं होम कन्यादान इ. विधी असतात. गोरजमुहुर्तावर वासराला गाई जवळ सोडतात. वासरू दुध प्यायला लागले म्हणजे अक्षता फेकतात.

विवाहपर्वू शरिरसंबंध निषिद्ध मानले जात नाहीत. विद्धवा विवाह आढळतो.

**अन्न** :–ठाकर लोकांचे मुख्य अन्न कंदमुळे आणि शिकार. ते बाजरी, भात, उडीद, कारळ, कुल्थी, वरई, नागली ही पिके आतिक्रमित जमिनीवर घेतात. जंगलात आढळणाऱ्या पुढील वनस्पतीचे कंद, पाने, अगर फुले यांची ते भाजी करतात वा खातात घोळ, म्हाकोडी, दौडी, तांबुलकंद, रानकेळी, मनचंदी, म्हाळू, गोमीळ्या, वाद, खरबुरी, हामन, बढदा, वा सुलेकंद, भातकंद, कोल्हाकंद, आबट्येल, शिरी, कुर्डु, चंदनबटवा, घळू, कोन्हळ, गेरसडा, आपटा, तिवस, शेवगा काचन, बहाल, केन्हळ इ

**शिकार** :–ठाकर पशुपक्षांची शिकार करतात. भाले, गलोल, तिरकामठे आणि गावठी बंदूक ही अवजारे शिकारीसाठी वापरतात. मासेमारी साठी जाळे व मुडे वापरतात. कधीकधी विषारी पाला ठेवून पाण्यात टाकून मासे मारतात. त्यांना आवश्यक असणारे ते शिकार करून आणतात. व आपसात वाटून खातात. मध, डिंक गोळा करतात.

**वनौषधी** :– ठाकरांना वनौषधींचे चागंले ज्ञान असून विविध आजारांवर ते उपचार स्वतःच करून घेतात. वनौषधींचा वापर करुन उपचार करणाऱ्या वैद्याला ते भगत असे म्हणतात. या परिसरात चांगला उपचार करणारा कै. गंगाराम नावजी पथवे ह्याची ख्याती होती. सध्या पुढील 'भगत' वनौषधीचा वापर करुन उपचार करतात.

राघो सावत – जेहुर (राजाची वाडी), तुळशीराम आगिवले काळदरी, कान्हूसावंत, दस्तापुर (सावंतवाडी), हेमासावंत, दस्तापुर( सावंतवाडी), आनंदा सोमा आवाले (शिपघाट) बाळु लक्ष्मण गेंगाळ, (महादेव खोरा) बुधा राया मधे (काळंकी), रखमा ढका पथवे (कळंकी), भिमा अबु पथवे (कळंकी), पुना कुशा पथवे, (कळंकी).

**अन्न पोषाख** :–

ठाकर लोकांचा पोषाख म्हणजे पुरुषांचा लंगोट, अंगात बंडी, व डोक्यावर पगडी, स्त्रियांचा मात्र आडवे लुगडे गुंडाळतात व डोक्यावर फडकी पांघरतात. स्त्रिया असंख्य काचेच्या मण्यांच्या माळा गळ्यात घालतात. विवाहित स्त्रिया कुंकू लावतात. पुरुष हल्ली हातात काठी व अंगावर घोंगडी घेतांना आढळून येत नाहीत.

**जाती पंचायत** :– ठकरांची जाती पंचायत असते. न्याय निवाडा करण्याचे

शिक्षा देण्याचे काम जाती पंचायत करते. स्थानिक पंचायतीच्या निर्णय मान्य नसल्यास समाज १४ गावांतून किंवा २१ गावांतून एकत्रित येवून न्याय निवाडा करतो. पंचायत भरविणारा पक्ष या पंचायतीचा खाण्या पिण्याचा खर्च करतो.

**नृत्य** :– कांबडनाच किंवा कोंबडीनृत्य हा नृत्याचा प्रकार ठाकरात आढळतो. पितृमोक्ष पक्षात नाचगाणेबंद असते. स्त्री – पुरुष स्वतंत्र नृत्य व गायन करतात. गाण्यांचा विषय, देवदेवता, पुराणे, धर्म यांचेशी असतो.

**बोली** :– ठाकर लोकांची स्वतंत्र बोली असून त्या बोलीला ठाकरी, ठाकरी बोली असे संबोधतात. त्यांच्या बोलीचा स्वतंत्र असा शब्द साठा आढळतो जसे – हरवा (भाला), साकन (जू बांधण्याचे दोर), वंगारी (गाडीचा नळा), कुरकुल (भाकरी ठेवण्याचे ढोपले), पीठा (पाठ), वसू (नागराचे इडे), ओघळ (नाला), लवन (शेताचा तुकडा), त्यांच्या बोलीत आहेत किंवा आहेत ऐवजी लिंगवचन पुरुष काल या नुसार आहू, आहात, आहे, अशी प्रत्यये आढळतात.

अशा प्रकारे अजिंठा डोंगर परिसरातील ठाकर हे ठाकर आदिवासी आहेत त्यांचे वर्णन हे कोकण, नगर, नासिक, भागातील ठाकरांशी जुळते. एवढेच नाही तर ते त्या भागातील ठाकरांशी बेटी व्यवहार करतात. नगर, नासिक, परिसरात त्यांचे नाते संबंध आहेत. हे ठाकर ठाकरच असून शासनाच्या नजरचुकीमुळे याठाकरांची ठाकर म्हणून नोंद घेतली गेली नाही त्यामुळे शासन त्यांना जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारुन शसन घोर अन्यायच करीत आहे.

या परिसरातील शाळेत जाणाऱ्या ठाकर मुलामुलींच्या प्रवेश अर्जावर व शाळेच्या टि. सी. वर ठाकर म्हणून नोंद असूनही महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना ठाकर म्हणून जातीचे प्रमाणपत्र देण्यास तहसीलदार व डेप्युटीकलेक्टर नकार देतात. त्यामुळे त्यांना जी. ओ. आय. स्कॉलरशीप मिळत नाही. पंचायत समिती, जिल्हा परिषद व शासन या ठाकरांकडे आदिवासींचे प्रमाणपत्र नसल्याने कोणत्याही शासकीय योजनेच्या प्रवाहात सामिल करुन घ्यायला तयार नाही. त्यासाठी शासनाने प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण करुन या ठाकरांची नोंद घेवून अजिंठा डोंगर परिसर सुद्धा आदिवासी पट्टा आहे. हे लक्षात घेवून तशी कागदोपत्री नोंद घेणे जरुरी आहे. त्या नोंदी शिवाय आणि आदेशाशिवाय तहसीलदार व डेप्युटीकलेक्टर जातीचे प्रमाणपत्र देवू शकणार नाही.


भारत देश आपली स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना या भारत मातेच्या आदिवासी बांधवांकडे दुर्लक्ष करणे हे अक्षम्य अपराधच ठरेल.

◆◆◆

– डॉ. रमेश सुर्यवंशी
(अभ्यासक/संशोधक),
१, सिद्धार्थ कॉलनी, कन्नड,
फोन (०२४३५) २१७१८

महाराष्ट्र राज्य अभयारण्य परिषदेस (चौथी)

# हार्दिक शुभेच्छा !



## राजकुमार (रज्जुसेठ) भारुका

### अध्यक्ष, तालुका पत्रकार संघ, कन्नड.

### गोविंदराव जिनींग ॲण्ड प्रेसींग प्रा. लि.

फोन नं. : २२१९९

### सिताराम शुगर इंडस्ट्रीज लि., औराळा

फोन नं. : २२१९९

### संतोषी सिनेमा थिएटर, कन्नड


### रामकृष्ण सिनेमा थिएटर

बस स्थानकाजवळ, कन्नड. फोन नं. : २११३८

प्रकाशक : पांडु किसन कडाळे, सरपंच चिवळी ता. कन्नड

मुद्रक :- मंगेश प्रिंटींग प्रेस, कन्नड.





GURGLING WATERS,
RUSTLING LEAVES,
CHIRPING BIRDS...





...OUR LIFE
SUPPORT SYSTEM.
CONSERVE IT


WILDLIFE DIVISION - THANE
FOREST DEPARTMENT MAHARASHTRA

# TANSA SANCTUARY

## -CATCHMENT FORESTS




The adobe of the three toed kingfisher and the black capped blackbird, and an important breeding ground for the yellow backed sunbird is how the legendary ornithologist Dr. Salim Ali described the forests of Tansa Sanctuary. Apart from wildlife values the most important value of this Sanctuary is that its forests form the catchment for two big lakes viz. the Tansa & the Vaitarana, supplying drinking water to the residents of Mumbai and neighbouring towns. Most tourists visit the sanctuary to spend sometime around the lakes. Another attraction for the people in general and trekers in particular is the trek up to the Mahuli fort (762mtrs.) a part of the historical legacy of Tansa Sanctuary. In addition to this if one considers the pleasant hill station weather of the Suryamal plateau (548 mtrs.) Tansa Sanctuary has a tremendous untapped tourism potential. The vegetation is predominantly representative of moist deciduous forests. Animal densities are on a lower side and sighting is difficult. However evidences confirming the presence of panthers, Hyaenas, Chousinga, Barking Deer are often seen. There are unconfirmed reports of the Rusty Spotted cat. The Sanctuary harbours a rich avifaunal population including wintering waterfowl.



# KARNALA BIRD SANCTUARY

## - BIRDING AROUND A FORT



An oasis amongst industrial growth is an apt description of Karnala Bird Sanctuary. Nestling in a valley, Karnala is a favourite gateway for many picnickers. Although most bird Sanctuaries in the country are associated with wetland birds, Karnala is different ..... harbouring a rich variety of woodland birds.... about 180 species including wintering migrants. Ashy Minivet and the Heartspotted Woodpecker, two rather rare birds have been sighted here. The vegetation here is of the Southern Moist deciduous type with a representation of semi-evergreen species in parts. The visitors to this Sanctuary are mostly day visitors, and a trek to the Karnala fort (funnel hill - as popularly known) is a normal feature of the visit. The climb which takes about an hour and a half allows the visitor a peep into the past..... the relics of a rich historical heritage not so uncommon in this part of the State. Inspite of a rich bird diversity, not many visitors appreciate this uniqueness of Karnala - the reason probably being the absence of an interpretation centre and proper signage and also another distraction being the few birds which are on display in various enclosures. Efforts are on to change all this so that the visitor can be made to OBSERVE and APPRECIATE rather just SEE and FORGET.




# PHANSAD SANCTUARY

## - A HIDEOUT WITH A DIFFERENCE




"A hideout it was"....being the hunting preserve of the erstwhile Nawab of Murud and "different it is" .... with the uniqueness of vegetation normally associated with high altitudes and inland areas. Phansad Sanctuary located amongst hills adjoining the coastal stretch of Murud and Roha Talukas of Raigad District is typical in its vegetation both in type and diversity. The almost perennial streams emerging out of nowhere at various places, having subclimax to climax vegetation, is another natural wonder of this Sanctuary. The Sanctuary has a very rich avifaunal and reptilian diversity apart from animals like Sambar, barking deer, wild boar, porcupine and the rather uncommon mouse deer. The importance of Phansad has of late been recognised and it is one of the few Sanctuaries receiving special attention under the Biodiversity Conservation Component of the Maharashtra Forestry Project. Habitat development works have been taken up alongwith vegetation monitoring plots. Participation of people in active conservation is also envisaged under the Eco-development programme. Phansad Sanctuary though not known very widely has a potential of attracting many a naturalist, wildlife researcher as well as the general visitor.






| | Notification | Area (sq. kms.) | Location | Accommodation |
|---|---|---|---|---|
| TANSA | WLP-1667/142822-Ydt 12-2-70<br>WLP-1085/CR-588/F-5dt 16-9-85 | 304.81 | Shahapur, Wada, Mokhada Taluka of Thane Dist. | Available at Tansa, Suryamal |
| KARNALA | WLP/1667/34846/Ydt 6-5-68 | 4.48 | 12 Kms. from Panvel | Available |
| PHANSAD | WLP/1085/CR-75/F-1 dt 25-2-86 | 53.52 | Murud & Roha Taluka of Raigad Dist. | Not available presently |



# CONTROLLING WILDLIFE TRADE

## - AWARENESS SHOULD BE THE KEY

The Wildlife Division, Thane was set up in the year 1982 with the objective of primarily controlling legal and illegal wildlife trade in and around the city of Mumbai. As a result of various amendments to the Wildlife (Protection) Act 1972, trade in almost all articles of wildlife origin is now prohibited. At present there are a few dealers in shed antlers and few dealers with captive animals who are to liquidate their stocks since new procurement is now very difficult under the provisions of the Act. Illegal trade in articles of wildlife origin is said to be only next in volume to trade in narcotics. The Division has been successful in seizures of articles of wildlife origin with the limited infrastructure available. Help of various Non-Governmental Organisations and individuals is sought for effective control. The key to control however lies in raising the general level of awareness amongst people.

For further details contact :
Deputy Conservator of Forests
Wildlife Division
Naupada, Thane (West) - 400 602
Tel : 5402522

Photographs : N. H. Kakodkar

...ned and printed by IMPULSE/96/192